**(सभापतीस्थानी मा. उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने अमरावती विभागातील फक्त बुलढाणा जिल्हा वगळता इतर सर्व जिल्ह्यातील कृषी पंपांना विद्युत पुरवठा करण्यासाठी अनुशेषामध्ये समाविष्ट केल्यामुळे सदर जिल्ह्यातील शेतक-यांवर होत असलेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री. अनंत तरे व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 9.4.2005 रोजी पालघर येथील जंगल रिसॉर्ट ॲण्ड वॉटर पार्कमधील तरण तलावात विजेचा प्रवाह उतरल्याने दहिसर येथील मायलेकींचा झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर मा.सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी "पुत्र प्राप्तीसाठी अकोला येथील एका विवाहितेला सासरकडील लोकांनी एका साधूच्या सेवेत ठेवल्यानंतर सदर ढोंगी साधूने या महिलेवर वारंवार केलेला बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

यानंतर मा.सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी यांनी "दिनांक 10 एप्रिल 2005 रोजी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात लागलेल्या आगीच्या वेळी तेथे अग्नीशमनाची प्राथमिक व्यवस्था नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

**(मा. उप सभापती** .......)

यानंतर मा.सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे व इतर वि.प.स. यांनी "राज्यातील शिक्षकांना वरिष्ठ व निवडश्रेणी लागू करण्यासंदर्भात निर्णय घेण्यास शासनाकडून होत असलेल्या विलंबामुळे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाने सुरु केलेले धरणे आंदोलन" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्यामुळे मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने या विषयावर निवेदन करावे.

इतर ज्या नियम 93च्या सूचना आलेल्या आहेत त्यांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

आता नियम 93च्या सूचनांवरील निवेदने घेण्यात येतील. त्यातील पहिले निवेदन मा.मंत्रीमहोदय सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे नंतर घेण्यात येईल.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील शेतक-यांच्या वीज पंपाचे तोडलेले कनेक्शन

**मु.शी.** : अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील शेतक-यांच्या वीज पंपाचे तोडलेले कनेक्शन याबाबत मा.सदस्य डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. दिलीप वळसे-पाटील (ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळता) मंत्री) : सभापती महोदय, मा.सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी "अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील शेतक-यांच्या वीज पंपाचे तोडलेले कनेक्शन" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 11:05

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, कृषी संजीवनी योजनेच्या संदर्भात शासन सातत्याने दावा करीत आहे की, या योजनेचा शेतक-यांना चांगला फायदा होणार होता. आपण निवेदनात म्हटले आहे की, ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असला तरी वाढीव मुदतीत या योजनेत सहभागी होऊन थकबाकी भरणा-या ग्राहकांची संख्या फार कमी आहे. पाथर्डी तालुक्याच्या संदर्भात स्पेसिफीक माहिती विचारण्याचे कारण असे आहे की, पाथर्डीमध्ये किती लोकांनी कृषी संजीवनी योजनेचा लाभ घेतलेला आहे ? या योजनेचा फायदा लोकांना मिळाला असता तर आम्हाला निवेदन करुन माहिती घेण्याची वेळच आली नसती. या योजनेचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे असे आपण म्हणत आहात. आम्ही अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यासंबंधी माहिती विचारली होती. सभापती महोदय, सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांचा अभ्यास चांगला आहे. जो स्पेसिफीक प्रश्न सोडून बाकीचा चांगल्या धोरणांचाच या ठिकाणी उल्ले्ख वारंवार निवेदनात करण्यात आलेला आहे. शासनाकडून मोठ मोठया घोषणा झाल्या, काही धोरणे जाहीर करण्यात आली. पाथर्डी तालुक्या संदर्भातील काहीही माहिती या निवेदनात देण्यात आलेली नाही. पाथर्डी तालुक्याच्या संदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी द्यावी.

श्री.दिलीप वळसे पाटील : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांच्या अभ्यासाबद्दल मला अजिबात शंका नाही. परंतु निवेदनातील पान क्रमांक 2 वरील तक्ता पाहिला तर त्यामध्ये पाथर्डी तालुक्याचीच माहिती दिलेली आहे. ती माहिती सन्माननीय सदस्यांनी वाचून घ्यावी.

---------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु.शी. : नियम 93 च्या निवेदनासंदर्भात.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, म्हाडामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात मी नियम 93 अन्वये सूचना आठ दिवसापूर्वी दिली होती. त्या निवेदनाच्या संदर्भात तीन दिवसात निवेदन करावे असे माननीय सभापतींनी आदेश दिले होते. सूचना देऊन जवळपास आजचा नऊ दिवस झालेले आहेत. परवा पुन्हा माननीय सभापतींनी आदेश दिले होते की, यासंबंधीचे निवेदन शुक्रवारी सभागृहात केले पाहिजे. शुक्रवारी माननीय सभापतींनी आदेश दिले की, सदर निवेदन सोमवारी सभागृहात केले गेले पाहिजे. परंतु आज देखील माझ्या सूचनेचे निवेदन आलेले नाही. माननीय सभापती महोदयांनी चार चार वेळा आदेश देऊनही विभागाकडून निवेदन करण्यात येत नसेल तर ती बाब गंभीर आहे

श्री. हर्षवर्धन पाटील : या म्हाडाच्या संदर्भात दिलेल्या सूचनेची दखल घेण्यात आलेली आहे. या सूचनेच्या संदर्भात उद्या निवेदन करण्यात येईल. आज अर्बन डेव्हपलमेंट विभागासंबंधी 93 चे एक निवेदन करावयाचे होते. ते निवेदन दुस-या संबंधित विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे.

---------------------

**उप सभापती** : मी सदस्यांना सांगू इच्छितो की, निवेदनावर आपण एकच प्रश्न विचारण्यास परवानगी देत असतो. अपवादात्मक बाब म्हणून दोन-तीन प्रश्न विचारण्यास संधी मी उपलब्ध करुन देतो. विधानसभेत निवेदने सभागृहाच्या पटलावरच ठेवण्यात येतात. आपल्याकडे प्रश्न विचारण्याची तरी सवलत आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर भरपूर काम दाखविण्यात आलेले आहे. ते काम आपल्याला पूर्ण करावयाचे आहे. सदस्यांना विनंती आहे की, प्रत्येक निवेदनावर सदस्यांनी ऐककच प्रश्न विचारावा म्हणजे आजचे कामकाज आपल्याला पूर्ण करता येईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 11:05

**पृ. शी.** : गेवराई (जि.बीड) येथील भीमसिंह महाराज मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थी कु.दत्ता राठोड याचा झालेला खून.

**मु. शी.** : गेवराई (जि.बीड) येथील भीमसिंह महाराज मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थी कु.दत्ता राठोड याचा झालेला खून याबाबत सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे,डॉ.दीपक सावंत,श्री.विलास अवचट,डॉ.अनिल परब,श्रीमती संजिवनी रायकर, श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे,डॉ.दीपक सावंत,श्री.विलास अवचट,डॉ.अनिल परब,श्रीमती संजिवनी रायकर,श्री. रामनाथ मोते, डॉ. अशोक मोडक यांनी " गेवाराई (जि.बीड) येथील भीमसिंह महाराज मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थी कु.दत्ता राठोड याचा झालेला खून " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------------------

4...



डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, राखून ठेवलेले निवेदन आहे त्यावर आपण आज चर्चा करणार आहोत. एका मुलाचा मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्राच्या शौचालयाच्या टाकीमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सापडलेला आहे. यासंदर्भात पूर्वी जे निवेदन वितरीत केले होते ते निवेदन आणि आज जे निवेदन वितरीत केलेले आहे यामध्ये काही फारसा फरक दिसत नाही. या विद्यार्थ्याने चांगले जेवण मिळत नव्हते अशी तक्रार केली म्हणून त्याचा खून झाला असा त्यांचा वडीलांचा आरोप आहे. याबाबतीत शासनाकडे कोणती माहिती आहे ? या प्रकरणी तीन आरोपी पकडले आहेत त्यामध्ये कोणकोणाचा समावेश आहे ? या प्रकरणी दोषारोपपत्र कधी सादर करण्यात येईल ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, वसतिगृहामध्ये चांगले जेवण मिळत नाही अशी हा विद्यार्थी आपल्या वडीलांकडे वारंवार तक्रार करावयाचा. सदर विद्यार्थी बेपत्ता झाला, तदनंतर त्या विद्यार्थ्याचा मृतदेह आढळून आला. दुस-या दिवशी तेथे येऊन त्या विद्यार्थ्यांच्या वडीलांनी येऊन सांगितले की, या ठिकाणच्या जेवणाबद्दल माझा मुलगा नेहमी तक्रार करीत होता. जेवणाच्या तक्रारीमुळे माझ्या मुलाचा खून केला गेला असे त्याच्या वडीलांनी जबाब दिलेला आहे. या प्रकरणी कलम 302 व 201 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या संस्थेची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. सदर प्रकरण लवकरच कोर्टात जाणार आहे.

श्री. धोंडीराम राठोड : एक मागासवर्गीय विद्यार्थी मागासवर्गीय वसतिगृहात रहातो आणि त्या वसतिगृहातील व्यवस्थेबाबतीत वारंवार तक्रार करतो. वसतिगृहाची तक्रार केली म्हणून त्या विद्यार्थ्याचा खून केला गेला. शाळेची मान्यता रद्द केल्याने कु.दत्ता राठोड जीवंत होणार आहे काय ? अशा पध्दतीने जर विद्यार्थ्यांचा छळ वसतिगृहांमध्ये होत असेल तर नुसती शाळेची मान्यता काढून कसे चालेल. त्या संस्था चालका विरुध्द कारवाई केली पाहिजे. या वसतिगृहाचा अधीक्षक आहे त्याच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. जर कारवाई केली नाही तर तक्रार करणा-या विद्यार्थ्यांचे अशाच प्रकारे खून करण्यात येतील. शासनाकडून अनुदान विद्यार्थ्यांचे खून करण्यासाठी देण्याता येतात काय ? या सर्व गोष्टींचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संस्थेच्या अधिक्षकांवर 302 चा गुन्हा दाखल करण्यात येईल.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, सदरहू वसतिगृहाची तपासणी वर्षातून किती वेळा करण्यात आली ? त्यामध्ये काही आढळून आले काय ? या संस्थेच्या अन्य ठिकाणी काही शाळा आहेत काय ? त्या कशा चालतात आणि या शाळांवर सुध्दा कारवाई केली जाईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या संस्थेची दुसरी कुठलीही शाळा नाही. शाळेची तपासणी करण्यासाठी पोलीस निरीक्षक गेले होते. तसेच त्या अगोदर समाजकल्याण खात्याच्या संचालकांनी देखील भेट देऊन चौकशी केली होती आणि त्याप्रमाणे अहवाल दिलेला आहे.

-----

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: डिझेल शुल्कावरील सवलत रद्द केल्यामुळे
मच्छिमारांनी पुकारलेला संप.

**मु.शी.**: डिझेल शुल्कावरील सवलत रद्द केल्यामुळे
मच्छिमारांनी पुकारलेला संप याबाबत सर्वश्री अनंत तरे,
डॉ.दीपक सावंत,श्री.अरविंद सावंत,ॲड.अनिल परब,
वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयंत पाटील (अर्थमंत्री): सभापती महोदय, सर्वश्री अनंत तरे,डॉ.दीपक सावंत,श्री.अरविंद सावंत,ॲड.अनिल परब,वि.प.स. यांनी डिझेल शुल्कावरील सवलत रद्द केल्यामुळे मच्छिमारांनी पुकारलेला संप या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढील निवेदन करीत आहे :-

मुल्यवर्धित कर प्रणालीमध्ये कोणत्याही नमुन्याच्या आधारे विक्री/खरेदीवर करमाफी देणे अभिप्रेत नाही. तसेच, मुंबई विक्रीकर कायद्याखाली काही व्यक्ती/संस्था यांना कलम 81 खाली अधिसूचनेद्वारे आंशिक अथवा पूर्णत: करमाफी ठराविक अथवा अमार्याद कालावधीसाठी देण्यात आली होती. आता तशी करमाफी देण्याचे प्रावधान नवीन मुल्यवर्धीत कर कायद्याखाली नाही.

याबाबत सर्व राज्यांसाठी नियुक्त केलेल्या राज्य अर्थमंत्र्यांच्या शक्ती प्रदत्त समितीने (Empowered Committee) निश्चित केलेल्या वरील धोरणामध्ये एकतर्फी बदल करण्याचे अधिकार राज्य शासनास नाही. काही विशिष्ट परिस्थितीमुळे, म्हणजेच मुल्यवर्धित कर कायद्याच्या कलम (8) अन्वये देशाबाहेर माल निर्यात करणारे व्यापारी, आंतरराज्य विक्री करणारे व्यापारी, विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) मधील व्यापारी, 100% निर्याताभिमुख घटक ( E.O.U.) साफ्टवेअर टेक्नोलॉजी पार्क व सामुहिक प्रोत्साहन योजनेखालील व्यापारी यांच्या विक्रीकर कर माफी अनुज्ञेय आहे. त्यांना देखील करमुक्त खरेदी करता येणार नाही. परंतु त्यांनी खरेदी करतांना भरलेल्या कराचा रोख परतावा देण्याची आवश्यकता असल्याने तशी तरतूद कायद्यामध्ये केलेली आहे.

त्याव्यतिरिक्त कोणत्याही व्यापारी अथवा व्यक्ती अथवा संस्थेला करमाफी देण्याचा अधिकार कोणत्याही राज्याला राहिलेला नाही. तसेच, करांच्या सर्वमान्य दरात देखील एकतर्फी बदल करण्याचा अधिकार राज्यांना नाही. मुल्यवर्धित कराची अंमलबजावणी करताना जर विक्री कराच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ....

महसुलात तुट आली तर त्याची भरपाई पुढील तीन वर्षे केंद्र सरकारकडून करण्यात येणार आहे. एखाद्या विशिष्ट वर्गासाठी मुल्यवर्धित कराच्या धोरणाविरुध्द विक्रीकराची माफी दिली किंवा विक्रीकरांवर सवलत दिली तर केंद्र शासनाकडून नुकसान भरपाई मिळण्यामध्ये अडचणी निर्माण होतील व मोठे आर्थिक नुकसान होईल.

सवलतीची योजना विक्रीकर विभागामार्फत न राबविता मत्स्य विभागामार्फत राबविणे उचित होईल याबद्दल चर्चा झालेली आहे. मुल्यवर्धित कर प्रणालीमुळे बंद होणा-या सवलतीच्या अनुषंगाने मच्छिमार संस्थांचे पदाधिकारी व अधिका-यांच्या सोबत झालेल्या बैठकीमध्ये "मच्छिमार सहकारी संस्थांना विक्रीकर डिझेल पुरवठा करण्याच्या योजनेऐवजी मत्स्य व्यवसाय विभागाकडून प्रस्तावित होणा-या पर्यायी अनुदान योजना स्विकारण्याची तयारी असेल तर राज्य शासन मच्छिमार सहकारी संस्था व त्यांना तेल पुरवठा करणा-या कंपन्या यांच्याकडील दिनांक 31 मार्च, 1997 पूर्वीची विक्रीकर थकबाकी माफ करण्याचा शासन विचार करेल" असे प्रस्तावित करण्यात आले. सदर प्रस्तावास सहकारी मच्छिमार संस्थांच्या पदाधिका-यांनी सहमती दर्शविली तसेच मत्स्य विभागाच्या अधिका-यांनी पर्यायी योजना त्वरित सादर करण्याचे मान्य केले.

तथापि, एक महिन्यापर्यंत 1 तारखेपासून 30 तारखेपर्यंत विशेषत: उद्यापासून 30 तारखेपर्यंत मच्छिमारांच्या बोटी समुद्रामध्ये जाणे थांबलेले आहे त्याच्यावर गदा येऊ नये म्हणून काल मत्स्यव्यवसाय विभागाला 10 कोटी रुपये सीएफ ॲडव्हान्समधून देऊन 30 तारखेपर्यंत किंवा निर्णय होईपर्यंत साधारणत: 16 तारखेला निर्णय होईल तोपर्यंत रकमेची व्यवस्था करण्यात आली आहे. आज दुपारी तेल कंपन्यांना सचिव(पदुम) यांच्याकडून सूचना जातील. आयुक्त(मत्स्यव्यवसाय) हे तेल कंपन्यांना कळवतील.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील ..

कदाचित आज दुपार पासून किंवा उशिरात उशिरा उद्या सकाळ पासून पूर्वी प्रमाणे त्यांना डिझेल देण्याची व्यवस्था केली जाईल.त्याचबरोबर 16 एप्रिल 2005 रोजीच्या बैठकीत जो निर्णय होईल त्याप्रमाणे आपण कार्यवाही करणार आहोत. आपण जे काही करीत आहोत ते खरे म्हणजे व्हायोलेशनच आहे. परंतु या सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन ही विशेष प्रोव्हीजन आपण करीत आहोत. 30 एप्रिल 2005 पर्यन्त त्यासाठी आपण मर्यादा ठेवणार आहोत. देशातील सर्व राज्यांनी थोडे फार व्हायोलेशन केलेले आहे परंतु महाराष्ट्र आणि इतर एक दोन राज्यांनी मात्र अजिबात व्हायोलेशन केलेले नाही. दुस-यांची व्हायोलेशन्स आपण 16 एप्रिल 2005 रोजी टेबल करणार आहोत. 30 एप्रिल 2005 पर्यन्त हे व्हायोलेशन दाखवून 30 तारखेपर्यन्त अशा पध्दतीने त्यांना डिझेल देण्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच हा विषय 16 तारखेला होणा-या शक्ती प्रदत्त समितीसमोर मांडण्यात येणार आहे. त्यावेळी जो निर्णय होईल त्या अनुषंगाने सरकार निर्णय घेईल आणि त्याची माहिती नंतर आपल्याला देण्यात येईल.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: व्हॅट कायद्याच्या विरोधात व्यापा-यांनी केलेले आंदोलन

मु.शी.: व्हॅट कायद्याच्या विरोधात व्यापा-यांनी केलेल्या आंदोलनाबाबत श्री. कन्हैयालाल गिडवाणी वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.जयंत पाटील ( वित्त मंत्री )सभापती महोदय, श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी व्हॅट कायद्याच्या विरोधात व्यापा-यांनी केलेले आंदोलन या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : सोलापूर विद्यापीठाला अनुदान देणे

मु.शी : सोलापूर विद्यापीठाला अनुदान देण्यासंबंधी सर्वश्री रणजितसिंह मोहिते पाटील,विनायकराव मेटे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील ( सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" सोलापूर जिल्हयातील जनतेने प्रदीर्घकाळ लावून धरलेल्या मागणीनुसार शासनाने दिनांक 1 ऑगस्ट 2004 रोजी सोलापूर विद्यापीठाची स्थापना करणे, विद्यापीठाला सुमारे 9 कोटी 75 लाख रुपये अनुदान तसेच 44 लाख रुपये विकास निधी देण्याचे सन 2004 च्या हिवाशी अधिवेशनात दिनांक 17 डिसेंबर 2004 रोजी शासनाने ठोस आश्वासन देऊनही त्याबाबत अद्यापपावेतो कोणतीही पूर्तता झाली नसल्याने तसेच चालू अर्थसंकल्पामध्ये तरतूद नसल्याने विद्यापीठाच्या तिजोरीमध्ये निर्माण झालेला खडखडाट, परिणामी विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भीती, तसेच निर्माण झालेले अनिश्चिततेचे वातावरण,विद्यापीठाने शासनाकडे 500 एकर जमिनीची मागाी केलेली असतांना हिवाळी अधिवेशनात आश्वासन मिळूनही ती मागणी अपूर्ण असल्यामुळे फक्त 38 एकरांच्या जागेत विद्यापीठाचा कारभार करण्याची आलेली पाळी,तसेच विद्यापीठातील 295 कर्मचा-याची पदे रिक्त असल्यामुळे व यू.जी.सी.तसेच कोल्हापूर विद्यापीठाकडून अजूनही कोणत्याही प्रकारचे अनुदान न मिळाल्यामुळे विद्यापीठाचे कामकाज कसे चालवावे याबद्दल निर्माण झालेला यक्ष प्रश्न तसेच शासन स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठांना परवानगी देत असतांना शासनाची स्वत:ची विद्यापीठे अपंग राहतील अशी सोलापूर जिल्हयात व संपूर्ण महाराष्ट्रात परिस्थिती निर्माण होणे याबाबत शासनाने तातडीने करावयची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..

श्री.सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** :निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5...

- निवेदना नंतर -

श्री.रणजितसिंह मोहिते -पाटील : सभापती महोदय, प्रथम मी शासनाला मनापासून धन्यवाद देतो. 2004 साली सोलापूर जिल्हयासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती. सोलापूर हा दुष्काळी भाग आहे आणि या दुष्काळी भागाचा विचार करता सरकारने सोलापूर जिल्हयासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना केलेली आहे.पूर्वी सोलापूर जिल्हा हा शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत होता आणि चार जिल्हयासाठी ते विद्यापीठ होते. परंतु एकंदर सामाजिक परिस्थिती आणि अंतर याचा विचार करुन सोलापूरला स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यास मान्यता मिळाली आहे. माननीय वित्त मंत्री श्री.जयंत पाटील यांचे सुध्दा मी मनापासून आभार मानतो त्यांनी तातडीने एक कोटी रुपये या विद्यापीठासाठी तातडीने तरतूद केली होती.मला या ठिकाणी एका गोटीचा आवर्जून उल्लेख करावयाचा आहे की, दिनांक 17डिसेंबर 2004 रोजी 44 लाख रुपयांचा विकास निधी देण्याच्या बाबतीत आश्वासन दिले होते तसेच 9 कोटी 75 लाख रुपये अनुदान देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु अद्यापी ही तरतूद मिळू शकली नाही. तसेच या वर्षीच्या अर्थसंकल्पात सुध्दा तरतूद करण्यात आलेली नाही.हया विद्यापीठासाठी लवकरात लवकर निधी देण्यात येणार आहे काय ? त्याचबरोबर मला दुसरा प्रश्न असा विचारावयाचा आहे की, कोल्हापूर विद्यापीठाच्या अंतर्गत  येणा-या चार जिल्हयाकरता  सालापूर विद्यापीठ स्थापन झालेले आहे तेव्हा कोल्हापूर विद्यापीठाचा विकास निधी आणि विद्यार्थी परीक्षा फीची रक्कम 52 कोटी रुपये होते त्यातील 25 टक्के रक्कम जरी देण्याचे ठरविले तरी ती रक्कम 13 कोटी रुपये इतकी होते तेव्हा कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाकडून ही रक्कम सोलापूरच्या विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यासाठी शासन विचार  करणार आहे  काय ? त्याचप्रमाणे जे निवेदन वितरित करण्यात आलेले आहे त्यात असे म्हटलेले आहे की, 295 पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे सबंधित विभागाकडे हा प्रस्ताव प्रलंबित आहे असेही त्या निवेदनात म्हटलेले आहे. मला माननीय मंत्रिमहोदयांना आवर्जून असा प्रश्न विचारावयाचा आहे की, 295पदे निर्माण करण्यासंबंधीचा प्रस्ताव 9 मार्च 2005 रोजी शासनाकडे पाठविण्यात आला होता तो केव्हा मंजूर करण्यात येणार  आहे ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, या सोलापूर विद्यापीठासंबंधात आपण नागपूर अधिवेशनामध्येसुद्धा चर्चा केली होती त्यावेळेस आपण आश्वासन दिलेले होते. यामध्ये दोन खास मुद्दे होते. एक तर तेथे जमीन आहे की नाही आणि दुसरा मुद्दा म्हणजे पैशासंबंधीचा. त्या ठिकाणी गृह खात्याची 500 एकर जमीन आहे ती या सोलापूर विद्यापीठासाठी मिळावी म्हणून आपण विनंती केली होती पण अजून त्याबाबत निर्णय झालेला नाही. ती जमीन देता येणार नाही असे आपल्याला गृह विभ्ांगाने सांगितले आहे. त्यामुळे आता आपण माननीय मंत्री महोदय, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांना सांगितले आहे की, आपणच या संबंधात गृह विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा करावी. त्याप्रमाणे त्यांच्या कमीत कमी 3-4 बैठका या संदर्भात झालेला आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील हे देखील त्या बैठकांना हजर होते. अध्यक्ष महाराज, जोवर ती जमीन आपल्या ताब्यामध्ये येत नाही तो पर्यंत आपल्याला ती विद्यापीठाच्या ताब्यात देता येत नाही आणि त्यामुळे पैसे देखील विद्यापीठाकडे देता येत नाहीत. कारण जमीनच नाही तर मग पैसे देऊन तरी काय होणार आहे ? तशी आपण बजेटमध्ये यासाठी तरतूद केलेली आहेच. गेल्या वर्षी देखील आपण 1 कोटी रुपये या विद्यापीठासाठी म्हणून दिलेले होते आणि या वर्षी देखील दिलेले आहेत. आता विद्यापीठाकरिता लागणाऱ्या पदांच्या बाबतचे प्रपोजल आलेले आहे पण अजून तेथे जमीन वगैरे काहीच नाही तर पदे तशी कशी देता येणार आहे. म्हणूनच नियोजन व वित्त विभागाने या बाबत सांगितले आहे की, गरज लागेल त्याप्रमाणे तुम्हाला पदे घेण्यास आम्ही परवानगी देऊ.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, माननीय अर्थमंत्री आता येथे उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये असे सांगितलेले आहे की, यापुढे येत्या वर्षामध्ये आम्ही अशा प्रकारची व्यवस्था निर्माण केलेली आहे की, कोठल्याही खात्याला अर्थखात्याकडे पैसे पेंडिंग आहे असे कारण देता येणार नाही अशी व्यवस्था आम्ही केलेली आहे. अध्यक्ष महाराज, माननीय अर्थमंत्र्यांनी या सदनाच्या माध्यमातून अर्थसंकल्पिय भाषणातून हे जे आश्वासन दिलेले आहे त्याचा भंग करून माननीय राज्य मंत्री सांगत आहेत ....

श्री. सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, मी तसे सांगितलेलेच नाही. मी असे सांगितले की, आम्ही जमीन ताब्यात आल्यानंतर तेथे बिल्डींग प्लान्स वगैरे झाल्यानंतर त्याचे प्रपोजल पैशासाठी पाठवू, ... तसेच पदे निर्मितीच्या बाबतीत देखील असे सांगितले आहे की, विद्यापीठ तयार झाल्या

..... इ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी ....

नंतर तेथे आवश्यक ती पदे निर्माण करण्यासाठी तुम्ही आमच्याकडे या आम्ही तुम्हाला ती मंजूर करून देऊ.

श्री. धनाजी साठे : अध्यक्ष महाराज, सोलापूर जिल्ह्यासाठी आपण हे स्वतंत्र विद्यापीठ दिले परंतु त्यासाठी ज्या सोयी पाहिजेत तशा कोठल्याही प्रकारच्या सोयी आज तेथे उपलब्ध नाहीत. विद्यापीठासाठी नोकर भरती करण्यात आलेली नाही. पाहिजे तो स्टाफ देखील दिलला नाही. त्यामुळे तेथील जनतेची अशी भावना आता झालेली आहे की, या विद्यापीठामुळे आपल्या विद्यार्थ्यांचे नुकसान तर होणार नाही ना ? ही भावना तेथे वाढीस लागू नये यासाठी तरी या विद्यापीठासाठी निधीची पूर्तता करून गरजेनुसार स्टाफ भरण्याची व्यवस्था केली जाईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : अध्यक्ष महाराज, सन्माननीय मंत्री श्री.विजयदादा मोहिते-पाटील यांनी या संदर्भात 3-4 बैठका घेतल्या आहेत हे तर मी यापूर्वी सांगितलेले आहेच. तेवहा पंधरा एक दिवसात याबाबत बैठक घेऊन त्यांनी ही जमिनीची समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा. जमीन ताब्यात आली की, आम्ही बाकीचे प्रपोजल एक्स्पिडाइट करू.

श्री. बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, नवीन विद्यापीठ आले की जो त्रास तेथे होतो तो सगळा त्रास याही विद्यापीठाच्या बाबतीत होतो आहे. या साठी आपल्याकडून निधी जाणे हा वेगळा विषय आहे. पण त्यांचा हक्काचा जो निधी आहे तो निधी तरी या विद्यापीठाला त्वरित मिळालाच पाहिजे. अध्यक्ष महाराज, अमरावती विद्यापीठ जेव्हा निर्माण झाले होते तेव्हा नागपूर विद्यापीठाकडून जो निधी अमरावती विद्यापीठाला मिळावयास पाहिजे होता, जो अमरावती विद्यापीठाचा हक्काचा होता तो मिळण्यास देखील 2-3 वर्षे लागली आहेत. आता या लक्षवेधी सुचनेमध्ये नोटीस देखील दिलेली आहे. कोल्हापूर विद्यापीठाकडे सर्व विद्यार्थ्यांच्या परीक्षांतून जो विकास निधी जमा होता तो जवळपास 50-60 कोटी रुपये इतका आहे. तेव्हा तो निधी तरी या सोलापूर विद्यापीठाला दिला गेला पाहिजे. अध्यक्ष महाराज, जमिनीची जी अडचण आहे त्याबाबत मला अधिक माहिती नसल्याने मी त्याबाबत काही आता बोलत नाही. परंतु नवीन होणाऱ्या विद्यापीठाला येणाऱ्या अडचणींची मला जाणीव असल्याने मी विचारू इच्छितो की, या सर्व चारही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकडून जो विकास निधी या सोलापूर विद्यापीठासाठी म्हणून जमा झालेला आहे त्यापैकी प्रपोर्शनेटली निधी द्यायला काय हरकत आहे ? तर तो निधी किती आहे आणि तो ताबडतोबीने द्यावयाचा असल्याने केव्हा देणार आहात ? ( यानंतर श्री.जागडे ....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सोलापूर विद्यापीठाला जो प्रपोर्शनेटली निधी द्यावयाचा आहे तो आपण देऊ.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, एकूण किती रक्कम सोलापूर विद्यापीठाला द्यावयाची आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, त्याचा आकडा आता मजजवळ नाही. सोलापूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या प्रमाणात हा निधी सोलापूर विद्यापीठाला देण्यात येईल.

प्रा. बी. टी. देशमुख : एकूण किती निधी द्यावयाचा आहे, याचा आग्रह मी धरत नाही. या चारही विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कातून जमा झालेला विकास निधी सोलापूर विद्यापीठाला ट्रान्सफर करण्याबाबतची कार्यवाही किती दिवसात पूर्ण करण्यात येईल ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, एक महिन्यात हा निधी सोलापूर विद्यापीठाकउे वर्ग करण्यात येईल.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विकास महामडळात झालेला भ्रष्टाचार.

**मु.शी.**: पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विकास महामडळात झालेला भ्रष्टाचार यासंबंधी सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, डॉ. अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे, श्री. मधुकर चव्हाण, डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रकाश शेंडगे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : अध्य□महोदय, मी □□म 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वज□□ महत्वाच्या बाबी□डे आपल्या अ□मती□ स□□□य पशुसंवर्धन मंत्र्यांचे ल□वेधू इच्छितो आ□ याबाबत त्यां□ □□द□□रावे, अशी वि□ी □रतो.

" दि-ांज 10 डिसेंबर, 2004 रोजी विधा-ापरिषद सभाजृहात पुज्यश्लोज अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विजास महामंडळातील भ्रष्टाचारासंबंधीची लजवेधी सूच-ाा चर्चेला आली असता वाडे बांधजाम व शेळया-मेंढया जरेदी यासाठी महामंडळा-ो जी निविदा माजविली होती त्यास स्थजिती देज्याचा व संपूर्ज प्रजरजाची चौजशी जरज्याचे आश्वास-ा पशुसंवर्ध-ा मंत्री महोदयां-ाी दिले तथापि -ााजपूरचे हिवाळी अधिवेश-ा संपताच सदरहू स्थजिती उठविज्यात येजे, लाभार्थी-ाा द्यावयाच्या शेळया-मेंढया तसेच बांधजामाचे साहित्य हे त्यां-ाा जर्जाच्या रक्जमेतू-ा देज्यात येजे, बांधजाम साहित्यामध्ये देज्यात आलेले लोजंडी पाईप, पत्रे व जाळया हे सर्व साहित्य निजृष्ट दर्जाचे असजे, या साहित्यासाठी 30 हजार रुपयांचे जर्ज लाभार्थ्यांच्या माथी मारजे तथापि त्याबदल्यात देज्यात आलेल्या साहित्याची जिंमत जेवळ 5 ते 6 हजार रुपये असजे, शेड, वाडे बांधज्याचे जंत्राट बांधजामाचा जुठलाही अ-ाुभव -ासलेल्या यवतमाळ येथील फर्निचर दुजा-ादाराला संपूर्ज महाराष्ट्राचे साहित्य पुरविज्यासाठी देज्यात येजे, प्रत्यजात बांधजामाचे साहित्य लाभार्थीला स्वत: घेऊ-ा देजे अपेजित असतां-ाा त्यांच्या माथी जर्जाचा मोठा बोजा लादू-ा त्याची जमी-ा जहाज ठेवज्यास भाज पाडजे, लाभार्थ्यां-ाा द्यावयाच्या शेळया-मेंढयांसाठी निविदा जाढज्यात येजे व ते देजिल ध-ाजर समाजाच्या व्यक्तीला -ा देता एजा बिल्डरला देज्यात येजे, शेळया-मेंढयांची जिंमत रु. 50 ते 55 प्रति जिलो असा बाजारभाव असतां-ाा निविदेद्वारे 80 रुपये प्रति जिलो लाभार्थ्यांच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे......

माथी ज्ज रुपा-ने मारु-ा त्यांची प्रचंड फसवजूज जरजे, जाद्यासाठी असलेली रक्जम 1 जोटी 75 लाज रुपये वाडे व शेळया देज्याच्या आधीच संपविजे, हे ज्ज मंजूर जरज्यासाठी संचालज मंडळा-ने या संपूर्ज प्रज्रजात लाभार्थींचे जमिश-ा म्हजू-ा लाजो रुपये उज्ळज्यात येजे, या सर्व जैरव्यवहाराच्या विरोधात आंबेजोजाई, जि. बीड येथे लाभार्थी-ाी दि-ांज 14 मार्च, 2005 रोजी पासू-ा जेलेले आमरज उपोषज व त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, लाभार्थ्यां-ाा -याय देज्याची आवश्यज्ता व याबाबत शास-ा-ने जरावयाची तातडीची उपाययोज-ाा. "

श्री. हसन मुश्रीफ ( पशुसंवर्धन राज्यमंत्री) : अध्य□ महाराज, ल□वेधी सूच□संबंधीच्या ि□वेद□च्या प्रती मा□□ीय सदस्यां□ आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते ि□वेद□ आपल्या अ□मती□ सभा□हाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : ि□वेद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

ि□वेद□

( प्रेस : येथे सोबतचे ि□वेद□ छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने हा विषय सभागृहात चर्चेला आला होता. त्यावेळी शेळी मेंढी विकास महामंडळात झ ाालेल्या भ्रष्टाचाराबाबत निवेदन करण्यात होते. बांधकाम व शेळ्या मेंढ्या खरेदी यासाठी महामंउळाने जी निविदा मागविली होती, त्यास स्थगिती देण्यात आली होती आणि या सर्व प्रकाराची चौकशी करण्यात येईल, असे मा. मंत्रिमहोदयांनी सांगितले होते. परंतु अधिवेशन संपल्यानंतर ती स्थगिती उठविण्यात आली. ही स्थगिती घाईघाईने उठवून ज्या ठिकाणभ पाच ते सहा हजार रुपये खर्च येणार होता, त्या शेडसाठी 30 हजार रुपये खर्च करण्यात आले आहेत. कोणत्याही प्रकारची चौकशी न करता, स्थगिती उठविण्यात आली. म्हणून यामध्ये जे अधिकारी दोषी आहेत, त्यांच्या विरुध्द तसेच संचालक व अध्यक्षांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनात या महामंडळाच्या कारभाराबाबत चर्चा झाली होती. त्या प्रमाणे या कार्यवाहीला त्यावेळी स्थगिती देण्यात आली होती. या महामंडळामार्फत शेडच्या बांधकामासाठी लाभार्थींना ॲडव्हान्स दिला होता. चारा आणि औषधे वितरीत झाली होती. एवढा पैसा वितरीत झाल्यानंतर लाभार्थींकडून ओरड झाली की, शेडचे बांधकाम त्वरीत करावे. त्यामुळे या बाबतची स्थगिती उठविण्यात आली होती. परवा मी औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने निवेदन केले आहे. आयुक्त ( मत्स्यव्यवसाय विभाग ) यांच्यामार्फत या बाबतची सखोल चौकशी करतील. यामध्ये ज्यांच्याकडून दोष झाले असतील तर त्यांच्याविरुध्द कारवाई करु. आताही माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबत जर त्यांच्या काही तक्रारी असतील तर त्या बाबत निश्चितपणे आयुक्तांच्या मार्फत चौकशी करु. तसेच यामध्ये जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्याविरुध्द कारवाई करु.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याबाबत अगोदरच अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. शेळी-मेंढी विकास महामंडळ 1978 साली स्थापन झाले आहे. या महामंडळाला 1978 पासून फक्त साडेचार कोटी रुपये देण्यात आले आहेत. दि. 30.11.03 रोजी या महामंडळाला 20 कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. परंतु 16 तारखेला फक्त 10 कोटी रुपयेच वितरीत करण्यात आले आहेत. सभापती महोदय, या बाबतचा मुळ शासन निर्णय पाहण्यायची आवश्यकता आहे. या ठिकाणी वाडे हे लाभार्थींनी बांधावयाचे आहेत. परंतु तेथील संचालक मंडळाने तसेच

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर......

अध्यक्षांनी वाडे लाभार्थींनी न बांधता त्या बाबतचे टेंडर काढावे, अशा प्रकारचा दबाव तेथील व्यवस्थापकीय संचालकांवर टाकला होता. व्यवस्थापकीय संचालकांने न ऐकल्यामुळे पुन्हा माननीय मंत्रिमहोदयांकडून तसेच अध्यक्षांकडून त्यांच्यावर दबाव टाकला होता. त्यानंतर व्यवस्थापकीय संचालकांने न ऐकल्यामुळे त्यांची बदली करण्यात आली. कोणत्याही प्रकारची वित्त विभाग, तसेच संबंधीत विभागाची परवानगी न घेता उपसचिव श्री. भाईटे यांनी या बाबतचा जी. आर. काढला आणि हे काम सुरु केले. जे वाडे पाच हजार रुपयांत बांधले गेले असते, त्यांच्यासाठी 30 हजार रुपये खर्च करण्यात आले आहे. तशा प्रकारच्या निविदा काढण्यात आल्या. यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. वाडे लाभार्थीनी बांधले पाहिजे, असा मुळ निर्णय होता.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

वाडे त्यांच्या सोईने बांधणे आवश्यक असतांना टेंडरचा आग्रह संचालक मंडळाने धरुन त्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार केला याची आपण चौकशी करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पहिल्यांदा वाडे त्या लाभार्थींनी बांधण्याचे ठरले होते. महामंडळाने ठराव केला व त्यांनी सांगितले की, ते स्पेसिफिक मापामध्ये बांधत नाहीत व त्याचे योग्य पध्दतीने युटिलायझेशन होणार नाही. म्हणून टेंडर प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने करावी यादृष्टीने टेंडर काढले.

श्री. पांडुरंग फुंडकर : 30 हजार रुपयाचे टेंडर काढता, ही पारदर्शक पध्दत कशी म्हणता? शासनाने घेतलेला निर्णय, कॅबिनेटमध्ये झालेला निर्णय संचालक मंडळ बदलते? हे संचालक मंडळ आपल्या सोईने काम करुन त्यांनी भ्रष्टाचार केला आहे. मी आपणास पुन्हा सांगतो की, स्पेसिफिकेशनप्रमाणे ते वाडे बांधले पाहिजेत ते लाभार्थी बांधू शकत नाही कां? तुम्ही लाभार्थींना योजना दिली तर लाभार्थी सुध्दा बांधू शकतात. परंतु मुळात ती योजना नव्हती. आपण वरच्या पातळीवर निर्णय घेऊन अशा पध्दतीने 5 हजारामध्ये वाडे बांधून द्यावयाचे आणि 30 हजार रुपये त्या लाभार्थ्याच्या नावावर 6 टक्के व्याजदराने कर्ज म्हणून टाकायचे. अशा पध्दतीने लाभार्थ्याला कर्जबाजारी करुन त्याच्याकडून 25 हजार रुपये घेणे बरोबर नाही. ज्या उपसचिवांनी शासनाला, वित्त विभागाला, उद्योग विभागाला न विचारता अशा प्रकारचा जी.आर. काढला त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शासन निर्णय उपसचिव काढीत नाही. शासन निर्णयाप्रमाणे हे लाभार्थींना वाडे बांधण्याचे काम द्यायचे ठरले होते. त्यावेळी लक्षात आले की, त्याचे योग्य पध्दतीने युटिलायझेशन होणार नाही. आणि म्हणून टेंडर काढून देण्याचे ठरले. त्याबाबत माननीय सदस्यांनी तक्रार केली की. वाडयाचे काम निकृष्ट पध्दतीचे होईल. त्यांचे म्हणणे असे की, त्याची किंमत 5 हजार रुपये आहे.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. 29.11.2003 च्या शासन निर्णयाप्रमाणे योजना तयार करण्यात आली. त्यानंतर 15 मे 2004 रोजी सुधारीत जी.आर. काढून ते बांधकाम करण्याबाबतचा निर्णय शासनाने बदलला की, महामंडळाने बदलला. जर महामंडळाने स्वत:च्या अखत्यारीत बदलला असेल तर सरकारला न विचारता हा निर्णय घेतल्याबाबत आपण संबंधितांवर कोणती कारवाई करणार?

12-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G 2

श्री. हसन मुश्रीफ : तो शासन निर्णय होता. महामंडळाने शासनाला विनंती केली की, अशा पध्दतीने बांधकाम झाले तर त्याचे युटिलायझेशन बरोबर होणार नाही. म्हणून शासनाने निर्णय घेतला. तो उपसचिवांनी निर्णय घेतला नव्हता...

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. वास्तविक पहातां महामंडळाच्या एम.डी. नी सरकारला कळविले की, हे वाडे बांधण्याचे काम आपण लाभार्थींना दिले पाहिजे. परंतु जर त्यामध्ये टेंडर काढले तर प्रचंड भ्रष्टाचार होईल. अशा पध्दतीचे लेखी निवेदन तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी शासनाला दिले होते. तरीसुध्दा त्यासंबंधीचा जी.आर. काढायला उपसचिवांनी नकार दिला. त्या ठिकाणी श्री. गोगटे या उपसचिवांना आणून बसवून त्यांच्याकडून जी.आर. काढायला लावला. आणि व्यवस्थापकीय संचालकांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले. केवळ धनगरांच्या टाळूवरील लोणी खाण्याचा हा प्रकार आहे. तेव्हा मंत्रिमहोदय त्यासंबंधी चुकीचे उत्तर देत असल्यामुळे आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पहिल्यांदा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता, तो महामंडळाचा निर्णय नव्हता. त्याही पुढे जाऊन सांगतो की, त्या वाडयाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झ ाले व त्याची चौकशी करण्यासाठी आपण आयुक्तांना सांगितले. माननीय सदस्यांना विनंती करीन की, अशाप्रकारे एखाद्या वाडयाचे निकृष्ट बांधकाम झाले असेल तर व ते निदर्शनास आणून दिल्यास त्याची चौकशी करु. त्याबाबत संबंधितांवर फौजदारी खटला भरायला शासन मागेपुढे पहाणार नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, क्या यह सच है कि लोकशाही आघाड़ी शासन ने इतिहास में पहली बार धनगर समाज की उन्नति के लिए 10 करोड़ रुपये दिए है और बाकी के 10 करोड़ रुपये इस महामंडल को कब तक दे दिए जाएंगे ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि वाडा, चारा एवं औषधी के लिए महामंडल को कब और कितना अनुदान दिया गया है और महामंडल ने कितने लाभार्थियों को ये चीज़े दी हैं और शेळया खरीदने के लिए अब तक अनुदान क्यों नहीं दिया गया है और यह अनुदान कब तक दिया जाएगा ? मेरा तीसरा प्रश्न यह है कि महामंडल के पास कितने लाभार्थियों की शिकायतें आई हैं और उसके बारे में शासन ने क्या कार्रवाई की है ?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:35

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, लोकशाही आघाडी शासनाने पहिल्यांदाच हा ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विकास महामंडळाला दहा कोटी रुपये दिले आहेत. या महामंडळाला 20 कोटी रुपये देण्याचे मान्य केलेले आहे पण त्यातील 10 कोटी रुपये वितरण झाले आणि लवकरात लवकर उरलेले 10 कोटी रुपये देणार आहोत. वाडे, चारा आणि औषधे यासाठी अगोदरच निधी दिलेला आहे. शेळया देण्याच्या बाबतीत स्थगिती दिली होती. पण या लोकांना ताबडतोब शेळया देणे आणि ही योजना पूर्ण करणे महत्वाचे आहे, कारण यामध्ये पैसे गुंतलेले आहेत, जमीन घेतलेली आहे. म्हणून लवकरात लवकर 10 कोटीचे नियोजन होणे गरजेचे आहे. याबाबतीत ज्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, त्याची चौकशी करण्यासाठी आम्ही त्या आयुक्तांकडे पाठविलेल्या आहेत.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, याठिकाणी हा विषय लक्षवेधी सूचनेच्या रुपाने पहिल्यांदा आलेला नाही. पण मुळामध्ये या तक्रारी आपल्याकडे केव्हा-केव्हा आल्या ? याबाबतीत आतापर्यंत चौकशी का केली नाही ? याचे कारण असे की, याबाबतीत जी.आर.बदलण्यात आला, त्याला वित्त विभागाची संमती घेतली होती का ? तसेच वाडा असेल, शेळया असतील यांच्या सर्व अवाच्यासवा किंमती शेतक-यांच्या उरावर लादण्यात आल्या आहेत. याबाबतीत पूर्वी तक्रारी आल्या होत्या. मग त्यासंबंधात कोणतीही त्वरीत कारवाई का केली नाही ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ज्या तक्रारी व्यक्तीश: प्राप्त झालेल्या आहेत, सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे साहेबांनी ज्या 18 तक्रारी आमच्या विभागाकडे दिलेल्या आहेत, त्या जशाच्यातशा आयुक्तांकडे पाठविलेल्या आहेत. वाडयाच्या बाबत सांगावयाचे तर . . . .

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मागच्या वेळी 14 मार्चला या विषयासंदर्भात उपोषण सुरु झाले होते, तेव्हा तक्रारी उपस्थित केल्या. त्यापूर्वी 10-15 दिवस अगोदर लाभार्थींनी कळविले की, निकृष्ट दर्जाचे बांधकाम झालेले आहे. तसेच बाजारामध्ये ज्या शेळया-मेंढया 50-55 रुपये प्रति किलो या दराने मिळतात, त्या 80 ते 85 रुपये प्रति किलो या दराने आमच्या माथी मारण्यात आल्या आहेत. याबाबतीत मी असेही सांगू इच्छितो की, ज्या लाभार्थींना शेळया-मेंढया दिल्या, त्या मेल्या. ही योजना राबवित असताना लाभार्थींना जबरदस्तीने म्हाता-या-कोता-या अशा शेळया दिल्या आणि त्या पुढे मेल्या. त्याचे फोटो देखील माझ्याजवळ आहेत. महामंडळाचा स्टॅम्प माझ्याकडे आहे. तेव्हा माझी अशी मागणी आहे की, शेळया-मेंढया देण्याच्या बाबतीत जे टेंडर

. . . . .एच-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे . . . .

काढण्यात आले होते, ते रद्द करणार आहात का ? याबाबतीत काहीतरी निर्णय झाला पाहिजे. आमचे असे म्हणणे आहे की, लाभार्थींना बाजार भावाप्रमाणे शेळया-मेंढया द्याव्यात. तसेच निकृष्ट दर्जाच्या शेड बांधून दिलेल्या आहेत, त्या देखील दुरुस्त कराव्यात.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, धनगर समाजाचा गैरसमज होता कामा नये या दृष्टीने मी उत्तर देतो. कारण धनगर समाजासाठी पहिल्यांदाच पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विकास महामंडळाला दहा कोटी रुपये देण्याचा आणि त्यातून 20 टक्के अनुदान देण्याचा निर्णय लोकशाही आघाडीने घेतला.

डॉ.अशोम मोडक : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदय, मघापासून "पहिल्यांदा, पहिल्यांदा" असे सांगत आहेत. पण याबाबतीत जो गोंधळ झालेला आहे, त्याचे ते काहीही अॅनॅलिसिस् करीत नाहीत.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी सांगतो. तुमचे समाधान होईल असे मी उत्तर देतो. यामध्ये दोन गोष्टी आहेत. ही योजना वाडे बांधून देणे म्हणजे शेड, शेळया आणि औषधे या तीन टप्प्यात विभागलेली आहे. वाडयाच्या बाबतीत निर्णय झाला होता की, लाभार्थींनी ते बांधावेत. पण महामंडळाने निदर्शनास आणून दिले की, यामध्ये पैशाचे योग्य प्रकारे युटीलायझेशन होणार नाही. लोक पैसे घेतील आणि वाडे बांधणार नाहीत. जर महामंडळाने स्वत: ते बांधून दिले तर त्याचा योग्य उपयोग होईल. म्हणून "महाराष्ट्र टाईम्स्" या वर्तमानपत्रामध्ये टेंडर काढून त्यानुसार ते बांधून देण्यात आले. पण त्याचे काम निकृष्ट झाले आहे अशा तक्रारी आल्यानंतर त्याची चौकशी करण्याबाबतीत आश्वासन दिले आहे. यानंतर चारा आणि औषधासाठी पैसे द्यावयाचे आहेत. ते कशा पध्दतीने द्यावेत याबाबतीत चर्चा झाली. नंतर वर्तमानपत्रामध्ये टेंडर काढण्यात आले आणि त्यामध्ये 80 ते 85 रुपये प्रति किलो असा जिवंत शेळीचा दर आला आणि ते टेंडर देण्यात आले. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, बाजाराभावामध्ये सध्या 50 ते 55 रुपये प्रति किलो या दराने शेळया मिळतात आणि असे असताना तुम्ही 80 ते 85 रुपये प्रति किलो या प्रमाणे शेळया लाभार्थींच्या बोकांडी मारत आहात. तर या दरवाढीच्या बाबतीत चौकशी करण्याचे कामही आयुक्तांना देण्यात आले आहे. तसेच पैसे कोणी-कोणी मागितले याची चौकशी करण्याचे अधिकार आयुक्तांना दिले. त्यांना दोन तज्ञ पाहिजेत तर ते द्यावेत. याबाबतीत आम्ही चौकशी करु.

. . . .एच-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ . . . .

शेळयांच्या बाबतीत सांगतो की, जे लाभार्थी नाबार्डने विहीत केलेल्या दराप्रमाणे शेळया घ्यावयास तयार असतील तर त्यांना त्या पध्दतीने द्याव्यात .

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (पुढे चालू....

बाजारामध्ये 50-55 रुपयामध्ये शेळी लाभार्थी घेणार असतील तर तशा महामंडळाला सूचना देऊन त्या पध्दतीने शेळ्या घेऊन द्याव्यात असे सांगण्यात येईल.

श्रीमती कांता नलावडे : प्रत्येक वाड्याच्याबाबतीत 20 हजार रुपये खर्च झालेले आहेत. प्रत्येक शेळीमागे 1 हजार रुपये याप्रमाणे अशा 20 शेळ्या द्यायच्या आहेत, यामध्ये एकूण 40 हजार रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. तसे लाभार्थींनी लिहून दिलेले आहे, तेव्हा त्याप्रमाणे हे वाडे रद्द करणार आहात काय ? दुसरा प्रश्न असा की, टेंडरद्वारा शेळ्या पुरविलेल्या आहेत. त्या शेळ्या रोगट पुरविलेल्या आहेत, त्यातील अनेक शेळ्या मेलेल्या आहेत, काहींना तर लहान करडी पुरविलेली आहेत. यामध्ये लाभार्थींचे नुकसान झालेले आहे, ते आपण भरून देणार आहात काय ?

श्री.हसन मुश्रीफ : मी दोन पध्दतीने सांगितलेले आहे. 10 कोटी रूपयापैकी 4 कोटी 56 लाख 35 हजार 10 रुपये खर्ची पडलेले आहेत. जवळजवळ 528 लोकांना वाडे बांधून दिलेले आहेत. आता त्याचे बांधकाम निकृष्ट प्रतीचे असल्याबाबत तक्रारी आलेल्या आहेत. त्यानंतर शेळ्या प्रति किलो 85 रुपये दराने पुरविलेल्या आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या 50-55 रुपये किलोप्रमाणे बाजारातून मिळू शकतात..

श्री.पांडुरंग फुंडकर : शेळीचा दर 80-85 रुपये किलो हा कशाच्या आधारावर काढलेला आहे. बाजारामध्ये त्यापेक्षा कमी भावाने मिळत असतील आणि त्याचे 2100 रुपये बील लावले जात असेल आणि ती वाढीव रक्कम कर्जरुपाने शेतकऱ्यांवर बोजा टाकणार असाल तर ते बरोबर नाही. तुमच्या अधिकाऱ्यांनी जास्त किंमतीने शेळ्या खरेदी केल्या असतील तर त्याचे पैसे त्या शेतकऱ्यांवर कर्जाच्या रुपाने कशाकरिता टाकता ? या खरेदीव्यवहारामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. आपले अधिकारी अशा पध्दतीने शेळ्या मेंढ्यांची खरेदी करत असतील तर ते योग्य नाही. त्या शेळीची मूळ जी किंमत आहे ती कमी आहे, तेवढीच रक्कम त्या लाभार्थीच्या कर्ज खात्यात टाकली जाईल, अशाप्रकारची आपण व्यवस्था करणार आहात काय ? ज्या अधिकाऱ्यांनी हे सगळे ठरविले ते उपसचिव श्री. भोईटे यांनी सरकारचा निर्णय फिरविला. वाडे लाभार्थींनी बांधायचे होते, तो निर्णय बदलून वाडे बांधण्याचे टेंडर काढले. त्या उपसचिवांची साधी बदली केली नाही. नागपूरच्या अधिवेशनामध्ये देखील हा प्रश्न उपस्थित झालेला होता, त्याही वेळेला सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही. त्या ठिकाणच्या उपसचिवांची बदली झाली नाही. शेळ्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे, त्याची आपण चौकशी करणार आहात काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.हसन मुश्रीफ : यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न नाही. शेळी, बोकड खरेदीच्या संदर्भात दै.सकाळमध्ये दिनांक 5-7-2004 रोजी जाहिरात दिली होती. तसेच नाबार्डने शेळ्या-मेंढयांची आधारभूत किंमत ठरविलेली आहे. त्या आधारे सर्वसाधरण 80 प्रति किलो (जिवंत वजन) असा दर ठरविलेला आहे. जर लाभार्थी स्वत: शेळी घेत असतील तर मंडळाचे अधिकारी त्यांच्या बरोबर जाऊन ते घेतील, अशाप्रकारची परवानगी आपण आता दिलेली आहे. त्याचबरोबर महामंडळाच्या दराने ज्यांना शेळी घ्यावयाची असेल तर लाभार्थी तशा पध्दतीने ती घेऊ शकतात. माझी विनंती आहे की, हे सगळे लवकरात लवकर करणे गरजेचे आहे, ते शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. कारण यामध्ये पैसे अडकलेले आहेत. शासनाचे जवळपास 5 कोटी रुपये गुंतलेले आहेत. पुन्हा 10 कोटी रुपये मिळणार आहेत, त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांना विश्वासात घेऊन पुढची योजना करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : वाडे बांधण्याचा शासनाने निर्णय घेतलेला होता. तो निर्णय संचालक मंडळाच्या सांगण्यावरुन बदलला गेला. माझा स्पेशिफिक प्रश्न असा आहे की, शासनाने किती तारखेला हा निर्णय बदलला, कोणाच्या सांगण्यावरुन बदलला ?

श्री.हसन मुश्रीफ : शासनाने निर्णय फिरविला नाही. पहिल्यांदाच शासनाने यासंबंधाने मार्गदर्शक तत्व महामंडळाला घालून दिलेले होते. परंतु महामंडळाने लाभार्थी पैशाचा योग्य विनियोग करणार नाहीत, कदाचित ते पैसे वापरतील आणि वाडे बांधणार नाहीत असे सांगितल्यानंतर यामध्ये पारदर्शकता येण्यासाठी टेंडर काढण्याचा निर्णय शासनाने घेतला.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. या समाजाला बसविण्यासाठी काही लोकांनी पैसे घेतले त्याच्या लेखी तक्रारी मंत्रिमहोदयांकडे दिलेल्या आहेत. ते लोक पैसे परत मागत आहेत. डायरेक्टर हजारे आणि श्रीमती पारुताई वाघ यांनी तक्रार केली आहे की, हे थांबवावे. त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर घेतले जात नाही. त्यांचे म्हणणे टेप केलेले आहे. संचालक मंडळाने भ्रष्टाचार केलेला आहे त्या भ्रष्टाचाराबाबत काय कारवाई करणार आणि ते पैसे लोकांना परत मिळतील काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंबंधीची तक्रार प्राप्त झालेली आहे. त्यांची सगळी नावे माझ्याकडे आहेत. ज्यांनी ज्यांनी पैसे घेतले आहेत त्यांची आयुक्त चौकशी करतील आणि ते मंडळाचे पदाधिकारी आणि अधिकारी यांची चौकशी करतील आणि चौकशीत सिध्द झाले तर निश्चितपणाने फौजदारी खटले दाखल करण्यात येतील.

श्री. सदाशिव पोळ : हे महामंडळ फक्त धनगर समाजासाठी आहे कां की, व्यवसाय करणा-यांसाठी आहे? याचा खुलासा व्हावा. म्हाता-या शेळया दिल्या असे म्हटले आहे. तेव्हा शेळयांची खरेदी करतांना तिचे वय कमीत कमी किती असावे आणि जास्तीत जास्त किती असावे असे काही बंधन होते काय आणि असल्यास त्या पध्दतीने या शेळया खरेदी केल्या आहेत काय?

श्री. हसन मुश्रीफ :सभापती महोदय, तो जरी टेंडरवाला असला तरी लाभार्थींच्या पसंतीनुसार दोन जाती, चार जाती अशा प्रकारे त्याने त्याच्या पसंती प्रमाणे शेळया घ्यावयाच्या होत्या. शेळी पालन करणा-या सर्व लोकांसाठी हे महामंडळ आहे.

**उपसभापती** :शेळीपालन फक्त धनगर समाजाने करावे असे बंधन आहे काय?

श्री. प्रकश शेंडगे : सभापती महोदय, हे महामंडळ धनगर समाजासाठी आहे.

श्री. हसन मुश्रीफ :महाराष्ट्र राज्य धनगर समाजोन्नती मंडळबाबत श्री. प्रकाशराव शेंडगेनी पत्र दिलेले आहे की, ग्रामीण भागातील गोरगरीब सर्व जाती धर्मातील लोकांसाठी हा प्रकल्प राबवावा, असे आपले पत्र आहे.

श्री. प्रकश शेंडगे :सभापती महोदय, हे महामंडळ धनगर समाजासाठी असेल त्याचे लाभार्थी धनगर समाजाचे असतील असे आश्वासन मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे. ते आश्वासन या सभागृहात जर मंत्रिमहोदय बदलत असतील तर हा या समजावर अन्याय होईल. याबाबत मंत्रिमहोदयांनी जे आश्वासन दिलेले आहे ते त्यांनी कायम ठेवावे. हे महामंडळ फक्त धनगर समाजाच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विकासासाठी आहे असा जी.आर. आहे. त्याची स्थापना पण तशीच आहे. मागे मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की,जर यामध्ये काही चुकीचे असेल तर त्यामध्ये दुरुस्ती करण्याचे आपण आश्वासन दिलेले आहे, तेव्हा मंत्रिमहोदय त्याचा खुलासा करतील काय?

श्री. हसन मुश्रीफ :कंपनी ॲक्टप्रमाणे हे महामंडळ रजिस्टर झालेले आहे. त्यावेळेला मी म्हणालो होतो आणि यांनी सुध्दा सांगितलेले आहे की, समाजातील सर्व जाती धर्मातील शेळी पालन करणा-या लोकांना याचा लाभ द्या. यामध्ये 90 टक्के लोक धनगर समाजाचे आहेत. फक्त पाच-दहा टक्के इतर समाजाचे आहेत. मी असे म्हणालो होतो की, प्रामुख्याने धनगर समाजच हा धंदा करतो त्यांना आपण अग्रक्रम देऊच पण बाकी शेतकरी पाच-दहा टक्के असतील, गरीब असतील त्यांना लाभ देऊ. पण जोपर्यंत कंपनी ॲक्टमध्ये दुरुस्ती करत नाही तोपर्यंत याचा विचार करु शकत नाही.

श्री. प्रकाश शेंडगे :याचा लाभ फक्त धनगर समाजाला मिळाला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. शासनाने मान्य केलेले आहे की, याच्या चौकशीला सुरुवात केलेली आहे. ही चौकशी किती कालावधीत पूर्ण होणार आहे? आणि यासंबंधीचा अहवाल पुढच्या अधिवेशनात सदनात ठेवण्यात येईल काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय,दोन महिन्याच्या आत याची चौकशी करुन त्याचा अहवाल सदनात ठेवू.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मंत्रिमहोदयांना मला प्रश्न विचारावयाचा आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी-मेंढी विकास महामंडळ स्थापन --- झालेले आहे. हे केवळ धनगर समाजाकरिता स्थापन झालेले आहे अशी त्या महामंडळाच्या नियमता, कायद्यात तरतूद असेल तर जे धनगर समजाचे नसतील त्यांना याचा फायदा देण्याचा निर्णय शासनाने कां घेतला?

श्री. हसन मुश्रीफ : "शेळी पालन करणारे" असे रजिस्ट्रेशन करतांना कंपनी ॲक्टमध्ये घातले होते. सन्माननीय सदस्यांचा आग्रह होता की, धनगर समाजासाठी हे महामंडळ असावे.

यानंतर श्री. बरवड ....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ...

ज्यावेळी आम्ही धनगर समाजासाठी मंजूर करु त्यावेळी इतर समाजातील अशा प्रकारे शेळी पालन करणाऱ्यांसाठी काही व्यवस्था निश्चितपणे करु.

**उप सभापती** : ज्याच्याबद्दल ही सगळी तक्रार झालेली आहे किंवा त्या शेळया विकून नेल्या वगैरे बाब आहे त्यामध्ये प्रश्न असा आहे की, आपण शेळयांचा इंश्योरंस काढणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, इंश्योरंस केलेला आहे. इंश्योरंस कंपनीकडून पैसे मिळवून देण्याची जबाबदारी शासन घेईल.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हे शासन शेळया, मेंढया, चारा, शेण, कशातही काही सोडत नाही. आता वैद्यकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार मी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आपल्यासमोर आणत आहे. शेळया मेंढया ठीक आहे पण आता जी मुले एम.डी. किंवा एम.एस. होणार आहेत किंवा पदव्यूत्तर परीक्षेमध्ये खोटया थिसीस म्हणजे ज्या थिसीस पूर्वी कोणी तरी लिहिलेल्या होत्या अशा थिसीसची किंवा प्रबंधाची कॉपी करुन विद्यार्थ्यांना देणे आणि अशा प्रकारे आपल्याकडे केवळ एकाची मर्यादा असताना सात सात विद्यार्थ्यांना रजिस्टर्ड करुन घेणे, शासनाने डॉ. पुरंदरे यांना पाठीशी घालणे, एकदा त्यांची चौकशी करुन त्यांना निलंबित करतात आणि कोणत्या तरी मंत्र्यांच्या अशीर्वादाने, माझा आरोप आहे की, मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्र्याच्या आशीर्वादाने त्याचे निलंबन रद्द करुन त्यांचा राजीनामा स्वीकृत करतात ही अतिशय भयानक गोष्ट आहे. मेडिकल प्रोफेशनमध्ये शासनाबद्दल नाराजीचे वातावरण आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्यावेळी डॉ. रेखा डावर यांनी याबाबतचा रिपोर्ट एफसीपीएसच्या सचिवांकडे दिला त्यावेळी त्यांच्यावर कोणती कारवाई झ ाली ? दुसरा प्रश्न असा की, विभागीय चौकशी सुरु असताना कोणाच्या आशीर्वादाने त्यांचे निलंबन मागे घेऊन राजीनामा मंजूर करण्यात आला ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डॉ. रेखा डावर यांनी एप्रिलच्या तिसऱ्या आठवडयात तक्रार दिली होती आणि आपण खुलासा वगैरे मागवून त्याचा रिपोर्ट आपल्याकडे 8 जून, 2004 ला आला होता. त्यानंतर कमिटीने असा निर्णय घेतला की, त्यांना सस्पेंड करावयास पाहिजे आणि त्यांच्यावर कारवाई करावयास पाहिजे. तेव्हा डॉ. पुरंदरे यांनी शासनाला विनती केली की, मी स्वत:हून राजीनामा देतो आणि शासनाने त्यांचा राजीनामा स्वीकारलेला आहे ही गोष्ट खरी आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत गंभीर प्रश्न आलेला आहे. डॉ. पुरंदरे यांच्यावर जे आरोप करण्यात आलेले होते त्यामध्ये काही तथ्य आढळून आले. त्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले. त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आली. शासकीय नियमाप्रमाणे ज्या कर्मचाऱ्याविरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित असेल किंवा सुरु होणार असेल अशा कर्मचाऱ्याचे निलंबन मागे घेण्याचा अधिकार शासनाला आहे काय ? नियमाप्रमाणे असे निलंबन मागे घेता येत नाही. हे निलंबन कोणत्या नियमानुसार मागे घेतले ?

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डॉ. पुरंदरे हे ऑनररी प्रोफेसर होते. ते शासनाचे कर्मचारी नव्हते. ते ऑनररी काम करीत होते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझ्याकडे शासनाच्या उपसचिवांचे पत्र आहे. श्री. गो. ना. रणखांबे नावाच्या अधिकाऱ्याचे पत्र माझ्याकडे आहे. त्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, ज्या अर्थी डॉ. सी. एन. पुरंदरे मानसेवी प्राध्यापक, स्त्रीरोग प्रसुतीशास्त्र, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय यांना निलंबित करणारा आदेश उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांनी 16 ऑगस्ट, 2004 रोजी काढला होता त्याअर्थी आता उपसचिव वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम 1979 च्या नियम 4 पोट नियम 5, खंड (क)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ MHM/ SBT/ श्री.बरवडनंतर 11:55

डॉ.दीपक सावंत....

अन्वये नावे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन याद्वारे उक्त निलंबन आदेश तात्काळ रद्द करण्यात येत आहे. तुम्हाला अधिकार नसताना पत्र का दिले ? मंत्रिमहोदय असत्य माहिती देऊन सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

श्री.सुरेश शेट्टी : जी विभागीय चौकशी सुरु झाली होती आणि त्यांचे निलंबन....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर येत नाही, त्यांचे निलंबन का रद्द केले ?

श्री.सुरेश शेट्टी : त्यांच्या निलंबनाचे आदेश 16.8.2004 रोजी काढले होते खरे आहे. मी सांगितले आहे की, ते शासनाकडे आले, काही मंत्र्यांना भेटले, काही अधिका-यांना भेटून त्यांनी सांगितले की, मी स्वत:हून राजीनामा देतो. त्यामुळे शासनाने त्यांचा राजीनामा स्वीकृत करण्याचा निर्णय घेतला.

डॉ.नीलम गो-हे : प्रश्न असा आहे की, कोणत्याही अशाप्रकारच्या वरिष्ठ स्तरावर असलेल्या माणसाने सर्व चुका करावयाच्या आणि बाकीच्या विद्यार्थ्यांवर त्यांनी अन्याय करावयाचा, त्यांची शोध पत्र मंजूर केली, त्यांनी निवासी डॉक्टरांच्या चुकीच्या नियुक्त्या मंजूर केल्या, आपण अधिकृत उत्तरामध्ये सांगत आहात की ते काही डॉक्टरांना भेटले, मंत्र्यांना भेटले, काही सचिवांना भेटले, मग आम्ही त्यांचा राजीनामा मंजूर झाला, माझे म्हणणे असे आहे की, हया माणसामुळे कोणचेही नुकसान झाले नाही असे आपले म्हणणे आहे तरी सुध्दा त्यांचा राजीनामा स्वीकृत केलेला आहे. पण ज्यांच्या चुकीच्या नियुक्त्या झाल्या त्यांचे नुकसान झाले नाही असे आपण कसे म्हणता आणि कोणत्या मंत्र्यांना हे अधिकारी जाऊन भेटले आहेत हे सांगा, कोणत्या नियमानुसार अशा चुका केलेल्या डॉक्टरला आपण निर्दोष असल्याचे प्रमाणपत्र देऊन त्यांचा राजीनामा स्वीकृत करीत आहात ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, त्यांच्यावर आरोप काय आहे ते पहिल्यांदा बघून घेऊ. आरोप हे आहेत की, 5 विद्यार्थ्यांनी डयुप्लीकेट थिसीस सबमिट केले. विद्यार्थी एमबीबीएस पास झाल्यानंतर पोस्ट ग्रॅज्यूएट, एमडीसाठी जातात आणि काहीजण सांगतात की, माझा एमडीमध्ये दाखला झाला नाही म्हणून एफसीपीएससाठी जातो. हया विद्यार्थ्यांकडून थिसीस सबमिट झाले

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ MHM/ SBT/

श्री.सुरेश शेट्टी.....

होते ते कॉपी करुन एफसीपीएससाठी दिले होते. पण हे अधिका-यांच्या लक्षात आल्यानंतर ते सहाही विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी गेले नाहीत. त्यामुळे एफसीपीएसने त्यांच्याविरुध्द कारवाई केली आहे. 2 विद्यार्थ्यांना 2 वर्षे निलंबित केले आहे आणि दुस-या 2 विद्यार्थ्यांना 3 वर्षासाठी निलंबित केले आहे. त्या विद्यार्थ्यांना कोठेही ॲडमिशन दिलेले नाही.

श्री.अनंत तरे : त्यांना निलंबित केले, परत त्यांना राजीनामा देण्यास सांगितले मग त्यांनी राजीनामा दिला आहे.  शासनाच्या माध्यमातून विभागीय चौकशी चालली होती ती थांबविण्याचा अधिकार आहे काय, त्यांच्याविरुध्द दोष नाही असे म्हटले आहे, त्यांनी खोटया नावाने तक्रारी करुन महाविद्यालयातील प्राध्यापकांची व संस्थेची बदनामी सुध्दा केलेली आहे. म्हणून प्रश्न असा आहे की, जी विभागीय चौकशी चालू केलेली आहे ती पूर्ण करुन त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन पाहिजे असल्यास पुन्हा एकदा विभागीय चौकशी सुरु करु.

डॉ.दीपक सावंत : माझी माहिती अशी आहे की, विभागीय चौकशी सुरु असताना कोणत्याही प्रकारे राजीनामा स्वीकारता येत नाही. या नियमाचे उल्लंघन का झाले ? कॉपी केलेल्या विद्यार्थ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करता मग डॉ.पुरंदरे यांच्याविरुध्द फौजदारी कारवाई करणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : मी कालच लॉ डिपार्टमेंटच्या सर्व अधिका-यांबरोबर चर्चा केली असून त्यांचे असे मत आहे की, त्यांच्याविरुध्द आता काही लिगल ॲक्शन घेऊ शकत नाही.

डॉ.दीपक सावंत : कॉपी केलेल्या विद्यार्थ्यांविरुध्द आपण फौजदारी  कारवाई करतो मग शिक्षकाने कॉपी करण्यास प्रवृत्त केल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करतो, येथे शिक्षकच कॉपी करतात, विद्यार्थ्यांना खोटया थिसीस आणून देत आहे, त्यांच्याविरुध्द शासन का कारवाई करु शकत नाही ? त्यांच्याविरुध्द कारवाई होऊ शकते, मंत्रिमहोदय पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, त्या विद्यार्थ्यांवर कॉलेज ऑफ फिजिशियन ॲण्ड सर्जन यांनी केली आहे.

नंतर श्री.शिगम.....

अशुध्दीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही.

श्री. सुरेश शेट्टी : आपण दालनात बसून याबाबतीत चर्चा करु.

**उप सभापती** : या विषयासंबंधी मा.मंत्री महोदयांनी अधिक चौकशी करावी.

श्री. सुरेश शेट्टी : होय.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

**पृ. शी.** : वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना रु.5 लक्ष रकमेची बँक गॅरंटी देण्याची घातलेली अट

**मु. शी** : वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना रु.5 लक्ष रकमेची बँक गॅरंटी देण्याची घातलेली अट यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री सुधाकर गणगणे, डॉ. एम.ए.अझिज प्रा.जोगेंद्र कवाडे, प्रा. बी.टी.देशमुख सर्वश्री वसंतराव खोटरे, पांडुरंग फुंडकर, संजय दत्त व जितेंद्र आव्हाड वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुधाकर गणगणे ( विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय वैद्याकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने शासकीय वैद्याकीय महाविद्यालयात सन 2005-06 मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना रुपये 5 लक्ष रकमेची बँक गॅरंटी देण्याची अट घालण्याचा निर्णय घेणे, त्याशिवाय जवळचा नातेवाईक नसलेल्या व्यक्तीकडून रुपये 15 लाख रकमेचे तारण घेण्याचा निर्णय घेणे, हे दोन्ही निर्णय शासनाने विद्यार्थी एम.बी.बी.एस. परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर 2 वर्षे शासकीय नोकरी करण्याच्या निमित्ताने घेणे, यातून उच्च मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय यांची गळचेपी होणे आणि त्यांचेवर श्रीमंत विद्यार्थ्यांच्या तुलनेत अन्याय झाल्यामुळे शासकीय वैद्याकीय महाविद्यालये देखील धनिकांच्या मुलांकरिता चालविली जात आहेत असा अपसमज निर्माण होणे या कारणास्तव या प्रवेशेच्छु विद्यार्थ्यांच्या भवितव्यासमोर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, समाजात निर्माण झालेला तीव्र असंतोष याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष व शासनाने लक्ष घालून करावयाची उपाययोजना, गेल्या वर्षापर्यन्त विद्यार्थ्यांकडून रुपये 2 लक्ष रुपयेची हमी घेण्यात येत होती. परंतु या वर्षी शासनाने लक्षवेधी सूचनेत नमूद केल्याप्रमाणे निर्णय घेऊन सर्वसामान्य मुलांना वैद्याकीय शिक्षणापासून वंचित ठेवले जाणे, जून-जुलै, 2005 पासून शासकीय वैद्याकीय प्रवेश प्रक्रिया सुरु

.3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुधाकर गणगणे....)

होत असल्याने आणि त्यापूर्वीच विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल करण्याची आणि महाविद्यालयांचे विकल्प दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण करावयाची असल्यामुळे या समस्येला तातडीने न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व आवश्यक ती उपाययोजना व शासनाची भूमिका "

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्याकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे :महाराष्ट्रातील मेडिकल विद्यार्थ्यांच्यादृष्टीने ही अत्यंत महत्वाची लक्षवेधी आहे. महाराष्ट्रातील जे गरीब आणि हुशार विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छितात त्यांच्याकडून शासन डबल गॅरंटी घेते. 5 लाख रु.ची वैयक्तिक बँक गॅरंटी आणि नातेवाईकाकडून सॉल्व्हन्सी घेण्यात येते. हुशार परंतु गरीब असे विद्यार्थी जे वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेऊ इच्छितात त्यांना या अटींची पूर्तता करता येत नसल्यामुळे त्यांना वैद्यकीय शिक्षणापासून वंचित रहावे लागते. तेव्हा अशा गरीब विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही बँक गॅरंटी आणि सॉल्व्हन्सीची अट शासन रद्द करणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : मेडिकल स्टुडंटस्साठी 5 लाखाची बॅन्क गॅरंटी आणि सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट देण्यासंबंधी नियम केलेले आहेत. यासंदर्भात सर्व मा.सदस्यांच्या बरोबर चर्चा केलेली असून सॉल्व्हन्सी सर्टिफिकेटची कंडिशन रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. परंतु 5 लाखाची बँक गॅरंटी कायम राहाणार आहे. त्याबाबतीत काही बदल करणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट रद्द करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.5 लाखाची बँक गॅरंटी देण्याची अट मात्र कायम आहे. गरीब आणि मध्यम कुटुंबातील विद्यार्थी जे पीएमटी परीक्षा पास होऊन मेडिकलसाठी प्रवेश घेऊ इच्छितात त्यांच्याकडे जर 5 लाखाची प्रॉपर्टी नसेल तर त्यांना मेडिकल प्रवेशापासून वंचित व्हावे लागेल. बँक गॅरंटी केव्हा मिळते ? 5 लाखाची पॉपर्टी असेल तरच त्यावर बॅक 5 लाखाची गॅरंटी देते. म्हणून ही बँक गॅरंटी 5 लाखा ऐवजी दोन अडीच लाखापर्यन्त शासन करणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : याबाबतीत शासनाचे काही प्रपोझल नाही.

श्री. नितीन गडकरी : ज्या कारणासाठी ही अट टाकलेली आहे ते कारण स्तुत्य आहे. विशेषत, मेळघाट, गडचिरोली अशा आदिवासी भागामध्ये डॉक्टर नोकरीवर जात नाहीत. त्यामुळे कधी कधी असे वाटते की, गडचिरोली, मेळघाट अशा भागातील आदिवासी लोकांसाठी डॉक्टरांची वेगळी कॅटेगरी करावी काय ? त्याठिकाणी डॉक्टर जात नसल्यामुळे लोक मरतात. आपण 5 लाखाची बँक गॅरंटीची अट टाकलेली आहे. पण त्याऐवजी आपण जर त्यांच्याकडून ॲफिडेव्हिटवर लिहून घेतले की, त्यांनी जर ग्रामीण भागामध्ये सेवा दिली नाही तर त्यांना पुढे प्रॅक्टीस करता येणार नाही, त्यांची डिग्री काढून घेण्यात येईल अशा प्रकारच्या,त्यांचे करिअर धोक्यात येईल अशा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

अटी टाकता येतील काय ? प्रत्येक डॉक्टरने ग्रामीण भागामध्ये दोन वर्षे सेवा दिली पाहिजे असा जो शासनाचा उद्देश आहे तो चांगला आहे. शासनाचा 5 लाख रु. मिळविण्याचा उद्देश नाही. तेव्हा या बँक गॅरंटी ऐवजी त्यांची डिग्री काढून घेण्यात येईल, त्यांना प्रॅक्टीस करता येणार नाही अशा प्रकारच्या अटींचे ॲफिडेव्हिट त्यांच्याकडून घेण्यात येईल काय ? माझी मंत्री महोदयांनी विनंती आहे की, आदिवासी भागामध्ये कुपोषणाने बालके मृत्यूमुखी पडत आहेत. आदिवासी भागात डॉक्टर नाहीत आणि ते जाऊ इच्छितही नाहीत. त्या भागामध्ये ज्या डॉक्टरांना पाठविण्यात येते त्यांच्या संदर्भात आमदार मंत्री महोदयांना पत्रे देतात की, त्यांना त्या भागात पाठवून नका..

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 12:05

श्री.नितीन गडकरी...

माझी आपल्याला विनंती आहे की, या बाबतीत आदिवासी क्षेत्रात,दूर्गम परिसरात प्रत्येक डॉक्टरांची दोन वर्षे नेमणूक केली गेली पाहिजे असे बंधन शासनाने घातले तर चांगले होईल असे मला वाटते. तुमची ग्रामीण भागाची अट आहे. हे वैद्यकीय अधिकारी काय करतात त्याचे उदाहरण मी सांगतो. नागपूर येथे रहातात, परंतु कळमेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्रात नेमणूक करुन घेतात. कळमेश्वर हे नागपूर पासून फक्त आठ कि.मी. अंतरावर आहे. ग्रामीण भागाबरोबर आदिवासी व दूर्गम भागाची अट टाकण्याचा शासन विचार करील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मला वाटते की, संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्यात शासकीय महाविद्यालयात एम.बी.बी.एस. आणि पोस्ट ग्रॅज्यूएशन शिकविण्यासाठी फक्त 18 हजार रुपये एवढीच फी घेतो. आपण एका विद्यार्थ्यास डॉक्टर बनविण्यासाठी 12 ते 15 लाख रुपये खर्च करतो. पोस्ट ग्रॅज्यूएशनचे शिक्षण घेण्यासाठी एका विद्यार्थ्यावर 30 लाख रुपयांपर्यन्त खर्च करीत असतो. गरीब कुटुंबातील ज्या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेले असते तेच विद्यार्थी ग्रामीण भागात जाऊन सेवा करतात. परंतु काही श्रीमंत कुटुबातील विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण या ठिकाणी घेतात. ते ग्रामीण भागात काम करीत नाहीत. ते दुस-या राज्यात निघून जातात आणि तेथे आपला व्यवसाय सुरु करतात. दिल्ली येथे निघून जातात, काही विद्यार्थी परदेशात निघून जातात. ज्या विद्यार्थ्याने वैद्यकीय शिक्षण ज्या राज्यात घेतलेले असते त्यांनी काही वर्षे त्या राज्यात सेवा केली पाहिजे अशी सर्व राज्यात अट आहे. मिल्ट्री हॉस्पीटलमध्ये 15 लाख रुपयांची गॅरंटी द्यावी लागते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब आणि इतर सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. त्या सूचनांच्या संदर्भात मेडीकल कौन्सील ऑफ इंडियाच्या अधिका-यां समवेत चर्चा करु.

विधानसभा आणि विधान परिषदेचे काही सदस्यांना सोबत घेऊन या विषयावर एक बैठक घेऊ. यासंदर्भात काय बदल करावयाचे आहेत त्याबाबतीत त्या बैठकीत चर्चा करु. ग्रामीण भागात वैद्यकीय अधिका-यांनी सेवा केली पाहिजे अशी सक्ती केली आहे त्याप्रमाणे दूर्गम व आदिवासी क्षेत्रातही अशा प्रकारची सक्ती वैद्यकीय अधिका-यांना करावी अशा प्रकारची अट घालावी अशी सूचना सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी केली आहे. त्या सूचने बाबत देखील त्या बैठकीत निश्चितपणे आपण चर्चा करु.

2...

श्री. नितीन गडकरी : 5 लाखाची बँक गॅरंटीची अट आहे. आपल्या बँका अशा आहेत की, तर बँक गॅरंटी घ्यावयास जातात त्यावेळी 5 लाखाची एफ.डी.आर. करा असे बँकेकडून सांगितले जाते. त्याच्या शिवाय बँका गॅरंटी देत नाहीत. जेवढी बँक गॅरंटी घ्यावयास जातात तेवढी एफ.डी.आर.करा असे बँकाकडून सांगितले जाते. विद्यार्थ्यांस वैद्यकीय शिक्षण घेताना त्यांचे कंबरडे मोडते. ते विद्यार्थी पैसे कुठून भरणार ? या संदर्भात बँकाच्या बाबतीत कठोर नियम करा. पैसे उभे करण्याची जी अट आहे ती व्यवहारीक नाही. शासनाच्या भावनेशी आम्ही सहमत आहोत. दुसरे म्हणजे ग्रामीण भागात वैद्यकीय सेवेचे अट आहे, त्या प्रमाणे आदिवासी व दुर्गम भागात देखील काही वर्षे वैद्यकीय अधिका-यांनी सेवा केलीच पाहिजे अशी सक्ती करा. जे जात नसतील त्यांच्या पदव्या काढून घ्या. परंतु पैशांची जी अट घातली आहे त्याकडे मात्र गांभीर्याने विचार करावा. 5 लाख रुपयांची एफ.डी.आर. काढल्या शिवाय 5 लाखाची गॅरंटी मिळत नाही. याबाबतीत गांभीर्याने विचार करावा असे माझे मत आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा शासनाने विचार करावा.

श्री. सुरेश शेट्टी : ठीक आहे.

श्री. धोंडीराम राठोड : या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी फी संदर्भातील माहिती दिली. या ठिकाणी फी च्या संदर्भातील मुद्दा नसून बँक गॅरंटीचा मुद्दा महत्वाचा आहे. ज्या विद्यार्थ्याची ऐपत असेल तेच विद्यार्थी बॉंड घेऊ शकतात. त्याची आर्थिक परिस्थिती चांगली असेल तरच त्यास 5 लाख रुपयांचा बॉंड मिळेल. सर्व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण घेता आले पाहिजे. पूर्वी दोन लाख रुपयांचा बॉंड आपण घेत होतो तो जर कंटीन्यू ठेवला तर ब-याच गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण घेता येऊ शकेल. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, पूर्वी प्रमाणेच 2 लाख रुपयांचा बॉंड घेण्याची पध्दत सुरु करण्यात येईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : यासंदर्भात अधिवेशन संपल्यानंतर आपल्या समवेत बैठक घेण्याचे मान्य केले आहे. त्या बैठकीत आपल्या सूचनेचा देखील विचार करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : इकॉनॉमिकल बॅकवर्ड हा क्रायरेटिया लावून किंवा मागासलेल्या भागातील विद्यार्थ्यांना 2 लाख रुपयांची बँक गॅरंटी शासन कायम ठेवणार काय ?

3...



ABG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम 12:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : या संदर्भात मी बैठक घेण्याचे मान्य केले आहे त्या बैठकीस आपणाला देखील बोलाविण्यात येईल. आपण ही संयुक्त बैठक घेऊ त्या बैठकीत सर्व सुचनांवर चर्चा करुन योग्य ते निर्णय घेऊ.

श्री. सुधाकर गणगणे : माननीय मंत्री महोदय या संदर्भात बैठक घेणार आहेत आणि त्यात निर्णय घेणार आहेत. त्या बैठकीमध्ये घेतले गेलेले निर्णय पुढील अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील काय ?

श्री. सुरेश शेट्टी : हे अधिवेशन संपल्यानंतर लागलीच यासंबंधीची बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीत जे काही निर्णय होतील ते निर्णयपुढील अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

---------------------

**उप सभापती** : मला माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकरराव सरपोतदार यांना विचारावयाचे आहे की, या सभागृहापुढे दोन विशेष उल्लेख आणि दोन शासकीय विधेयके आहेत. विशेष उल्लेख करणारे बरेचसे सदस्य सभागृहात दिसत नाहीत. शासकीय दोन बिले आहेत त्यावर आता आपण चर्चा सुरु करावी आणि विशेष उल्लेख आपण दुपारी घेऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : विशेष उल्लेख दुपारी घेवू त्यास माझी हरकत नाही..

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 12:10

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहामध्ये एकही शासकीय बिल पेंडिंग राहिलेले नाही. आपल्याला भरपूर वेळ आहे. आता 12 वाजून 10 मिनिटे झालेली आहेत. सकाळपासून काम केलेले आहे. आता सुट्टी द्यावी. 1 वाजता पुन्हा कामकाज सुरु करु. आता जे बिल घेतले जाणार आहे ते 20 मिनिटांमध्ये होणार नाही. चर्चा अर्धवट राहील असे मला वाटते.

**उपसभापती** : ठीक आहे. मंत्रीमहोदय बिल मांडतील. चर्चा नंतर करु.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: औद्योगिक विवाद (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO.VI OF 2003.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE INDUSTRIAL DISPUTES ACT, 1947 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)**

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 6-औद्योगिक विवाद अधिनियम,1947 महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्याच्या बाबतीत संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा विधानसभेचा प्रस्ताव रद्द करुन सदरहू विधेयक विचारात घेण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, संयुक्त चिकित्सा समितीकडून विधेयक परत का आले याचे कारण दिले पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय,फार महत्वाचा मुद्दा आहे. आजपर्यंत विधिमंडळाच्या इतिहासामध्ये संयुक्त चिकित्सा समितीकडून विधेयक काढून घेण्यात आले ही गंभीर गोष्ट आहे. संयुक्त चिकित्सा समिती काम करीत नव्हती काय ? बिल पाठविले होते त्याचे काय झाले ? विधिमंडळाच्या सदस्यांचा हा अपमान आहे. याबाबत मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा.

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, सन् 2003 में जब इस बिल के लिए 15 सदस्यों की संयुक्त चिकित्सा समिति नियुक्त हुई थी तो उस समय मा. विरोधी पक्ष नेता ने इस बारे में कुछ तक्रार की थी, कुछ ऑब्जेक्शन्स लिए थे और उसके बाद नई समिति का गठन नहीं हुआ. यह विधेयक कामगारों के हित से संबंधित है, इसलिए बी.ए.सी. ने यह निर्णय लिया इस बिल को संयुक्त चिकित्सा समिति से वापस लेकर सभागृह में पेश किया जाए.

प्रश्न प्रस्तुत झाला.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, 15-20 मिनिटात चर्चा होऊ शकत नाही.विषय महत्वाचा आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. प्रश्न मतास टाकून संमत झाला आहे. आता दुपारच्या सत्रात बिल चर्चेला घेऊ. आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेऊ या.

----

यानंतर श्री. गायकवाड

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेखाच्या सूचना**

पृ.शी. :अहमदनगर जिल्हयातील नेवासे व राहुरी तालुक्यातील शेतक-यांनी मुळा धरणाचे एक टी.एम.सी.पाणी कायम स्वरुपी सोडण्याची केलेली विनंती

मु.शी : अहमदनगर जिल्हयातील नेवासे व राहुरी तालुक्यातील शेतक-यांनी मुळा धरणाचे एक टी.एम.सी.पाणी कायम स्वरुपी सोडण्याची केलेलीविनंती याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. :

" अहमदनगर जिल्हयातील नेवासा व राहुरी तालुक्यातील नदीकाठच्या जमिनी पुनर्वसन खात्यामार्फत ताबयात घेऊन मुळा धरणग्रस्तांना देण्यात आल्या,मुळा धरणाच्या पाण्यावरच नेवासा व राहुरी तालुक्यातील नदीकाठच्या शेतक-यांचे जीवन अवलंबून आहे, या धरणाचे पाणी बंधा-यात जर आले तर ते पाणी पाझराव्दारे नेवासा व राहुरी तालुकयातील शेतक-यांच्या विहिरीत जाते व त्याचा उपयोग पिण्यासाठी,जनावरांसाठी व शेतीसाठी होतो. या संदर्भात मुळा धरणाचे पाणी मानोरी व वांजुळपुई के.टी.वेअरमध्ये 1 टी.एम.सी. कायम स्वरुपी सोडण्याबाबत निवेदन नेवासा व राहुरी तालुक्यातील शेतक-यानी तहासीलदाराकडे दिले आहे. नेवासा व राहुरी तालुक्यातील शेतक-यांनी विविध आंदोलने करुन शासनाचे लक्ष वेधण्याचे सर्व प्रयत्न करुन पाहिले. परंतु आश्वासना व्यतिरिक्त कृती काहीही झाली नाही.संबंधित मंत्र्यांनी आदेश देऊनही त्याची अंमलबजावणी पाटबंधारे खात्याने अद्याप केलेली नाही. ही बाब तर अतिशय गंभीर व संतापजनक आहे. शासनाच्या या बेपर्वाईमुळे शेतक-यांची परिस्थिती फार बिकट झाली आहे म्हणून तातडीने खास बाब म्हणून एक टी.एम.सी. पाणी कायम स्वरुपी सोडण्यात यावे." सदर विषय सार्वजनिक दृष्टया महत्वाचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे आपल्या परवानगीने उपस्थित केलेला आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, शासन या संबंधी शेतक-यांच्या हिताचा व योग्य तो निर्णय घेईल. धन्यवाद

---

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: साबुसिध्दीकी पॉलिटेक्नीकमध्ये सुरु असलेले गैरप्रकार
मु.शी : साबुसिध्दीकी पॉलिटेक्नीकमध्ये सुरु असलेल्या गैरप्रकारा बाबत श्रीमती सेंजीवनी रायकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** :माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधी सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक): महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते. :

"साबुसिध्दीकी पॉलिटेक्निक या संस्थाची स्वायत्ता रद्द करण्याबाबत अहवाल सादर करण्यात आला आहे. तेथे परीक्षेतील अनेक गैरप्रकार सुरु असून प्राचार्याची अजूनही चाललेली मनमानी या सबंधात तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. सदर विषय महत्वाचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे मांडू इच्छिते ."

सभापती महोदय आपण मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास परवानगी दिली याबद्दल मी आपली आभारी आहे .परंतु हाच प्रश्न किती वेळा मांडावयाचा ? हा माझ्यापुढे प्रश्न आहे. 10 डिसेंबर 2004 रोजी नागपूर अधिवेशनात हाच प्रश्न विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे मांडला होता.त्या अगोदर पावसाळी अधिवेशनात संपूर्ण भ्रष्टाचारासंबंधी लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. या पूर्वी मी जी विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती त्याचे उत्तरासुध्दा शासनाने दिले होते . त्यावेळी उत्तरात असे म्हटले होते की,"परीक्षेतील फेरफार प्रकरण नियमबाहय गोष्ट असल्यामुळे संबंधित संस्थेची स्वायत्तता रद्द करण्यासाठीचा अहवाल 30.11.2004 च्या पत्रानुसार पाठविण्यात आला आहे" परंतु अद्याप त्या संस्थेची स्वायत्तता रद्द झाली नाही. पुन्हा या वर्षी जो काही गैरप्रकार करावयाचा होता तो त्यांनी केला आहे.गेल्या वर्षी परीक्षेमध्ये त्यांनी घोटाळा केला होता म्हणून स्वायत्तता रद्द करण्यात यावी असे म्हटले होते या वर्षीसुध्दा तेथे घोटाळे केले गेले आहेत. तेथे श्री अब्दुल.रझ्झाक नावाचे एक प्राचार्य असून.ते झेब्रा मलिक नावाची त्यांची जी असिस्टंट आहे तिच्या मदतीने परीक्षेत भ्रष्टाचार करीत असतात .श्री.हक नावाचे एक परीक्षा नियंत्रक अधिकारी आहेत. याबाबतीत त्यांनी तक्रार केल्यामुळे त्यांचे सहा महिने निलंबन करण्यात आले होते. परंतु ते नंतर कोर्टात गेले होते व कोर्टात गेल्यानंतर असे सांगण्यात आले होते की,या प्रकरणी त्यांची चौकशी करण्यात यावी.परंतु अजूनही चौकशी करण्यात आलेली

3...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नाही. या वर्षी इलेक्ट्रीकल इंजिनिअरचा थर्ड वर्षाचा एक विद्यार्थी आजारी असल्यामुळे तो दुस-या घटक चाचण्ीला बसू शकला नाही. नियमानुसार पुन्हा परीक्षा घेण्याचे प्रावधान नसतांना ही परीक्षा घेण्यात आली होती. सदर परीक्षा घेण्यास तेथील शिक्षकांनी विरोध केला होता परंतु दबाव तंत्राचा अवलंब करण्यात आला होता व ही परीक्षा घेण्यात आली होती. ही बाब कर्मचारी संघटनेने संचालकांकडे केली होती त्यानंतर ही परीक्षा रद्द करण्यात आली आणि गुंणही रद्द करण्यात आले होते या सस्थेसंबंधी अशा अनेक तक्रारी आहेत. माजी मंत्री श्री.इसाक जामखानवाला यांचा आपल्यावर दबाव येतो की काय ? व त्यामुळे शासन काही कारवाई करीत नाही की काय? अशी मला शंका येते.तेव्हा तातडीने या संस्थेची स्वायत्तता रदद् करावी अशी मी विनंती करते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी : वर्तमानपत्रात येणा-या बिभत्स जाहिराती तसेच रस्त्यावर लागणारी

अश्लील पोस्टर्स

मु.शी : वर्तमानपत्रात येणा-या बिभत्स जाहिराती तसेच रस्त्यावर लागणारी अश्लील पोस्टर्स याबाबत श्री.संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधान सभेने निवडलेले) :महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :

" जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती ही आदर्श संस्कृती म्हणून गणली जाते.त्याबद्दल आम्हा सर्वाना गर्व आहे. एकत्र कुटूंब पध्दती हा या संस्कृतीचा पाया आहे. पण आज ही आदर्शवत संस्कृती रसातळाला जाते की काय अशी भीती प्रत्येक भारतीयास वाटत आहे. या संस्कृतीला ग्रहण लागले असून शेवटची घटका मोजण्या पर्यन्त आज परिस्थिती निर्माण झाली आहे. पाश्चिमात्य संस्कृतीने आमच्यावर संपूर्णपणे ताबा बसविला असून प्रत्येक क्षेत्रात सर्वत्र पाश्चिमात्य संस्कृ तीचा पगडा दिसून येत आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचे हे वारे आमच्या युवा पिढीवर भुरळ घालीत असून आमची युवा पिढी आज भरकटलेली आहे....

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त ...

त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत व त्यांनी आई वडीलांचे पांग फेडावे असे प्रत्येक पालकांस वाटत असते. आपला पाल्य हा उद्याचा आपला आधारस्तंभ असल्याकारणाने त्याने कुठल्याही वाममार्गास जाऊ नये असे प्रत्येक पित्यास वाटते. परंतु सभापती महोदय, आज आपण सर्वत्र पाहिले तर असे दिसून येईल की, आमच्या युवा पिढीवर फार वाईट परिणाम होईल असेच वातावरण सर्वत्र निर्माण झाले आहे. सिनेमाची अश्लिल पोस्टर्स, टी.व्ही.वरील चाललेली अश्लील दृश्ये, वर्तमानपत्रात येणाऱ्या अश्लील जाहिराती, काही वर्तमानपत्रात महिलांचे येणारे कमी कपड्यातील फोटो या सर्व बाबी आजच्या आमच्या युवा पिढीवर वाईट परिणाम करीत आहेत. घराबाहेर नव्हे तर घरातच टीव्ही वर 24 तास अश्लिलतेने कळस गाठला आहे. गाण्यांच्या रिमिक्स मधून युवा पिढीवर वाईट संस्कार होतील असे हावभाव व कमी कपड्यातील अश्लील डान्स हाच आमच्या तरूणांचा आदर्श होत चालला आहे. सभापती महोदय, हे सर्व काही, वेळेवरच थांबणे गरजेचे आहे. प्रत्येक पालकांमध्ये विशेषत: ज्यांची मुले कुमार वयात आहेत त्यांच्यात भीतीचे व चिंतेचे वातावरण पसरलेले आहे. त्यासाठी आपल्या राज्य सरकारने त्वरित अश्लिलतेविरोधात खंबीर पावले उचलणे गरजेचे आहे. कारण ही युवा पिढी आमच्या देशाची संपत्ती आहे. ती नीट सांभाळणे व तिचे जतन करणे सर्वांचेच काम आहे. त्यासाठी वेळीच या प्रलोभनांना आळा घालणे गरजेचे आहे. म्हणून सभापती महोदय, रस्त्यांवर लावली जाणारी अश्लील पोस्टर्स, विशेषत: शाळा आणि कॉलेज यांच्या परिसरात, वर्तमानपत्रात येणारे स्त्रियांचे कमी कपड्यातील फोटो व जाहिरात, दूरदर्शन तसेच विविध चॅनेल वरील उलटसुलट प्रेमप्रकरणांसंबंधीच्या सिरियलस्, अश्लील जाहिराती, बीभत्स दृश्ये थांबवावीत. त्यासाठी राज्य शासनाने कडक कारवाई करावी. डान्सबार विषयी वा गावठी दारू विषयी शासनाने जी ठोस पावले उचललेली आहेत. तशीच खंबीर भूमिका शासनाने या अश्लीलते विरोधात घ्यावी व तरूण पिढीस या प्रलोभनांपासून वाचवावे अशी नम्र विनंती मी या ठिकाणी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

*****

...... क्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KGS/ MAP/ श्री. गायकवाड नंतर --- 12:20

**पृ.शी.** : कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाशर्तीबाबत.

**मु.शी.** : कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाशर्तीबाबत सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

----

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विषयाबाबत विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो ...

" कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाशर्तीबाबत प्रमाणसंहिता नियम लागू करण्याबाबत."

माननीय सभापती महोदय, वास्तविक पाहता हे विश्वविद्यालय स्थापन झाल्यापासून एका अर्थी एका बाबतीत एक तऱ्हेचा घोळ झाला आहे. मुंबईहून उच्च आणि तंत्र शिक्षण खात्याच्या कक्ष अधिकारी यांचेकडून 15 ऑक्टोबर 2004 रोजी या विश्वविद्यालयाकडे अशी विचारणा करण्यात आली आहे की, एकंदर सर्व विश्वविद्यालयांमध्ये प्रमाण संहितेतील सेवाप्रवेश नियम आहेत त्यापेक्षा वेगळे नियम आपल्याकडे आहेत काय ? त्यावर या विश्वविद्यालयाकडून कुलसचिवांनी दिनांक 11 नोव्हेंबर 2004 ला असे उत्तर पाठविले की, वास्तविक पाहता महाराष्ट्र अकृषि विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता नियम 1984 मध्ये नमूद केलेल्या त्या त्या पदांचे सेवा प्रवेश नियमानुसार कर्मचाऱ्यांची नियुक्ती व वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. म्हणजेच हे नियम आमच्याकडेही लागू आहेत. परंतु या विश्वविद्यालयाने तांत्रिक पदांसाठी किंवा अन्य पदांसाठी सवेगळे सेवाप्रवेश नियम तयार केलेले नाहीत. माननीय सभापती महोदय, असे असतानाही या संबंधात अजूनही निर्णायक असे काहीही या विश्वविद्यालयास कळविण्यात आलेले नाही. त्यामुळे आज तेथे असा प्रश्न निर्माण झ ाला आहे की, तेथील एक कर्मचारी श्री. तोडकर म्हणून वरिष्ठ लिपिक हे 31 मे 2005 रोजी विहित वयोमानानुसार निवृत्त होत आहेत. परंतु त्यांच्या अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीच्या विनियोगाबाबत अजूनपर्यंत निर्णय झालेला नाही. त्यामुळे

...... क्यू 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. मोडक ....

मोठी समस्या निर्माण झालेली आहे. माननीय सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळाकडून ही माणसे शासनाच्या आदेशानुसार या विश्वविद्यालयामध्ये सामील झाली आणि 19.3.1999 पासून या विश्वविद्यालयाच्या सेवेत कार्यरत आहेत. दुर्दैवाने आजपर्यंत निर्णायक उत्तर शासनाकडून न आल्यामुळे एक प्रकारचे नैराश्य आणि असंतोष तेथील कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला आहे. माननीय सभापती महोदय, 21 मार्च 2005 रोजी महाराष्ट्र शासनाकडून एक नवीन परिपत्रक यांचेकडे पोहोचले आहे. त्यातील पहिलीच ओळ अशी आहे की, "राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शासनमान्य अनुदानित पदांना शासन अनुदान अनुज्ञेय असून त्यांना शासनाची निवृत्ती योजना लागू आहे. तेव्हा या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून माझी विनंती आहे की, या संबंधात कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाने शासनाला एकदा कळविले आहे की, इतर विद्यापीठांचे सेवानियम आम्हालाही लागू आहेत तर मग त्या संबंधात निर्णायक खुलासा शासनाने तातडीने विश्वविद्यालयास कळवावयास पाहिजे. जेणे करून जे सद्‌गृहस्थ निवृत्त होणार आहेत त्यांना दिलासा मिळेल, न्याय मिळेल. एवढी विनंती करून मी विशेष उल्लेख संपवितो.

*****

( यानंतर श्री. जागडे ..... आर 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 12 वाजून 25 मिनिटांनी, 1.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली. )

---

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी मा.सभापती)**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**तळोशी (ता.महाड,जि.रायगड) येथील प्राथमिक शाळेत एकच शिक्षक असल्याबाबत**

**(१) * १८८८ श्री. जयंत पाटील** : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) अनेक प्राथमिक शाळेत विशेषतः तळोशी येथे इयत्ता १ ली ते ५ वी या सर्व वर्गासाठी मिळून एकच शिक्षक असल्याच्या तक्रारी तेथील ग्रामस्थांनी शासनाकडे वारंवार केल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) या प्राथमिक शाळेमधून अपुरा शिक्षक वर्ग असल्यामुळे तळोशी व त्या परिसरातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची हेळसांड होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंबंधी शासनाने ग्रामस्थांच्या तक्रारीची दखल घेऊन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री. विजयसिंह मोहिते-पाटिल यांच्याकरिता**: (१) महाड तालुक्यातील तळोशी येथे इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग असून दोन शिक्षक कार्यरत आहेत. सदर शाळेत एकच शिक्षक असल्याची तक्रार तळोशी ग्रामस्थांनी गट शिक्षण अधिकारी, महाड कार्यालयात केली आहे.

(२) पटसंख्येनुसार सदर शाळेस दोन उप शिक्षक व एक मुख्याध्यापक अशी तीन पदे मंजूर आहेत. सध्या सदर शाळेत दोन उप शिक्षक कार्यरत असून त्यांचेकडून नियोजनाप्रमाणे विद्यार्थ्यांचे अध्यापन केले जाते.

(३) सदर शाळेत दोन उप शिक्षक कार्यरत आहेत व मुख्याध्यापकाचे पद भरण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1888

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या शाळेमध्ये सात शिक्षकांची आवश्यकता असतांना फक्त एकच शिक्षक साडे तीन वर्षे आहे. तेव्हा एका शिक्षकाने सात वर्ग शिकवावे असे शासनाने नवीन धोरण स्वीकारले आहे कां?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, त्या शाळेमध्ये तीन शिक्षकांची गरज आहे, सात शिक्षकांची नाही. सध्या त्याठिकाणी दोन शिक्षक आहेत, व ते मुलांना शिकवीत आहेत. त्या शाळेमध्ये हेडमास्तर नाही हे खरे आहे, तेव्हा हेडमास्तरची गरज आहे. लवकरात लवकर ते पद पदोन्नतीने भरण्यात येईल.

श्रीमती सुधा जोशी : सदर शाळेमध्ये एक शिक्षक असल्याची तक्रार ग्रामस्थांनी गट शिक्षणाधिकारी, महाड यांच्या कार्यालयात केली हे मंत्रिमहोदयांनी कबूल केले आहे. अशी तक्रार ग्रामस्थांनी कां केली? याचा अर्थ एकाच्या ठिकाणी दोन शिक्षक म्हटले आहे. एका वेळी दोन पैकी दोन शिक्षक हजर रहातात कां? 1 ली ते 5 वी करिता मुख्याध्यापकांसह तीन शिक्षक असणे ही संख्या अत्यंत अपूरी ठरते. मुख्याध्यापकाचे पद भरण्याची कार्यवाही चालू आहे असे म्हटले आहे. तेव्हा मुख्याध्यापकाचे पद केव्हापासून रिक्त आहे, व ही कार्यवाही केव्हा चालू केली ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, दोन शिक्षक असून ते दोन्ही हजर रहातात. पदोन्नतीची प्रक्रिया दरवर्षी होत असते. मागील वर्षी 183 शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली त्यापैकी फक्त 94 शिक्षकांनी पदोन्नती स्वीकारली व 99 शिक्षकांनी पदोन्नती स्वीकारली नाही. या वर्षी 150 शिक्षकांना पदोन्नती देण्याचे प्रस्तावीत असून ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर ही पदे भरण्यात येतील.

श्री. वसंतराव खोटरे : प्रश्नामध्ये विचारण्यात आले आहे की, 1 ली ते 5 वी या सर्व वर्गांसाठी मिळून एक मुख्याध्यापक व 2 शिक्षकांची गरज आहे. असे असतांना त्या ठिकाणी एकच शिक्षक आहे. प्रश्न असा आहे की, ही पदे केव्हापासून रिक्त आहेत. ही पदे रिक्त राहिल्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले, ते विद्यार्थी अप्रगत राहिले त्याला जबाबदार कोण?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी वारंवार सांगत आहे की, त्या ठिकाणी दोन शिक्षक आहेत. मुळात राज्यामध्ये शिक्षकांची संख्या फार कमी आहे...

श्री. वसंतराव खोटरे : या ठिकाणी शिक्षकांच्या जागा केव्हापासून रिक्त आहेत ते सांगा?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1888 . . . .

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, 1ली ते 4 थी च्या वर्गामध्ये फक्त 29 विद्यार्थी आहेत आणि 5 वी ते 7 वी च्या वर्गामध्ये फक्त 22 विद्यार्थी आहेत आणि त्यासाठी तेथे दोन शिक्षकांची गरज आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी हे काय सुरु आहे ? माननीय मंत्री महोदय कशा प्रकारची उत्तरे देत आहेत ? या शाळेमध्ये सात वर्ग आहेत आणि माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, तेथे 2 शिक्षक आहेत आणि मुख्याध्यापक नाहीत. पण माननीय मंत्री महोदय उत्तर देताना मात्र, तेथे सर्व काही व्यवस्थित सुरु आहे अशा पध्दतीने सांगत आहेत. तेव्हा आपणच आम्हाला मार्गदर्शन करावे किंवा यांनीच त्यांच्या दिव्यदृष्टीतून समजावून सांगावे की, पहिली ते सातवी पर्यंतच्या वर्गांना हे दोन शिक्षक कोणत्या चमत्काराने शिकवितात ? सभापती महोदय, हे योग्य आहे का ? हे काय आहे ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचा रोख असा आहे की, ही 1 ली ते 7 वी पर्यंतची इयत्ता असलेली शाळा आहे आणि सध्या तेथे दोन शिक्षक आहेत. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर असे आहे की, हेड मास्तरांसह तेथे तीन शिक्षकांची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेबांनी हाच प्रश्न विचारला आहे की, 1 ली ते 7 वी च्या वर्गासाठी कमीतकमी किती शिक्षक असावेत आणि त्यापैकी दोन शिक्षक कधीपासून आहेत ? ते सांगावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या प्रमाणात किती शिक्षक असले पाहिजेत याबाबतीत शासनाचे नॉर्म्स् आहेत. त्या नॉर्म्स्प्रमाणे 1 हेड मास्तर आणि 2 शिक्षकांची त्या शाळेमध्ये गरज आहे. विद्यार्थ्यांच्या पटसंख्येप्रमाणे याबाबतीत नॉर्म्स् ठरलेले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्या शाळेमध्ये 1 ली ते 5 वी पर्यंतच्या वर्गामध्ये विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ? तसेच नॉर्म्स्प्रमाणे किती विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक असला पाहिजे ?

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, या शाळेमध्ये 1 ली ते 7 वी पर्यंतचे वर्ग असून त्यामध्ये एकूण 51 विद्यार्थी आहेत. 1 ली ते 4 थी च्या वर्गामध्ये 29 विद्यार्थी आणि 5 वी ते 7 वी पर्यंतच्या वर्गामध्ये 22 विद्यार्थी आहेत. निकष असा आहे की, 1 ली ते 4 थी मध्ये 15 विद्यार्थ्यांसाठी 1 शिक्षक, 16 ते 89 विद्यार्थ्यांसाठी 2 शिक्षक. 5 वी ते 7 वी साठी 15,10 अशी

. . . .टी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1888 . . . .

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील . . . .

कॅटॅगरी आहे आणि त्यासाठी 1 शिक्षक असे आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ही ग्रामीण भागातील शाळा आहे. विद्यार्थ्यांच्या संख्येचा विचार केला तर, आता माननीय मंत्री महोदयांनी निकषाच्या संबंधात जे उत्तर दिले आहे, ते विचारात घेतले तर या शाळेमध्ये 4 शिक्षकांची पदे मंजूर होऊ शकतात. गेल्या अनेक दिवसापासून तेथे शिक्षक नाहीत. 1 ली ते 7 वी च्या वर्गासाठी सर्व विषय त्या दोन शिक्षकांनी शिकवावयाचे आहेत अशी सध्या स्थिती आहे. म्हणून आपल्या नॉर्म्स्प्रमाणे त्या शाळेमध्ये सर्व शिक्षकांची नेमणूक किती दिवसामध्ये करण्यात येणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, तेथे नॉर्म्स्प्रमाणे 2 शिक्षक आणि 1 हेड मास्तर यांची गरज आहे. सध्या तेथे 2 शिक्षक आहेत आणि 1 हेडमास्तरची नेमणूक करावयाची आहे. त्याठिकाणी जसे प्रमोशन होईल, कारण त्याशिवाय भरती करु शकणार नाही. प्रमोशनची यादी तयार आहे, ती फायनल झाल्यावर आम्ही नेमणूक करु.

----

. . . .टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जळजांव जिल्हा परिषदेमध्ये उमेदवारांची -ियुक्ती ज्रता-ाा
प्रज्ल्पग्रस्त उमेदवारांवर झालेला अ-याय

(2) * 3672 श्री. जुरुमुज्ञ जाजवा-ी , श्री. -िती-ा जडज्री , श्री. प्रतापराव सो-ावजे , श्री. पांडुरंज फुंडज्र , श्री. मधुज्र चव्हाज , श्री. वि-ोद तावडे : स-मा-ा-ीय ग्रामविज्ास मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज्रतील ज्ाय :-

(1) जळजांव जिल्हा परिषदेमध्ये विविध जात्यामध्ये प्रज्ल्पग्रस्त उमेदवारांची -ियुक्ती ज्रता-ाा सामा-य प्रशास-ा विभाज परिपत्रज ज्र.प्रज्ल्पग्रस्त 1000/प्र.ज्र.27/2000/16 अ,दि-ांज 13.9.2000 व ग्रामविज्ास व जलसंधारज विभाज धरज /1000/प्र.ज्र.3244/15,दि-ांज 20.11.2001 अ-वये विहित जेलेल्या पध्दती-ुसार -ा भरता अ-य पध्दती-े भरल्यामुळे स्था-िज प्रज्ल्पग्रस्त उमेदवारांवर अ-याय झाला आहे, हे जरे आहे ज्ाय,

(2) असल्यास, याबाबत शास-ाा-े चौज्शी जेली आहे ज्ाय,

(3) चौज्शीत ज्ाय आढळू-ा आले व त्या-ुसार पात्र प्रज्ल्पग्रस्त उमेदवारांची भरती ज्रज्याबाबत शास-ाा-े जोजती जार्यवाही जेली आहे वा ज्रज्यात येत आहे,

(4) अद्याप जोजतीही जार्यवाही जेली -ासल्यास, विलंबाची जारजे ज्ाय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता : (1) अंशत: जरे आहे.

(2) होय.

(3) व (4) जळजांव जिल्हा परिषदेज्डील ग्रामसेवज संवर्जाची फक्त 10 पदे व पशुध-ा पर्यवेजजाची 3 पदे प्रज्ल्पग्रस्तामधू-ा भरावयाची होती. त्यात पशुध-ा पर्यवेजज संवर्जाची 3 पदे जळजांव जिल्हाधिजारी जार्यालयाज्डू-ा प्रज्ल्पग्रस्तांची यादी माजवू-ा त्यातील दो-ा पदे भरली. मात्र तिसरे पद हे भ.ज.(ड) प्रवर्जासाठी राजीव पद असल्या-े व त्या जिल्हाधिजारी जार्यालयातील यादीत त्या प्रवर्जातील उमेदवार उपलब्ध -ा झाल्या-े शास-ााच्या मा-यते-े इतर जिल्हयातू-ा भरज्यांत आले. शास-ााच्या दि-ांज 4 जा-ेवारी, 2003 च्या आदेशाप्रमाजे जिल्हा -िवड समितीमार्फत -िव्वळ जाहिरातीद्वारे भरली. त्यात ग्रामसेवज संवर्जातील प्रज्ल्पग्रस्तांची 10 पदे शास-ा आदेशा-ुसार जिल्हाधिजारी जार्यालयाज्डू-ा प्रज्ल्पग्रस्तांची यादी माजवू-ा भरती ज्रजे आवश्यज होते. तथापि जिल्हाधिजारी जार्यालयाज्डू-ा प्रज्ल्पग्रस्तांची यादी माजवू-ा भरती -ा ज्रता जिल्हा -िवड समिती-े -िवड जेलेल्या व त्यात प्रज्ल्पग्रस्त म्हजू-ा उपलब्ध झालेल्या उमेदवारांमधू-ा ग्रामसेवजांची 10 पदे भरली व हया 10 पदांपैजी 7 उेदवार स्था-िज जळजांव जिल्हयातील असू-ा 3 उमेदवार हे अ-य जिल्हयातील आहेत.

श्री.गुरुमुख जागवानी : सभापति महोदय, जलगांव जिला परिषद में विविध विभागों में प्रकल्पग्रस्त उम्मीदवारों की नियुक्ति करते समय नियमों का पालन न करते हुए पैसा लेकर भरती करके प्रकल्पग्रस्तों पर अन्याय किया गया है. जिला परिषद में ग्राम सेवकों के कुल 91 पद हैं. जलगांव जिला परिषद में ग्राम सेवक संवर्ग के 10 पद प्रकल्पग्रस्तों के लिए रिजर्व थें. ये पद जलगांव जिलाधिकारी कार्यालय द्वारा बनाई गई प्रकल्पग्रस्तों की लीस्ट के अनुसार भरे जाए. इस प्रकार का नियम है. लेकिन वहां लीस्ट को नज़रअंदाज़ करके दो-दो लाख रुपये लेकर 7 पद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4

भरे गए और जलगांव के बाहर के तीन लोगों को नौकरी दी गई. इसलिए मेरा यह प्रश्न है कि इस प्रकार से जो सिलेक्शन किया गया है, क्या उसे रद्द करके फिर से सिलेक्शन करने संबंधी आदेश दिए जाएंगे और क्या इस मामले की जांच की जाएगी ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि जून, 2004 में शिक्षणसेवकों की भरती के संबंध में विज्ञापन दिया गया था. शिक्षणसेवकों के पद भी प्रकल्पग्रस्तों के लिए आरक्षित थें. लेकिन ये पद अभी तक नहीं भरे गए हैं. जलगांव में ऐसे हजारों की तादाद में प्रकल्पग्रस्त हैं जो डी.एड. हैं. ये पद न भर कर उन पर अन्याय हो रहा है. इसलिए क्या इस मामले की जांच करके प्रकल्पग्रस्तों को न्याय दिया जाएगा ?

यानंतर श्री किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे.... 13:10

ता.प्र.क्र.3672 (पुढे चालू....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जी भरती झालेली आहे, ती नियमाप्रमाणे झालेली आहे. 2000/2001 चे शासनाने परिपत्रक काढलेले आहे त्यानंतर शासनाने सूचना दिलेल्या आहेत की, फक्त कलेक्टरची यादी न घेता, सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे आणखी शासनाने आणखी एक परिपत्रक काढलेले आहे ते विचारात घ्यावे. त्यामध्ये क्लिअरकट म्हटलेले आहे की, सिनियॉरिटीप्रमाणे कलेक्टरांची यादी घ्यावी त्याचबरोबर त्याबाबतची जाहिरात महाराष्ट्रात सगळीकडे देऊन प्रकल्पग्रस्त उमेदवारांचे अर्ज मागवून त्यांचा इंटरव्ह्यू घ्यावा. त्याप्रमाणे जळगाव सोडून इतर भागातील प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी अर्ज केलेले होते. ज्यांचा इंटरव्ह्यू झाला त्यामध्ये जळगावचे 7उमेदवार आणि 3 उमेदवार बाहेरचे होते. पण या ठिकाणी सिनियॉरिटीने न बोलाविता मेरिटने उमेदवार घेतले गेले.

श्री.पांडुरंग फुंडकर : या जिल्हापरिषदेमध्ये रिक्त पदे भरत असतांना शासनाचे जे निकष आहेत, त्याप्रमाणे भरती केलेली नाही. प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात शासनाच्या निकषाप्रमाणे कलेक्टरांकडे उमेदवारांच्या सिनियॉरिटीची यादी असते, त्यामधील उमेदवारांना बोलाविले जाते. त्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांसाठी जितक्या जागा राखीव असतात, त्या ठिकाणी या यादीतील उमेदवारांना प्राधान्य दिले जाते. प्रत्येक खात्यामध्ये ज्या जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे जीवन उध्वस्त झ ालेले आहे, त्यांच्या घरातील एका व्यक्तीला नाकरीवर घेण्याच्याबाबतीतील यादी जिल्हाधिकाऱ्यांकडे असते, त्याप्रमाणे त्यांना प्राधान्य दिले पाहिजे. जळगाव जिल्हापरिषदेमध्ये 2000-2001 आणि जून 2004 मध्ये प्रसिध्द झालेली 'शिक्षक सेवकां'ची आरक्षित पदे भरली गेली नाहीत. म्हणून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्तरावर ही भरती झालेली आहे. त्यामध्ये दोन-दोन लाख रुपये उमेदवारांकडून घेतलेले आहेत. म्हणून त्या जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त आहेत, ...त्यांची जमीन प्रकल्पामध्ये गेलेली आहे, ते भूमीहीन झालेले आहेत ,त्यांना त्या ठिकाणी प्राधान्य देण्याच्याबाबतीमध्ये शासनाने धोरण ठरविलेले आहे. त्याप्रमाणे भरती झालेली नाही, तेव्हा ती भरती रद्द करून पुन्हा नव्याने भरतीचे आदेश देणार आहात काय आणि या प्रकरणी जो गैरप्रकार झालेला आहे, त्याची चौकशी करणार आहात काय ?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्य म्हणाले त्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांची सिनियॉरिटीप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे यादी असते ती प्रथम बोलाविली पाहिजे हे खरे आहे. पण त्यानंतर सुप्रीम कोर्टाचेही एक जज्जमेंट आहे. त्यामध्ये त्यांनी स्पष्ट सांगितलेले आहे की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र. 3672 ....

श्री. रणजित कांबळे (पुढे चालू....

"Having regard to the respective contentions, we are of the view that contention of the respondents is more acceptable which would be consistent with the principles of fair play, justice and equal opportunity. It is common though their names are either registered or are waiting to be registered in the employment exchange, with the result that the choice of selection is restricted to only such of the candidates whose names come to sponsored by the employment exchange. Under these circumstances, many a deserving candidates is deprived of the right to be considered for appointment to a post under the state. Better view appears to be that it should be mandatory for the requisitioning authority/establishment to intimate the employment exchange and employment exchange should sponsor the names of the candidates to the requisitioning departments or selection strictly according to seniority and reservation, as per requisition. In addition, the appropriate department, undertaking, or establishment should call for the names by publication in the newspapers having wider circulation and also display on their office notice board or to announce on radio, television and employment news bulletins, and then consider the cases of all the candidates who have applied. If this procedure is adopted, fair play would be sub-served. The equality of opportunity in the matter of employment would be available to all eligible candidates."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात..

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार... 13:15

ता.प्र.क्र.3672. . . .

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय,माझा हरकतीचा मुद्दा आहे.खरे म्हणजे सभागृहाची दिशाभूल होत आहे.सुप्रिम कोर्टाने जे जेजमेंट दिले त्या आधी शासनाने प्रकल्पग्रस्तां करिता एक जी.आर. काढला. त्या जी.आर. प्रमाणे तेथील जिल्हाधिका-याच्या ऑफिसमध्ये जी सिनियॉरिटी लिस्ट होती, त्याप्रमाणे भरती करावयास पाहिजे होती. सुप्रिम कोर्टाच्या जजमेंटचा आधार जिल्हा निवड समितीने घेतला आहे. सुप्रिम कोर्टाचे जजमेंट सगळयाच ठिकाणी लागू आहे. मग त्याचा अभ्यास करुन, लॉ डिपार्टमेंटकडून व्हेरिफाय करुन घेऊन त्या अनुषंगाने सुप्रिम कोर्टाच्या गाईडलाईन्सच्या आधाराने शासनाचा आधीचा जी.आर. दुरुस्त करुन सगळया जिल्हयाला पाठविला होता काय? सभापती महोदय, माझी माहिती अशी आहे की, सुप्रिम कोर्टाच्या जजमेंटप्रमाणे आधीच्या जी.आर.मध्ये काय बदल होतो याबाबतच्या सूचना शासनाने पाठविलेल्या नाहीत. सु-मोटो जिल्हाधिका-यांनी, त्या कमिटीने हे केले याचे कारण, सभापती महोदय, मला माहीत आहे. ते उमेदवार मला भेटले आहेत. मी जबाबदारीने सांगतो की, त्यात मोठया प्रमाणावर या बाहेरच्या उमेदवारांकडून पैसा घेण्यात आले आणि निवडमंडळावर दबाव आणून त्या सगळया माणसांची नावे त्यात धुसवण्यात आली आणि तेथील स्थानिक लोकांवर अन्याय करण्यात आला. माझा पहिला प्रश्न असा आहे की,याबाबतीत जेव्हा या राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने चौकशी सुरु केली तेव्हा यांनी त्याना दिनांक 3 जानेवारी,2004 ला पत्र दिलेले आहे.या पत्राद्वारे सामान्य प्रशासन विभागाने जिल्हाधिकारी जळगाव यांच्यकाडे चौकशी केली. त्यानंतर 2004 मध्येच शासनाकडे त्यांचा अहवाल प्राप्त झाला. याबाबत शासनाला नंतर माहिती मिळाल्यानंतर हे प्रकरण दाबण्याकरिता, हे सुप्रिम कोर्टाच्या जजमेंटचा आधार देत आहेत. जर या ठिकाणी सुप्रिमकोर्टाच्या जजमेंटचा आधार देण्यात येत आहे तर मग हे सुप्रिमकोर्टाचे जजमेंट किती तारखेला झाले आणि त्याप्रमाणे जुने जी.आर.दुरुस्त करुन नवीन गाईडलाईन्स प्रमाणे जी.आर. काढले होते काय, ते जी. आर. काढले नसतील तर डायरेक्ट सुप्रिम कोर्टाचे जजमेंट एकटया जळगाव जिल्हा परिषदेच्या सी.ओ.ला माहीत झाले. बाकी महाराष्ट्रात ते लागू होत नाही, ही विसंगती कशी?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3672. . . .

**सभापती** : श्री. नितीन गडकरी हा तुमचा हरकतीचा नसून प्रश्नच आहे. मी मंत्रिमहोदयांना उत्तर द्यावयास सांगतो.आपण असा निर्णय घेतला होता की, तारांकित प्रश्नोत्तराच्या तासात हरकतीचे मुद्दे उपस्थित करावयाचे नाहीत. मी तुम्हाला प्रश्न विचारण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा एवढाच आहे की,सुप्रिम कोर्टाच्या जजमेंटच्या आधारावर जोपर्यंत शासनाने जी.आर.काढला नाही, तोपर्यंत हे इम्प्लीमेंटेशन जिल्हा निवड समितीने केले हे योग्य की अयोग्य हा माझा वैधानिक मुद्दा आहे. आपण मला सरंक्षण द्यावे. कारण हा मुद्दा पूर्णपणे इनव्हॅलिड आहे असे माझे म्हणणे आहे.

**सभापती** :प्रकल्पग्रस्तांच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिका-यांच्या कार्यालयात ज्येष्ठता यादी निश्चित केलेली आहे.त्या त्या विभागामध्ये ज्या वेळेला रिक्रुटमेंट असेल त्यावेळेला या यादीला प्राधान्य द्यावे अशा पध्दतीच्या राज्य सरकारच्या सूचना आहेत. मूळ प्रश्न असा आहे की, या अनुषंगाने ती ज्येष्ठता यादी कां वापरली नाही. यावर मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिलेले आहे की, त्या अनुषंगाने सुप्रिम कोर्टाने एका निर्णयामध्ये असे सांगितले आहे की, या सगळया गोष्टीचा वापर कराच पण त्या व्यतिरिक्त पत्रक प्रसिध्द करुन काही उमेदवार असतील तर बघा. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे की, असे असेल तर संपूर्ण राज्यामध्ये अशा सूचना शासनाने दिल्या आहेत काय? आणि या सूचना केवळ जळगावच्या निवड समितीला दिल्या आहेत काय?

श्री. नितीन गडकरी :सभापती महोदय, एटया जळगाव जिल्हयातील निवड समितीला अशा प्रकारे सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाचे इन्टरप्रिटेशन करुन निर्णय घेण्याचा अधिकार आहे काय? केवळ आपल्या माणसांना घुसवण्याकरिता सुप्रिम कोर्टाच्या नांवावर लक्ष्मीदर्शन घेऊन हा कार्यक्रम झाला हे बरोबर नाही?

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 3672.....

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला त्याबाबत मी पुढे बोलणार होतो. त्या अनुषंगाने केंद्र सरकारने आम्हाला नोटीस दिली. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "All the State Governments/UT Administrative are requested to adhere to the aforesaid instruction." त्या पत्राच्या अनुषंगाने शासनाने एक सूचना काढली की, ही बाब लक्षात घेऊन आपण जाहिरातीच्या माध्यमातून आलेले जे उमेद्वार आहेत आणि जिल्हाधिकाऱ्यांची यादी यामध्ये ज्येष्ठतेनुसार आपण घ्यावे आणि त्यामध्ये मेरीटप्रमाणे निवडावे. ती जी यादी असते ती जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयामध्ये जाहीर होते. त्या ठिकाणी कोणता उमेद्वार सिनियारिटीच्या यादीमध्ये यावयास पाहिजे होता परंतु त्याचे नाव त्या यादीमध्ये नाही अशा प्रकारची काही माहिती आपल्याकडे असेल तर ताबडतोब त्याची चौकशी करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाने जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडून याबाबत चौकशी करुन अहवाल मागितला. तो अहवाल आपल्याला मिळाला काय ? त्या अहवालामध्ये काय त्रुटी आहेत ? त्या अहवालाच्या बाबतीत आपण पुढे काय कारवाई केली ? माझ्याकडे तारखा आहेत. सभापती महोदय, मी आपल्या माहितीसाठी सांगतो. या नियमबाह्य भरती प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या 30 डिसेंबर, 2003 रोजीच्या पत्र क्र. प्रकल्प-1003/आ-773/प्र.क्र.126/03/16-अ अन्वये व जिल्हाधिकारी, जळगाव यांनी त्यांच्या दिनांकित 3 जानेवारी, 2004 च्या पत्र क्र. स्वीस/संकिर्ण/55/2/4 अन्वये चौकशी अहवाल मागितला आहे. तो अहवाल यांना मिळाला. त्यामध्ये काय आहे ? त्या अहवालातील माहिती सांगा. त्यामध्ये काय त्रुटी आहेत ? ते बरोबर आहे की नाही ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ती माहिती सध्या माझ्याकडे नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. विजयसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, ग्रामसेवक भरतीमध्ये प्रकल्पग्रस्तांना घेतले पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. प्रकल्पग्रस्तांच्या सिनियॉरिटीप्रमाणे 7 लोकांना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतले. जाहिरातीनुसार लोक आले होते परंतु प्रकल्पग्रस्तांमधीलच 7 लोक घेतलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यामध्ये त्यांनी यामध्ये भरती करीत असताना काही तरी वेगळया प्रकारची गडबड झालेली आहे अशी तक्रार केलेली आहे. आम्ही त्याची संपूर्ण चौकशी करु आणि त्याबाबतीत कारवाई करु.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी पुराव्यासहीत सांगितले. मी तारखा सांगितल्या तसेच पत्र क्रमांक सांगितले. सामान्य प्रशासन विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना नोटीस पाठवून चौकशी करुन अहवाल मागितला. त्याचे उत्तर त्यांनी पाठविले. ते पत्र मी जाहीर करु काय ? सभापती महोदय, आपली परवानगी असेल तर ते पत्र मी जाहीर करतो.

**सभापती** : ते पत्र माझ्याकडे द्यावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला आणि माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे. हा खरा या अहवालाशी संबंधित प्रश्न आहे. सामान्य प्रशासन विभागाने चौकशीचा अहवाल मागितला. त्या अहवालाचे उत्तर जिल्हाधिकाऱ्यांनी पाठविले. त्या अहवालाचा इंफरंस त्यांनी आम्हाला सांगावा. त्यामध्ये त्रुटी असेल तर कारवाई करावी. नसेल तर आम्ही चौकशी केली त्यामध्ये काहीही नाही असे सांगावे. हाच प्रश्न विचारण्याचा मुख्य उद्देश आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, अहवाल आलेला नाही. आम्ही भरती कशी करावी यासंबंधीच्या मार्गदर्शनासाठी जिल्हाधिकारी, जळगाव यांनी सामान्य प्रशासन विभागाला एक पत्र लिहिले. सामान्य प्रशासन विभागाने त्यांना स्पष्ट पत्र दिले की, आपण या निकषाप्रमाणे त्यांची भरती करावयास पाहिजे. अहवाल वगैरे काही बोलविलेला नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : प्रकल्पग्रस्त उमेद्‌वार आणि अनुकंपा तत्वारील ज्या बाबी आहेत त्यामध्ये राज्यामध्ये प्रचंड गोंधळ आणि प्रचंड कन्फ्युजन आहे आणि याबाबतीत प्रचंड अस्वस्थता आहे. जळगाव जिल्हयामध्ये प्रकल्पग्रस्तांना घेताना त्यांची जी ज्येष्ठता यादी जिल्हाधिकाऱ्यांकडे असते त्यातील उमेद्‌वारांना आधी घेणे आवश्यक आहे आणि जर जागा उरल्या तर जिहयाच्या बाहेरील लोक असतील त्यांना सामावून घ्यावे ही साधी गोष्ट आहे. ही बाब जिल्हाधिकारी जळगाव यांनी पार पाडली आहे काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3672... प्रा.जोगेंद्र कवाडे....

संपूर्ण राज्याची एक प्रकल्पग्रस्तांची यादी तयार करावी, अनुकंपा तत्वावरील यादी तयार करावी आणि त्यानुसार त्याठिकाणी भरती करावी असे आपल्या राज्याचे धोरण आहे का ? प्रश्न असा आहे की, विदर्भातील जे प्रकल्पग्रस्त आहेत आणि ज्या अनुकंपा तत्वावरील केसेस आहेत त्यांना वगळून विदर्भाबाहेरील प्रकल्पग्रस्तांना आणि अनुकंपा तत्वाच्या लोकांना नोक-या देण्यात आल्या आहेत. भंडारा जिल्हयात गोंदिया जिल्हयातील लोकांना घेतले आहे. म्हणून शासनाने स्पष्ट भूमिका घेऊन ज्या जिल्हयातील प्रकल्पग्रस्त व अनुकंपा तत्वावरील उमेदवार असतील त्यांना प्राधान्य देऊन घ्यावे आणि उरलेल्या जागांसाठी मघाशी सांगितल्याप्रमाणे जाहिरात देऊन मेरिटप्रमाणे घ्यावे, अशाप्रकारची कार्यवाही शासन करणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : अगोदर अशीच पध्दत होती. परंतु सुप्रीम कोर्टाचे आदेश आल्यानंतर जाहिरातीच्या माध्यमातून...

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : मी हरकतीच्या मुद्याला परवानगी देणार नाही, आपण प्रश्न विचारावा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : याठिकाणी सुप्रीम कोर्टाचा मुद्दा सांगितला जात आहे. एखादा माणूस सुप्रीम कोर्टात जात असेल तर अशावेळी आमचे विधी विभागाचे अधिकारी शासनाची भूमिका चांगल्या प्रकारे मांडून योग्य निर्णय घेऊ शकत नाहीत काय ? कोर्टाकडून असा निर्णय घेण्याची क्षमता आमच्या वकिलांकडे, आमच्या ॲडव्होकेट जनरलकडे नाही काय ? अशाप्रकारचे वकील सुप्रीम कोर्टात का पाठवित नाही ?

श्री.रणजित कांबळे : शेवटी ते सगळे राज्याचे प्रकल्पग्रस्त आहेत त्यामुळे ते कोठेही अर्ज करु शकतात. त्यानुसार ते महाराष्ट्रामध्ये अर्ज करीत आहेत.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय, श्री.मोहिते-पाटीलसाहेब यांना मी सांगतो की, आपण याबाबत लक्ष देणे गरजेचे आहे. ज्यांच्या जमिनी अनेक प्रकल्पाखाली बुडालेले आहेत असे राज्यात अनेक प्रकल्पग्रस्त आहेत. त्याचप्रमाणे अनुकंपा तत्वाच्या केसेस आहेत दुर्दैवाने त्यांच्या घरची व्यक्त मरण पावलेली असते. या दोन्ही प्रवर्गाला जास्तीत जास्त प्राधान्य देऊन त्यांना नोकरीसाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र.3672... **मा.सभापती**....

संधी देणे, याकरिता जिल्हाधिका-यांच्या कार्यालयामध्ये दोन ज्येष्ठता याद्या आहेत. त्या जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांची ती यादी आहे. अन्य काहीही असले तरी त्यांना सर्वोच्च प्रधान्य देणे यासाठी प्रयत्न करणे. समजा यामध्ये अडचण आली तर मा.सदस्य श्री.कवाडे आणि मा.सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे ग्रामविकास विभाग सामान्य प्रशासन विभागामार्फत प्रयत्न करील काय आणि प्रकल्पग्रस्त आणि अनुकंपा तत्वाच्या केसेसना सर्वोच्च प्राधान्य देईल का ? त्या पध्दतीने आपण प्राधान्य द्यावे अशी माझी याबाबतीतील सूचना आहे.

श्री.रणजित कांबळे : होय.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बार्शी (जि.सोलापूर ) येथील शासजीय जोदामातील**
**रोजजार हमी योज-ेच्या ज्व्हात झालेला जैरव्यवहार**

**(3) * 1969 श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत** : स-मा-ा-नीय अन, -ाजरी पुरवठा व ग्राहज संरजज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज्रतील ज्राय :-

(1) बार्शी पोलिसां-ी दि-ांज 30 डिसेंबर,2004 रोजी वा त्यासुमारास, बार्शी (जि.सोलापूर) येथील शासजीय जोदामातील रोजजार हमी योज-ेच्या ज्व्हाची 150 पोती ज्ाळयाबाजारात विज्रीला -ेली जात असता-ा जप्त जेली हे जरे आहे ज्राय,

(2) असल्यास, शास-ा-े वरील प्रज्रजाची चौज्शी जेली आहे ज्राय,

(3) चौज्शीत ज्राय आढळू-ा आले व त्या-ुसार दोषी असजाऱ्या व्यक्तीवर शास-ा-े जोजती ज्ारवाई जेली आहे वा ज्रज्यात येत आहे,

(4) अद्याप, जोजतीच ज्ार्यवाही जेली -ासल्यास, विलंबाची ज्ारजे ज्राय आहेत ?

**श्री.सुनिल तटज्रे** : (1) दि-ांज 29.12.2004 रोजी संशयावरु-ा पोलीसां-ी 150 पोती जप्त जेली, हे जरे आहे.

(2) होय.

(3) सदर प्रज्रजाची चौज्शी ज्रज्यात आली. चौज्शीत जैरप्रज्ार झालेला -ाही, असे आढळू-ा आले. त्यामुळे दोषी व्यक्तींवर ज्ार्यवाही ज्रज्याचा प्रश्-ा उद्‌भवत -ाही.

(4) प्रश्-ा उद्‌भवत -ाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, पोलिसांनी 150 पोती जप्त केली आहेत असे म्हटले आहे. असे असताना चौकशीत गैरप्रकार झालेला नाही असे म्हणणे योग्य आहे काय ? ही 150 पोती कोणाची होती आणि ती ताब्यात का घेण्यात आली ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हे जे धान्य आहे ते उपळे दुमाला या गावातील स्वस्त धान्य दुकानासाठी रो.ह.यो.च्या मजुरांसाठी खाजगी वाहनातून चालले होते. पोलिसांचे पेट्रोलिंग चालू होते त्यावेळी त्यांना संशय आला म्हणून त्यांनी ते वाहन थांबविले आणि सुरुवातीला धान्य जप्त केले. म्हणून पहिले उत्तर खरे आहे असे म्हटले आहे. परंतु पूर्ण चौकशी केली त्यावेळी नुकताच माल परमीट घेऊन दुकानामध्ये चालला होता. राज्य मार्केटिंग फेडरेशनचे वाहन नादुरुस्त झाले असल्यामुळे खाजगी वाहनातून चालला होता. हे निदर्शनास आल्यामुळे तो माल पुन्हा मजुरांसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

4....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र.1969....

श्री.अनंत तरे : ही 150 पोती जप्त केली असे सांगितले आहे. परंतु त्या वाहनाला पकडल्यानंतर त्यांच्याकडे परमीट असेल, पोलिसांनी माल जप्त केल्यानंतर त्यांच्या चौकशीत आढळले आहे. पण जी 150 पोती होती ती गोदामातून रोहयोच्या मजुरांसाठी चालली होती. -त्या मालकाला संरक्षण देण्यासाठी माल जप्त केल्यानंतर हे उघडकीस आणण्यात आले आहे. ज्यावेळी पोलिसांनी गोदामातून गाडी पकडली त्यावेळी पोलिसांना काय आढळले आणि त्यांना माल जप्त करण्याचा काय अधिकार होता ? माझा प्रश्न असा आहे की, पोलिसांनी गाडी पकडली होती तेव्हा त्यांना काय आढळून आले ?

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 1969 ...)

श्री. सुनील तटकरे : मी आधीच सांगितले की, पोलिसांचे पेट्रोलिंग चालू होते आणि त्यावेळी खाजगी वाहनातून मालाची वाहतूक होत होती. त्यामुळे पोलिसांनी त्यांना थांबवले आणि तो माल ज्प्त केला. त्यानंतर पुरवठा अधिकारी आणि तहसिलदार यांच्याकडे चौकशी करण्यात आली. चौकशीअंती जी माहिती आढळून आली त्यानुसार पुढची कारवाई करण्यात आली.

श्री. जयंत प्र. पाटील : फेडरेशनची गाडी नव्हती म्हणून खाजगी गाडीतून माल जात होता. अशा त-हेने खाजगी गाडीतून माल नेण्यासाठी पुरवठा अधिका-याची परवानगी लागते. तशी परवानगी दुकानदाराने घेतलेली होती काय ?तसेच गोडाऊन मधून माल नेताना त्याची नोंद रजिस्टरमध्ये होत असते. तेव्हा अशा त-हेने खाजगी गाडीतून माल नेण्यात येत आहे अशी नोंद गोडाऊच्या रजिस्टरमध्ये होती काय ?

श्री. सुनील तटकरे : दोन्ही प्रश्नांची उत्तरे "होय" अशी आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : चौकशी केल्यानंतर त्यामध्ये कोणताही गैरप्रकार नाही असे आढळून आले. जेव्हा अशा प्रकारे खाजगी गाडीतून माल नेत असताना ड्रायव्हर किंवा क्लिनर यांच्याकडे त्यासंदर्भातील परवाना असतो. असा परवाना त्यांच्याकडे होता काय ? नसेल, तर तो परवाना संबंधिताला वाचविण्यासाठी नंतर करण्यात आला असा त्याचा अर्थ होईल.

श्री. सुनील तटकरे : तपासाअंती जी माहिती प्राप्त झाली त्याप्रमाणे त्यांच्याकडे परवाना होता. पोलिसांनी तो माल पकडण्याचे काय कारण ? अशी मा.सदस्यांनी विचारणा केलेली आहे. याबाबतीत देखील पोलीस विभागाकडून खुलासा मागविण्यात येईल.

श्रीमती सुधा जोशी : या प्रकरणी मुळातच पोलिसांना संशय का आला ? पोलिसांनी तो माल जप्त करण्याचे कारण काय ? परवाना असता तर पोलिसांना तो माल कसा काय जप्त केला असता ? चौकशीत काय आढळून आले की ज्यामुळे याप्रकरणी गैरप्रकार नाही असा निष्कर्ष काढण्यात आला ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 1969 ...)

श्री. सुनील तटकरे : चौकशीमध्ये असे आढळून आले की, ज्या रस्त्यावर हा माल पकडण्यात आला त्याच रस्त्यावरुन ही माल वाहतूक करावयाची होती. अन्य दुसरा कोणताही रस्ता नव्हता. त्यामुळे माल नेण्याचा जो उद्देश होता तो रास्त होता. त्या दिवशी राज्य फेडरेशनची गाडी नादुरुस्त असल्यामुळे खाजगी वाहनातून माल नेण्यासाठी परवानगी देण्यात आलेली होती. पेट्रोलिंगच्या वेळी पोलिसांनी तो माल जप्त केला. परंतु तपासणीअंती निष्कर्ष प्राप्त झाल्यानंतर पुढचा निर्णय झालेला आहे.

श्री. दिवाकर रावते : ही माल वाहतूक कायदेशीर होती असे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु आपण राष्ट्रवादी पक्षाचे मंत्री असल्यामुळे काँग्रेस पक्षाचे सदस्य श्री. संजय दत्त आणि कर्नल सुधीर सावंत यांनी प्रश्न विचारलेला आहे, हे खरे आहे काय ?

(उत्तर नाही)

श्री. संजय दत्त : हा प्रकार घडला त्यावेळी गोडाऊनमध्ये किती पोती होती याची तपासणी नंतर करण्यात आलेली आहे काय ? असल्यास, त्यामध्ये काय आढळून आले ?

श्री. सुनील तटकरे : त्या दिवशी काही प्रमाणात धान्य आलेले होते ते धान्य रोजगार हमी योजनेसाठी देण्यात आले होते हे चौकशीमध्ये सिध्द झालेले आहे.

श्री. अनंत तरे : पोलिसांनी जप्त केलेला माल ताबडतोबीने कसा काय परत केला ?

श्री. सुनील तटकरे : पोलिसांनी माल जप्त केल्यानंतर त्यासंदर्भात पूर्ण चौकशी करण्यात आली. चौकशीअंती हा माल योग्यरितीने जात होता असे आढळून आल्यामुळे तो माल परत ताब्यात देण्यात आलेला आहे.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बेरिस्ते (ता.मोखाडा) येथील बालकांना गोवर**
**आणि कांजण्यांची झालेली लाजज**

**(४) * ३९२७ श्री. अनंत तरे , श्री. दिवाकर रावते , डॉ. दिपक सावंत , श्री. अनिल परब :**
सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २४ जानेवारी,२००५ च्या सुमारास मोखाडा तालुक्यातील बेरिस्ते गावातील बालकांना गोवर आणि कांजण्यांची लागण झाली व त्यांच्यावर उपचार करण्यासाठी आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नव्हते हे खरे आहे काय,

(२) या भागातील साथीबाबत उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक सरपंच आणि पोलिस पाटील यांनी मोखाडा पंचायत समितीच्या आरोग्य विभागाकडे करुनसुध्दा त्यांची दखल घेण्यात आलेली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१) मोखाडा तालुक्यातील बेरिस्ते गावांत गोवरची लागण झाली नसून दि.१८/१/२००५ पासून चार बालकांना कांजण्याची लागण झाली आहे. सदर रुग्णांवर तात्काळ उपचार करण्यात आले. वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होते.

(२) हे जरे -ाही.

(३) व (४) कांजण्याचे रुग्ण आढळून आल्याने बेरिस्ते गाव व परिसरातील गांवे, पाडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे पथकामार्फत सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणात नवीन रुग्ण आढळून आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

श्री. अनंत तरे : मोखाडा या आदिवासी भागामध्ये पोलीस पाटील आदिवासी आहे, सरपंच आदिवासी आहे. प्रश्न क्र. 2 असा विचारण्यात आलेला आहे की, या भागातील साथीबाबत उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक सरपंच आणि पोलीस पाटील यांनी मोखाडा पंचायत समितीच्या आरोग्य विभागाकडे करुन सुध्दा त्याची दखल घेण्यात आलेली नाही हे खरे आहे काय? या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, मंत्री महोदयांनी कशाच्या आधारे हे उत्तर दिलेले आहे. तेथील सरपंच आणि पोलीस पाटील यांनी तक्रार केलेली असून त्यांचे अर्ज माझ्याकडे आहेत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 13:35

ता.प्र.क्र.3927...

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, पोलीस पाटील आणि उप सरपंच यांचे ते पत्र आहे ते पत्र सन्माननीय सदस्यांना हवे असल्यास मी देण्यास तयार आहे. मी स्वत: बी.डी.ओ. यांना बोलाविले आणि त्यांना विचारले की, अशा प्रकारची तक्रार आपल्याकडे आली होती काय ? त्याबाबतीत त्यांनी "नाही" असे स्पष्टपणे सांगितले.

श्री. अनंत तरे : माझ्याकडे पत्राची प्रत आहे ती मी माननीय मंत्री महोदयांना आपल्या माध्यमातून सादर करतो.

श्री. रणजित कांबळे : ठीक आहे. मला आपल्याकडील पत्र द्या.

डॉ. दीपक सावंत : पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, चार बालकांना कांजण्याची लागण झाली होती. तिस-या आणि चौथ्या प्रश्नाच्या उत्तरात नमूद केले आहे की, बेरिस्ते गाव व परिसरातील गांवे,पाडे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे पथकामार्फत सर्व्हेक्षण करण्यात आले. या परिसरात कांजण्याचे एकूण किती रुग्ण आढळून आले ? मोखाडा रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिका-यांची किती पदे रिक्त आहेत ?

श्री. रणजित कांबळे : पहिल्या प्रश्नाचे आम्ही छापील उत्तर दिलेले आहे. कांजण्याची लागण झालेले चारच रुग्ण आढळून आले. या ठिकाणी रुग्णालय आहे. तेथे एका वैद्यकीय अधिका-याची नियुक्ती केलेली आहे. तो वैद्यकीय अधिकारी त्या ठिकाणी सेवा करीत आहे.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**-ााजपूर जवळील जोराडी औक्ष्जज विद्युत**

**प्रज ल्पाला लाजलेली आज**

**(5) * 5326 श्री. सुरेश जेथलिया , श्री. जोपीजि स□बाजोरिया , डॉ. □लिम जोऱ्हे , डॉ. दिपज सावंत , श्री. अ□ल परब** : स-मा-ा-नीय ऊर्जा (अपारंपरिज ऊर्जा वजळू-ा) मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) दि-ांज 1 जा-ेवारी, 2005 रोजी वा त्यासुमारास -ााजपूर जवळील जोराडी औक्ष्जज विद्युत प्रजल्पाला मोठी आज लाजली हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, सदर आजीमुळे विदर्भाच्या बहुतांशी भाजात वीज पुरवठा दो-ा-ती-ा दिवस जंडीत जरज्यात आला होता हे ही जरे आहे जाय,

(3) असल्यास, शास-ा-ाे याबाबत चौजशी जेली आहे जाय,

(4) चौजशीत जाय आढळू-ा आले व तद्-ुसार शास-ा-ाे जोजती जार्यवाही जेली वा जरज्यात येत आहे ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (1) -ाही. तथापि, जोराडी औक्ष्जज विद्युत प्रजल्पामध्ये दि-ांज 27-2-2005 रोजी आज लाजली होती.

(2) विदर्भातील वर्धा व यवतमाळ जिल्ह्यातील विद्युत पुरवठा अंशत: बंद होता. चंद्रपूर व जडचिरोली या जिल्ह्यातील विद्युत पुरवठयावर जाहीही परिजाम झाला -ाही. उर्वरित विदर्भात -ााजपूर, भंडारा, जोंदिया, अमरावती, अजोला, वाशीम, बुलढाजा हे जिल्हे पूर्जपजे अंधरात होते.

दि-ांज 27-2-2005 रोजी 22.20 वाजताच्या सुमारास विदर्भाचा 35 टक्जे वीज पुरवठा चालू जरज्यात आला व दि.28-2-2005 रोजी 2.30 वा. 50 ते 60 टक्जे वीज पुरवठा सुरु जरज्यात आला. दि.7-3-2005 पासू-ा वीज पुरवठा पूर्ववत जरज्यात आला.

(3) व (4) मुज्य अभियंता (विद्युत) व मुज्य विद्युत -िरिजज, महाराष्ट्र शास-ा आजि तांत्रिज सदस्य, (पारेषज, व वितरज), म.रा.वि.मंडळ यां-ी स्वतंत्रपजे घट-ेची चौजशी जेली व शास-ास अहवाल सादर जेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

ता.प्र.क्र.5326

अहवाला प्रमाजे आजीचे प्रमुज ज ारज, 35 वर्षापूर्वी लावज्यात आलेल्या ज ेबलचे आर्युमा-ा संपल्या-ो विद्युत प्रवाहामुळे ज ेबल जरम होवू-ा इ-शुलेश-ा फेल्युअर होवू-ा ज ेबल-ो पेट घेतला व आज इतरत्र पसरली.

तथापि, असे प्रज ार वारंवार घडू -ायेत म्हजू-ा जालील उपाययोज-ाा ज रज्यात येत आहेत.

1) ज्या ज ेबलचे ज िंवा उपज रजाचे आर्युमा-ा संपलेले आहे ते बदलज्यात येतील. आज ा-िरोधज ज ेबलच फक्त वापरज्यात येतील.

2) भूमिजत ज ेबल टाज ज्याऐवजी ज ेबल जमी-ीवरु-ा टाजू-ा त्यां-ाा स्वयंचलित स्प्रींज लर सिस्टीम तसेच फायर बॅरियर लावज्यात येतील.

3) स्वयंचलित फायर डिटेक्श-ा व अलार्म सिस्टीम सबस्टेश-ामध्ये बसविज्यात येतील.

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तरात असे म्हटले आहे की, या ठिकाणी 35 वर्षापूर्वीपासूनची केबल होती. टेक्नीकल रिपोर्टप्रमाणे त्या केबलची वयोमर्यादा संपलेली होती. कर्मचा-यांच्या हलगर्जीपणामुळे ही आग लागलेली आहे त्यामुळे दोषी अधिका-यावर,कर्मचा-यांवर काय कारवाई करण्यात आलेली आहे ? या आगीमुळे जवळपास 3 कोटी रुपयाचे नुकसान झ ाालेले आहे. या आगीस दोषी असणा-या अधिका-यांविरुध्द काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री.दिलीप वळसे पाटील : ज्या केबल्समुळे ही आग लागली त्या केबल्सचे आयुर्मान 35 वर्षाचे आहे हे खरे आहे. केबल्स किती कालावधीत आऊट डेटेड होऊ शकतात यासंबंधीचे स्पष्ट असे काही निकष लावले गेलेले नाहीत. हा फायर ॲक्सीडेंटचा प्रकार आहे. त्यामुळे ही घटना घडलेली आहे. एक गोष्ट खरी आहे की, या केबल्स वेळीच बदलल्या गेल्या असत्या तर कदाचित ही घटना टळू शकली असती. या संदर्भात दोन चौकश्या नेमण्यात आल्या होत्या. मुख्य अभियंता,इलेक्ट्रीकल यांच्या माध्यमातून या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे. तसेच बोर्डाचे तांत्रिक संचालक यांच्या माध्यमातून देखील या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे. या दोघांचे चौकशी अहवाल प्राप्त झालेले आहेत. या अहवालांच्या बाबतीत वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरु आहे.

4...

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 13:35

ता.प्र.क्र.5326

श्री. अनिल परब : या प्रकल्पाचे आधुनिकीकरण करण्याचे ठरविले होते त्या अगोदरच तेथे आग लागलेली आहे. आज त्या ठिकाणची परिस्थिती काय आहे ? आधुनिकीकरणाचे कामाची प्रगती काय आहे ?

श्री. दिलीप वळसे पाटील : या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. कोराडी प्रकल्प निर्मितीचे युनीट वेगळे आहे. त्याच्यामध्ये स्वीचेस स्टेशन आहे. स्वीच स्टेशनच्या बाजूला ही कंट्रोल रुम होती. ही आग प्रामुख्याने तेथील कंट्रोल रुमला लागलेली आहे. आपले जे जनरेटिंग स्टेशन आहे ते इंम्पॅक्ट आहे. त्याला कोणताही प्रकारचा धोका निर्माण झालेला नाही. स्वीच स्टेशनला धोका निर्माण झालेला नाही. कोराडी प्रकल्पाच्या आधुनिकीकरणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांना वेगळा प्रश्न विचारावा लागेल. ती माहिती आता माझ्याकडे उपलबध नाही. सन्माननीय सदस्यांना यासंबंधीची निश्चितपणे माहिती देण्यात येईल.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, 35 वर्षापूर्वीची केबल होती. त्या केबल्सचे आयुष्यमान संपलेले होते. त्या ठिकाणी आपले मेन्टनन्स विभाग कार्यरत आहे. या केबल्स अतिशय जुन्या झ ालेल्या आहेत ही बाब त्यांच्या लक्षात आली नाही काय ? विदर्भात सध्या आठ-आठ तास वीज पुरवठा नसतो. एकेका भागाची वीज आठ-आठ तास खंडीत होत असते. त्या विभागात वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्यामुळे त्या ठिकाणी पर्यायी वीज उपलब्ध करुन देण्यासाठी काही पर्यायी यंत्रणा शासनाने उपलब्ध करुन दिली आहे काय ?

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 13:40

ता.प्र.क्र.5326 पुढे सुरु...

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी एखाद्या निर्मिती केंद्राकडून वीज निर्माण केली जाते त्यावेळी निर्माण केलेली वीज स्विचिंग स्टेशनमध्ये येते आणि नंतर ग्रीडमध्ये पाठविली जाते. कंट्रोल रुमला आग लागल्यामुळे एक तर कोराडी सब स्टेशनमधून निर्माण झालेली वीज पुढे पाठविता आली नाही आणि त्यामध्ये खंड निर्माण झाला,शॉर्टेज निर्माण झाले. अशा वेळी खापरखेडा येथून वीज घेण्याची आवश्यकता होती. परंतु त्याही ठिकाणी तांत्रिक बिघाड झाल्यामुळे प्रश्न निर्माण होऊन त्यातूनही वीज घेता आली नाही. याचा परिणाम असा झाला की परळीवर लोड आल्यामुळे सगळी सबस्टेशन ट्रीप झाली आणि वीज बंद झाली. याचा परिणाम विदर्भ आणि मराठवाडयातील काही जिल्हयामध्ये झाला आणि काही काळ लोकांना अंधारात रहावे लागले. कंट्रोल रुमचे जे नुकसान झालेले आहे ते पाहता लोकांची अशी अपेक्षा होती की हे काम साधारणपणे दोन महिन्यात तरी पूर्ण होईल. परंतु वीज मंडळाच्या सगळया अधिका-यांनी जिद्दीने काम करुन 6-7 दिवसातच दुरुस्तीचे काम पूर्ण करुन पुन्हा विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यात यश मिळविले.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, कोराडी विद्युत केंद्राच्या प्रकल्पामध्ये दुरुस्ती करण्याबाबत ज्या पध्दतीने मंत्रीमहोदयांनी उपाययोजना केल्याचे सांगितले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. माझ्या जवळच हा प्रकल्प आहे. असे प्रकार वारंवार घडू नयेत म्हणून ज्या उपाययोजना कराव्या लागतील त्यासाठी किती कालावधी लागेल ? जे जलकुंभ असतात त्यावर सफाई कधी केली त्याची तारीख आणि पुढील सफाई केव्हा करणार याची तारीख लिहिलेली असते. त्याचप्रमाणे रेल्वे वॅगन्सवर देखील अशा प्रकारची माहिती असते. सबस्टेशनमध्ये अशा प्रकारची उपकरणे आहेत त्यांची मुदत केव्हा संपणार आहे आणि किती काळासाठी याचा वापर होणार आहे याची माहिती असली तर जेणेकरुन भविष्यात असे प्रकार टाळता येतील.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मा.सदस्यांनी विचारलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. एखाद्या ठिकाणी सबस्टेशनची यंत्रणा उभी केल्यानंतर त्याचा टाईम टू टाईम मेंटेनन्स आणि अपग्रेडेशनचे काम व्हावयाला पाहिजे. हे लक्षात आल्यानंतर सुध्दा आपण अशा प्रकारचे काम हातामध्ये घेऊ शकत नाही. राज्यातील असलेला विजेचा तुटवडा लक्षात घेतला तर सगळी सबस्टेशन्स आणि जनरेटर्स अपेक्षेपेक्षा जास्त चालतात. कॅपसिटीपेक्षा आम्ही जास्त चालवत

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 13:40

ता.प्र.क्र.5326 पुढे सुरु...

श्री. दिलीप वळसे-पाटील..

आहोत. ही बाब माझ्या लक्षात आल्यावर यापुढे अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी मुख्य विद्युत निरीक्षक यांच्याकडून तपासणी केली जाते आणि अहवाल सादर केला जातो त्या अहवालाची दुर्देवाने नोंद घेतली जात नाही. वीज मंडळाला आजच याबाबतीत सूचना दिलेल्या आहेत आणि मुख्य विद्युत निरीक्षक जो अहवाल सादर करतील त्या अहवालाची काटेकोरपणाने नोंद घेऊन त्यांनी सुचविल्याप्रमाणे ज्या ठिकाणी कार्यवाहीची आवश्यकता असेल ती केली पाहिजे अन्यथा अशा प्रकारचे अपघात होऊ शकतात. आज महाराष्ट्रात जेवढी जनरेटींग सबस्टेशन्स आहेत त्यांचा सुध्दा कालावधी 30-35 वर्षांचा झालेला आहे. यंत्रणा जुनी झालेली आहे. ही यंत्रणा डिस्कार्ड करुन नवीन यंत्रणेमध्ये सुधारणा करावी याबाबत माहिती मागितली. आज राज्य सरकारच्या माध्यमातून नवीन वीज निर्मिती प्रकल्प उभे करण्याचे काम केलेले आहे त्यासाठी निधी उपलब्ध करुन देत आहोत. जुन्या यंत्रणेमध्ये सुधारणा करण्यात यावी जोपर्यंत पर्यायी व्यवस्था आपण करीत नाही. वीज निर्मिती झाली पाहिजे. तोपर्यंत हे काम हातामध्ये घेणे शक्य नाही. वीजेची पूर्तता हा एक भाग झाला आणि त्यासाठी पर्यायी व्यवस्था हा दुसरा भाग आणि त्यादृष्टिने पावले टाकण्याचे काम त्या स्तरावर अभ्यास करुन योजना तयार करीत आहोत.

यानंतर श्री. गायकवाड ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5326..

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मत्रिमहोदयांनी अतिशय विस्तृत व चांगले उत्तर दिलेले आहे परंतु हे उत्तर कागदपत्रावरच राहणार आहे.कोराडी प्रकल्पाला आग लागल्यानंतर शासन जागे होणार आहे काय ? ज्या तीन प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत त्या उपाययोजना करण्यासाठी नेमका किती कालावधी लागणार आहे ?आणि त्यासाठी पुरेसा निधी आहे काय ?

श्री.दिलीप वळसे- पाटील : डिप्रीसिएटेड व्हॅल्युप्रमाणे एकूण 2 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. ही सगळी यंत्रणा उभी करण्यासाठी एकूण 5 कोटी रुपयांचा खर्च येणार असून वीज मंडळाच्या दृष्टीने ही रक्कम फार मोठी नाही. ज्या तीन प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत त्या सहा महिन्याच्या कालावधीत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय वरळी येथील अध्यापक,तांत्रिक व अतांत्रिक पदे भरण्याच्या प्रस्तावास मिळावयाची मंजूरी**

**(६) * ५२७७ श्री. धोंडीराम राठोड** : स-मा-न-ीय वैद्यऱ्ीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील ऱ्ाय :-

(१) शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय व रुग्णालय वरळी, मुंबई येथील अध्यापक,नर्सेस,तांत्रिक व अतांत्रिक पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव संचालक शासकीय आयुर्वेदीक महाविद्यालय व रुग्णालय,मुंबई यांनी दिनांक २८ मे,२००४ रोजी वैद्यकिय शिक्षण विभागाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास वैद्यकीय शिक्षण विभागाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे ऱ्ाय,

(३) नसल्यास, त्यामागील कारणे काय आहेत व सदरहू प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी,श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) -ाही.

(३) आयुर्वेद संचालकांनी पाठविलेल्या प्रस्तावात काही सुधारणा आवश्यक असल्याने, त्यानुसार संचालकांकडून सुधारित प्रस्ताव नोव्हेंबर,२००४ मध्ये प्राप्त झाला आहे. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय वरळी येथे अध्यापक,नर्सेस व तांत्रिक,अतांत्रिक पदे भरण्यासबंधीचा प्रस्ताव दिनांक 28 मे 2004 ला संचालकांनी शासनाकडे पाठविला होता हे खरे आहे? काय असा प्रश्न विचारला असता त्याला " होय " असे उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु तिस-या उत्तरात मात्र असे म्हटलेले आहे की, "आयुर्वेद संचालकांनी पाढविलेल्या प्रस्तावात काही सुधारणा आवश्यक असल्याने त्यानुसार संचालकाकडून सुधारित प्रस्ताव नोव्हेबर 2004 मध्ये प्राप्त झाला आहे. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे".या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की ,त्याप्रस्तावात कोणत्या सुधारणा आवश्यक होत्या ? किती दिवसात या जागा भरण्यात येणार आहेत ? तसेच अनेक पदे रिक्त असल्यामुळे शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाच्या कामकाजावर परिणाम झाला नाही काय ? एकूण किती पदे रिक्त आहेत आणि ती कोणती आहेत ?

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5277...

श्री.सुरेश शेट्टी : आम्ही जे प्रपोजल पाठविले होते त्यामध्ये सेक्रेटरी लेव्हल कमिटीच्या दिनांक 22.7.2004 च्या बैठकीत काही क्वेरीज काढण्यात आल्या होत्या.त्या क्वेरीज क्लिअर करण्या करिता डायरेक्टरांकडे पुन्हा प्रस्ताव पाठविण्यात आला होता.सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला होता की, या महाविद्यालयामध्ये एकूण किती जागा रिक्त आहेत ?त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की,टिचींग स्टाफमध्ये 25 पदे रिक्त आहेत. नॉन टिचींग स्टाफमध्ये 34 पदे रिक्त आहेत.नर्सेसची 15 पदे रिक्त आहेत, नॉन टेकनिकलची 17 पदे रिक्त आहेत. हाय लेव्हल कमिटीकडे एक प्रस्ताव पाठवून लवकरात लवकर ही पदे मंजूर करुन घेण्यात येईल आणि पुढचे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या अगोदर ही पदे भरण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.

श्री.धोंडीराम राठोड : एकूण 81 पदे रिक्त आहेत तेव्हा ही पदे तातडीने भरण्याची गरज शासनाला वाटत नाही काय ? किती दिवसात ही पदे भरण्यात येतील ? लवकरात लवकर म्हणजे ही पदे केव्हा भरण्यात येणार आहेत ? याचा कालावधी माननीय मंत्रीमहोदय सांगू शकतील काय ?

श्री.सुरेश शेट्टी : मी मघाशीच सांगितले आहे की,पुढचे शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या अगोदर ही पदे भरण्याचा प्रयत्न करु.

डॉ नीलम गो-हे :सभापती महोदय, आयुर्वेद महाविद्यालयाकडे आणि रुग्णालयाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.मी या महाविद्यालयातील विद्यार्थीनी आहे.माझे शिक्षण पोदार आयुर्वेदिक महाविद्यालयात झाले आहे. या निमित्ताने मला माननीय मत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, हे शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून रिक्त पदे भरण्याच्या बाबतीत किती प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : पोदार आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या संदर्भात खालच्या सभागृहात काही दिवसापूर्वी चर्चा झाली होती. त्यावेळी तेथील स्थानिक सन्माननीय आमदारांनी या चर्चेत भाग घेतला होता .त्यावेळी असे आश्वासन देण्यात आले होते , अधिवेशन संपल्यानंतर मी आणि स्थानिक आमदार त्या ठिकाणी जाऊन व्हिजीट करणार आहोत . माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे यांनासुध्दा आम्ही बरोबर घेऊन जाऊ आणि मुंबईतील हे एकमेव आयुर्वेदिक महाविद्यालय आहे तेव्हा त्या ठिकाणी काय सुधारणा करणे आवश्यक आहे याची पहाणी करुन ही सुधारणा कशी करावयाची आहे त्यासबंधीचा निर्णय आम्ही नंतर घेणार आहोत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5277....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,त्या ठिकाणी व्हिजीट करण्याची काहीही गरज नाही.जी पदे रिक्त आहेत ती पदे व्हिजीट केल्यामुळे भरली जाणार नाहीत. एकूण किती पदे रिक्त आहेत याची माहिती आपल्या रेकॉर्डमध्ये आहे. तेव्हा ही पदे भरण्यासाठी वित्त विभागाने मंजुरी दिलेली आहे ? त्यासाठी बजेट मंजूर केलेले आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5277 ..

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेच आहे की, या पदांबाबतचा आढावा मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये घेतला जाईल. या समितीसमोर हा प्रस्ताव 2004 पासून प्रलंबित आहे. त्यामध्ये त्यांना काही माहिती पाहिजे होती ती आता मागविलेली आहे. ती प्राप्त झाल्यानंतर मुख्य सचिवांच्या या समितीला तातडीने सांगण्यात येईल. नुसते आयुर्वेदिक कॉलेजांच्याबाबतीतच नाही तर .. परवा आपल्याला मेडिकल युनिवर्सिटीसाठी पदे पाहिजे होती तर आपण त्यांनाही पदे मंजूर करून दिली. हाफकीनला काही पदे पाहिजे होती त्यांनाही पदे मंजूर करून दिली. मग आयुर्वेदिक कॉलेज असेल वा एज्युकेशनमधील इतरही टिचिंगच्या पोस्टस् आज रिक्त आहेत त्याही पदांच्या संदर्भात आढावा घेण्याचे काम तातडीने पूर्ण करून ही पदे जून महिन्यापासून उपलब्ध होतील या दृष्टीने कारवाई करण्याच्या संदर्भात आदेश मुख्य सचिवांना दिले जातील.

*****

..... सीसी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बीड जिल्हयात 6 लाज रुपयांचा अवैध रॉजेलचा जप्त जेलेला साठा**

**(7) * 4951 श्री. वि□यज राव मेटे , श्री. रजाजितसिंह मोहिते-पाटील** : स-मा-ा-नीय अन, -ाजरी पुरवठा व ग्राहज संरजज मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा जरतील जाय :-

(1) दि-ांज 19 जुलै, 2004 रोजी बीड शहरातील बार्शी -ाजा परिसरात जल्फ जेरोसि-ा एज-सी या समांतर बाजार योज-ेंतर्जत अडीच हजार लिटर रॉजेल ठेवज्याचा परवा-ाधारज रॉजेल विज्री जरजाऱ्या विज्रेत्यावर छापा टाजू-ा जवळजवळ 6 लाज रुपयांचा अवैध रॉजेल साठा जप्त जरज्यात आला हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, याबाबत चौजशी जरज्यांत आली आहे जाय,

(3) असल्यास, चौजशीचे -िष्जर्ष जाय आहेत व त्या-ुसार पुढे जोजती जारवाई जरज्यात आली ?

**श्री.सुनील तटजरे** : (1) होय, हे जरे आहे.

(2) होय.

(3) सफेद जेरोसी-ाचा विज्रेता दोषी आढळू-ा आल्यामुळे या परवा-ाधारजा विरुध्द पोलीस स्टेश-ा पेठ, बीड येथे दि-ांज 20.7.2004 रोजी जु-हा -ोंदविज्यात आला असू-ा त्यांचा समांतर आजार योज-ेंतर्जत जेरोसी-ा परवा-ा दि-ांज 6 ऑजस्ट, 2004 रोजी रद्द जरज्यात आला आहे. सदरहू प्रजरज -यायप्रविष्ट आहे.

श्री. विनायकराव मेटे : अध्यक्ष महाराज, बीडमध्ये 19 व 20 जुलै रोजी 6 लाख रुपयांचा अवैध रॉकेलचा साठा जप्त केला आहे आणि ही धाड घालण्याची कारवाई राज्य स्तरीय दक्षता पथकाने रॉकेलचा काळाबाजार होत असल्याने केलेली आहे. जिल्हा स्तरीय दक्षता पथकाने ही कारवाई केलेली नाही. असे असतानाही 6 लाख रुपयांचा जो हा साठा जप्त केलेला आहे तो अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी त्याच एजन्सीला किरकोळ स्वरूपाचा बॉंड घेऊन परत केला आहे हे खरे आहे काय ? असल्यास कशा मुळे असे करण्यात आले आणि त्याबाबत आपण आता काय कारवाई करणार आहात ?

श्री. सुनील तटकरे : अध्यक्ष महाराज, राज्य दक्षता पथकाने `आणि जिल्हा स्तरीय दक्षता पथकाने संयुक्तरित्या हा छापा घातलेला आहे. त्या अनुषंगाने जो मुद्देमाल तेथे पकडण्यात आलेला आहे त्याची माहिती येथे देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे संबंधितांवर पेठ बीड पोलीस ठाण्याकडून सत्र न्यायालयामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच यामध्ये सफेद केरोसीनचा सदर विक्रेता श्री.मोमीन अब्दुल मियॉं दोषी आढळून आल्याने त्याचा सफेद केरोसीनचा परवानासुद्धा रद्द करण्यात आलेला आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी तीन प्रकारचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला

...... सीसी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तटकरे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.4951 ...

आहे. त्यामध्ये 4400 लीटर निळे रॉकेल की ज्याची किंमत सुमारे 52,844 रुपये आहे, त्यानंतर थोडीशी पक्रिया करून आलेले 20400 लीटर पिवळ्या रंगाचे रॉकेल.. ज्याची किंमत 2,45,000/- रुपये आहे आणि 22800 लीटर सफेद रॉकेल.. ज्याची किंमत 2,73,828 रुपये आहे. अशा प्रकारे एकंदर 5,71,628 लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी या कारवाईमध्ये जे निळे केरोसिन जप्त केलेले होते ते त्याच एरियाच्या अंतर्गत असलेल्या दुसऱ्या एजन्सीला जाहीर निविदा देऊन विक्री केले आहे. त्यानंतर पिवळया आणि सफेद रंगाचे केरोसिन त्यांना परत देताना 10 लाख रुपये बँकेची हमी घेऊन दिले आहे. कारण त्याचेकडे सफेद केरोसिनचा परवाना होता. मग ही जी रॉकेल टाकी होती तीही जाहीर निविदा देऊन विक्री केलेली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : अध्यक्ष महाराज, या अधिवेशनामध्ये बीड जिल्ह्यातील रॉकेल संबंधातील हा तिसरा प्रश्न आहे. येथे हे जे रॉकेल जप्त करण्यात आलेले आहे तो रॉकेल साठा येथून कोठे नेण्यात येणार होता ? कारण बीड जिल्ह्यातील काही पेट्रोलपंपांवर हा रॉकेल साठा भेसळीसाठी म्हणून जातो अशी आमची माहिती आहे. तशा प्रकारेच हाही साठा पेट्रोल पंपांवर जाणार होता काय ? असेल तर अशा पेट्रोल पंपांच्या विरोधात शासन कारवाई काय करणार आहे?

श्री. सुनील तटकरे : अध्यक्ष महाराज, हा जो रॉकेलसाठा जप्त करण्यात आलेला आहे तो तेथील गल्फ केरोसिन एजन्सीच्या गोदामामध्ये छापा टाकून जप्त करण्यात आलेला आहे. तो साठा पेट्रोलपंपावर जात होता किंवा काय असा प्रश्न विचारला आहे. पण तसे काही आढळलेले नाही. मात्र त्या गोदामामध्ये क्षमतेपेक्षा जास्त साठा सापडला असल्याने त्याबाबत कारवाई आपण केलेली आहे. दुसरे म्हणजे एखाद्या पेट्रोलपंपावर असा काही प्रकार होत असल्याचे सापडले तर त्याचेवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

( यानंतर श्री. जागडे ..... डीडी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4951.....

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या बाबत वर्तमानपत्रातून बातमी छापून आली आहे. माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील हा तिसरा प्रकार आहे. सभापती महोदय, आम्हाला निळं केरोसीन माहिती आहे, सफेद करोसीन आहे. आता या ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीमध्ये पिवळे केरोसीन सापडले आहे. पिवळ्या केरोसीनची काय भानगड आहे, हे मा. मंत्रिमहोदय आम्हाला सांगतील काय ? सभापती महोदय, रॉकेलचा अवैध व्यवहार करणा-या गल्फ केरोसीन एजन्सीला राजकीय नेत्यांचा पाठींबा आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे अवैध साठा धाडीमध्ये सापडला आहे. कोणते तरी मटेरियल कन्व्हर्ट करण्याच्या उद्देशाने या रॉकेलमध्ये पिवळा कलर मिसळला होता. पंचानाम्यामध्ये ज्या बाबी दिसून आल्या होत्या, त्या मी सदनासमोर मांडलेल्या आहेत. गल्फ केरोसीन एजन्सीला कोणत्याही राजकीय नेत्यांचा तसेच पक्षाचा पाठिंबा नाही.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रत्नागिरी जिल्हा रुग्णालयातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांअभावी**

**पडून असलेली यंत्रसामुग्री**

**(८) * ५२६४ श्री. विनोद तावडे , डॉ. अशोक मोडक , श्रीमती कांता नलावडे :** स-मा-न-नीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा रुग्णालयाची लाखो रुपये खर्चून नवीन इमारत बांधण्यात आली आहे, तसेच लाखो रुपयांची यंत्रसामुग्री प्रशिक्षित कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने वापराविना पडून आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रुग्णालयातील प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, डॉ. विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) व (३) रुग्णालयातील सध्या उपलब्ध असलेल्या अधिकारी/कर्मचरी यांना प्रशिक्षित करण्यात आले असून त्यांच्याकडून रुग्णालयातील यंत्रसामुग्रीचा वापर करण्यात येत आहे. तसेच नियमित पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, खालच्या सदनात माननीय सदस्य श्री. गोगटे यांनी विचारलेल्या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले आहे की, " रेडिओलॉजीचे कोणतेही उपकरण रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात नाही." माझा असा प्रश्न आहे की, रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात रेडिओलॉजीचे उपकरण आहे काय ? हे उपकरण असल्यास ते चालविण्यासाठी प्रशिक्षण कर्मचारी वर्ग आहे काय ? तसेच आपण जी पदे भरणार आहांत, ती कोणती आहेत ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, रेडिओलॉजी तसेच सिटी स्कॅनचे मशिन रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात आहे. ते मशिन चालू आहे. तसेच त्या रुग्णालयात श्री. राजदीप नावाचे डॉक्टर गेल्या चार वर्षापासून काम करीत आहेत. माननीय सदस्य या ठिकाणी सांगत आहे, तसे उत्तर मी काही खालच्या सभागृहात दिलेले नाही. माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला आहे की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

......5264.....

श्री. रणजित कांबळे......

" ही रिक्त पदे केव्हा भरण्यात येणार आहेत ? " सभापती महोदय, वर्ग 1 चे एक आणि वर्ग 2 ची तीन पदे रिक्त आहेत. इएनटी सर्जन, पॅथोलॉजीस्ट, चेस्ट ॲण्ड टी.बी. एक्सपर्ट आणि मनोरुग्णतंज्ञ ही चार पदे रिक्त आहेत. ही पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हा रुग्णालयात प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग पुरेशा संख्येने उपलब्ध नाहीत. हे माननीय मंत्रिमहोदय मान्य करीत आहेत. तेव्हा पहिले उत्तर दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्हा रुग्णालयाची आवश्यकता तसेच त्या भागातील रुग्णांचा विचार करुन प्रशिक्षित कर्मचारी वर्ग त्वरीत भरला जाणार आहे काय ? यामुळे त्या भागातील रुग्णांची गैरसोय दूर होणार आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हा टेक्निकल स्टाफचा मुद्दा आहे. बाकीच्या कर्मचा-यांना योग्य प्रकारचे ट्रेनिंग देण्यात आले आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ 14:00

ता.प्र.क्र.5264...

श्री. रणजित कांबळे...

कारण प्रत्येक डॉक्टर, नर्स यांना इंस्ट्रुमेंट्स हँडल करण्यासाठी ट्रेनिंगची आवश्यकता आहे. त्यासाठी त्यांना ट्रेनिंग दिले आहे. त्या ठिकाणी प्रशिक्षित कर्मचारी वर्ग आहे.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, ही रिक्त पदे केव्हा भरण्यात येणार आहेत?

श्री. रणजित कांबळे : लवकरात लवकर भरण्यात येतील.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शहरासारख्या ठिकाणी माणसाला जर एखादा आजार झाला तर तो वेगवेगळया ठिकाणी उपचार घेण्यासाठी जाऊ शकतो. परंतु ग्रामीण भागामध्ये एक्स-रे मशीन उपलब्ध नसते. त्याठिकाणी एखाद्या माणसाला असाध्य रोग झाला व त्याला चिकित्सा करावयाची असेल तर तो पटकन शहरामध्ये येऊ शकत नाही. या ठिकाणी मंत्रिमहोदयांनी दिलेल्या उत्तरावरुन शासनाची असलेली उदासीनता आणि बेफिकीरी दिसून येते. प्रश्न असा आहे की, सद्या उपलब्ध असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात येत नाही. काही वेळेस ग्रामीण भागात कंपाऊंडर हे डॉक्टरचे काम करतात. त्याचप्रमाणे वॉर्ड बॉय सुध्दा काम करतात. जे ऑलरेडी पदविका प्राप्त तज्ज्ञ, निष्णात व प्रशिक्षित झालेले लोक आहेत त्यांना त्या ठिकाणी नियुक्त करण्याची आवश्यकता आहे. परंतु आपण एखाद्या क्लार्कला किंवा वॉर्ड बॉयला भरती करुन सांगितले तर तो एक्स-रे कसा काढणार, ब्लड टेस्ट कसे करणार? म्हणून जे प्रशिक्षित कर्मचारी आहेत त्यांना त्याठिकाणी नेमण्याची आवश्यकता आहे. जर ते प्रशिक्षित नसतील तर त्यांना अधिकृतपणे प्रशिक्षित करण्यात येत आहे कां? बेस्ट अव्हेलेबल कर्मचारी आहेत त्यांना कामचलाऊ प्रशिक्षित करण्यात येत आहे कां?

श्री.रणजित कांबळे : मी अगोदर सांगितल्याप्रमाणे वर्ग 1 चे एक पद रिक्त आहे, वर्ग 2 ची 3 पदे रिक्त आहेत. ही पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : त्यासाठी आर्थिक तरतूद आहे काय?

श्री. रणजित कांबळे : होय.

**सभापती** : मा.सदस्या श्रीमती कांता नलावडे व मा.सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी एकत्र प्रश्न विचारावेत, दोन्ही प्रश्नांना मंत्रिमहोदय एकाच वेळी उत्तर देतील.

श्रीमती कांता नलावडे : या रुग्णालयामध्ये एकूण प्रशिक्षित कर्मचारी वर्ग किती आहे? जी पदे रिक्त आहेत ती लवकरात लवकर ॲकॅडमिक वर्षामध्ये भरणार काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5264...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, ग्रामीण भागातील, डोंगराळ-दुर्गम भागातील शासकीय रुग्णालयांमध्ये कर्मचारी वर्ग आहेत परंतु त्याठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला किंवा उपचार होऊ शकत नाही. सभापती महोदय, 28 मार्चला 2 महिन्याच्या मुलीच्या गळयामध्ये सुपारीचे खांड अडकले. त्या मुलीवर तात्काळ उपचार न झाल्यामुळे तिचा मृत्यू झाला. या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शासन काय तजवीज करणार आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, त्याठिकाणी पुरेसा कर्मचारी वर्ग आहे. त्या ठिकाणी न्युरो सर्जन, ऑर्थोपेडीक सर्जन, ॲनेस्थेसिएटीस्ट, रेडिओलॉजिस्ट, ऑप्थॅलमिस्ट, फिजिशियन, ब्लड बँक ऑफिसर, गायनाकॉलॉजिस्ट 3 आहेत व डेंटल सर्जन 2 आहेत, मेडिकल ऑफिसर 7 आहेत अशाप्रकारचा कर्मचारी वर्ग आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे.

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 11 एप्रिल 2005 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : सोमवार, दिनांक 11 एप्रिल 2005 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>औचित्याच्या मुद्दयासंबंधी</u>**

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याच्या मुद्दयाव्दारे एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. आजच्या दैनिक लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये एक गंभीर स्वरुपाची बातमी प्रसिध्द झाली आहे. "विधानभवनाच्या तिजोरीवर रोखपालाचा डल्ला" अशाप्रकारचे या बातमीचे शीर्षक आहे. लोकशाहीमधील आपल्या राज्याचे विधानभवन हे सर्वोच असे सभागृह आहे. हे एक कायदेमंडळ आहे, या कायदेमंडळाचा कारभार स्वतंत्रपणे चालत असतो. जनसामान्यांवर होत असलेला अन्याय, अत्याचार यांना या सभागृहामध्ये वाचा फोडली जाते. त्यांचे अनेक प्रश्न या ठिकाणी सोडविले जातात.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

आणि त्यांचे प्रश्न सोडविले जातात. विविध खात्यात होत असलेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे या सभागृहाच्या माध्यमातून बाहेर येतात आणि त्यावर चर्चा होते, अशी भ्रष्टाचाराची प्रकरणे शोधून भ्रष्टाचार करणा-यांना या सभागृहाच्या माध्ममातून शिक्षा देखील करण्यात आलेली आहे, अशी अनेक प्रकरणे आहेत. या बातमीमुळे आज या पवित्र सभागृहावर, ज्या सभागृहाचे आपण सर्वेसर्वा आहात, अशा सभागृहावरच या बातमीमुळे प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे. या बातमीमध्ये म्हटलेले आहे की," विधानभवनातील रोख व्यवहार सांभाळणा-या विभागात सुमारे 14 लाख रुपयांची गडबड अलीकडेच आढळून आली आहे. या प्रकरणी संबंधित रोखपालाची या पदावरुन तात्काळ उचलबांगडी करण्यात आली आहे.विधीमंडळ सचिवालयात खळबळ उडवून देणा-या या प्रकाराची खमंग चर्चा कर्मचारीवर्गात सुरु आहे." असा उल्लेख यामध्ये आहे. पुढे असे म्हटलेले आहे की,"माजी आमदाराने आपल्या स्वीय सहाय्यकामार्फत रोख 70 हजार विधीमंडळ सचिवालयाकडे पाठविले होते. ते रिझर्व्ह बॅंकेकडे भरताना रोखपाल मनोज गावकर याने त्यातील सातच हजार रुपये भरले. मात्र लेखा व कोषागार विभागाकडे पाठवावयाच्या चलनावर 70 हजार रुपये, अशी नोंद केली . . . ."

**सभापती** : संपूर्ण बातमी वाचण्याची गरज नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला एकच मुद्दा उपस्थित करावयाचा आहे की, अशा प्रकारची बातमी आल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हा मॅसेज गेला आहे की, विधीमंडळा सारख्या संस्थेमध्ये अशा प्रकारची भ्रष्टाचाराची प्रकरणे चालणार असतील तर त्यामुळे या पवित्र मंदिरावर प्रश्नचिन्ह उभे राहीलेले आहे. त्यामुळे याचा खुलासा झाला पाहिजे आणि त्यातून महाराष्ट्रातील जनतेला एक योग्य तो मॅसेज गेला पाहिजे.

------

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला एकच विनंती करावयाची आहे की, दैनिक "लोकसत्ता" मध्ये जे काही छापून आलेले आहे, त्यामुळे आम्ही व्यथित झालो आहोत. या सभागृहाची, आपली प्रतिष्ठा, विधीमंडळाचे प्रमुख म्हणून आपल्या सर्वांची प्रतिष्ठा लक्षात घेता ही बातमी आमच्या मनाला वेदना देणारी आहे. याबाबतीत वस्तुस्थिती काय आहे ? केवळ वर्तमानपत्रात छापून आले म्हणून ते सत्य आहे किंवा याबाबतीत नेमकी स्थिती काय आहे ? या

. . . . 2 एफ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

बाबतची माहिती आपल्यामार्फत महाराष्ट्राच्या जनतेला मिळण्याची आवश्यकता आहे.वर्तमानपत्रात अनेक वेळा बातम्या प्रसिध्द होतात, पण काही वेळा त्या बातम्या अपू-या माहितीच्या आधारावर असतात. काही वेळा ख-या असतात, काही वेळेला चुकीच्या निघतात. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण आमच्या या सर्व विधीमंडळाचे प्रमुख आहात. याठिकाणी आपला अधिकार आहे. तेव्हा यासंबंधीची नेमकी परिस्थिती काय आहे, ती या सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या, सन्मानाच्या दृष्टीने याबाबतीतील सत्य स्थिती, वस्तुस्थिती आपण या निमित्ताने सभागृहासमोर ठेवली तर मला असे वाटते की, याबाबतीत प्रकारचे दिशादर्शन होईल. म्हणून माननीय विरोधी पक्षनेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे, त्याबाबतीत आपण सभागृहासमोर वस्तुस्थिती आणावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

----

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजच्या दैनिक "लोकसत्ता" मध्ये आपल्या विधान मंडळाच्या संबंधात एक बातमी वाचावयास मिळाली. मला खूप आश्चर्य वाटले. माझा या विधीमंडळाच्या बाबतीतील अनुभव विचारात घेतला तर अशा प्रकारची बातमी प्रथमच छापून आली आहे अशी माझी कल्पना आहे. याचा अर्थ असा होतो की, भ्रष्टाचाराचे बोट हे विधीमंडळाकडे दाखविले जात आहे आणि जनतेमध्ये या सार्वभौम सभागृहाविषयी अशा प्रकारचे मत तयार होणे हे कोणत्याही लोकशाहीला धातक आहे. ही बातमी वाचल्यानंतर मला खूप वाईट वाटले. या बातमीबद्दल वस्तुस्थितीचा खुलासा झाला नाही तर लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होईल. याठिकाणी बातमीला असे स्वरुप दिले गेले आहे की, एवढा मोठा भ्रष्टाचार होऊन सुध्दा विधीमंडळातील संबंधित व्यक्तीच्या विरुध्द फक्त त्याची एका जागेवरुन दुस-या जागेवर बदली करण्यात आली आहे आणि याठिकाणी 14 लाखाचा भ्रष्टाचार झालेला असून सुध्दा त्याच्यावर योग्य ती कारवाई झाली नाही असा त्यातून अर्थ ध्वनित होतो. अशा प्रकारची विधीमंडळाच्या बाबतीत कोणतीही बातमी प्रसिध्द होणे आणि त्याचा जास्तीतजास्त खुलासा लवकर न होणे, यामुळे संभ्रमावस्था निर्माण होत आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू....

आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. आपल्या हातामध्ये सगळ्या गोष्टी आहेत, त्यामुळे जास्तीत जास्त वस्तुस्थितीचा खुलासा आपण या बाबीवर करु शकता. जी घटना घडलेली आहे ती गंभीर आहे, त्यावर इलाज काय आहे, याबाबत आपणच मार्गदर्शन करु शकता. आम्ही या मंडळाचे सदस्य असल्यामुळे आम्हाला वेदना झालेल्या आहेत, अशाप्रकारची भविष्यकाळात बातमी होणार नाही, या दृष्टीकोनातून संबंधित व्यक्तीवर कारवाई व्हावी. आज या विधिमंडळामध्ये जे घडले तर त्याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. याचा विचार करून भविष्यात अशाप्रकारे कोणत्याही कर्मचाऱ्याने धाडस केल्यानंतर काय होते, याबाबतचा मेसेस या सदनाच्या माध्यमातून लोकांपर्यन्त पोहाचला तर त्याचा निश्चितच परिणाम होईल. भविष्यकाळात अशी घटना घडू नये या दृष्टीने आमची विनंती आहे की, आपणच या विषयावर वस्तुथिती काय आहे आणि त्यावर काय इलाज झ ाला, याबाबतची माहिती दिली तर बरे होईल, एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सर्वसाधारणपणे विधिमंडळाच्या कामकाजाची चर्चा आपण सभागृहात करत नाही. मा.विरोधी पक्ष नेत्यांनी एका गंभीर परिस्थितीमध्ये ही गोष्ट लक्षात आणून दिलेली आहे. आपण विधिमंडळ सचिवालयाची चर्चा येथे करत नाही. परंतु विधिमंडळामध्ये घडलेल्या एका कृत्याविषयीची बातमी आलेली आहे. बॅक शीप कोठेही असू शकेल. तेथे असेल किंवा नसेल. या ठिकाणी त्याबाबतची चर्चा करत नाही, हे खरे असले तरी त्यामध्ये ज्या प्रकारची बातमी आहे, ज्या प्रकारची वस्तुस्थिती आलेली आहे..खरे म्हणजे अशा प्रकरणामध्ये आपण नेहमी शासनाला निवेदन करायला सांगतो. परंतु येथे तशी परिस्थिती नाही. मात्र एक गोष्ट अत्यंत निकडीची आणि आवश्यक आहे की, या सभागृहाच्या माध्यमातून सभागृहाच्या बाहेर जेवढी शक्य होईल तेवढी लवकर याबाबतची अत्यंत पारर्शक अशी वस्तुस्थिती दर्शक माहिती जाणे आवश्यक आहे. एवढ्या मोठ्या ऑर्गनायझेशनमध्ये एखाद्या कर्मचाऱ्यांनी काही तरी आयसोलेट करणे, तशाप्रकारचे स्वरुप असेल तर ते स्पष्ट होणे आणि या बाबतची निश्चित जी परिस्थिती आहे ती सभागृहापुढे येणे आवश्यक आहे. सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने आम्ही सर्व बाजूचे सदस्य आपल्याकडे ही विनंती करू शकतो. आपण योग्य ते कराल अशी विनंती आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभ्ांपती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे जी या ठिकाणी सूचना केलेली आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी

SKK/ KGS/ MAP/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे चालू.....

यांनी आज काही वर्तमानपत्रामध्ये विधिमंडळ कार्यालयामधील भ्रष्टाचाराच्या संदर्भात बातमी प्रसृत झाली, त्याबाबतीत काय हकिकत आहे, काय परिस्थिती आहे हे आम्हा सदस्यांना माहीत नाही. परंतु जी बातमी आलेली आहे, ती अत्यंत गंभीर आहे. म्हणून या बातमीच्या संदर्भात आपण आम्हाला मार्गदर्शन करावे यासाठी म्हणून विरोधी पक्ष नेत्यांनी आणि मा.सदस्यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे सूचना केलेली आहे, त्या सूचनेला मी पाठिंबा देतो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पाडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार आणि सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी विधिमंडळाच्या कार्यालयामध्ये जो काही धक्कादायक प्रकार घडला, त्याबाबत वर्तमानपत्रामध्ये आलेली बातमी सभागृहाच्या लक्षात आणून देण्यासाठी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला. खरे तर याबाबत मी त्यांना धन्यवाद देतो.

यानंतर कु.थोरात...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 14:15

प्रा. जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, मी सकाळी जेव्हा इकडे यावयास निघालो तेव्हा लिफटमध्ये कर्मचा-यांची चर्चा सुरु होती. मला काही कळले नाही. विधिमंडळात काही तरी घोटाळा अमुक, तमुक वगैरे.... मला वाटले सभागृहात काही घोटाळा तर झाला नाही ना? विधानसभेमध्ये तर काही घोटाळा झाला नाही ना? त्यानंतर मला वेळ असल्यामुळे मी पाचव्या मजल्यावरील वाचनालयात गेलो. वाचनालयात ग्रंथपालांनी लोकसत्तेचा अंक आणून दिला. लोकसत्तेच्या अंकामध्ये आमच्या सन्माननीय सदस्यांनी जे वर्णन केले ते संपूर्ण त्यामध्ये होते. 14 लाखाचा घोटाळा झाला. खरे पाहिले तर ही बातमी वर्तमानपत्रात आली, त्याची शहानिशा आमच्या शासनाने करावी परंतु आमचे संसदीय कार्य मंत्री यांनी अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रात आल्या नंतर त्यांनी याचा खुलासा प्रथम सभागृहात केला असता किंवा खालच्या सभागृहात केला असता आणि त्यासंबंधीची वस्तुस्थिती या ठिकाणी सांगितली असती तर जास्त उचित झाले असते. सभापती महोदय, विधिमंडळ हे या राज्याचे सर्वोच्च सभागृह आहे आणि आपण येथे कस्टोडियन आहात. विधानसभेचे अध्यक्ष आणि आपण याचे कस्टोडियन आहात. आपल्या अधिकार क्षेत्रात जी कोणतीही संस्था काम करीत असेल तर त्यामध्ये अशा प्रकारचा भ्रष्टाचार, घोटाळा होत असेल तर त्याचे शिंतोडे आपल्या विधिमंडळावर उडाल्याशिवाय राहाणार नाहीत. ही बाब अत्यंत गंभीर आहे. श्री. मधुकर सरपोतदार साहेबांनी एका गोष्टीचा उल्लेख केला. मी त्या गोष्टीकडे पुन्हा एकदा लक्ष वेधू इच्छितो की, ज्यांनी हा घोटाळा केला, भ्रष्टाचार केला, अपहार केला त्याची फक्त एका विभागातून दुस-या विभागात ट्रान्सफर करण्यात आली हे मला कळत नाही. श्री. जोशी नावाचे अधिकारी त्या काळात होते त्यांचे काय झाले हे कळायला मार्ग नाही. आपल्या विधिमंडळाचा संपूर्ण परिसर ज्याला आम्ही पवित्र मंदिर म्हणतो, या राज्याचे पवित्र मंदिर म्हणतो लोकशाहीचे पवित्र मंदिरात म्हणतो आपण त्याचे कस्टोडियन आहात. म्हणून माझी विनंती आहे की, याच्या संदर्भात योग्य तो खुलासा झाला पाहिजे. जनतेमध्ये या संदर्भात वेगवेगळी चर्चा होत आहे, त्याला कुठे तरी पूर्णविराम मिळाला पाहिजे आणि खरी वस्तुस्थिती या सदनाच्या माध्यमतून राज्याच्या जनतेला कळली पाहिजे एवढीच या औचित्याच्या मुद्याला समर्थन देतांना माझी विनंती आहे.धन्यवाद.

-----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य गट नेत्यांनी ज्या भावना या ठिकाणी व्यक्त केल्या. यापूर्वी सदनाच्या अनुषंगाने विधिमंडळ सचिवालयाच्या बाबतीमध्ये अशा पध्दतीची चर्चा करण्याची प्रथा नाही, पध्दती नाही, आणि परंपराही नाही. पण या ठिकाणी आपण ज्या भावना व्यक्त केल्या आणि या सदनाचे पावित्र्य जपणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने आपण या ठिकाणी जे प्रतिपादन केले त्याचा मान राखण्याच्या दृष्टीकोनातून एका अपवादात्मक दृष्टीकोनातून मी या ठिकाणी असा निर्णय घेतला आहे की, याबाबतीतील वस्तुस्थिती या सार्वभौम सभागृहात सांगावी. अपवाद म्हणूच मी हा निर्णय घेतलेला आहे म्हणून या ठिकाणी जे एकूण प्रकरण आहे, त्याची वस्तुस्थिती आपल्या समोर मांडतो. विधिमंडळ सचिवालयाच्या अनुषंगाने जे पावित्र्य आपण व्यक्त केले आणि संपूर्ण महाराष्ट्र या वरिष्ठ सभागृहाकडे ज्या पध्दतीने पाहतो, त्या अनुषंगाने हे पावित्र्य या पुढच्या काळात टिकले पाहिजे या अनुषंगाने एकूण या संपूर्ण प्रश्नाकडे मी आणि सन्माननीय अध्यक्ष आम्ही दोघेही पाहतो. प्रशासकीय दृष्टीने मी आणि सन्माननीय अध्यक्षंनी यादृष्टीने पहाणे गरजेचे आहे. आणि म्हणून आपल्यासमोर, महाराष्ट्रातील जनतेसमोर ही वस्तुस्थिती आली पाहिजे यादृष्टीने या सभागृहात मी वस्तुस्थिती मांडतो.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**मा. सभापती** ........

अधिदान व लेखा कार्यालयाकडून दि. 24 मार्च, 2005 रोजी श्री. गांवकर रोखपाल यांनी चलन क्र. 17 अन्वये रु. 70,000 /- रिझर्व्ह बँकेत भरावयाचे असताना केवळ रु. 7,000/- चलनाने भरुन नंतर त्या चलनावर रु. 70,000/- अशी खाडाखेड केली. याबाबत त्यांची सविस्तर चौकशी करावी असे कळविले.

क-लेखा कक्षाने ही बाब दि. 24.3.05 रोजी मा. प्रधान सचिवांच्या निदर्शनास आणल्यानंतर मा. प्रधान सचिवांनी श्री. गांवकर यांना हजर राहण्याबाबत त्वरित कळवावे अथवा पोलीस तक्रार दाखल करुन कार्यालयात हजर करुन घ्यावे. श्री. गांवकर यांचा सर्व व्यवहार तपासण्याच्या दृष्टीने त्यांचेकडून सर्व कागदपत्रे जप्त करावेत व चौकशी करावी. श्री. गांवकर यांची बदली तातडीने करावी असे आदेश दिले.

श्री. गांवकर यांना दि. 24 मार्च, 2005 रोजी तात्काळ कार्यालयात हजर राहण्याबाबत कळविण्यात आले.

गुरुवार, दि. 1 एप्रिल, 2005 रोजी श्री. गांवकर, रोखपाल-1 यांचेकडून संबंधित महत्वाची कागदपत्रे (कॅशबुक, चलनबुक, स्लीप बुक, चेक बुक इ.) लेखा कक्षाच्या अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतली.

लेखा अधिकाऱ्यांनी श्री. गांवकर यांचेकडे प्रथम विचारणा केली असता त्यांनी सदरहू गैरव्यवहार केल्याचे मौखिकरित्या मान्य केले.

दि. 2 एप्रिल, 2005 रोजी "क" आस्थापना कक्षाने श्री. गांवकर, रोखपाल यांचेकडून इ ापनाव्दारे झालेल्या आर्थिक गैरव्यवहारासंबंधी दि. 4 एप्रिल, 2005 रोजीपर्यंत खुलासा मागविला.

श्री. गांवकर यांनी दि. 4 एप्रिल, 2005 रोजी लेखी खुलासा सादर करुन त्यात गैरव्यवहार केल्याचे मान्य केले व उपरोक्त गैरव्यवहाराव्यतिरिक्त आणखी चौकशीत मी जी काही रक्कम घेतली आहे असे आढळल्यास तीही मी कार्यालयास परत करेन असे कबूल केले.

दि. 5 एप्रिल, 2005 रोजी रोखपाल श्री. गांवकर यांनी रु. 10,88,781/- कार्यालयात लेखा अधिकाऱ्यांकडे जमा केले.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**मा. सभापती** .....

श्री. गांवकर यांनी केलेल्या उपरोक्त गैरव्यवहाराच्या अनुषंगाने त्यांना तात्काळ दि. 4 एप्रिल, 2005 रोजी मूळ लिपिक-टंकलेखक पदावर घेण्यात आले. त्यांचे रोखपाल (1) या पदाचे ओळखपत्र कार्यालयाने त्याचदिवशी ताब्यात घेतले.

श्री. गांवकर यांनी रोखपाल पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून त्यांना मूळ लिपिक-टंकलेखक पदावर परत घेतल्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीतील त्यांनी केलेल्या लेखा कक्षातील आर्थिक व्यवहार व त्यासंदर्भातील अभिलेख्यांची तपासणी करण्याकरिता उपसचिव श्री. बी. एन. बागुल यांची दि. 8 एप्रिल, 2005 रोजी तपासणी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे व त्यांना दि. 30 एप्रिल, 2005 पर्यंत तपासणी अहवाल देण्यास सांगण्यात आले आहे.

श्री. बागुल यांनी तपासणी पूर्ण करुन अहवाल सादर केल्यानंतर श्री. गांवकर यांच्यावर दोषारोपपत्र ठेवणे, त्यांच्यावर त्याबाबतीत कडक कारवाई करणे या पध्दतीचे सर्व उपाय योजण्यात येतील आणि याबाबतीत कोणावरही यत्किंचितही दयामाया या विधिमंडळ सचिवालयामध्ये दाखविली जाणार नाही. याबाबतीत आतापर्यन्त झालेली जी कारवाई आहे ती मी या सदनासमोर मांडलेली आहे.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ. सुनील देशमुख ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा ( औरंगाबाद ) सन 2003-2004 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

श्री. दिलीप वळसे-पाटील ( ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( सल्लागाराच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती ) विनियम, 2004 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ / लिगल / 111 / 2004 / 1085, दिनांकित 10 जून, 2004 सभगृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्रशुल्काच्या अटी व शर्ती) विनियम, 2004 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/111/2004/1087, दिनांकित 10 जून, 2004 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

------

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना अटी) विनियम, 2004 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक माविनिआ/लिगल/111/2004/1089, दिनांकित 10 जून, 2004 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

------

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, 2004 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/111/2004/1090, दिनांकित 10 जून, 2004 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

------

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, 2004 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/लिगल/111/2004/1091, दिनांकित 10 जून, 2004 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

**नियम 93 च्या सूचना**

**सभापती** : आज नियम 93 च्या काही सूचना आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी व इतर वि.प.स.यांनी "नागपूर सुधार प्रन्यासने भूखंडधारकाकडून गैरकृषी कराची केलेली आकारणी, त्यामुळे लिजधारक जनतेत पसरलेला असंतोष" यासंबंधी नियम 93 ची सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील व इतर वि.प.स.यांनी "ग्रामीण भागात जनावरांमध्ये दुधाची मात्रा वाढविण्यासाठी ऑक्सीटॉक्सी या औषधाचा सुरु असलेला गैरवापर व त्यामुळे दूध पिणा-या व्यक्तींच्या आरोग्यावर होणारा विपरित परिणाम" यासंबंधी नियम 93 ची सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी "मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवरील अपघातात जखमी होणा-या प्रवाशांना तात्काळ वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी सुसज्ज असलेल्या 3 फॅक्सी गाडया बंद केल्याबाबत" नियम 93 ची सूचना दिलेली आहे. हा नियम 93 चा विषय होत नाही. शासनाने निवेदन करावे असा निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी देखील एक नियम 93 ची सूचना दिलेली आहे.

**सभापती** : मा.सदस्यांनी माझ्या दालनामध्ये यावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी नियम 93 ची सूचना दिली होती, त्यासंबंधी आपल्या निदेशाप्रमाणे आठ दिवसापूर्वी सभागृहामध्ये निवेदन वितरितही करण्यात आले होते.

**सभापती** : आज काही निवेदने येतील, काही दिनांक 15 तारखेला येतील. परंतु 16 तारखेला निवेदने येणार नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्या नियम 93 च्या सूचनेसंबंधीचे निवेदन मला मिळाले. परंतु मा.मंत्रिमहोदयांना बाहेरगावी जावयाचे असल्यामुळे ते पुढे ढकलण्यात आले होते.

**सभापती** : आज आपण काही निवेदने घेत आहोत.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सोमवारी सांगितले होते की, हे निवेदन उद्या होईल.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, डॉ.दत्ता सामंत यांचे खरे मारेकरी आहेत ते अद्याप बाहेर आहेत. या गुन्हयातील 3 आरोपी फरार आहेत त्यांची पुन्हा चौकशी व्हावी यादृष्टीने नियम 93 ची सूचना दिलेली आहे आणि दुसरे असे की, नागपूरला गैरकृषी कराची प्रकरणे अनेक आहेत त्यामुळे अनेकांनी उपोषण सुरु केले आहे तेव्हा गैरकृषी करावरील शासनाने निवेदन करणे आवश्यक आहे.

**सभापती** : सन्माननीय श्री.दिलीप वळसे-पाटील याठिकाणी आहेत, कै.डॉ.दत्ता सामंत यांचे खूनी आरोपी आहेत ते डेहराडूनला सापडल्याची बातमी आहे त्यासंबंधी सदनाच्या भावना लक्षात घेऊन आपण यासंबंधी सखोल चौकशी करावी. याठिकाणी मा.उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटीलसाहेबही आहेत त्यांनी त्याबाबतीमध्ये लवकरात लवकर निवेदन करावे.

श्री.आर.आर.पाटील : होय.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सांगोल्यातील मजुरांच्या खोटया सहया घेऊन रोहयोची कामे जेसीबीने केलेली आहेत.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

यामध्ये सुमारे साडेतीन कोटीचा भ्रष्टाचार झालेला आहे. आज सकाळी सगळी माणसे मला येऊन भेटली आणि त्यांनी सांगितले की, तुम्ही 93 अन्वये हा विषय मांडू नका. जेसीबीने काम केल्याचे माझ्याकडे फोटो आहेत.

**सभापती** : माननीय सदस्यांनी मला दालनात येऊन भेटावे. यासंदर्भात दोन दिवसामध्ये जे काही करता येईल ते जरुर करु.

**(सभापतीस्थानी मा. उप सभापती)**

डॉ. नीलम गो-हे : पुण्यामध्ये 12 जणांच्या टोळीने इंटरनेटच्या माध्यमातून देशद्रोही कारावया सुरु केलेल्या आहेत. बनावट क्रेडिट कार्ड वापरुन या टोळीने दोन-अडीच कोटी रुपयाचा गफला केलेला असून या संदर्भात 93 अन्वये सूचना दिलेली आहे. ज्यावेळी कोणत्याही मार्गाने लोकांना न्याय मिळत नाही आणि ज्यावेळी शासनाने तातडीने लोकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने कारवाई करावयाची असते असे विषय आम्ही 93च्या माध्यमातून देतो. आता लक्षवेधी देण्यासाठीही तेवढा वेळ उरलेला नाही. त्यामुळे मी दिलेल्या 93च्या विषयावर शासनाने निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मघाशी मा.सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी डॉ. दत्ता सामंत यांचे खुनी पकडलेले असून त्यासंदर्भात फेर चौकशी करावी यासंदर्भात 93ची सूचना दिलेली असून त्याबाबतीत शासनाने निवेदन करावे अशी विनंती केलेली आहे.

**उप सभापती** : निवेदन करण्यात येईल असे मा. उप मुख्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : निवेदनामध्ये याचाही उल्लेख असावा की, जे आरोपी पकडलेले आहेत त्यांना मुंबईला आणून त्यांची ट्रायल सुरु करावी...

श्री. आर.आर.पाटील : या प्रकरणी निवेदन करण्यात येईल असे मी सांगितले. एवढ्या मोठ्या कामगार नेत्याची अशा प्रकारे हत्या होणे हे सहन करता येण्यासारखे नाही. काही आरोपी सापडलेले आहेत. त्यांना आणून या घटनेची फेर चौकशी करण्यात येईल.

--

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: प्राध्यापिका सौ.अलका उमेश झाडगावकर यांनी प्लॅस्टिच्या उपद्रवी कच-यापासून इंधन बनवण्याचा लावलेला शोध

**मु.शी.**: प्राध्यापिका सौ. अलका उमेश झाडगावकर यांनी प्लॅस्टिकच्या उपद्रवी कच-यापासून इंधन बनवण्याचा लावलेला शोध यासंबंधी माननीय अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे निवेदन

श्री. विनय कोरे (अपारंपारिक ऊर्जा मंत्री) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

**निवेदन**

(प्रेस : येथे सोडत जोडलेले निवेदन छापावे.)

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 14:35

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी स्वत: हा प्रकल्प पाहिला आहे. हा प्रकल्प दोन तीन गोष्टींशी संबंधित आहे. प्लॅस्टीकच्या कच-याच्या आधारावर 1 कोटी 20 लाख रुपये खर्च करुन 100 मे.वॅ.क्षमतेचा प्रकल्प उभा करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. हा प्रकल्प मुंबईजवळ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. हा प्रकल्प उभा करीत असल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, यासंदर्भातील संपूर्ण संशोधन नागपूर येथे झाले. नागपूर शहरात देखील प्लॅस्टीक वापरले जाते. या ठिकाणी 100 मे.वॅ. क्षमतेचा प्रकल्प उभा करीत आहात,तर उप राजधानीमध्ये कमीत कमी 50 मे.वॅ.क्षमतेचा प्रकल्प उभा करण्यास काय अडचण आहे. तो प्रकल्प शासनाने उभा करावा अन्यथा खाजगीकरणाच्या माध्यमातून उभा करण्यास परवानगी द्यावी. श्रीमती झाडगांवकर यांनी नागपूर येथे यासंबंधीचे संशोधन केलेले आहे. त्या संशोधनाची शासनाने ताबडतोब दखल घेतली. तीन चार दिवसापूर्वी माननीय मुख्यमंत्री या कार्यक्रमास आले होते. हा अतिशय यशस्वी प्रयोग आहे. अशा प्रकारचा प्रकल्प नागपूर शहरात उभारला गेला पाहिजे अशी माझी शासनाला विनंती आहे. हा प्रकल्प उभा करण्याचा शासनाने तातडीने निर्णय घेऊन पुढील पाऊल उचलले त्याबद्दल शासनाचे पुन्हा अभिनंदन करतो.

श्री. विनय कोरे : सन्माननीय श्री.नितीन गडकरी यांनी अशा प्रकारचा प्रकल्प नागपूर येथे व्हावा अशी विनंती केलेली आहे. नागपूरला सुध्दा अशा प्रकारचा प्रकल्प उभा करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, 50 मे.वॅ.क्षमतेचा प्रकल्प आधी नागपूरला करा, कारण त्या ठिकाणी यासंबंधीचे संशोधन झालेले आहे. परंतु नागपूर शहरात तेवढे प्लॅस्टीक वापरले गेले पाहिजे. प्लॅस्टीक वापरण्याचे असेसमेंट करुन आवश्यकता असेल तर नागपूर येथे 50 मे.वॅ.क्षमतेचा प्रकल्प करावा अशी माझी उप सूचना आहे.आपण माझा उल्लेख केला म्हणून मी उप सूचना सुचविलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : राज्यातील मंत्र्यांनी केलेली सूचना शासनाला बंधनकारक असते . एका जेष्ठ मंत्र्यांनी ही सूचना करणे म्हणजे त्यांनी आमचा इंटरेस्ट प्रोटेक्ट केले त्याबद्दल त्यांचे सुध्दा मी मनापासून अभिनंदन करतो. अर्थमंत्र्यांची सूचना व सभागृहाची भावना लक्षात घेता

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

माननीय अपारंपारिक मंत्री पहिला 50 मे.वॅ.प्रकल्प नागपूरला टाकतील व त्यास आपली संमती असेल असे समजतो. माननीय अर्थमंत्र्यांनी केलेली सूचनेची आपण दखल निश्चितपणे घ्याल अशी अपेक्षा बाळगतो आणि नागपूर येथे लवकरच असा प्रकल्प सुरु करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री. विनय कोरे : सन्माननीय श्री. गडकरी साहेबांनी खाजगी गुंतवणुकीतून विकास कामे कशी होऊ शकतात याबाबतीतील ब-याच गोष्टी महाराष्ट्राला दाखवून दिलेल्या आहेत. अशा प्रकारचा नवा प्रयोग करीत असताना खाजगी गुंतवणूकदार त्या प्रयोगात पैसा घालविण्यास तयार होतील अशा दृष्टीने मुंबई हे या प्रकल्पाचे ठिकाण ठरविण्यात आलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : आम्हाला सबसिडी द्या. आम्ही सुध्दा अशा प्रकारचे प्रकल्प उभारुन दाखवू.

श्री. विनय कोरे : आम्ही हा प्रकल्प सरकारच्या पैशातून करीत नाही. आपल्या भावनांचा आदर ठेवून नागपूरला अशा प्रकारचा प्रकल्प उभारण्याचे अभिवचन मी मघाशी आपल्याला दिलेले आहे.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, माझे ऑब्जेक्शन आहे. सारख्या वयाचे लोक मित्र असतात, सारख्या व्यसनाचे लोक मित्र असतात, त्यांनी मागणी केली आणि मंत्र्यांनी लगेच मागणी मान्य केली. सारख्या वजनाचे लोक देखील मित्र असतात काय ?

( उत्तर आले नाही )

---------------

3...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : श्री.प्रसाद गणेश ठाकूर,रा.वडवली,जि.रायगड याची झालेली हत्या.

**मु. शी.** : श्री.प्रसाद गणेश ठाकूर,रा.वडवली,जि.रायगड याची झालेली हत्या. याबाबत डॉ.अशोक मोडक,श्री.विनोद तावडे, श्री.अरविंद सावंत वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक,श्री.विनोद तावडे,श्री.अरविंद सावंत यांनी "श्री.प्रसाद गणेश ठाकूर,रा.वडवली,जि.रायगड याची झालेली हत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 14:35

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, एकतर्फी प्रेमातून झालेला खूनाचा हा प्रकार आहे. आपण श्री.जयप्रकाश जगन्नाथ म्हात्रे यांचा निवेदनात उल्लेख केलेला आहे. त्याचे प्रेम होते, त्याने खून केला, तेव्हा तोच मुख्य आरोपी आहे काय असा माझा प्रश्न आहे ? दुस-या आरोपीचे नाव काय आहे ? 1 एप्रिलच्या मध्यरात्री ज्या ठिकाणी खून केला गेला, त्या ठिकाणी श्री.मनोज नावाच्या मुलाची डायरी सापडली होती. यासंबंधीचा आपल्याकडे खुलासा असेल. या डायरीचा आधार घेऊन पोलिसांनी काय तपास केला ? त्या तपासात काय निष्पन्न झाले ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जेथे घटना घडली. त्या घटनेच्या ठिकाणी एक काळी डायरी सापडली. त्या काळया डायरीमध्ये मनोजचे नाव होते. त्यात दूरध्वनी नंबर होते. त्या डायरीमुळे खुलासा झाला. त्यातून कळले की, खरे खूनी कोण होते..

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे..

हे तपासण्यासाठी मनोज म्हात्रे आणि त्याच्या मावसभावाकडे तपासकर्ता अधिकारी गेले होते त्यांनी सांगितले की मनोज म्हात्रे आणि जयेश म्हात्रे या दोघांनी मिळून खून केलेला आहे. त्यांचा कबुलीजबाब मॅजिस्ट्रेटसमोर घेण्यात आला.

डॉ. अशोक मोडक : सभापती महादय, हे एका माणसाचे काम नाही. हे रॅकेट आहे. यामध्ये 4-5 जण सहभागी असतील. घटनास्थळी दारुच्या बाटल्या सापडल्या आहेत. आरोपीला जामीन दिलेला आहे. जामीन दिल्यामुळे कदाचित ज्या मुलीचे लग्न 1 मे रोजी होणार होते त्या मुलीच्या जिवाला धोका संभवतो.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सुरुवातीला ही घटना घडल्यानंतर मयताच्या वडिलांना विचारले होते. त्यानंतर राजेंद्र अनाजी पाटील याला अटक केली. त्यानंतर म्हात्रे आर्णा मनोज कुंभार या दोघांनी खुलासा केल्यानंतर या आरोपीचे नांव समाविष्ट केले. हे म्हात्रेला कळले. त्याने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. एफआयआरमध्ये नांव नसल्यामुळे इंटरिम जामीन मिळाला आहे. 13 तारखेला पोलीस जामीन रद्द करण्यासाठी अर्ज करणार आहेत.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 14:40

**पृ.शी.**: "व्हॅट" या कायद्याच्या विरोधात राज्यातील व्यापा-यांनी पुकारलेला संप.

**मु.शी.**: "व्हॅट" या कायद्याच्या विरोधात राज्यातील व्यापा-यांनी पुकारलेला संप याबाबत श्री.कन्हैयालाल गिडवाणी,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( चर्चा पुढे सुरु...)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदनानंतर</u>

श्री. कन्हैयालाल गिडवाणी : सभापती महोदय, 23 मार्च रोजी अर्थमंत्र्यांनी पेट्रोल आणि डिझ ेलचा समावेश या व्हॅटमध्ये व्हावा यासाठी नवी दिल्ली येथे राज्य शासनातर्फे आग्रह धरु असे आश्वासन दिलेले होते. त्याबाबत काय झाले ?16 तारखेला बैठक आहे त्यामध्ये हा विषय घेणार काय ? पेट्रोल आणि डिझेलचा समावेश व्हॅटमध्ये झाला की 5 रुपये आणि 7 रुपये पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील. तसा आग्रह धरुन आपण निर्ण घेणार काय ?15 एप्रिल पासून महाराष्ट्रामध्ये व्यापा-यांनी संप पुकारला आहे. त्याबाबत व्यापा-यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा झालेली आहे. त्यामध्ये मंत्रीमहोदयांनी कोणते आश्वासन दिलेले आहे ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय,पेट्रोल आणि डिझेलसाठी मागे चर्चा झालेली होती त्यानंतर लगेचच म्हणजे 24 तारखेला दिल्लीला जी बैठक झाली त्यामध्ये मा.सदस्यांनी सांगितल्यानुसार मी आश्वासन दिले होते त्यानुसार प्रस्ताव मी मांडला होता. वेगवेगळया राज्यांना जे कॉम्पेनसेशन द्यावे लागणार आहे ती रक्कम मोठी होईल. केंद्र सरकारच्या वित्तमंत्र्यांशी यावर चर्चा झाली आणि 20 टक्के फ्लोअर रेट ठेवू सर्व देशातील राज्यांना 20 टक्के हून खाली आणण्यासाठी कारण काही राज्ये 20 टक्क्याच्या वर आहेत आणि काही खाली आहेत हा प्रस्ताव मांडला. पण ज्या राज्यांचा 20 टक्क्याच्या खाली आहे त्यांनी या सभेत सांगितले की, आम्ही 20 टक्क्ेपर्यंत कशासाठी वाढवावयाचे ? यावर सहमती न झाल्यामुळे त्यासाठी पुन्हा केंद्रीय वित्त मंत्र्यांना सांगितले जेवढे 20 टक्के वर आहेत तेवढे 20 टक्केपर्यंत आणण्यासाठी कॉम्पेनसेशन द्यावे लागले तर ते द्यावे अशा स्वरुपासाठी चर्चा करण्याचे ठरलेले आहे. वित्त मंत्र्यांशी ज्यावेळी भेट होईल त्यावेळी देशातील ओव्हरऑल कॉम्पेनसेशनचा आकडा सांगावा लागेल. नंतर निर्णय होईल. केंद्र सरकारला ते परवडणे आवश्यक आहे त्याप्रमाणे डेटा तयार करुन देत आहोत. दुसरा प्रश्न विचारला होता त्यासंदर्भात काही दिवसापूर्वी राज्यातील ब-याच व्यापा-यांना मी दिवसभर भेटलो. 2/3 मुद्यांबाबत त्यांना शंका होती. या राज्यामध्ये व्हॅट आहे त्या राज्यातील दर आणि व्हॅट नसलेल्या राज्यातील दर यामध्ये फरक किती ? दुसरा मुद्दा सर्व राज्यात व्हॅट आहे त्याठिकाणी 2-4 कमॉडिटीज मध्ये बदल आहेत त्यासाठी काय करावयाचे आणि ज्या कमॉडिज शून्य अक्के होत्या त्या 4 टक्केक मध्ये गेल्या आहेत किंवा जादा रेटमध्ये गेल्या आहेत त्यांच्यासाठी काय करावयाचे ? याविषयी मी राज्यात सर्व व्यापा-यांशी चर्चा केली. चर्चेअंती असे आश्वासन

...3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 14:40

श्री. जयंत पाटील ...

दिले आहे की 16 एप्रिल रोजी जी बैठक आहे त्या बैठकीमध्ये वेगवेगळया राज्यामधील रेटच्या व्हेरीएशन्स् निदर्शनाला आणून देतील....

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. श्री.जयंत पाटील ..

तशा प्रकारचे पत्र आजच राज्य सरकारने त्यांना पाठविलेले आहे. तसेच त्यांना हा विषय अजेंडयावर घेण्यास सांगण्यात येऊन .यामध्ये काही ॲनामलीज असतील तर आम्हीसुध्दा त्या ॲनामलीज करु यासाठी आपण त्यांची परवानगी मागणे आवश्यक आहे. दुस-याने चूक केली म्हणून आपणही ती चूक करणे बरोबर नाही. सर्व राज्यांनी त्या रेटप्रमाणे यावे नाही तर त्या रेटपेक्षा खालच्या रेटवर आपण जाऊ अशा प्रकारचा प्रस्ताव आम्ही पाठविलेला आहे. 16 एप्रिल 2005 ला या संदर्भात बैठक होणार आहे. त्यावेळी चर्चा झाल्यानंतर त्याची सविस्तर माहिती देता येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : ठाणे महानगरपालिका आणि अंबरनाथ नगरपालिकेच्या माध्यमिक शाळांना वेतन अनुदान न मिळणे

मु.शी : ठाणे महानगरपालिका आणि अंबरनाथ नगरपालिकेच्या माध्यमिक शाळांना वेतन अनुदान न मिळणे याबाबत श्री.रामनाथ मोते, प्रतापराव सोनवणे, श्रीमती संजीवनी रायकर,डॉ.अशोक मोडक ,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) :सभापती महोदय, श्री.रामनाथ मोते,प्रतापराव सोनवणे, श्रीमती संजीवनी रायकर, डॉ.अशोक मोडक यांनी " ठाणे महानगरपालिका आणि अंबरनाथ नगरपालिकेच्या माध्यमिक शाळांना वेतन अनुदान न मिळणे "या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

-. निवेदना नंतर -

श्री.रामनाथ मोते :ठाणे महानगरपालिकेच्या माध्यमिक आणि अंबरनाथ नगरपालिकेच्या माध्यमिक शाळेतील शिक्षकांना ऑक्टोबर महिन्यानंतर सहा सात महिने पगार मिळत नाही. ही परिस्थिती दरवर्षी निर्माण होत असते.ऑक्टोबर 2004 पासून बंद असलेला पगार आता त्या शिक्षकांना देण्यात आलेला आहे.परंतु दरवर्षी या शिक्षकांना सहा ते सात महिने वेळेवर पगार मिळत नाही.त्यामुळे त्यांची आर्थिक कुचंबणा होत असते. तेव्हा याबाबतीत शासनाने कायम स्वरुपाचा तोडगा काढणे अत्यंत आवश्यक आहे.आता या वर्षापुरता प्रश्न जरी सुटलेला असला तरी पुढच्या वर्षीच्या अधिवेशनात पुन्हा हाच प्रश्न विचारावा लागेल की काय अशी भीती मला वाटते.हा प्रश्न पुन्हा निर्माण होणार नाही यासाठी शासनाने प्रयत्न केला पाहिजे. अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना वेळेवर पगार मिळेल यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? यापूर्वीसुध्दा सात आठ महिने शिक्षकांना पगार मिळाला नव्हता त्यामुळे चौधरी नावाच्या मुख्याध्यापकाचा हार्ट ॲटॅकमुळे मृत्यू झाला होता. हे मुख्याध्यापक ठाण्यातील शाळेमध्ये होते.तेव्हा या घटना टाळण्यासाठी व शिक्षकांना वेळेवर पगार मिळण्यासाठी शासन काही वेगळी योजना करणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ :स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राथमिक आणि माध्यमिक ज्या शाळा आहेत त्या शाळेतील शिक्षकांच्या पगारासाठी अर्थसंकल्पात शिक्षण खाते तरतूद करण्यासाठी प्रयत्न करते परंतु वित्त विभागाकडून ती तरतूद मिळतेच असे नाही. त्यामुळे शेवटी पगार देण्याच्या बाबतीत अडचण निर्माण होत असते.येथून पुढे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत काम करणा-या शिक्षकांची ससे होलपट होता कामा नये या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेण्यात येईल आणि त्यांचा पगार वेळेवर दिला जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी शासन मान्य अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकीस मान्यता न मिळणे

मु.शी : शासन मान्य अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकीस मान्यता न मिळण्याबाबत श्री.रामनाथ मोते,श्रीमती संजीवनी रायकर,डॉ.अशोक मोडक ,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) :सभापती महोदय, श्री.रामनाथ मोते,श्रीमती संजीवनी रायकर डॉ.अशोक मोडक यांनी " शासन मान्य अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नेमणुकीस मान्यता न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.

श्री.हासन मुश्रीफ :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांची अर्धा तास चर्चा याच विषयावर असल्यामुळे त्या चर्चेलासुध्दा मी आताच समाधानकारक उत्तर देऊन ती चर्चा संपवितो.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री.रामनाथ मोते :सभापती महोदय, अनुदानित संस्थेत काम करणारे जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांच्या नियुक्तीवर शासनाने सध्या बदी आणली आहे.एखाद्या शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचा-यांचे जर दुर्देवाने निधन झाले तर त्याच्या मुलाला अनुकंपा तत्वावर नोकरीस घेतले जाते.घरातील कमावत्या व्यक्तीचे निधन झाल्यानंतर त्या शिक्षकाच्या किंवा शिक्षिकेच्या मुलाला तातडीने अनुकंपा तत्वावर नोकरी दिली तर त्यांचा संसार उभा राहू शकेल. संस्था चालकांकडे या नोक-या देण्याच्या संदर्भातील धोरण होते परंतु त्यात आता बदल करण्यात आला आहे .31 डिसेंबर 2002 च्या शासन निर्णयानुसार ज्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी हवी आहे ते आता शासनाकडे अर्ज करीत आहेत.त्यांना नोक-या देण्याकरता आपणच त्यांचे समायोजन करणे आवश्यक आहे.गेल्या दोन तीन वर्षापासून अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यास बंदी घालण्यात आलेली आहे.त्या शिक्षकाच्या कुटूंबाला आधार न मिळाल्यामुळे अनेक शिक्षकांचे संसार उघडण्यावर पडलेले आहेत व त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. तेव्हा किमान अनुकंपा तत्वावर या कुटूंबियाच्या पाल्यांना नोकरी देण्यास आपण मान्यता देणार आहात काय आणि खास बाब म्हणून त्यांना नियुक्ती देण्याचा प्रश्न आपण सोडविणार आहात काय ?

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, यामध्ये दोन भाग आहेत. एक म्हणजे शिक्षकांची पदे आणि दुसरा भाग म्हणजे शिक्षकेतर पदे भरणे. शिक्षकांची पदे अनुकंपा तत्त्वानुसार भरताना ते उमेदवार शिक्षण सेवकांच्या सगळ्या अटी पूर्ण करीत असतील तर शासन तसे परिपत्रक काढून आदेश देईल. मात्र शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्याबाबतीत स्थगिती दिलेली आहे आणि त्याबाबत आढावा घेणे चालू आहे तो झाल्यानंतर हाही विषय संपेल.

डॉ. अशोक मोडक : अध्यक्ष महाराज, यामध्ये एक डायमेंशन सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी येथे सांगितले आहे. पण आज अशा अनेक शाळा आहेत की,ख तेथे मूलत: शिक्षकेतर कर्मचारी कमी आहेत आणि त्यामुळेच तेथील शिक्षणावर आणि एकूणच वातावरणावर प्रतिकूल परिणाम होत आहे. हे सर्व लक्षात घेता आणि अनुकंपा तत्त्वावरील भरतीची बाब लक्षात घेता हा आकृतीबंध आपण केव्हा स्वीकारणार आहात हे कळले पाहिजे. ते आपण सांगू शकाल का ?

श्री. हसन मुश्रीफ : अध्यक्ष महाराज, हे शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न सोडवू. त्यामुळे हा अनुकंपा तत्त्वासंबंधीचा प्रश्नही संपेल.

******

....... ओओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईतील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी मेधा पाटकर यांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेला अमानुष लाठीमार.

**मु.शी.** : मुंबईतील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी मेधा पाटकर यांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेला अमानुष लाठीमार याबाबत प्रा.शरद पाटील व श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

----

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील आणि श्री. जयंत प्र.प्राटील यांनी "मुंबईतील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनासाठी मेधा पाटकर यांनी काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेला अमानुष लाठीमार" या विषयी नियम 93 अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

...... ओओ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MAP/ KGS/ श्री.गायकवाड नंतर --- 14:50

( मा. गृह राज्यमंत्र्यांच्या नियम 93 अन्वयेच्या निवेदनानंतर ....)

प्रा. शरद पाटील : अध्यक्ष महाराज, 6 तारखेला जी घटना घडली आहे .. आंदोलकांच्या मोर्चावर पोलिसांनी जो अत्याचार केलेला आहे त्या संबंधात शासनाकडून आलेले हे निवेदन संपूर्णत: पोलिसांच्या अहवालावर आधारलेले आहे. या निवेदनात अनेक विसंगती आहेत. पोलीस आवाहनाकडे दुर्लक्ष करून श्रीमती मेधा पाटकर यांनी आंदोलकांना चिथावले असे यामध्ये म्हटलेले आहे. परंतु असा काही प्रकार घडलेलाच नव्हता. पोलिसांवर हल्ला करा अशा स्वरूपाच्या सूचना श्रीमती मेधाताईंनी आंदोलकांना केल्या असेच या निवेदनातून सूचित होत आहे. वास्तविक तेथे शांततामय आंदोलन करणाऱ्या आंदोलकांवर पोलिसांनी कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता अमानुष असा लाठीमार केलेला आहे. त्यामध्ये महिला आंदोलकांची लहान मुले देखील जखमी झालेली आहेत आणि या निवेदनात म्हटले आहे की, त्या महिला आपल्या बालकांना घेऊन पळत असताना खाली पडली आणि त्यामध्ये बालक जखमी झाले तसेच दुसऱ्या एका बालकाला न्यूमोनिया झाल्याचे देखील यामध्ये म्हटलेले आहे. अध्यक्ष महाराज, माननीय उपमुख्यमंत्री महोदयांपर्यंत या जखमी महिला-बालक इ. लोकांना बरोबर आणले होते तेव्हा मी स्वत: तेथे जाऊन पाहिले आहे. तेथील स्त्री-पुरूषांच्या शरीरावर वळ उठल्याचे देखील मी पाहिलेले आहे. अशा प्रकारे पोलिसांच्या अहवालावर विसंबून न राहता या संपूर्ण लाठीमाराची स्वतंत्र चौकशी करून, या अमानुष अत्याचाराची जबाबदारी निश्चित करून त्यांचेवर आपण कारवाई करणार का ?

श्री. आर.आर.पाटील : अध्यक्ष महाराज, अतिशय गरीब माणसांना घेऊन आलेल्या मोर्चावर लाठीमार करणे ही या राज्यामध्ये घडलेली एक दु:खद घटना आहे असे मी मानतो. त्याबद्दल मला मनापासून खेद वाटतो आहे. अतिशय शांततेमध्ये निघालेला हा मोर्चा आझाद मैदानावर आला असता तेथे आपले गाऱ्हाणे ऐकण्यास कोणी येत नव्हते म्हणून आंदोलक रस्त्यावर बसले. त्यातील काही प्रमुख नेत्यांना तेव्हा पोलिसांनी अटक केली त्यामुळे काही प्रमाणात सौम्य असा लाठीमार देखील पोलिसांकडून करण्यात आला. ही घटना शासन म्हणून मी अतिशय गांभीर्याने घेतलेली आहे. याबाबतचा प्राथमिक अहवाल आल्यानंतर याबाबतची चौकशी कशा पध्दतीने करावयाचा याचा विचार शासन निश्चितपणे करील. प्राथमिक चौकशीचा अहवाल तीन दिवसात माझ्याकडे पोहोचेल. ॲडिशनल सी.पी. या प्राथमिक चौकशीचे काम करीत आहेत.

*****

...... ओओ 4 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शाहू महाराजांची सरकार दरबारी होणारी अवहेलना.

**मु.शी.** : शाहू महाराजांची सरकार दरबारी होणारी अवहेलना
याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

----

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "शाहू महाराजांची सरकार दरबारी होणारी अवहेलना" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे होते. परंतु निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापण्यात यावे. )

( यानंतर श्री. जागडे ....पीपी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MHM/ MAP/ KGS/ SBT/ 14:55

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मला या ठिकाणी दोन-तीन मुद्यांचे स्पष्टीकरण माननीय मंत्रिमहोदयांकडून पाहिजे. छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीबाबतचे संशोधन किती दिवसापासून सुरु आहे ? उत्तरामध्ये असे सांगितले आहे की, " आता या बबतची कमिटी तयार करण्यात आली आहे." यामध्ये आता बराच मोठा कालावधी गेला आहे. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांच्या समर्थकांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीबाबतचा वाद मिटविण्यासाठी ही समिती निर्माण करण्यात आली आहे काय ? या बाबत या समितीने कोणती शिफारस केली आहे ? तसेच त्या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे? छत्रपती शाहू महाराजांचा पुतळा तयार करण्यासाठी माजी लोकसभा अध्यक्ष श्री. मनोहर जोशी यांनी पुढाकार घेतला होता. त्या समितीमार्फत या बाबतचा पाठपुरावा केला जात आहे काय ? यासाठी आता वेगळी समिती नेमण्यात आली आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीबाबत दि. 16 जुलै आणि 26 जून या तारखांबाबतचा वाद होता. या बाबत इतिहासकारांचा सल्ला घेण्यासाठी शासनाने एक उच्चस्तरीय समिती नेमली आहे. त्या समितीने या बाबत योग्य प्रकारचे संशोधन करुन विचार पूर्वक निर्णय घ्यावयाचा आहे. आता या समितीला तीन महिन्यात आपला अहवाल देण्याबाबतचे निदेश दिले जातील. जी पुतळा समिती आहे, ती पूर्वीचीच आहे. या पुतळ्याचे शिल्पकार श्री.सुतार यांना पाच लाख रुपये देण्यात आले आहेत. उर्वरित रक्कम दोन टप्प्यात देण्यात येणार आहे. सात लाख रुपयाचा एक प्रस्ताव वित्त विभागाकडे गेला आहे. त्यास लवकरात लवकर मान्यता मिळेल. तसेच 15 जून 2005 पूर्वी हा पुतळा पूर्ण होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभातपी महोदय, निवेदनाच्या दुस-या परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे कोल्हापूरच्या गॅझेटियर्समध्ये छत्रपती शाहू महाराजांबद्दल चुकीचा मजकूर छापून आला होता. आता हा मजकूर वगळण्यात आला आहे. परंतु ज्यांनी हा मजकूर घातला आहे, त्यांची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या गॅझेटियर्सचे कार्यकारी संपादक श्री.के. के. चौधरी होते. त्यांनी 1979 मध्ये हे गॅझेट पब्लिश केले होते. त्यानंतर हा वाद निर्माण झाला होता. त्यानंतर त्या पुस्तकांवर बंदी घालण्यात आली होती तसेच ते संपादक मंडळ बरखास्त करण्यात आले होते. श्री. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली या ठिकाणी सुधारीत मंडळ नेमण्यात आले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे.....

आहे. त्यानंतर यामध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. ही दुरुस्ती जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात लोकांच्या हरकती मागविण्यासाठी ठेवण्यात आली होती. परंतु या बाबत नंतर कोणतीही हरकत आली नाही. त्यामुळे ही दुरुस्ती पुनर्लिखित करुन प्रकाशित करण्यात आली. त्या ठिकाणी कार्यकारी मंडळ बरखास्त करण्यात आले आहे. यापेक्षा दुसरी कारवाई शासन करु शकत नाही.

--

..3..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नांदगाव ( ता. जव्हार, जि.ठाणे ) येथे विचित्र तापाच्या साथीने दोन कुपोषित बालके दगावणे.

**मु.शी.**: नांदगाव ( ता. जव्हार, जि.ठाणे ) येथे विचित्र तापाच्या साथीने दोन कुपोषित बालके दगावणे या बाबत डॉ. नीलम गो-हे यांनी दिलेली नियम 93 ची सूचना.

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : अध्य□ महोदय, डॉ. नीलम गो-हे यां□ नांदगाव ( ता. जव्हार, जि.ठाणे ) येथे विचित्र तापाच्या साथीने दोन कुपोषित बालके दगावणे या विषयावर □यम 93 अ□ये जी सूच□ दिली होती, तिला अ□ल□ आप□ □देश दिल्याप्रमा□ मला □वेद□ □रावयाचे आहे. □वेद□च्या प्रती सदस्यां□ आ□दरच वितरीत □लेल्या असल्या□मी हे □वेद□ सभा□हाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : □वेद□ सभा□हाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

□वेद□

( प्रेस : येथे सोबतचे □वेद□ छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या ठिकणी दोन्ही परिच्छेदात एकसारखे उत्तर दिले आहे. पहिल्या परिच्छेदात असे म्हटले आहे की, " सदरहू रुग्णांच्या नातेवाईकांस पुढील उपचारासाठी कुटीर रुग्णालय, जव्हार येथे पाठविले. परंतु तिच्या नातेवाईकांनी तिला कुटीर रुग्णालय, जव्हार येथे न नेता खाजगी दवाखान्यात दाखवून परत घरी आणले." दुस-या परिच्छेदातही तसेच म्हटले आहे. आपणाकडे ॲम्ब्युलन्स व जीप असताना तसेच कर्मचारीही असताना संबंधीत अधिका-यांनी याचा पाठपुरावा केला नाही. दोन्ही रुग्ण नंतर मरण पावले आहेत.

( यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आपण तिला दुसऱ्या आरोग्य सेवा रुग्णालयामध्ये नेल्यामुळे ती मुलगी दगावली. त्यामध्ये शासनाची जबाबदारी नाही असे तुमचे म्हणणे आहे असे उत्तरावरुन स्पष्ट दिसते. ॲम्बुलन्स, जीप वहातुकीची व्यवस्था तुम्ही त्यांना कां उपलब्ध करुन दिली नाही?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, दामिनी मुकणे या मुलीला काँजेक्टिव्ह हार्ट डिसिज होता. त्यामुळे ती गंभीर आजारी होती. तिला सबडिस्ट्रिक्ट हॉस्पिटल जव्हार मध्ये रेफर केले होते. परंतु त्या मुलीच्या नातेवाईकांनी तिला जव्हार मधील प्रायव्हेट प्रॅक्टिशनर डॉ. संजय कपादनी यांच्याकडे नेले व नंतर तिला सरळ घरी नेले. या पूर्वी त्याठिकाणी आरोग्य शिबीर भरले होते त्या वेळी हा त्रास डॉक्टरच्या लक्षात आला होता. त्यावेळी डॉक्टरने त्यांना जे.जे. हॉस्पिटलमध्ये जाऊन पुढील ट्रीटमेंट घेण्यास सांगितले होते. त्या मुलीला 20 तारखेला नांदगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचार करुन पुढील उपचारासाठी सबडिस्ट्रिक्ट हॉस्पिटल जव्हारकडे पाठविण्यात आले. मघाशी सांगितल्याप्रमाणे नातेवाईकांनी तिला खाजगी प्रॅक्टिशनरकडे नेले. दि.23 रोजी पुन्हा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये त्या मुलीला आणल्यानंतर व पुढील उपचारासाठी सबडिस्ट्रिक्ट हॉस्पिटल जव्हारकडे पाठविण्यात आल्यानंतर वाटेतच तिचा मृत्यू झाला.

त्यानंतर, निवृत्ती भरत वड या मुलाला ब्रॉकोसायटीस न्यूमोनिया झाला होता. त्याला सुध्दा सबडिस्ट्रिक्ट हॉस्पिटल जव्हारकडे रेफर केले होते. परंतु त्या मुलाचे नातेवाईक सुध्दा प्रायव्हेट प्रॅक्टिशनरकडे मुलाला घेऊन गेले.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा एकच प्रश्न आहे की, त्या रुग्णालयाला ॲम्बुलन्स कां नाही?

श्री.रणजित कांबळे : ॲम्बुलन्स आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कुपोषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या दोन बालकांचा मृत्यू कुपोषणामुळे झाला. त्यांच्या मृत्यूचे कारण काहीही असेल, परंतु मृत्यू कुपोषणामुळे झाला हे खरे आहे काय? दुसरा प्रश्न असा आहे की, या परिस्थितीची शासनाला आणि लोकांना माहिती होण्यासाठी कुपोषणावर शासन श्वेतपत्रिका जाहीर करणार आहे काय?

श्री. रणजित कांबळे : माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देतो. त्या मुलांना ॲम्बुलन्समधून जव्हार येथील सबडिस्ट्रिक्ट हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले होते. परंतु ते प्रायव्हेट प्रॅक्टिशनरकडे गेले होते त्यामुळे त्यांना सबडिस्ट्रिक्ट हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करता आले नाही. ती ॲम्बुलन्स प्राथमिक आरोग्य केंद्राची आहे. दुसरा प्रश्न कुपोषणाबाबत विचारला आहे. दामिनी मुकणे ही ग्रेड 3 ची कुपोषित बालिका होती.

डॉ. दीपक सावंत : कुपोषणावर शासन श्वेतपत्रिका जाहीर करणार आहे काय?

श्री. रणजित कांबळे : त्याची आवश्यकता वाटत नाही. नियम 93 अन्वये विचारलेल्या सूचनेला अनुलक्षून उत्तरे दिलेली आहेत.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>लजवेधी सूच-ाा</u>

**पृ.शी.**: मराठी चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी मुंबई, महाराष्ट्रामध्ये थिएटर्स उपलब्ध न होणे.

**मु.शी.**: मराठी चित्रपटांच्या प्रदर्शनासाठी मुंबई, महाराष्ट्रामध्ये थिएटर्स उपलब्ध न होण्यासंबंधी सर्वश्री प्रमोद -ावलज्र, मधुज्र सरपोतदार, डॉ. -ाीलम जोऱ्हे, श्री. अ-ांत तरे, डॉ.दीपज् सावंत, सर्वश्री. विलास अवचट, अरविंद सावंत यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रमोद नवलकर ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ाुमती-ो -ाियम 101 अ-वये पुढील तातडीच्या व सार्वजनिज् महत्वाच्या बाबीज्डे स-मा-ा-ाीय उप मुख्यमंत्र्यांचे लज वेधू इच्छितो आजि त्याबाबत त्यां-ाी -ािवेद-ा ज्रावे, अशी वि-ांती ज्रतो.

"मुंबई, महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट -ािर्मितीची वाढती संज्या, मराठी चित्रपट -ािर्मितीसाठी शास-ााज्डू-ा मिळजारे अ-ाुदा-ा त्यामुळे मराठी चित्रपटांची -ािर्मिती वेजात होत असू-ा आठवडयाला एज्ाहू-ा अधिज् चित्रपट प्रदर्शित होजे, असे असतां-ाा मराठी चित्रपटांच्या प्रदर्श-ाासाठी मुंबई, महाराष्ट्रामध्ये थिएटर्स मिळत -ासल्या-ो मराठी फिल्म इंडस्ट्रीपुढे -ािर्माज झालेली जोंडी, चित्रपट मालज्ांज्डू-ा मराठी चित्रपटवाल्यां-ाा मिळजारी सापत्-ा भावाची वाजजूज्, तसेच चित्रपटजृहांचे भाडे अव्वाच्यासव्वा आजारज्यात येजे, महाराष्ट्रात हि-दी सी ग्रेड फिल्म इतजेही मराठी चित्रपटां-ाा प्राधा-य दिले -ा जाजे, चित्रपटजृह मालज्ांवर तसेच -ावि-ा चित्रपटजृहां-ाा परवा-ाजी देतां-ाा मराठी चित्रपट दाजविज्याबाबत अट घालज्याची -ाितांत आवश्यज्ता, मुंबई शहरामधील ज्ाही सि-ोमाजृहांत मराठी चित्रपट प्रदर्शित ज्रज्यासाठी सक्ती-ो थिएटर्स उपलब्ध ज्रु-ा देज्याच्या शास-ााच्या अटी असतां-ाा त्या पायदळी तुडविज्यात येजे, राज्याच्या राजधा-ाीत मराठी चित्रपटांची होजारी जळचेपी, त्यावर शास-ाा-ो तात्ज्ाळ उपाययोज-ाा ज्रज्याबाबत दाजविलेली अजम्य हेळसाड, परिजामी ज-ातेत -ािर्माज झालेली चिड व तीव्र असंतोष लजात घेता याप्रज्रजी शास-ाा-ो तातडी-ो ज्ेलेली व ज्रावयाची उपाययोज-ाा व शास-ााची प्रतिक्रिया. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन
( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

(यानंतर सौ. रणदिवे)

.... ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:05

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना या निवेदनामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, नाही.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, मी केली तर चालेल का ? माझ्या माहिती प्रमाणे 50 टक्क्याची सवलत ही गोरेगाव चित्रनगरी मध्ये आहे, त्याप्रमाणे कोल्हापूर चित्रनगरी मध्ये देखील आहे. आपण या निवेदनामध्ये कोल्हापूरच्या चित्रनगरी बाबत उल्लेखच केलेला नाही. तुम्ही पुन्हा अशी चुक कशी केली ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दोन्हीकडे 50 टक्के सवलत आहे.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, म्हणजे कोल्हापूर चित्रनगरी मध्ये देखील सवलत आहे. गेल्या वेळेला ज्यासाठी आपण ही लक्षवेधी सूचना तहकूब केली होती, कारण मी असे म्हटले होते की, 16 लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत आणि आपण निवेदनामध्ये 15 लाख रुपये असे छापले होते. माझ्या माहितीप्रमाणे आपणच व्यासपीठावर असताना, माननीय उप मुख्यमंत्री श्री.मुंडेसाहेबांनी 16 लाख रुपये जाहीर केले होते. मग तुम्ही त्याचा उल्लेख येथे का केला नाही ? त्यावेळी माननीय श्री.मुंडेसाहेबांनी ही जी घोषणा केली होती, ती बातमी वर्तमानपत्रामध्ये आली होती, त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव केला होता. परंतु मागच्या वेळेला निवेदनामध्ये 15 लाख असा उल्लेख केला होता, म्हणून ही लक्षवेधी सूचना तहकूब करावयास लावली. मग निवेदनामध्ये 16 लाखाच्या ऐवजी 15 लाख असा उल्लेख कसा केला ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, कायमच्यासाठी नाही तर त्या परिस्थितीत केलेली ती पोकळ घोषणा होती आणि त्यावेळी ती कृतीत आणण्याचा कोणताही प्रयत्न झाला नव्हता.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, घोषणा पोकळ होती, तर तुम्ही याबाबतीत पोकळ जी.आर.का काढला नाही ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्या वेळच्या शासनाने काढला नाही.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, आपण आता तसा जी.आर.काढणार का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांची इच्छा 16 लाखाचा जी.आर.काढण्याची होती. पण ती पूर्ण झाली नाही. आताचे शासन 20 लाखाचा जी.आर.काढेल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, अर्थसंकल्पात सांगितले की, 5 लाख रुपये वाढविण्यात आले आहेत. त्यावेळी 16 लाखाचा जी.आर.काढावयाचा राहीला होता. तेव्हा ते 16 लाख गृहीत धरुन 20 च्या ऐवजी 21 लाखाचा जी.आर.काढणार आहात का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, 16 लाखाची घोषणा पोकळच होती. त्यामध्ये 5 लाख रुपये मिसळून तेवढेच राहतील म्हणजे 20 लाखाचा जी.आर.काढू आणि त्याचे इम्प्लीमेंन्टेशन करु. एक गोष्ट खरी आहे की, ही लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यामागची भावना अशी आहे की,जे मराठी चित्रपट निघतात, ते चित्रपटगृहामध्ये दाखविले जावेत, हा हेतू आपल्याला अपेक्षित होता आणि शासनालाही तसेच अपेक्षित आहे. पण तो साध्य होताना दिसत नाही. एकतर चित्रपट कमी निघतात आणि काढले तर कमी रिलीज होतात. काही वेळा चित्रपटांना चित्रपटगृहे उपलब्ध होत नाहीत आणि काही चित्रपट गृहांकडे निर्माते जात नाहीत. तेव्हा यांच्यामध्ये समन्वय असण्याची आवश्यकता आहे. मराठी लोकांना हिंदी कळते हा यातील दोष आहे. त्यामुळे हिंदी चित्रपट निघतात, लोक त्यांना रिस्पॉन्स् देतात. पण मराठीचा अभिमान म्हणून चार आठवडयाची सक्ती प्रत्येक चित्रपटगृहावर आहे. जर एखाद्या चित्रपट निर्मात्याकडून, मला हा चित्रपट येथे दाखवावयाचा आहे, पण चित्रपटगृह उपलब्ध करुन दिले जात नाही अशी ज्यादिवशी पहिली तक्रार येईल, तेव्हा त्या चित्रपटगृहाला टाळे ठोकण्याची भूमिका महाराष्ट्रात घेतली जाईल. या बाबतीत गृह विभागात एक कक्ष निर्माण केला जाईल. चित्रपटगृह उपलब्ध व्हावे म्हणून संबंधित चित्रपटगृहाच्या मालकाशी संपर्क साधावा. पण तरीही चित्रपटगृह उपलब्ध झाले नाही तर उप सचिवाच्या स्तरावरील अधिका-यांकडे संपर्क साधला तर शासनामार्फत मध्यस्थी करुन चित्रपटगृह उपलब्ध करुन दिले जाईल. आज तुरळक प्रमाणात मराठी चित्रपट निर्माते मराठी चित्रपट काढण्यासाठी पुढे येतात आणि शासनाचे अनुदान वेळेवर मिळत नसेल तर, ते अनुदान वेळेवर मिळण्याच्यादृष्टीने प्रयत्न केला जाईल. मराठी चित्रपट निघाले पाहिजेत, ते चालले पाहिजेत, त्यांना चित्रपटगृह उपलब्ध करुन करुन दिले पाहिजे याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.प्रमोद नवलकरसाहेबांबरोबर बसून चांगली नियमावली तयार करु.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, आता नवीन चित्रपटगृहे, मल्टीप्लेक्स् निर्माण होत आहेत, अशा वेळी त्यांना परवानगी देताना वर्षातून किमान एक महिना मराठी चित्रपटांसाठी चित्रपटगृह राखून ठेवणे बंधनकारक करण्यात

. . . .2 आर-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रमोद नवलकर . . . .

आले आहे. पण जुन्या चित्रपटगृहांच्या बाबतीत काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जुन्या चित्रपटगृहांना सुध्दा हे नियम लागू करण्यात येतील.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, ज्यांनी हा नियम पाळलेला नाही, अशा किती चित्रपटगृहांच्या मालकांच्या विरोधात कारवाई केली आहे ? कारण कोणीच मराठी चित्रपट लावत नाहीत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या गोष्टीबाबत चित्रपट निर्माते, चित्रपट-गृहाचे मालक यांच्याबरोबर तत्कालीन उप मुख्यमंत्री माननीय श्री.छगन भुजबळ यांची बैठक झाली होती. तेव्हा चित्रपटगृहाच्या मालकांनी अशी तक्रार केली की, आमच्याकडे चित्रपटगृहाची मागणी करण्यासाठी कोणी आले नाही. आमच्याकडे मागणी आली तर आम्ही देणार. काही ठिकाणी मराठी चित्रपट पाहण्यासाठी कोणी येत नाही असे चित्रपटगृहाच्या मालकांनी सांगितले.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (पुढे चालू...

थिअटरच्याबाबतीमध्ये मालकांवर सक्ती करुन उपयोग काय ? या बाबतीतील नियमावली करून मराठी चित्रपटाला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.नवलकर साहेब आपण एकत्र बसून मराठी चित्रपट निर्मात्यांची, मराठी चित्रपटाची गळचेपी होणार नाही या दृष्टीने चित्रपटगृहे उपलब्ध होतील, अशी भूमिका घेण्यात येईल.

श्री.प्रमोद नवलकर : चित्रपट निर्मार्त्यांची अशी तक्रार आहे की, त्यांना चित्रपटगृहाचे भाडे परवडत नाही. माझी विनंती आहे की, परसेंटेजप्रमाणे भाडे आकारण्याबाबत त्यांनी विनंती केलेली आहे त्याचा विचार केला जाणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : या सूचनेचा विचार नवीन नियमावली करत असतांना नक्की केला जाईल.

श्री.विलास अवचट : निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "बहुविध चित्रपटगृह संकुलांना परवाना देतांना वर्षातून किमान एक महिना मराठी चित्रपटांसाठी चित्रपटगृह राखून ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याच संदर्भात मी एक उदाहरण सांगतो "श्वास" मराठी चित्रपटाचे निर्माते श्री. अरूण नलवडे यांनी चित्रपटगृह तीन शो दाखविण्यासाठी घेतला. आठ दिवसामध्ये चित्रपटगृहाच्या मालकांनी त्यांना मधेच नोटीस देऊन चित्रपट बंद करायला लावला. अशाप्रकारची तक्रार खात्याकडे पाठविलेली आहे, त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या तक्रारीची माहिती घेतली जाईल. त्या चित्रपटगृहाच्या मालकांनी तसे केले असेल तर त्याच्यावर कारवाई सुध्दा केली जाईल. सभापती महोदय, मराठी भाषिकांना किमान वर्षातून एकदा मराठी चित्रपट बघितलाच पाहिजे, अशी काही सक्ती करता येईल काय, याचा आपण विचार करणे गरजेचे आहे.

श्री.विनायक मेटे : सन्माननीय गृहमंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे, त्यांनी दिलेल्या उत्तराने बऱ्याचशा गोष्टींबाबत समाधान झाले. परंतु सन्माननीय सदस्य श्री.नवलकर साहेबांनी प्रश्न विचारला तो महत्वाचा आहे. अनेक मुंबईतील चित्रपटगृहामध्ये मा.गृहमंत्री म्हणतात, त्याप्रमाणे मराठी चित्रपट पहायला कोणी जात नाहीत. त्यामुळे निर्मात्याला चित्रपटगृहाचे भाडे परवडत नाही. बऱ्याचशा चित्रपटगृहाचे मालक व्यवस्थित रेकॉर्ड ठेवत नाहीत, कमी प्रेक्षक दाखवितात आणि तोट्यात व्यवसाय चालतो असे सांगतात. त्यामुळे सन्माननीय सदस्य

श्री.नवलकर साहेब म्हणतात त्याप्रमाणे चित्रपटगृहाचे मालक आणि निर्माते यांनी जे काही प्रेक्षक येतील त्याच्या बाबतीत टक्केवारी ठरवून पैसे घेतले पाहिजेत. तेव्हा याबाबतीत चित्रपटगृहाचे मालक आणि मराठी चित्रपट निर्माते यांची एक बैठक घेऊन याबाबतीत तातडीने निर्णय घेतला जाईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : चित्रपटगृहाचे भाडे टक्केवारीवर ठेवण्यासाठी आणि मराठी चित्रपट पहाणाऱ्यांची टक्केवारी वाढविण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यात येईल.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**लक्षवेधी क्रमांक 2 संबंधी**</u>

**उपसभापती** : आता पुढची दुसऱ्या क्रमांकाच्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात संबंधित विभागाचे मंत्री महोदय खालच्या सभागृहात व्यस्त असल्यामुळे ते येईपर्यन्त पुढची तिसऱ्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

--

**पृ. शी.** : झोपडपट्ट्या बांधून गरजुंची फसवणूक करणाऱ्या झोपडपट्टी दादां विरुध्द करण्यात यावयाच्या कारवाईबाबत..

**मु. शी** : "झोपडपट्ट्या बांधून गरजुंची फसवणूक करणाऱ्या ोपडपट्टी दादां विरुध्द करण्यात यावयाच्या कारवाई बाबत" यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुबई महानगरपालिकेने अनधिकृत झोपडपट्ट्या बांधून शासनाची,मुंबई महानगरपालिकेची व खाजगी जमीन बळकावून गरजूंची फसवणूक करणाऱ्या झोपडपट्टी दादांची यादी नुकतीच शासनाच्या गृह खात्याकडे व मुंबई पोलीस आयुक्तांकडे देणे, परंतु त्यावरशासनाने कोणतीही कारवाई न करणे, परिणामत: रोज बेसुमार अनधिकृत झोपड्या, गॅरेजेस् व बांधकाम निर्माण होणे, या ठिकाणी समाज विघातक प्रवृत्तीने बेकायदेशीर व्यवसाय चालू ठेवणे, परिणामत: कायदा व सुव्यवस्थेचे गंभ्ठीर प्रश्न निर्माण होणे व त्याचप्रमाणे नागरी सोयींवर विपरित परिणात होणे, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे.....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या अशा विषयावर मी लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मध्यंतरी 30 डिसेंबर 2004 रोजी मुंबई महानगरपालिकेने 117 झोपडपट्टी दादांची यादी पोलीस कमिशनर श्री.एम.एन.रॉय यांच्याकडे दिली. गरीब गरजू लोकांचा गैरफायदा दादा घेत असतात. छत्र मिळविण्यासाठी गरीब माणूस झोपडपट्टीमध्ये रहाण्यास जातो. ती झोपडी दादांनी बांधलेली असते. तो दादा त्यांच्याकडून 1 लाख, 50 हजार रुपये डिपॉझिट घेतात. शासनाने 1995 नंतरच्या झोपडपट्ट्यांवर कारवाई करण्याचा आणि झोपडपट्टी दादांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला होता. तो प्रश्न दिल्लीपर्यन्त गेला आणि माणुसकीच्या आणि मानवतेच्या दृष्टीने त्याला स्टे दिला गेला.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदार... 15:15

श्री. मधुकर चव्हाण....

या सगळया गोष्टी नंतर असे सांगण्यात आले की, आम्ही यावर कारवाई करु.दिनांक 30 डिसेंबर,2004 ला जोसेफ साहेबांच्या सहीचे एक पत्र एम.एन. रॉयकडे गेले. त्यामध्ये संभाव्य आणि संशयीत झोपडपट्टी दादांची 117 लोकांची यादी देण्यात आली. त्याच्यानंतर उत्तर असे आलेले आहे की, बृहन्मुंबई आयुक्तांना 146 संशयीतांची यादी मिळाली 146 मधून 117 लोक वजा केले तर पंधरा-वीस च्या आसपास लोक शिल्लक राहतात. पण त्या उत्तरात असे म्हटले आहे की, 70 लोक निर्दोष आहेत. 14 लोकांना एम.पी.डी.ए.खाली अटक करण्यात आले. उरले 62. सभापती महोदय, हे किती हास्यास्पद आहे ते बघा. 21 लोकांवर कलम 151 खाली कारवाई करण्यात आली. ज्यांनी मुंबईत हाहाकर केला आहे. ज्यांनी मुंबईत करोडो रुपयाची जमीन हस्तगत केली आहे. झोपडया बांधल्या आहेत. गरजूंच्या असहाय्यतेचा,गरजेचा फायदा घेऊन त्या
झोपडया दिल्या आहेत. तेथे पाणी नाही, दिवा-बत्तीची व्यवस्था नाही.ना घरका ना घाटका अशी त्यांची अवस्था करुन टाकली आहे. त्यांना कलम 151 खाली पकडून 24 तासानंतर सोडून देण्यात आले. माननीय उपमुख्यमंत्री महोदय, आपल्याला माहीत आहे की, एखादी सभा असेल तर रेकॉर्डवर दाखविण्यासाठी कोणालाही उचलून नेतात आणि बंद करतात. आपण गृहीत धरु की, 21 जणांवर कारवाई केल्या नंतर 41 लोक उरले त्यापैकी एकाला मुंबई पोलीस कायदा 56 खाली अटक केलेली आहे. उरलेल्या 40 लोकांचे काय केले? काही पोलीस लोकांची नांवे दिलेली आहेत. रमाबाई नगर, घाटकोपर, जोगेश्वरी आणि बोरीवलीमध्ये श्रीकृष्णनगरच्या बाजूला पोलीस कॉन्स्टेबलनी........

**उपसभापती** :प्रश्न विचारा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, खरोखरच हे 146 लोक आहेत काय? जर 70 लोक निर्दोष आढळले तर 76 लोकांच्या विरुध्द एम.पी.डी.ए.खाली कारवाई कां केली नाही, आता ज्या लोंकांना पकडले आहे त्यांची स्थानबध्दता कायम आहे की, ते जामिनावर सुटले आहेत?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, मुंबई महापालिकेकडून आणि जिल्हाधिका-याकडून या दोघांकडून 146 लोकांची यादी पोलिसांना प्राप्त झाली होती. एम.पी.डी.ए., एम.आर.पी.पी. या गुन्हयांच्या अंतर्गत झोपडपट्टी दादांच्या बाबतीत कारवाई करीत असतो. त्यांनी दिलेल्या यादीत असे आढळून आले की, काही मजुरांची, हमालांची, गवंडयांची, सुतारांची अशी कलमे लावण्यासाठी नांवे दिली होती. हे लोक मजुरीवर काम करीत होते. यांचा एवढा तीव्र गुन्हा नसल्यामुळे या गुन्हयाअंतर्गत यांच्यावर कारवाई करण्यात आली नव्हती.ज्यांच्यावर पहिला कुठलाही गुन्हा नोंदवलेला नाही अशीही काही नांवे होती, तर काही नांवांमध्ये फक्त नाव होते. उदा. सचिन. त्याचे पूर्ण नांव नव्हते, पत्ता नव्हता. त्यामुळे काही नांवांच्या बाबतीत त्यांना शोधणे सुध्दा अडचणीचे ठरले. त्यामुळे पोलीस त्यांच्यावर कारवाई करु शकले नाहीत. ज्यांच्या बाबतीत पुरावे मिळाले, त्या अकरा जणांच्या बाबतीत पोलिसांनी कठोर कारवाई करण्याची भूमिका घेतलेली आहे. पोलिसांना ही झोपडपट्टी दादांची नावे स्वत: होऊन मिळाली. त्याचबरोबर ही जी यादी दिली होती त्यातील पात्र असतील त्या लोकांवरही कारवाई करण्यात आलेली आहे. आपल्याला सहज वाटते की, खेडयापाडयातून, देशाच्या कानाकोप-यातून माणसे मुंबईत येतात आणि निवा-यासाठी आपले घर बांधतात. पण हे सत्य नाही. त्या गरीब माणसांना सुध्दा घर विकतच घ्यावे लागते. घर भाडयानेच घ्यावे लागते. झोपडपट्टी दादा वाढलेले आहेत. म्हणूनच अनेक अवैधदंधेसुध्दा वाढत आहेत. यांना सहकार्य करणारे महापालिकेत आहेत. शासनाच्या विविध यंत्रणांमध्ये आहेत. संगनमताने या गोष्टी होत आहेत. म्हणून झोपडपट्टी दादांच्या विरोधात एक व्यापक मोहीम घेण्यात येईल. केवळ महापालिकेलाच वरवर दिसलेलेच नव्हे तर याचा खोलात जाऊन तपास करण्यात येईल. आणि या झोपडपट्टी दादांना शासनात बसून मग पोलीस दलात असतील, जिल्हाधिकारी कार्यालयात असतील आणि नगरपालिकेत असतील, रेशनिंगचे कार्ड देणारे असतील, अप्रत्यक्षणाने प्रोत्साहन देणा-या ज्या म्हणून यंत्रणा आहेत, त्यांच्यावर या कायद्याअंतर्गत कारवाई करण्याची एक मोहीम घेण्यात येईल. झ ोपडपट्टीचा प्रश्न हा गरीब माणसांचा प्रश्न आहे. पण त्या गरिबांना जे लूटत आहेत. धाकधपटश: दाखवून ख-या अर्थाने जे गुन्हेगारी स्वरुपाचे कृत्य करीत आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याच्या बाबतीत, झोपडपट्टी दादांच्या बाबतीत शासन गंभीरपणे कारवाई करील.

यानंतर श्री. बरवड ....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, झोपडपट्ट्यांविषयी, तेथील झोपडया, झोपडपट्टी दादा याबाबत नेहमी चर्चा होते पण मुंबईमध्ये आणि मुंबई उपनगरांमध्ये होत असलेली अनधिकृत इमारतींची बांधकामे याकडे मात्र सोयीस्कररीत्या दुर्लक्ष होत असल्याचे जाणवते. मुंबईमध्ये आता 40 टक्के अनधिकृत इमारती बांद्रा ते दहिसर आणि कुर्ला ते मुलुंड भागामध्ये आणि ठाण्यामध्ये सुध्दा उभ्या आहेत. त्या अनधिकृत इमारती उभ्या राहात असताना संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना त्याची माहिती नसते काय ? माहिती असेल तर 9-9 मजल्यांच्या अनधिकृत इमारती उभ्या राहतात त्याविरुध्द पोलीस कारवाई करणार आहेत काय ? अशा इमारती उभ्या राहात असताना पोलीस त्यामध्ये हस्तक्षेप करणार आहेत काय ?

श्री. आर. आर. पाटील : जगातील प्रत्येक गोष्ट पोलिसांना माहिती असते आणि ती पोलिसांनीच बघितली पाहिजे या निष्कर्षावर येणे योग्य ठरणार नाही. यासाठी विविध यंत्रणा आहेत. महापालिकेची जागा असेल तर त्या जागेचे संरक्षण महापालिकेने केले पाहिजे. महसूल विभागाची जागा असेल तर त्या जागेचे संरक्षण महसूल विभागाने केले पाहिजे. ज्यांच्या जागा आहेत, ज्या विभागाच्या जागा आहेत त्यांनी त्या जागांचे संरक्षण करणे आणि बांधकामाच्या बाबतीत महापालिकेने नियंत्रण ठेवणे आणि हे नियंत्रण ठेवत असताना त्या ठिकाणी कोणी गुन्हेगारी जगत उतरत असेल, शासकीय यंत्रणांना न जुमानता बांधकामे केली जात असतील आणि अशा ठिकाणी पोलिसांचे संरक्षण मागितले तर संरक्षणाला जाणे आणि गुन्हेगारी कृत्य रोखणे हे पोलिसांचे काम ठरते. महापालिकेने आणि शासनाच्या विविध यंत्रणांनी संरक्षण मागितल्यानंतर पोलिसांचा रोल निर्माण होतो, जबाबदारी निर्माण होते. अशा ठिकाणी पोलीस जातात व यापुढेही ते जातील. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित करताना सांगितले की, 40 टक्के अनधिकृत बांधकामे आहेत. हा आकडा किती आहे हे मला माहीत नाही पण फार मोठया प्रमाणावर अनधिकृत बांधकामे आहेत. थोडयाशा निर्दयपणाने गरिबांच्या झोपडया मुंबईत पाडलेल्या आहेत. नियमांचे पालन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण कोणी धनदांडगे कायदे पायदळी तुडवून मोठी बांधकामे करीत असतील तर तीन महिन्यांच्या आत महापालिकेकडून अशी माहिती घेतली जाईल आणि या अनधिकृत बांधकामाच्या विरोधात मोठी कारवाई केली जाईल. ती बांधकामे कोणाची आहेत याचा बिलकुल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. आर. आर. पाटील ...

मुलाहिजा ठेवला जाणार नाही. त्यासाठी आवश्यक असणारे सर्व पोलीस दल दिले जाईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वेगवेगळया राज्यातून आणि विशेषत: उत्तरप्रदेश आणि बिहार या राज्यातून येणाऱ्या लोकांची सरळसरळ साखळी आहे. मुंबईतील वस्त्यांमध्ये सुध्दा पाहिले तर देशाच्या वेगवेगळया भागातून येणारे लोक ठराविक वस्त्यांमध्येच येऊन वसतात असे चित्र आपल्याला दिसते. आज शिवाजीनगर गोवंडी भागात गेलो तर त्या ठिकाणी ढाक्याचे प्रतिरुप झ ाालेले दिसून येईल. ही जी माणसे पकडली त्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत त्याचबरोबर इतर राज्यांमध्ये त्यांची संपूर्ण ट्रॅक आहे त्या मार्गावरुन त्यांचे दळणवळण चाललेले असते. याबाबतीत आपण राष्ट्रीय स्तरावर देखील केंद्राची मदत घेणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, जो ट्रॅक आहे त्याची सुध्दा पोलीस दलाकडून माहिती घेण्यात येईल. या गोष्टीची चौकशी करण्यात येईल. त्याचबरोबर त्यांना मदत करणाऱ्या यंत्रणांच्या बाबतीत मी बोललो. आज एमपीडीएमध्ये काही लोक सापडलेली आहेत. एमआरटीपी अंतर्गत काही लोकांवर कारवाई सुरु आहे. आता जे लोक ताब्यात आलेले आहेत त्यांच्या माध्यमातून त्यांना कोण कोण सहकार्य करीत होते, मग नगरपालिकेमध्ये बसलेले, पोलीस दलामध्ये बसलेले, जिल्हाधिकारी कार्यालयात बसलेले झारीतील शुक्राचार्य कोण आहेत हे सगळे शोधले जाईल आणि त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले की, झ ाोपडपट्टी दादांविरुध्द कठोर कारवाई करु परंतु त्यासाठी एक वेगळा सेल किंवा वेगळी यंत्रणा उभी केली आहे काय किंवा निश्चित कालावधी आपण ठरविला आहे काय ? ज्या अनधिकृत झोपडया आहेत किंवा झोपडपट्टी दादांनी बसविलेल्या झोपडया आहेत त्यासंदर्भात आताच सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे शिवाजीनगर येथे बांगलादेशीय लोकांच्या झोपडया आहेत. त्या लोकांना रेशन कार्ड मिळते. ज्या ठिकाणी रेशन कार्ड देण्याची व्यवस्था आहे त्या ठिकाणी सुध्दा चौकशी करणे गरजेचे आहे. या लोकांना रेशन कार्ड सहजासहजी मिळते परंतु मध्यमवर्गीय लोकांना सहजासहजी रेशन कार्ड मिळत नाही. याबाबतीत आपण काही कारवाई करणार काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, बोगस रेशन कार्ड पुरविणारी पुरवठा खात्यातील एक टोळी पकडण्यामध्ये पोलिसांना यश आले आहे. 11 अधिकाऱ्यांना त्यासंदर्भात अटक करण्यात आली होती. त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बोगस रेशन कार्ड देऊन झोपडया किंवा बांधकामे अधिकृत करण्याचे जे प्रयत्न करीत आहेत आणि अशांना जे शासनात बसून पाठिंबा देत आहेत त्यांच्यावरही कारवाई करण्याची भूमिका शासनाने स्वीकारलेली आहे आणि काही लोकांवर कारवाई सुध्दा झालेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मला आपल्या माध्यमातून मा.उपमुख्यमंत्री, गृहमंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, युतीच्या काळामध्ये बांगलादेशीय नागरिकांच्या झोपडपट्टयांवर किती कारवाया करण्यात आल्या ? दुसरा प्रश्न असा आहे की, पोलिसांना 146 संशयीत व्यक्तींची यादी प्राप्त झालेली आहे. त्यापैकी 70 व्यक्तींवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नाही. उर्वरित 76 व्यक्तींवर आरोप आढळले आहेत. त्यापैकी 14 जणांवर एमआरटीपी अंतर्गत कारवाई करण्यात आली, 21 व्यक्तींवर सीआरपीसीच्या कलम 151 नुसार कारवाई करण्यात आली, मुंबई पोलीस कायदा 56 अन्वये एका व्यक्तीवर कारवाई करण्यात आली आहे, 14 व्यक्तींना एमपीडीए कायद्यानुसार स्थानबध्द करण्यात आले आणि दोन व्यक्तींवर तशाप्रकारची कारवाई प्रस्तावित आहे. या 76 आरोपींपैकी 52 लोकांविरुध्द कारवाई झालेली आहे, पण उर्वरित 24 लोकांविरुध्द कारवाई केली जाणार आहे काय ? त्याचप्रमाणे गरीब, गरजू लोक झोपडया बांधतात त्यांच्यावर निर्दयपणे कारवाई करु नये ही आमची विनंती शासनाने मान्य केली, परंतु ज्यांनी व्यवसायाकरिता अतिक्रमकण केले आहे, अशाप्रकारे कुर्ल्यामध्ये मोठमोठे गॅरेजेस आहेत, मोठया व्यवसायाकरिता, उद्योगधंद्याकरिता ज्यांनी अतिक्रमण केले आहे त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वी दोन्ही प्रश्नांची उत्तरे दिलेली आहेत. फक्त एका प्रश्नाचे उत्तर माझ्याजवळ नाही. युतीच्या काळामध्ये किती बांगलादेशीय झोपडीधारकांविरुध्द कारवाई केली असा प्रश्न विचारण्यात आला आहे, याबाबतची माहिती पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी पटलावर ठेवीन. काही लोकांना, झोपडपट्टी दादांना मोकळे सोडले गेले असा प्रश्न विचारला आहे परंतु यासंबंधीची माहिती घेतली असता यातील काही लोक गवंडयांच्या हाताखाली कामाला होते, मजुरीने वाळू चाळायला गेले होते, काही हमाली स्वरुपाचे काम करीत होते, ते झोपडपट्टीदादा नव्हते. एमआरटीपी एवढा मोठा गुन्हा त्यांनी केल्याचे आढळले नाही म्हणून त्यांच्यावर कारवाई केलेली नाही, गरीब माणसांच्या झोपडयांच्या संदर्भात विचारले त्यासंबंधीचा समन्वय समितीमध्ये निर्णय घेतला जाणार आहे त्या समितीमध्ये मा.सदस्य श्री.कवाडेसर आपली मते मांडू शकतील. व्यवसायासाठी जेथे अतिक्रमणे झालेली आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, गरीब माणसांच्या प्रश्नात सहानुभूतिचे धोरण राहील आणि व्हाईट कॉलर असलेले गुन्हेगार मोडून काढले जातील.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, माहीमच्या दिशेला सेनापती बापट मार्गावर सरस्वती विद्यामंदिरजवळ दिवसाढवळया वेश्याव्यवसाय चालू आहे आणि ते दृश्य शाळेतील मुलांना पहावे लागते. मला एक जागरुक महिला सतत 3 दिवस फोन करुन सांगत आहे की, याप्रकरणी मी महापालिकेला लिहिले तर ते पोलिसांकडे जा असे सांगतात आणि पोलिसांना सांगितले तर हे काम महापालिकेचे आहे आम्ही काही करणार नाही असे पोलीस म्हणतात. शासन त्या झोपडया तातडीने उठविण्याचे काम आपण करणार काय ? तिने खूप प्रयत्न केला परंतु यश आले नाही. ती मला रोज फोन करुन विचारते की, सध्या अधिवेशन सुरु असल्यामुळे हा प्रश्न विचारला का ? माझी ती मैत्रिण आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सरस्वती विद्यामंदिर या शाळेजवळ अशा गोष्टी घडत असतील त्या अतिशय चुकीच्या आहेत. परंतु झोपडया उठविण्याचा प्रयत्न केला तर शासनाला निर्दय मानले जाईल, वेश्याव्यवसाय बंद केला तर त्यांच्या पोटाचे प्रश्न महानुभावीपणाने उपस्थित केले जातील पण असे प्रश्न कोणी उपस्थित करणार असले तरीही झोपडयांचे रेकॉर्ड महापालिकेकडे आहे आणि तेथे कोणाकडून वेश्याव्यवसाय केला जात असेल तर त्यासंबंधी पूर्णपणे पोलिसांची जबाबदारी आहे, आजच्या आज सूचना दिल्या जातील आणि कारवाई केली जाईल.

------

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 15:30

**पृ. शी.** : पुणे शहरातील भवानी पेठेत कासेवाडीत लागलेली भीषण आग

**मु. शी** : पुणे शहरातील भवानी पेठेत कासेवाडीत लागलेली भीषण आग यासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ.. नीलम गो-हे, सर्वश्री.शांताराम करमळकर, विनोद तावडे, डॉ. अशोक मोडक, सर्वश्री प्रतापराव सोनवणे, वसंतराव काळे, रणजितसिंह मोहिते-पाटील, विलासराव शिंदे, जितेंद्र आव्हाड आणि प्रा. फौजिया खान वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

" दिनांक 3 मार्च 2005 रोजी वा त्या सुमारास पुणे शहराच्या भरवस्तीतील भवानी पेठेत कासेवाडीत लागलेल्या भीषण आगीत सुमारे 500 झोपड्या जळून खाक होणे, सदर आगीत झोपडपट्टीवासीयांचे चिजवस्तू, भांडी आदी जळून खाक होणे, काही जण आगीने गंभीर जखमी होणे, सदर भीषण आगीत किती वित्त व जीवित हानी झाली याचा अद्याप अंदाज न लागणे, आग कशी व का लागली याच्या कारणांचा अद्याप शोध न लागणे, सदर झोपडपट्टीतील पाचशे कुटुंबे रस्त्यावर पडली असणे, सदर आग घातपातामुळे वा अन्य कारणांमुळे लागली याचा शोध घेण्यास पोलिसांनी दाखविलेली अक्षम्य दिरंगाई, जळीत झोपडपट्टीतील लोकांना शासनाच्या आपतकालीन मदतीतून मदत देण्याबाबत शासनाने दाखविलेली अक्षम्य दिरंगाई व उदासिनता, परिणामी येथील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

..2..

12-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) WW-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : 3 मार्च 2005 रोजी पुणे शहराच्या भरवस्तीतील भवानी पेठेत कासेवाडीत लागलेल्या आगीत 500 झोपड्या जळून खाक झालेल्या आहेत. त्याच प्रमाणे 26 मार्च 2005 रोजी रात्री पावणेतीन वाजता वाकणकरवाडा, तुळशीबाग येथील श्री. पेंडसे यांचा वाडा जळून त्यामध्ये 7 लाख रु.चे नुकसान झाले. दिनांक 2 एपिल 2005 रोजी बुधवार पेठेतील चोळखण अळी येथे गोदामाला आग लागली असून श्री. लालजी ठक्कर या मालकाने ती जागा रिकामी करुन घेण्यासाठी सदर आग आवली असा आरोप तेथील भाडेकरुंनी केलेला आहे. ही आग विझ ाविण्यासाठी 19 बंब वापरावे लागते. 2 एप्रिल 2005 रोजी बुधवार पेठेमध्ये सिलेंडरची गळती होऊन झालेल्या अपघातामध्ये 3 कामगार जखमी झाले. तसेच ऊरळीदेवाची येथील मंतरवाडी, ता. हवेली. जिल्हा पुणे येथील रुची सोया, सेंच्युरी लॅमिलेशन, टेक्समो आणि सेंच्युरी फायबर प्लेस या चार कंपन्यांना आगी आलगून त्यामध्ये 97 लाख रुपयाचे नुकसान झाले. आग विझविण्यासाठी जे पाणी मारले गेले त्यामध्ये सामान भिजून 34 लाख रुपयाचे नुकसान झाले. अशा प्रकारच्या आगी लागून हजारो माणसे बेघर झाली असून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. या आगी शॉर्टसर्किटमुळे आणि सिलेंडरच्या स्फोटामुळे लागलेल्या आहेत अशीच कारणे सांगितली जातात. तेथील झोपडपट्टीवासीयांनी असे आरोप केलेले आहेत की, त्या ठिकाणच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी गटारांची साफसफाई करण्यास सांगितलेले असताना ती गटारे साफ न केल्यामुळे गटारातील विषारी वायूमुळे या घटना घडलेल्या आहेत. माझा आणखी एक प्रश्न असा आहे की, 3 मार्च रोजी जी आग लागली त्या आगीमध्ये बेघर झालेल्या लोकांना 1 महिन्यापासून शाळेत ठेवलेले आहे. या लोकांची कायमस्वरुपी पुनर्वसनाची कोणती व्यवस्था शासनाने केलेली ? या आगीची कारणे शॉर्ट सर्किट आणि सिलेंडरचे स्फोट अशी दिलेली आहेत. म्हणून या प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : मा. सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी पुणे शहरामध्ये लागलेल्या अनेक आगींचा उल्लेख केलेला आहे. 3 मार्च 2005 रोजी जी आग लागली त्यासंबंधी लक्षवेधी सूचना देण्यात आलेली आहे. अन्य ठिकाणी लागलेल्या आगींचा लक्षवेधी सूचनेमध्ये उल्लेख करण्यात आलेला नसल्यामुळे त्या आगींच्या संदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. तरी देखील मा.सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे त्या आगींच्या संदर्भात देखील चौकशी केली जाईल. 3 मार्चला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. राजेंद्र शिंगणे...)

लागलेली आग ही शॉर्टसर्किटमुळे लागलेली आहे असा पोलिसांनी प्राथमिक अंदाज काढलेला आहे. अन्य कोणतेही कारण पोलीस तपासामध्ये आजपर्यन्त निष्पन्न झालेले नाही. इतर कारणांचा देखील तपास चालू आहे. इतर जी काही कारणे असतील तर त्यांचाही निश्चितपणे तपास करून योग्य ती कारवाई केली जाईल. माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, जी कुटुंबे महानगरपालिकेच्या शाळेमध्ये आहेत त्या कुटुंबाचे कायम स्वरुपी पुनर्वन करण्याच्यादृष्टीने 3 तारखेला आग लागल्यानंतर मा.मुख्यमंत्र्यांनी 7 तारखेला नगरविकास खात्याचें सचिव, मदत व पुनर्वसन खात्याचे सचिव, जिल्हाधिकारी, महानगरपालिकेचे आयुक्त यांची मिटींग घेऊन या लोकांचे पुनर्वसन झाले पाहिजे अशा सूचना दिल्या. यासाठी पुणे शहरामध्ये एसआरएस स्कीम सुरु झालेली असून त्याअंतर्गत त्या लोकांचे आहे त्याच ठिकाणी पुनर्वसन करण्यात येईल.

---

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकृषिक धाराच्या संदर्भात कुठलेही निकष नसल्याने निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती

**मु. शी** : अकृषिक धाराच्या संदर्भात कुठलेही निकष नसल्याने निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती यासंबंधी सन्माननीय सदस्य श्रीमती फौजिया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, सुधाकर गणगणे, श्रीमती सुधा जोशी व श्री. गुरुनाथ कुलकर्णी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती फौजिया खान (नामनियुक्त): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"अकृषिक धाराच्या संदर्भात कुठलेही ठराविक निकष नसल्याने निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती, जमिनीच्या मूल्यांकनाबाबत होत असलेला भेदभाव, औरंगाबादच्या तुलनेत परभणी, बीड, उस्मानाबाद, लातूर आदी ठिकाणचे जमिनीचे भाव कमी असूनही येथील नागरिकांना औरंगाबादपेक्षा जास्त आकारण्यात येत असलेली अकृषिक धारा, अकृषिक धारा भरण्याविषयी कुठल्याही सूचना न देता 1 ते 40 पट लावण्यात येत असलेला दंड, दंड कोणत्या ठिकाणी किती लावावयाचा याचे काहीही निकष नसणे, स्वेच्छा अधिकाराचा जिल्हा प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर होत असलेला दुरुपयोग, अकृषिक धाराच्या संदर्भात निकष, दंड नि पूर्वसूचनेबाबत स्वयंस्पष्ट नियम बनविण्याची गरज, सध्या असे नियम नसल्याने मोठ्या प्रमाणावर होत असलेला भेदभाव, केवळ लक्ष्यपूर्ती हा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन प्रशासनाकडून होत असलेली जाचक वसुली, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल व पुनर्वसनराज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस :येथे सोबतचे निवेदन छापावे)

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, इस लक्षवेधी सूचना के निवेदन में क्रमांक 4 के अन्तर्गत लिखा है कि, अनधिकृत अकृषिक वापरापोटी अशा वापराखालील क्षेत्रावरील अकृषिक आकारणी व अशा आकारणीच्या 40 पटी पर्यन्त दंडात्मक आकारणी करण्याची तरतूद नियमात आहे. सभापति महोदय, 40 टाईम्स तक दंड वसूल करने संबंधी कानून में तरतूद है. इसका मतलब यह है कि एक से लेकर 40 टाईम्स तक दंड वसूल किया जा सकता है. लेकिन यह ठहराने का अधिकार जिला अधिकारी को दिया गया है. यह बहुत लॉंग रोप है और वन टाईम दंड कहीं भी नहीं लिया जा रहा है. 40 टाईम्स के नजदीक ही दंड वसूल किया जाता है. इसलिए मैं यह जानना चाहती हूं कि इस नियम के अन्तर्गत कौनसा क्रायटेरिया लगाया जाता है ? और क्या इस कानून में फिर से दुरुस्ती की जाएगी ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि, मैं परभणी के बारे में बताना चाहती हूं, जो एन.ए. रेट लगाए गए हैं, वे यूनिलॅटरली और आर्बिट्ररी लगाए गए हैं. नियम ऐसा है कि, रेट निश्चित करते समय वह जमीन नागरी भाग में है अथवा ग्रामीण भाग में है, जमीन का उस क्षेत्र् में निश्चित स्थान, जमीन का प्रस्तावित अकृषिक उपयोग और जमीन का बाजार मूल्य इत्यादि बातें विचार में लेकर दर निश्चित किए जाते हैं. लेकिन उस वक्त की जिलाधिकारी श्रीमती रस्तोगी ने 6 रुपये जो दर लगाया है, जो कमर्शियल का हाईएस्ट रेट है, वह ऐसे ही लगा दिया. औरंगाबाद में कमर्शियल रेट तीन रुपये है और परभणी और लातुर में ढाई रुपये रेट है. इन दोनों जगहों के रेट में अंतर है. इसलिए मेरा यह प्रश्न है कि क्या परभणी शहर के संबंध में रेट और पेनाल्टी का मूल्यांकन किया जाएगा ? मेरा तीसरा प्रश्न यह है कि, उत्तर में लिखा है कि अकृषिक वापरासाठी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. जहां गावठाण एरिया के बाहर कॉलोनी है, वहां एनए टैक्स भरने के बाद ही घर बनाया जा सकता है. फिर भी पेनाल्टी ली जाती है. इसलिए मेरा यह प्रश्न है कि क्या परभणी के गावठाण एरिया का विस्तार किया जाएगा ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक प्रश्न या ठिकाणी विचारले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने एन.ए.चा रेट यासंबंधीचा प्रश्न विचारला गेलेला आहे. यासंदर्भात सांगू इच्छितो की, ज्या विभागात जमिनीचा जो बाजारभाव असेल, त्यामध्ये रेडी रेकनर, खरेदी विक्रीचे व्यवहार इत्यादि सगळया बाबींचा विचार करुन त्या भावाच्या तीन टक्के दराने अकृषिक कर आपण लावत असतो. उदाहरणार्थ त्या ठिकाणी बाजारभाव 100 रुपये असेल तरइ

2...

डॉ.राजेद्र शिंगणे..

अकृषिक दर त्या ठिकाणी 3 टक्के दराने म्हणजे 3 रुपये चौरस फूटाने आकारला जातो. औरंगाबाद, परभणी, लातूर,बीड, उस्मानाबाद या चार-पाच जिल्हयाचा उल्लेख सूचनेमध्ये करण्यात आलेला आहे तसेच सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना देखील या जिल्हयांचा उल्लेख केलेला आहे.खरे म्हटले तर औरंगाबादमध्ये पाहिले तर 72 पैशापासून ते 2 रुपये 46 पैशांपर्यन्त चौरस फूट अकृषिक कर लावला जातो. लातूरमध्ये सगळयात जास्त दर आहे. 4 रुपये 36 पैशांपासून ते 12 रुपयांपर्यन्त प्रति चौरस फूट या प्रमाणे अकृषिक कर आकारला जातो आहे. बीडमध्ये 30 पैशापासून ते 1 रुपया 47 पैसे प्रति चौरस फूट अकृषिक दर आकारला जात आहे. वेगवेगळया शहरांमध्ये अकृषिक दर वेगवेगळे आहेत. सन्माननीय सदस्यांनी दुसरा महत्वाचा प्रश्न विचारला की, हा दंड 40 पैसेच का आकारण्यात येतो. हा अतिशय महत्वाचा प्रश्न त्यांनी या ठिकाणी विचारलेला आहे. जेव्हा जेव्हा दंड लावण्याचे काम पडत असते. 1 ते 40 पट दंड आकारण्यात यावा अशा प्रकारची रेव्हेन्यू कोर्टाची तरतूद आहे. आमचे अधिकारी त्याच तरतुदीची अंमलबजावणी करीत असतात. आमच्या अधिका-यांनी 40 पट दंड लावलेल्याची उदाहरणे आपल्याला दिसतील. आमच्या अधिका-यांनी कुठे 20 पट दंड लावला, 25 पट दंड लावला असे मागील काळात एकही उदाहरण आपल्याला दिसणार नाही. हा दंड सरसकट 40 टक्के लावला ही गोष्ट खरी आहे. या संदर्भात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. अकृषिकच्या बाबतीत कमी दर लावला गेला तर विनाकारण शंका उदभवण्याची शक्यता निर्माण होऊ शकतात, यामध्ये काही गैरव्यवहार झाले असतील अशा देखील शंका उदभवू शकतात, कमी दर लावल्यानंतर लेखा परिक्षक सुध्दा आक्षेप घेतात. 40 पट दंड आकारण्यात येतो तो परवडत नाही ही गोष्ट खरी आहे. या संदर्भात अनेक वेळा चर्चा या सभागृहात झालेली आहे. हा 40 पट लावण्यात आलेला दंड याच्यामध्ये सुधारणा करुन तो सगळयांसाठी सारखा असला पाहिजे. यासंदर्भात 10 टक्के,15 टक्के,20 टक्के दंड लावता येईल काय ही बाब तपासण्याची कार्यवाही आम्ही करीत आहोत. यापुढच्या काळात परवडेल असा दंड लावण्याचा प्रयत्न आम्ही निश्चितपणे प्रयत्न करु.

यानंतर श्री. कानडे...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 15:40

डॉ. राजेंद्र शिंगणे ..

मा.सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी परभणी जिल्हयासंबंधीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. परभणीमध्ये वाढलेले गावठाण आहे. गावठाणे नव्याने बांधली असतील त्यासंदर्भात ज्या सूचना केलेल्या आहेत त्यावर निश्चितपणाने विचार करुन दिलेल्या सूचनांनुसारच कारवाई केली जाईल.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मैंने यह पूछा था कि परभणी में पेनाल्टी और रेट युनिलॅटरली और आर्बिटरी किए गए हैं, इसलिए क्या उनका पुनर्मूल्यांकन किया जाएगा ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मा.सदस्यांनी केलेली सूचना तक्रार आहे असे समजून ती तपासली जाईल आणि त्याप्रमाणे योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम के तहत पहले ग्रामीण क्षेत्र में 2 पैसे टैक्स लगाया जाता था और शहरी क्षेत्र में 14 पैसे टैक्स लगाया जाता था. लेकिन कालान्तर में वह बढ़ाया गया. एक हजार रुपये, दो हजार रुपये भी किया गया. तब इस संबंध में एक समिति बनाई गई थी. उस समय यह कहा गया था कि दुगुना से ज्यादा नहीं लगाया जाएगा. लेकिन समिति की रिपोर्ट आ जाने के बाद भी हर जिले में अलग अलग एन.ए. टैक्स लगाया जाता है. इसलिए शासन को इस संबंध में ऐसा नियम बनाना चाहिए जिसके तहत पूरे महाराष्ट्र में ग्रामीण भागों में एवं शहरी भागों में रेट फिक्स कर दिए जाए. ताकि कोई तफावत न रह सके. जब कोई व्यक्ति अनधिकृत रुप से जमीन का उपयोग करता है तो 40 पट पेनाल्टी लगाई जाती है. अभी हाल ही में इसी संबंध में माननीय सदस्य श्री शरद पाटील जी ने बताया था कि पाँच पट पेनाल्टी लगाई थी. इसलिए मेरा अनुरोध है कि पूरे महाराष्ट्र में पेनाल्टी पाँच पट की जाए और शहरी विभाग में 80 पैसे ओर ग्रामीण विभाग में 20 पैसे टैक्स किया जाए. क्या मंत्री महोदय इस प्रकार का निर्णय लेंगे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. बाजोरिया यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. अर्बन भाग आणि ग्रामीण भाग यामध्ये वेगवेगळे दर लावले आहेत. समितीचा निर्णय अगोदर झालेला आहे. निर्णय काय झाला आहे ते मी तपासून पाहतो. त्याठिकाणी डिस्क्रीशन न राहता निश्चितपणाने ग्रामीण भाग आणि शहरी भाग यामध्ये दोघांनाही परवडेल आणि जे देऊ शकतील त्याच पध्दतीने पुढील काळात रेट आणि टॅक्स लावण्याचा प्रयत्न केला जाईल. 5 टक्के दंड आकारणीबाबत याठिकाणी उल्लेख करण्यात आला. मा.सदस्य श्री. शरद पाटील मागील

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ....

आठवडयामध्ये एका गावाचा प्रश्न घेऊन आले होते. अपिल केल्यानंतर लावलेल्या दंडाची रक्कम कमी करण्यात आली. सर्व जण शासनाकडे येऊ शकत नाहीत आणि अपिल करु शकत नाहीत. 40 पट दंडआकारणी त्रासदायक झालेली आहे. 40 पट दंड आकारणीची तरतूद जमीन महसूल अधिनियम 69 क(8) प्रमाणे आकारली जाते. 40 टक्के रक्कम कमी करण्याचा शासन निश्चित प्रयत्न करील. कमी-जास्त दंड आकारणी केली तरी अनधिकृत बांधकामे फोफावण्याचा धोका आहे म्हणून यावर वचक आणि अंकुश राहिला पाहिजे यासाठी दंडाची रक्कम आकारली जाते. म्हणून दंडाची रक्कम जास्त-कमी न करता यातून मध्य मार्ग काढला जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, प्रमाणदर निश्चित करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिका-यांना आहेत. मला विचारावयाचे आहे की,या अधिकाराचा एखाद्या जिल्हयात गैरवापर झालेला आढळून आला आहे काय ? तसेच निवेदनात म्हटले आहे की औरंगाबाद जिल्हयाच्या तुलनेने परभणी,बीड,उस्मानाबाद या जिल्हयात अकृषीक दरात तफावत नाही. या निष्कर्षाप्रत येण्यासाठी शासनाने सविस्तर माहिती घेतली आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी..

आणि घेतली असल्यास ती केव्हा घेतलेली आहे ? त्याचबरोबर एक ते चाळीस पट दंडात्मक कारवाई करीत असतांना कोणत्या निकषावर एक पट दंड लावावयाचा आणि कोणत्या निकषावर 40 पट दंड लावावयाचा हे ठरविलेले आहे काय ? माननीय मंत्रिमहोदयांनी मघाशी असे सांगितलेले आहे की, सरसकट 40 पट दंड आकारला जात आहे. मला असे सांगावयाचे आहे
की, हे बिलकूल बरोबर नाही.तेव्हा सरसकट दंड लावणे हे अयोग्य असून दंड लावण्याच्या बाबतीत कोणते निकष लावण्यात आलेले आहेत ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा

डॉ.राजेन्द्र शिंगणे :सभापती महोदय, आपण 40 टक्के दंड आकारत आहोत आणि हा दंड आकारत असतांना जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिकाराचा कोठेही गैरवापर केलेला आहे असे निदर्शनास आलेले नाही. एक ते चाळीस पट दंड आकारण्याची तरतूद कायद्यात केलेली आहे.तेव्हा एक पटपेक्षा कोणी कमी दंड आकारला नाही आणि चाळीस पटीपेक्षासुध्दा कोणी जास्त दंड आकारला नाही.औरंगाबाद,परभणी,बीड,जालना,उस्मानाबाद या जिल्हयाचे जे प्रमाणित दर आहेत त्याबाबतीत मी प्रश्नाच्या सुरुवातीलाच उल्लेख केलेला आहे आणि त्यासंबंधीची आकडेवारीसुध्दा मी त्याचवेळी दिली होती.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : झुणका -भाकर केन्द्रावर झुणका- भाकर न मिळणे

मु.शी : झुणका- भाकर केन्द्रावर झुणका- भाकर न मिळण्यासंबंधी सर्वश्री संजय दत्त,रमेश निकोसे,प्रा.जोगेन्द्र कवाडे,सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी,जयंत पाटील,धनाजी साठे,जितेन्द्र आव्हाड यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.संजय दत्त (विधान सभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो :

" राज्यात अनेक जिल्हयात सध्या सुरु असलेल्या झुणका-भाकर केन्द्रांवर नागरिकांसाठी मिळत असलेली झुणका -भाकर न मिळणे, सदर ठिकाणी दुस-या महागडया वस्तू विकल्या जाणे,हया योजना राज्यातील नागरिकांच्या दृष्टीने महागडया असणे, तसेच येथील केन्द्र चालकांनी सदर केन्द्रावर जागा हडप करण्याची आखलेली योजना व हया योजनांमुळे राज्यातील आघाडी सरकारने सदरची योजना बंद करणे परंतु राज्यात अशा 600 च्या वर झुणका -भाकर केन्द्रांनी सदरची जागा घेऊन झुणका -भाकर केन्द्रावर महागडया वस्तू विकणे,त्यामुळे राज्यातील अल्प व मध्यम गरीब कुटूंबियांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे व घबराटीचे वातावरण यावर तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका "

श्री.सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदना नंतर -

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यातील मराठी माणसाला व बेरोजगार तरुणांच्या हाताला  काम मिळावे व राज्यातील गोर गरीब जनतेला कमीत कमी दोन घास अन्न मिळावे या उद्देशाने त्या काळच्या सरकारने प्रचंड आर्थिक बोजा उचलून ही झुणका भाकर योजना अंमलात आणली परंतु राज्य सरकारने ज्या उद्देशाने ही योजना राबविण्याचा प्रयत्न केले होते तो उद्देश काही साध्य झाला नाही. याबाबतीत मला माननीय मंत्रिमहोदयांना दोन प्रश्न विचारावयाचे आहेत.माझा पहिला प्रश्न असा आहे की ,योजना बंद करुन दिनांक 24.2.2005 रोजी केन्द्र ताब्यात घेण्याच्या बाबतीत दिलेल्या आदेशा प्रमाणे आजपर्यन्त किती केन्द्रे ताब्यात घेण्यात आलेली आहेत? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्रात एकूण किती झुणकाभाकर केन्द्रे आहेत ? त्यासाठी शासनाची  किती जागा देण्यात आली होती ?याची जिल्हावार माहिती द्यावी.

श्री.सुनील तटकरे :ज्यावेळी ही झुणका भाकर केन्द्रांची योजना सुरु करण्यात आली होती त्यावेळी राज्य सरकारने 6 हजार 211 केन्द्रे  सुरु केली होती. त्यापैकी शासकीय जागेवर 4 हजार 370 केन्द्रे होती, खाजगी जागेवर 1 हजार 541 केन्द्रे होती.म्हाडा आणि एस.टी.महामंडळाच्या जागेवर 300 केन्द्रे होती.अशा प्रकारे एकूण 6 हजार 211 झुणकाभाकर केन्द्रे त्यावेळी मंजूर करण्यात आली होती. तपासणीमुळे आणि अनुदानामुळे बंद  पडलेल्या केन्द्राची संख्या 3 हजार 662 इतकी होती.सध्या कार्यरत असलेल्या झुणका भाकर केन्द्राची संख्या 2 हजार 549 आहे.विभागनिहाय सांगावयाचे झाले तर कोकणामध्ये 625, नाशिक विभागात 310,पुणे विभागात 585,औरंगाबाद विभागात 252,अमरावती विभागात 408 नागपूर विभागात291 एस.टी.महामंडळाच्या विविध बस स्थानकावर 68 केन्द्रे आहेत. मुंबई शहरामध्ये 127 आणि उपनगरात 113 अशी 240 केन्द्रे तेथे सुरु आहेत.झुणका भाकर केन्द्राच्या चालकांनी  सुप्रीम कोर्टात अर्ज दाखल केलेले आहेत व त्यांना सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिलेली आहे.त्यामुळे त्या जागा  ताब्यात घेण्याचा प्रश्न नाही. त्या व्यतिरिक्त असलेल्या केन्द्राच्या संदर्भात जिल्हाधिका-यांना सूचना देऊन त्या जागा  ताब्यात घेण्याच्या बाबतीत कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत.

श्री.संजय दत्त :सर्वोच्च न्यायालयामध्ये जे गेलेले आहेत त्यांच्या पुरतीच ही बाब मर्यादित राहणार आहे असे निवेदनात सांगण्यात आलेले आहे. परंतु जे सर्वोच्च न्यायालयात गेलेले नाहीत त्यांच्या बाबतीत काय निर्णय घेण्यात येणार आहे?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे :सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे ज्यांची केन्द्रे ताब्यात घेण्यात येणार नव्हती त्यांच्या व्यतिरिक्त अन्य जागा ताब्यात घेण्याच्या बाबतीत जिल्हाधिका-यांना सूचना दिलेल्या आहेत.या जागा जिल्हाधिका-यांनी तातडीने ताब्यात घ्याव्यात आणि त्यानंतर या जागा नगरपालिकेच्या असतील किंवा शासनाच्या मालकीच्या असतील तर त्यांनी यासंबंधीचे पुढचे धोरण ठरवावे असे आदेश देण्यात आलेले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी असा प्रश्न विचारला आहे की, या संबंधी 24.2.2005 रोजी आदेश काढलेला आहे तर त्यानुसार आजपर्यंत किती झुणकाभाकर केंद्रे शासनाने ताब्यात घेतली आहेत ? या माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री. सुनील तटकरे : अध्यक्ष महाराज, याची प्रक्रिया चालू आहे आणि अजून एकही ताब्यात आलेले नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : अध्यक्ष महाराज, युती शासनाच्या वेळेस ही योजना सुरू झाली. त्यावेळेस जी सबसिडी या योजनेत दिली जात होती ती शासन चालू ठेवणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : अध्यक्ष महाराज, या योजनेत सबसिडी वा अनुदान न देण्याचा निर्णय युती शासनाच्याच काळात 1990 साली घेण्यात आलेला आहे आणि आताही त्यानुसार कोठलेही अनुदान यामध्ये दिले जात नाही आणि देण्यात येणार नाही.

श्री. गुरूनाथ कुळकर्णी : अध्यक्ष महाराज, युती सरकारने अत्यंत चांगल्या प्रकारचा असा हा कार्यक्रम आणलेला होता की ज्यामुळे गरीबाला आणि बेकाराला काही तरी काम मिळू शकेल आणि पोट देखील भरू शकेल. पण त्यांच्याच सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे विधानसभेतील विरोधी पक्षनेते श्री.नारायण राणे यांनी ही योजना बंद करून टाकली. तेव्हा माझा या संदर्भात प्रश्न असा आहे की, या ठिकाणी जे झुणका-भाकर केंद्राचे चालक वा मालक सुप्रीम कोर्टामध्ये गेले आहेत ते कोठल्याही प्रकारे संघटना करून वा रजिस्टर्ड संस्थेतर्फे गेलेले नाहीत. तसे संघटना करून जर ते गेले असते तर मी समजू शकतो की, त्यातून जो काही कोर्टाचा निर्णय होईल तो सर्वांना लागू होऊ शकतो. पण जे कोणी पिटीशनर्स आज सुप्रीम कोर्टामध्ये गेलेले आहेत ते वैयक्तिकरित्या गेलेले आहेत. आज ही योजना चालू नाही आणि यातील अनुदान देखील बंद झ ाालेले आहे. तेवहा ही झुणका-भाकर केंद्रे बंद करण्यासाठी.. कारण शासकीय जमीन ताब्यात घेण्यासाठी आपण काय प्रयत्न केला आहे ?

श्री. सुनील तटकरे : अध्यक्ष महाराज, सुरूवातीस उच्च न्यायालयामध्ये जेव्हा हे प्रकरण गेले होते तेव्हा उच्च न्यायालयाने त्याबाबत जैसे थे चा आदेश दिला होता त्यानंतर मग त्याबाबत निर्णय झाला आणि त्यातील काही लोक सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले. सुप्रीम कोर्टाने तेवढ्या लोकां पुरतीच स्थगिती दिली आहे आणि उरलेल्यांच्या बाबतीत मात्र राज्य सरकारने ती केंद्रे बंद करण्याचा जो निर्णय घेतला त्यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केलेले आहे. त्यामुळे आपण सर्वच

...... 3ए 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तटकरे ...

जिल्हाधिकाऱ्यांना त्या त्या ठिकाणची झुणका-भाकर केंद्रे बंद करून ताब्यात घेण्याच्या सूचना दिल्या आहेत आणि त्याची कारवाई सुरू आहे मात्र ज्यांना सुप्रीम कोर्टामध्ये स्टे मिळाला आहे त्यांच्या व्यतिरिक्त इतरांच्या बाबतीतच ही कारवाई सुरू आहे.

श्री. गुरूनाथ कुळकर्णी : अध्यक्ष महाराज, आज जी काही झुणका भाकर केंद्रे सुरू आहेत तेथे झुणका-भाकर विकलीच जात नाही तर बिअर वगैरे अनधिकृत माल ठेवला जातो, विकला जातो. तेव्हा अशा प्रकारे किती झुणका-भाकर केंद्रांमधून अवैध व्यवहार केले जात आहेत ?

श्री. सुनील तटकरे : अध्यक्ष महाराज, ही योजना बंद केल्यानंतर जी झुणका-भाकर केंद्रे सुरू आहेत त्यांचे बाबतीत आपण तपासणी केलेली नाही. मात्र त्यापूर्वीच या केंद्रांचे अनुदान बंद करण्याचा निर्णय तत्कालीन सरकारने घेतलेला होता त्यामुळे त्यावेळी त्यांना मिळत असलेले अनुदान आणि त्यांचा होणारा एकूण खर्च यांची सांगड घालण्यासाठी त्यांना अन्य पदार्थ देखील तेथे विकण्याची परवानगी दिली होती. परंतु आता कोठल्याही प्रकारे आपण त्या संदर्भात तपासणी करीत नाही वा केलेली नाही. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ज्यांचे बाबतीत स्थगिती दिलेली आहे ती केंद्रे आज सुरू राहणार आहेत त्यांची तपासणी आपल्या अधिकाऱ्यांकडून केली जाईल आणि तेथे अशा प्रकारे अवैधरित्या अन्य पदार्थ ठेवले जात असतील तर त्यांचेवर कारवाई केली जाईल.

**उपसभापती** : या झुणका-भाकर केंद्रांच्या बाबतीत आज असे झाले आहे की, श्री. मनोहर जोशींनी झुणका दिला आणि श्री.नारायण राणेंनी दणका दिला.

प्रा. जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महाराज, सर्वोच्च न्यायालयामध्ये या झुणका-भाकर केंद्राची जी मंडळी गेली आहेत .. त्यापैकी कितींना सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे ? म्हणजे चालू असलेल्या किती झुणका-भाकर केंद्रांपैकी किती केंद्रांच्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे ? ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. जागडे .... 3बी 1 ...

प्रा. जोगेंद्र कवाडे....

हे फक्त त्यांच्याच पुरते मर्यादित असेल तर ही केंद्रे ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही करण्याबाबतचे आदेश दि. 24.2.2005 रोजी दिले आहेत. असे असतानाही अजून झुणका भाकर केंद्रे ताब्यात का घेण्यात आली नाहीत ? तसेच जी झुणका भाकर केंद्रे सरकारच्या, एस.टी. च्या जमिनीवर आहेत, त्या ताब्यात घेऊन इतर गरजू लोकांना ही झुणका भाकर केंद्र देण्यात येणार आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा लाभ 218 केंद्राना मिळाला आहे. त्यापैकी मुंबई शहरात 170, ठाण्यामध्ये 36, पुण्यामध्ये 3 आणि सोलापूर 9 अशी ही केंद्रे आहेत. दि. 24 फेब्रुवारी 2005 रोजी जे आदेश दिले आहेत, ते आदेश आम्ही सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना, विभागीय आयुक्त, सर्व महानगरपालिका आयुक्त, उपाध्यक्ष म्हाडा, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, यांना दिले आहेत. या सर्वांना न्यायालयीन स्थगितीच्या व्यतिरिक्त जी केंद्रे होती, ती ताब्यात घेण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. ही केंद्रे ताब्यात आल्यानंतर त्या बाबतची पुढील कारवाई करण्याबाबतचा अधिकार हा त्या त्या संबंधीत अधिका-यांना देण्यात आला आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ.शी.**: बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना सेवा विषयक कामे नाकारणे.

**मु.शी.**: बेरोजगार सेवा सहकारी संस्थांना सेवा विषयक कामे नाकारणे याबाबत मा. सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील ( सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" राज्यातील बेरोजगारीचे निर्मुलन करण्याच्या उद्देशाने शासनाने क्र. रोस्वरो-2002/प्र.क्र.267/रोस्वरो-1 दि. 17.8.2002 नुसार शासनाचय विविध विभागांना व त्यांच्या अधिनिस्त असलेल्या कार्यालये व आस्थापनात बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थांना सेवा विषयक कामे देण्याबाबतचे आदेश निर्गमित केलेले असले तरी शासनाचे अधिकारी या आदेशांचा आपल्या सोईप्रमाणे अर्थ लावून बेरोजगारांच्या सोसायट्यांना कामे देण्यास टाळाटाळ करीत असून ती कामे त्यांच्या मर्जीतील व्यक्ती वा कंत्राटदारांना देत आहेत. परिणामी सदरहू योजना बंद पडावी व आपल्या मर्जीतील लोकांना व कंत्राटदारांना ही कामे देण्यास रान मोकळे मिळावे या दिशेने त्यांची वाटचाल सुरु झालेली आहे. उदाहरणादाखल नगरपरिषद ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर अंतर्गत निघणा-या कुशव अकुशल मजूर पुरवठ्याच्या कामाकरिता नगरविकास विभागाने बेरोजगारांच्या सेवा सहकारी सोसायटी संबंधित परिपत्रकानुसार नगरपरिषद ब्रम्हपुरीला सदरहू कामाकरिता वेळोवेळी मा. मुख्याधिकारी, मा. उपविभागीय अधिकारी व मा. जिल्हाधिकारी यांना मागणी केली असता खाजगी कंत्राटदारांना ती कामे देण्यात आली. म्हणून माझी अशी विनंती आहे की, शासनाने बेरोजगार सेवा सोसायट्यांना कामे नाकारणा-यांना अधिका-यांविरुध्द कडक कारवाई करावी. "

--

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील भीषण पाणी टंचाई.

**मु.शी.**: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील भीषण पाणी टंचाई याबाबत मा. सदस्य श्री. जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" सिंधुदूर्ग जिल्ह्यासाठी 3 कोटी 28 लाख 54 हजार रुपये खर्चाचा पाणी पुरवठा आराखडा प्रस्तावित केला असून या अंतर्गत 38 गावे 513 वाड्यांचा समावेश आहे. यामध्ये विहीरी खोल करणे, गाळ काढणे, नळ योजनांची दुरुस्ती करणे आदी कामे हाती घेतली जाणार आहेत. तसेच आठ गावे व त्यामधील काही वाड्यांवर टँकरने पाणी पुरवठा करावा लागणार आहे.

जिल्हा प्रशासनाने जो सव्वातीन कोटीचा टंचाई आराखडा तयार केला आहे, तो अद्याप तसाच कागदावर असून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणीस सुरुवात झालेली नाही.

एप्रिल महिन्याचा पहिला आठवडा संपला आहे. पाणी टंचाईची खरी झळ आता सुरु झाली आहे. त्यामुळे या टंचाईच्या कामाला अतिशय महत्व देऊन कामे युध्द पातळीवर सुरु करावीत, अशी माझी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी आहे.

माझ्या या विशेष उल्लेखावर शासनाने त्वरीत कारवाई करावी व केलेल्या कार्यवाहीचा वृत्तांत जरी मला एक महिन्याने नियमानुसार कळविले तरी चालेल. परंतु या बाबत प्रशासनाने टंचाई कार्यक्रम कागदावर न ठेवता त्वरीत अंमलबजावणीत आणावा यासाठी शासनाने लक्ष वेधावे म्हणून मी हा विशेष उल्लेख करीत आहे. "

--



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: श्रीमती सुवर्णा संतोष सगळे हीला बाळंतपणासाठी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील रुग्णालयात दाखल करुन न घेणे.

**मु.शी.**: श्रीमती सुवर्णा संतोष सगळे हीला बाळंतपणासाठी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील रुग्णालयात दाखल करुन न घेणे याबाबत मा. सदस्य श्रीमती नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्रीमती नीलम गो-हे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती नीलम गो-हे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" दि. 9.4.2005 रोजी आरोग्य मंत्री यांच्या बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील राजाप्रिंपीचा गावची सुवर्णा संतोष सगळे यांना बाळंतपणासाठी गेवराईच्या वैद्यकिय अधिका-यांकडे आणले असताना सदर वैद्यकिय अधिका-यांनी तिला दाखल न करुन घेता बीड येथे जाण्याचा दिलेला सल्ला, या घडामोडीत दोन तास वाया गेल्याने ही महिला रणरणत्या उन्हात रस्त्यांतच बाळंत झाल्याचे घटना घडणे, अशा प्रकारे गेवराई येथील वैद्यकिय अधिका-यांने प्रसंगाचे गांभीर्य न ओळखता आपल्या कर्तव्यात केलेली कसूर, अशा प्रकारे एका वैद्यकिय अधिका-याची वागणूक माणूसकीला काळीमा फासणारी असून या प्रकरणी शासनाने तात्काळ निवेदन करावे. "

सभापती महोदय, बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील श्रीमती सुवर्णा संतोष सगळे या महिलेच्या प्रश्नाबाबत मी या ठिकाणी विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे. सभापती महोदय, अतिशय खेदाची ही गोष्ट आहे. दि. 9 एप्रिल हा आरोग्य दिवस आहे. त्या दिवशी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील रुग्णालयात श्रीमती सुवर्णा हीच्या आईवडिलांनी बाळंतपणासाठी आणले असता ड्युटीवर असणारे डॉ. शेख मुज्जमीर यांनी श्रीमती सुवर्णा हीस बीडला हलविण्याचा सल्ला दिला.

( यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आणि बीडला तिला नेण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे सदर महिलेचे रस्त्यावर बाळंतपण झाले. त्या रस्त्यावरील महिला मजुरांनी रस्त्यावर आडोसा करुन त्या महिलेच्या बाळंतपणाची व्यवस्था केली. जागतिक आरोग्य दिनाच्या दिशी एक महिला रस्त्यावर प्रसूत होते. मला वाटते महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने ही अतिशय चिंताजनक गोष्ट आहे. अशा पध्दतीची संवेदनाहीन वर्तणूक करणारे डॉ. शेख मुजमील यांच्यावर ताबडतोब कारवाई करुन संबंधित महिलेच्या बाळंतपणाची पुढील व्यवस्था व बालकाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीकोनातून मदत करावी. अशा पध्दतीचा संवेदनाहीन कारभार आरोग्य दिनाच्या दिवशी ग्रामीण भागात होत असल्यामुळे मा. आरोग्य मंत्र्यांनी या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे अशाप्रकारची या विशेष उल्लेखाव्दारे मी विनंती करते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासनातर्फे प्रकाशित होणाऱ्या प्रकाशनांची शासनाच्या विक्री केंद्राव्दारे जिल्हा व तालुका स्तरावर विक्री करणे.

मु.शी. :शासनातर्फे प्रकाशित होणाऱ्या प्रकाशनांची शासनाच्या विक्री केंद्राव्दारे जिल्हा व तालुका स्तरावर विक्री करणे याबाबत मा.सदस्य श्री.संजय दत्त यां-ी दिलेली विशेष उल्लेजाची सूच-ा.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. संजय दत्त यां-ी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा मांडतो.

"महाराष्ट्र शासनाच्या मुद्रण विभागातर्फे शासनाचे अनेक पुस्तके प्रकाशित होत असतात. त्यात प्रामुख्याने शासनाचे अधिनियम, शासनाची नियतकालिके, शासनातर्फे प्रकाशित झालेला शब्दकोष, राज्यातील असलेल्या थोर व्यक्तींची पुस्तके यांचा प्रामुख्याने समावेश होतो. सभापती महोदय, आज करोडो रुपयांची ही सर्व प्रकाशने मुंबईत पडून आहेत. ती पुस्तके जर जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर शासनाच्या विक्री केंद्राव्दारे विक्रीस ठेवली तर शासनातर्फे वेळोवेळी प्रकाशित होणारी प्रकाशन व अधिनियम गांवातल्या तळागाळातल्या माणसांतही ही महाराष्ट्राची संपत्ती उपलब्ध होऊ शकेल. सभापती महोदय, खेडेगावातील एखाद्यास शासनाचा एखादा G.R. किंवा शासनातर्फे प्रसिध्द झालेले पुस्तक जर हवे असेल तर त्यासाठी त्यांना मुंबईत किंवा नागपूर येथे धाव घ्यावी लागते किंवा कुणाला तरी पाठवावे लागते. त्यावेळेस ते प्रकाशन उपलब्ध नसेल तर त्यांना परत जावे लागते. यासाठी त्यांचा वेळ,काळ व पैसा हे सर्व काही वाया जाते. यासाठी सभापती महोदय, मी याठिकाणी आपणांस सुचवू इच्छितो की, तहसिलदार कार्यालयाच्या प्रांगणात किंवा जिल्हा कलेक्टर कार्यालयाच्या प्रांगणात शासनातर्फे प्रकाशित होणारी प्रकाशने ठेवावीत. त्यासाठी शासनाने स्टॉल उभारण्यास जागा उपलब्ध करुन द्यावी व हे स्टॉल चालविण्याची परवानगी प्रामुख्याने विधवा, अपंग, परित्यक्ता, अंध व्यक्तींना द्यावी. जेणेकरुन त्यांनाही त्याठिकाणी स्थानिक रोजगार मिळेल व तालुका स्तरावर शासनातर्फे नुकताच प्रकाशित झालेला G.R. मिळून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त ....

जनतेचा मोठा व अत्यावश्यक प्रश्न यातून सुटणार असल्या कारणाने तसेच त्यायोगे सामान्य जनतेस माहितीचा अधिकारही मिळणे सुलभ होईल, यासाठी सभापती महोदय, आपण त्वरीत याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात ही नम्र विनंती" अशी या विशेष उल्लेखाव्दारे आपणास विनंती करीत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : भिवंडी महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री.एम.आय. दामोदरन यांच्या बेहिशेबी मालमत्तेबाबत शासनाकडून कारवाई न होणे.

मु.शी. भिवंडी महानगरपालिकेचे शहर अभियंता श्री.एम.आय. दामोदरन यांच्या बेहिशेबी मालमत्तेबाबत शासनाकडून कारवाई न होणे याबाबत मा.सदस्य प्रा. शरद पाटील यां-ी दिलेली विशेष उल्लेजाची सूच-ा.

**उपसभापती** : मा.सदस्य प्रा. शरद पाटील यां-ी एज विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा दिली आहे. त्यां-ी ती मांडावी.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेजासंबंधीची सूच-ा मांडतो.

"ठाणे जिल्हयातील भिवंडी महापालिकेचे शहर अभियंता एम.आय.दामोदरन यांच्या मुलुंड, भिवंडी आणि केरळ राज्यातील निवासस्थानांवर दि. 13 एप्रिल 1999 रोजी आयकर खात्याच्या अधिकाऱ्यांनी धाड घालून मिळालेली बेहिशेबी मालमत्ता, गैरमार्गाने मिळवलेली माया 40 ते 50 कोटीच्या बेहिशेबीपेक्षा जास्त म्हणजे 175 ते 200 कोटी रुपयांची मालमत्ता आयकर खात्याच्या हाती लागणे.परंतु यापैकी 40 ते 50 कोटी रुपयांची मालमत्ता आयकर खात्याने आपल्या कागदपत्रावर रेकॉर्ड केलेली असणे.श्री. दामोदरन यांनी आपल्या हितसंबंधित राजकीय व्यक्तींना हाताशी धरुन हे प्रकरण गेली पाच वर्षे पध्दतशीरपणे आणि योजनाबध्दरित्या केवळ आपल्या पैशाच्या जोरावर दडपले जाणे, भिवंडीतील अनेक नागरिकांनी राज्य सरकार व भ्रष्टाचार आणि लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रारी करुनही त्यावर आजपर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे शासनाविषयी जनतेच्या मनात निर्माण झालेली संशयाची भावना त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी" अशी विशेष उल्लेखाव्दारे मी शासनास विनंती करीत आहे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.40 वाजता पुन्हा भरेल.

( 4.05 ते 4.40 मध्यंतर )

----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

**(सभापतीस्थानी मा.उपसभापती)**

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, विनियोजन विधेयकाला विधानपरिषदेमध्ये संमती मिळविण्यासाठी मला विधेयक माडण्याची परवानगी द्यावी अशी विनंती आहे.

श्री.मधुकर चव्हाण : आमची हरकत नाही.

-

**पृ.शी.** : विनियोजन विधेयक.

**L.A. BILL NO. XLIX OF 2005.**

**(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2006.)**

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री ) : महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक 49, दिनांक 31 मार्च 2006 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी त्या मांडाव्यात.

( खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

12-04-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3E-2

SKK/ MAP/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफरस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

---

**पृ.शी.** : वैद्यकीय परिषद (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO. XIII OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MEDICAL COUNCIL ACT, 1965.)**

श्री.सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 13 **-** महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, 1965, यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 13 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ.शी.** : 2003-04 चा संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान स्पर्धेचा निकाल

**मु.शी** : 2003-04 चा संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान स्पर्धेचा निकाल यासंबंधी माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे निवेदन.

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, माननीय अर्थ मंत्री श्री. जयंत पाटील यांनी काल मच्छिमारांच्या संदर्भात एक निवेदन केले होते ते निवेदन अजूनपर्यंत आमच्या पिजनहोलमध्ये टाकण्यात आलेले नाही.

**उपसभापती** :आज सकाळी ते निवेदन सभागृहात वितरित करण्यात आलेले आहे. त्यावेळी आपण सभागृहात उपस्थित नव्हता. माझे आपल्याकडे लक्ष होते. आपण सभागृहात उपस्थित नव्हता.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 16:15

**पृ.शी.**: राज्यातील अवर्षण प्रवण परिस्थिती.

**मु.शी.**: राज्यातील अवर्षण प्रवण परिस्थिती या विषयावर डॉ. कमलकिशेर कदम, सर्वश्री यशंवतराव गडाख, दिवाकर रावते, घोंडिराम राठोड, सदाशिवराव पोळ, विलासराव शिंदे, जगन्नाथ शेवाळे, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रतापसिंह मोहिते-पाटील, जयंत पाटील, दिलीपराव देशमुख, उल्हास पवार, शरद पाटील, संजय दत्त, नतिकोद्दीन खतिब, गुरुनाथ कुलकर्णी, सुधाकर गणगणे,सर्वश्रीमती मंदा म्हात्रे, सुधा जोशी, प्रा. फौजिया खान, श्री. धनाजी साठे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : आता आपण अल्पकालीन चर्चेला सुरुवात करु या. या अल्पकालीन चर्चेसंबंधी मतदानाकरिता औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही, केवळ चर्चा होईल. या चर्चेसाठी वेळ ठरवून दिलेला आहे. सूचना देणारे माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

डॉ. कमलकिशेर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.;

"महाराष्ट्र एक कृषिप्रधान राज्य असून बहुतांश जनतेची उपजिविका ही शेतीवर अवलंबून आहे. तथापि, अपुरा पाऊस व प्रत्येक वर्षी, कोणत्या ना कोणत्या विभागात उद्‌भवणा-या टंचाईग्रस्त परिस्थितीमुळे राज्यातील अवर्षण प्रवण तालुक्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यात 87 तालुके हे अवर्षण प्रवण असून त्यात अन्य तालुक्यांची भर पडली आहे. या अवर्षण प्रवण भागातील जनतेचे जीवन अत्यंत कष्टमय असून त्यांना पुरेसे अन्न, पिण्यास पाणी व जनावरांना चारा उपलब्ध नसल्यामुळे ते स्थालांतर करतात व अशा स्थलांतरामुळे त्यांचे संपूर्ण जीवनच उध्वस्त झाले असून याबाबत तातडीने कायम स्वरुपाची उपाययोजना करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. या अवर्षण प्रवण तालुक्यात पिण्याच्या पाण्याच्या व शेतीच्या -----

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 16:15

श्री. कमलकिशोर कदम..

पाण्याच्या प्रश्नावरुन गेल्या 50 वर्षांच्या कालावधीमध्ये शासनाने विविध योजना राबवूनसुध्दा भरीव अशी प्रगती दिसून येत नाही, या तालुक्यांचा दुष्काळ कायमस्वरुपी संपविण्यासाठी व त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यासाठी तातडीने ठोस व कालबध्द कार्यक्रम आखण्याची निकड विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, महाराष्ट्र हे कृषिप्रधान राज्य आहे. येथील 60 ते 70 टक्के जनतेची उपजिविका ही शेतीवर अवलंबून आहे.

यानंतर श्री. बरवड ....

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )**

डॉ. कमलकिशोर कदम .....

एकूण शेतीपैकी जवळजवळ 80 ते 82 टक्के शेती कोरडवाहू, जिरायती शेती आहे आणि 17 टक्के शेती सिंचनाखाली आलेली आहे. या 82 टक्के जिरायती शेतीतील शेतकऱ्यांचे जीवनमान पावसावर अवलंबून आहे. पाऊस नीट पडला तर त्याचे जीवन कसे तरी चालणार आणि पाऊस पडला नाही तर कोरडवाहू शेतीमध्ये काहीही पिकत नाही. त्या ठिकाणी उत्पन्नाचा प्रश्न नाही. शेतीमध्ये जे कष्ट केलेले आहे ते सर्व वाया जाणार. पिण्यासाठी पाणी नाही. हाताला काम नाही आणि अतिशय उध्वस्त असे जिणे त्या कोरडवाहू शेतकऱ्याच्या वाटयाला आलेले आहे. आम्ही म्हणतो की, महाराष्ट्रात 185 साखर कारखाने आहेत, कृषी औद्योगिक समाज व्यवस्था आम्ही निर्माण केली, मोठया प्रमाणामध्ये शेतीचा विकास केला पण हे एक मर्यादित चित्र आहे. 70-80 टक्के जिरायती शेतीतील शेतकरी अजूनही आपल्या पोटापाण्याच्या चिंतेच्या व्यतिरिक्त काहीही करु शकत नाहीत. म्हणून या व्यासपीठावर त्यांच्या सुखदुःखाची चर्चा करण्यासाठी आज हा विषय या सभागृहापुढे आणलेला आहे.

सभापती महोदया, दुष्काळ महाराष्ट्राला नवीन नाही. दुष्काळ हा आपल्या पाचवीला पुजलेला आहे. नेमेचि येतो मग पावसाळा असे आपण म्हणतो परंतु पावसाळा नेमेचि येत नाही आणि नियमितही येत नाही. त्यामुळे या महाराष्ट्राच्या कोठल्या ना कोठया भागात कायम दुष्काळाचे सावट पडलेले आहे. दोन वर्षापूर्वी पश्चिम महाराष्ट्र दुष्काळात अतिशय होरपळून निघालेला आहे. मागचे वर्ष आणि या वर्षी मराठवाडा आणि विदर्भ दुष्काळाच्या छायेत आहे. सातत्याने महाराष्ट्रातील कोठल्या ना कोठल्या जिल्हयामध्ये, कोठल्या ना कोठल्या विभागामध्ये पाऊस पडत नाही आणि अवर्षणाचा तडाखा हा शेतीला आणि शेतकऱ्यांना कायम बसत आलेला आहे. या अवर्षणाचाच इतिहास पाहिला तर 1396 ते 1804 अशी आठ वर्षे सतत दुष्काळ होता. या दख्खनच्या पठारावर नर्मदेच्या दक्षिणेस सातत्याने आठ वर्षे दुष्काळाचा तडाखा त्या भागातील लोकांनी सहन केलेला आहे. सन 1460 चा दुष्काळ हा अतिशय प्रसिध्द दुष्काळ आहे. त्यावेळी विजापूरच्या सुलतानाचे अधिकारी श्री. दामाजी पंत यांनी दुष्काळामध्ये गरीब माणसांना मरताना पाहून सरकारची धान्याची

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. कमलकिशोर कदम ...

गोदामे उघडी केली आणि सर्व सरकारी धान्य लुटून गोरगरिबांना वाटून टाकले. नंतर बादशहाने फर्मान काढले की, तुमचे घरदार विका, जायजाद विका आणि जे सरकारी गोदामातील धान्य वाटलेले आहे ती रक्कम सरकारदरबारी जमा करा. त्यावेळी पंढरपूरचा विठोबा विठू महाराजाचे रूप घेऊन दरबारात रुजू झाला आणि दामाजी पंतांनी जी रक्कम भरावयाची होती ती रक्कम विठू महाराजांनी भरली आणि श्री. दामाजी पंतांची सुटका केली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.कमलकिशोर कदम....

ईस्ट इंडिया कंपनीच्या काळामध्ये 12 वेळा दुष्काळ पडला, त्या दुष्काळातून सुटका कशी करावयाची यासाठी त्यांनी अनेक कमिशन्स नेमली होती. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये सुध्दा 1950, 1952 मध्ये, 1965 मध्ये दुष्काळ पडला होता. 1970 ते 1973 या तीन वर्षात सातत्याने दुष्काळ पडला आणि महाराष्ट्रातील 26 जिल्हयांपैकी 23 जिल्हयांमध्ये दुष्काळ होता हे त्या दुष्काळाचे वैशिष्टय होते. स्व.वसंतराव नाईक यांचे नाव शेतकरी कधीच विसरु शकणार नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी त्या काळात रात्रंदिवस गावोगावी जाऊन शेतक-यांच्या पाठीवर हात ठेवून सांगितले की, तू घाबरु नकोस, सरकार तुझ्या पाठीशी आहे. अशाप्रकारे दुष्काळात सापडलेल्या शेतक-यांना सरकारने वाचविले होते हे विसरता येणार नाही. त्यावेळी महाराष्ट्रामध्ये 60 हजार दुष्काळी कामे सुरु होती आणि त्यावर 50 लाख मजूर काम करीत होते. त्या काळात या कामांवर सरकारने 300 कोटी रुपये खर्च केले होते, आज त्याचा हिशेब केला तर 20 हजार कोटी रुपये त्यावेळी सरकारने शेतक-यांना वाचविण्यासाठी, दुष्काळातून बाहेर काढण्यासाठी खर्च केले होते. अशा या पार्श्वभूमिवर असलेले महाराष्ट्र राज्य आजही त्या छायेतून बाहेर आलेले नाही. यासंदर्भात शासनाने सुकथनकर समिती नेमली होती. त्या समितीने काही निकष ठरविले त्यानुसार साधारण पर्जन्यमान 650 एमएमपेक्षा खालचा भाग असेल तो दुष्काळी भाग समजला जावा, तेथे पाऊस नियमित पडत नाही म्हणजे पावसाळयाच्या 22 आठवडयापैकी 18 आठवडे आणि आठवडयाला फक्त 5 एमएम पाऊस पडतो तो भाग दुष्काळी समजला जावा, जमिनीचा पोत पहावा, जी जमीन हलक्या दर्जाची असेल, पाण्याचा निचरा होत असेल, जमिनीत पाणी टिकत नाही अशा जमिनीचा भाग दुष्काळी समजण्यात यावा. म्हणजे अशाप्रकारे दुष्काळी तालुके ठरवित असताना विचार केला गेला आणि महाराष्ट्रातील 87 तालुके दुष्काळी ठरविले गेले. त्यावेळच्या सुकथनकर समितीने 83 आणि राज्यशासनाने 4 तालुक्यांची भर टाकून हे 87 तालुके दुष्काळी म्हणून जाहीर केले. परंतु हे 87 तालुके तरी दुष्काळी आहेत काय ? दुष्काळ कसा, कोठे व केव्हा येईल हेही सांगता येत नाही. 1970 ते 1973 या काळात महाराष्ट्रातील 26 पैकी 23 जिल्हयात दुष्काळ होता. डॉ.सुब्रमण्यम समितीने अनेक तालुक्यांचा उल्लेख केला आहे की, याही

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ SBT/ MHM/ MAP/

डॉ.कमलकिशोर कदम....

तालुक्यांची नावे या दुष्काळी तालुक्यात असावयास पाहिजे. त्यांनी जी नावे दिली होती त्यापैकी काही नावे मी वाचून दाखवितो. जालना, जाफराबाद, परतूर, आंबेजोगाई, पाथरी, गंगाखेड, भोकर, देगलूर, बिलोली, लातूर आणि औसा असे मराठवाडयातील नांदेड व परभणी जिल्हयातील 10-15 तालुके आहेत. ही नावे दुष्काळी तालुक्यांमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. नांदेड आणि परभणी हे दोन जिल्हे दुष्काळग्रस्त नाहीत म्हणून त्यांना याच्यातून बाहेर ठेवण्यात आले आहे. परंतु वस्तुस्थिती अशी नाही. त्यासाठी मी काही आकडेवारी वाचून दाखविती. जालना जिल्हयात 155 रब्बी गावे आहेत. 1983-84 मध्ये या 155 गावांपैकी 155 गावे दुष्काळी आहेत, 1984-85 मध्ये 155 पैकी 108 गावे दुष्काळी आहेत. त्यानंतर 1985-86 मध्ये 155 पैकी 118 गावे म्हणजे 80 ते 90 टक्के गावे अवर्षणग्रस्त आहेत.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. कमलकिशोर कदम पुढे सुरु...

जाफराबादमध्ये एकूण 100 गावे आहेत. त्यापैकी 95 गावे अवर्षणग्रस्त होती. 1985-86मध्ये 100 पैकी 100 गावे अवर्षणग्रस्त होती. 1986-87मध्येही शंभर पैकी शंभर गावे अवर्षणग्रस्त होती. परतूरमधील 95 पैकी 95 खरीप गावे अवर्षणग्रस्त होती. आंबेजोगाईमधील 140 खरीप गावांपैकी 140 गावे अवर्षणग्रस्त होती. 1984-85मध्ये 85 खरीप गावे अवर्षणग्रस्त होती. या सुकथनकर समितीने ही जी नावे दिलेली आहेत ती नावे देखील अपुरी आहेत. मला असे वाटू लागले आहे की, सिंचन झालेला भाग सोडला तर संपूर्ण महाराष्ट्रातील 80 टक्के जिराईत शेतीचा आपल्या पुढे प्रश्न आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे अतिशय गांभीर्याने पाहिले पाहिजे. आम्ही जलसिंचनासाठी भांडतो, अनुशेषावर भांडतो, अनुशेष भरुन निघाला पाहिजे असा आग्रह आम्ही धरतो. परंतु या 80 टक्के कोरडवाहू शेती करणा-या शेतक-यांना नवीन जीवन कसे मिळेल यासाठी मात्र कोणीही आग्रह धरत नाही. मला असे वाटते की, आज पर्यन्त आपण सिंचनाच्या योजनांवर हजारो कोटी रुपये खर्च केलेले आहेत. 47-48 हजार कोटी रु.खर्च करुन जलसिंचनाच्या हजारो योजना आपण केल्या. 30-32 हजार कोटी रु. खर्च करुन शेकडो मध्यम पाटबंधा-याच्या आणि हजारो लघुसिंचनाच्या योजना आपण केल्या आणि 50 लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण केली असे येथे सांगितले जाते. परंतु प्रत्यक्षात 16 लाख हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षमता निर्माण झालेली नाही. हजारो कोटी रुपये खर्च झालेले आहेत. तर मग ही सिंचन क्षमता का निर्माण होत नाही ? आम्ही एवढे केले तेवढे केले असे येथे वारंवार सांगितले जाते. परंतु जी काही सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे त्याच्या निम्म्यापेक्षा जास्त सिंचन क्षमता ही शेतक-यांच्या विहिरींची आहे,पाटबंधारे प्रकल्पांची नाही. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर सिंचनासाठी पैसा खर्च करीत असताना तो पैसा योग्य पध्दतीने, योग्य त्या कामांना वापरला जात नाही आणि वापरला गेला तर त्यापासून रिटर्न मिळत नाही अशी एकंदर परिस्थिती आहे. कोरडवाहू शेतीसाठी जलसिंचनाची जी कामे करावयाची असतात त्या कामासाठी राज्य शासन पैसा देत नाही. मला आठवते की, 2000-2001मध्ये 30-40 कोटी रु. दिलेले होते. त्यानंतर मात्र कधी 10 कोटी, कधी 15 कोटी असे पैसे शासनाने जलसिंचनासाठी दिलेले आहेत. अशा अल्प तरतुदीतून महाराष्ट्रातील 80 टक्के

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. कमलकिशोर कदम पुढे सुरु...

कोरडवाहू शेत जमीन कधीही सुधारणार नाही आणि त्या शेतीवर अवलंबून असलेल्या शेतक-यांचे जीवनमान देखील कधीच सुधारणार नाही. शेतक-यांना अगदी सहजपणे आश्वासन देऊन भुलविले जाते. निवडणुका आल्या की, कापसाला 2700 रु. भाव देऊ असे सांगितले जाते. कापूस उत्पादक शेतकरी तुमच्याकडे 2700रु. भाव द्यावा असा अर्ज घेऊन आला नव्हता. त्याला तुम्ही वीज मोफत देऊ असे सांगितले. अजून त्याला काय काय फुकट देणार आहात ते माहीत नाही. ह्या निवडणुका संपल्यानंतर "गरज सरो नि वैद्य मरो" अशी त्या शेतक-याची स्थिती होते. विजेच्या बाबतीत नंतर सांगितले जाते की, वीज फुकट देणे परवडत नाही. मग हे अगोदर कळत नाही काय ? कापसाला 2700 रु. भाव देऊ असे सांगितले. नॅशनल प्राईज पेक्षा ही किंमत फार जास्त आहे. सरकारने सत्यवचनी असले पाहिजे. हा एवढा भाव देता येणार नाही, सरकारपुढे अनंत अडचणी आहेत त्यामुळे 1600 रुपया पेक्षा जास्त भाव देता येणार नाही असे स्पष्टपणे सरकारने सांगितले पाहिजे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ SBT/ प्रथम श्री.शिगम 17:05

श्री. कमलकिशोर कदम...

फक्त प्रश्नच एकच आहे की, खोटे बोलण्यासाठी, उधारीवर ठेवण्यासाठी राज्यामध्ये शेतक-यांचा मोठया प्रमाणात उपयोग होत आहे. राज्यामध्ये शेतकरी हा एकच माणूस आहे की, सरकार त्याला चालवत रहाते. सभापती महोदया, शेतीवरच्या खर्चासाठी 1 हजार 926 कोटी रुपये मागणी सादर करण्यात आलेली आहे. यामध्ये 70 ते 80 टक्के पगाराची रक्कम आहे. म्हणजे शेतीसाठी फक्त 500 ते 600 कोटी रुपये एवढीच तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाचे 50 हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. एवढया मोठया बजेटमध्ये शेतीसाठी फक्त 500 ते 600 कोटी एवढीच तरतूद केली गेलेली आहे. सरकारी कर्मचा-यांच्या महागाई भत्ता दरवर्षी 1500 कोटी रुपये देता. तो महागाई भत्ता नाकारण्याची तुमच्यात हिंमत नाही. परंतु या राज्यातील कोरडवाहू शेतीवर 6 कोटी शेतकरी अवलंबून आहेत त्याच्यासाठी 500-600 कोटी रुपयांचे तुकडे फेकून त्यांना फसविण्याचे काम तुम्ही करीत आहात. या सदनात बसणा-या सर्व सदस्यांनी एक जबाबदारी म्हणून स्वीकारली पाहिजे की, महाराष्ट्र गरीब का आहे? या राज्यातील 6 कोटी लोक दारिद्रय रेषेखाली रहाणार असतील तर महाराष्ट्र हा कधीच श्रीमंत होऊ शकणार नाही. राज्यात इंटर नॅशनल टेक्नॉलॉजी येऊ द्या अन्य अत्यावश्यक सुविधा येऊ द्या. कुठल्याही टेक्नॉलॉजीने महाराष्ट्र हा पुढे जाऊ शकणार नाही. सर्वात मुलभूत प्रश्न हा कोरडवाहू शेतीचा आहे. तो प्रश्न सोडविल्याशिवाय या राज्याला एकही पाऊल पुढे टाकता येणार नाही. सभापती महोदया, आमच्या नांदेड जिल्हयाच्या बाजूला आंध्र प्रदेश राज्य आहे. आंध्र प्रदेशामध्ये प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात जलसंधारणाच्या कामासाठी 200 ते 300 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत असते. त्यांनी काही गोष्टी ठरवून घेतलेल्या आहेत.शेती सुधारल्या शिवाय राज्याचा कुठलाही विकास होणार नाही. कोरडवाहू शेतीचा विकास करण्यासाठी जलसंधारणाची कामे होणे अत्यावश्यक आहे, त्या शिवाय शेतीचे उत्पादन वाढू शकणार नाही, शेतक-यांच्या जीवनाला स्थैर्य येऊ शकणार नाही, या सर्व गोष्टींची जाणीव ठेवून आंध्र प्रदेशचे तत्कालिन मुख्यमंत्री श्री. चंद्राबाबू नायडू यांनी जलसंधारणाच्या कामासाठी 200 ते 300 कोटी रुपयांची दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद करण्याचे ठरविले आहे. त्या प्रमाणे त्या ठिकाणी जलसंधारणाची कामे मोठया प्रमाणात होत आहेत. कोरडवाहू शेतीच्या सुधारणेसाठी आपण काही तरतूद करुन ठेवण्याची गरज आहे. सभापती महोदया, शासकीय कर्मचा-यांचा 25 टक्के पगार कमी करा. कर्मचा-यांचा पगार कमी केल्याने काही बिघडणार नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम...

या राज्यात 80 लाख वाहने फिरत आहेत. या वाहनांना रोज पाच लिटर पेट्रोल लागत असेल. दररोज या वाहनांवर 5 ते 10 लाख लिटर पेट्रोल वापरले जात आहे. या पेट्रोलवर तुम्ही कर बसवा. प्रत्येक लिटरमागे 5 रुपये कर लावा. ग्रामीण महाराष्ट्राची पुर्नबांधणी करण्यासाठी हा कर लावला आहे असे जनतेला सांगा. हा सगळा पैसा शेती सुधारणेसाठी खर्च करा. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आता आश्वासनावर जगण्याचे दिवस आता संपलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी सांगितले की, आता सहनशीलतेच्या आम्ही पलिकडे गेलेलो आहोत. आमच्या संवेदना देखील नष्ट व्हावयास लागल्या आहेत. राज्यात रोज शेतकरी आत्महत्या करीत आहेत. नांदेड जिल्हयातील एका शेतक-याचे मी उदाहरण या ठिकाणी सांगतो. त्या शेतक-याने 90 हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. 90 हजार रुपये कर्जाचे बँकेने 1 लाख 80 हजार रुपये आकारले. बँकेचे अधिकारी त्या शेतक-याच्या घरी गेले, त्याच्या घरातील गाडगे,मडके बाहेर फेकून दिले. संपूर्ण घरात शोध घेतला परंतु बँकेच्या अधिका-यांना काहीच सापडले नाही. त्या शेतक-याकडे सहा-सात एकर जमीन होती. ती जमीन माननीय न्यायमूर्तींनी लिलाव करण्याची परवानगी दिली. लिलाव करताना गावक-यांनी हरकत घेतली. तर त्यांना पोलिसांनी लाठया घातल्या. त्या ठिकाणी 144 कलम जारी केले. 144 कलम जारी करुन एका गरीब शेतक-याच्या सहा-सात एकर जमिनीचा लिलाव केला. फार मोठे कांड करण्यात आले आणि म्हणून कधी कधी असे वाटते की, शासनाने संवेदनशील राहिले पाहिजे....

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम..

कधी तरी माणूस फार मोठा झाला की गरीब माणसाची दु:खे त्याला कळत नाहीत. त्यामुळे शासनाची आणि सामान्य माणसाचे संबंध जर तुटले तर गरीब माणसाचे प्रश्न सुटू शकत नाहीत. कोणीही या भ्रमात राहण्याचे कारण नाही की आम्ही येथे आलो म्हणजे कायम आहोत. ज्या माणसाची नाळ गरीब माणसाशी जोडलेली आहे त्याच्यासाठी जो काम करतो त्याच माणसाला तो आधार देईल. खोटे बोलून,कामचलाऊपणा करुन वेळ मारुन नेली तरी चालेल असा भ्रम असेल तर तो जास्त काळ चालणार नाही. या ठरावाच्या निमित्ताने मी एकच विनंती करणार आहे. या राज्यातील 80 टक्के कोरडवाहू शेतक-यांच्या प्रश्नाकडे सरकारने गांभीर्याने पहावे आणि गाव आणि तेथील दुष्काळ निवारण्याच्या कामासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. या राज्यामध्ये कै.यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे मुख्यमंत्री होऊन गेले. त्यांनी औद्योगिक क्रांती केली,गरिबांच्या मुलांना शिक्षण दिले आणि सत्तेचे विकेंद्रीकरण करुन गरीबांच्या हातात सत्ता दिली. कै.वसंतदादा पाटील हे तर गरीब माणसाची चालती-बोलती माया होती. कै.वसंतराव नाईक धडाडीचे सेनानी होते. जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असताना मी त्यांच्यासोबत फिरलो आहे. प्रत्येक गोरगरीब माणसाच्या झ ाोपडीमध्ये जाऊन त्यांनी त्याला आधार दिला. श्री. शरदराव पवार साहेबांसारखे नेते ज्यांचा जगण्याचा आणि चिंतनाचा विषयच शेती आहे. ही सगळी रत्ने महाराष्ट्राने दिली आहेत. हा प्रश्न सोडविण्यासाठी गांभीर्याने काम करावे लागेल. शेतीच्या प्रश्नासाठी जास्त वेळ द्यावा लागेल.या सदनामध्ये मला कोणावरही टीका करावयाची नाही. पगार आणि भत्त्याशिवाय फारशी चर्चा होत नाही. भत्ता कोणता आणि किती मिळतो मला माहीत नाही. महाराष्ट्राच्या बजेटमधील 80 टक्के पैसा हा सगळा वेतन आणि भत्ते यामध्ये चालला आहे. 50 हजार कोटींच्या बजेटमध्ये 500 कोटी रुपये शेतीला देऊ शकत नाही. 50 हजार केटींच्या बजेटमध्ये 25 हजार केटी रुपये शेतीला दिले जातील तो महाराष्ट्राचा सुदिन राहील. ग्रामीण भागातील शेतक-याच्या भाग्योदयाचा सुदिन राहील. याप्रश्नाकडे सदनाने गांभीर्याने पहावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सदाशिव पोळ (विधान सभेने निवडलेले):सभापती महोदया, माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी या ठिकाणी 87 अवर्षणग्रस्त तालुकयाच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या अवर्षणग्रस्त तालुकयातील शेतक-यांच्या व्यथा आणि अडचणीसंबंधी चर्चा करीत असतांना मला असे सांगावयाचे आहे की,. राज्य सरकारचे एकूण बजेट 50 हजार कोटी रुपयांचे असतांना शेतक-यांसाठी 500 कोटी रुपये सुध्दा दिले जात नाहीत. अशा परिस्थितीमध्ये 87 तालुक्यातील शेतकरी कशा पध्दतीने शेती करतील आणि ते शेतकरी इतर तालुक्याच्या बरोबरीने कसे येतील ? त्या भागात बागायती शेती कशी वाढेल? हे गंभीर प्रश्न आहेत.दुष्काळी तालुक्यातील जी जमीन आहे ती सुध्दा हलकी व मुरमाड आहे . या भागात कधीही वेळेवर पाऊस पडत नाही. पाऊस पडला तर तो नेहमी अवेळी पडत असतो.या दुष्काळी तालुक्यात नेहमीच 50 सेन्टी मिटर्स पेक्षा कमी पाऊस पडत असतो.त्यामुळे शेतक-यांच्या हातात एखादे सुध्दा पीक येत नाही.कधी तरी चुकून पाऊस पडला तर तो सुध्दा 8-15 दिवस पडतो आणि वरचे वर ,वेळेवर पाऊस पडत नाही त्यामुळे पीक येत नाही. अशा परिस्थितीमध्ये शेतक-यांना दिलासा देणे महत्वाचे आहे. तसेच त्या भागात जास्तीत जास्त पाणी कसे अडविले जाईल यासाठी सुध्दा प्रयत्न केला पाहिजे.तेथील भूगर्भातील पाण्याची पातळी कशा पध्दतीने वाढवता येईल हेही पाहण्याची गरज आहे. आज त्या भागातील शेतक-यांना शेतीतून काहीही उत्पन्न मिळत नसल्यामुळे तो कायमचा दुसरीकडे स्थलांतर करीत असतो.त्याला आपले जीवनमान सुधारता येत नाही. शेतीतून उत्पन्न मिळत नसल्यामुळे त्याचे भागत नाही.त्यामुळे काही शेतकरी मेंढपाळ व्यवसाय करतात व त्या निमित्ताने स्थलांतर करीत असतात.. ऊस तोडण्यासाठी त्यांना दुसरीकडे जावे लागते. त्याचबरोबर काही वेळा मुंबई सारख्या शहरामध्ये किंवा बंगलोर,हैद्राबाद या सारख्या मोठया शहरामध्ये सुध्दा पोट भरण्यासाठी त्यांना जावे लागते.त्यामुळे त्या शेतक-यांच्या मुलाच्या शिक्षणाकडे कायमचे दुर्लक्ष होत असते.तेव्हा हे शेतकरी दुसरीकडे जाणार नाहीत त्याच ठिकाणी स्थायिक होतील व त्यांची शेतीमध्ये सुधारणा होईल यासाठी शासनाने वेगळा विचार करण्याची आज गरज आहे. दुष्काळी भागाला पाणी देण्यासाठी कृष्णा खोरे आणि तापी खोरे या सारख्या विविध योजना शासनाने आखल्या आहेत परंतु त्यामध्ये प्रादेशिक वाद निर्माण झाल्यामुळे ज्या भागाला पाणी देण्याची गरज होती त्या भागाला पाणी न मिळता त्या योजना आज बंद पडलेल्या आहेत. कोल्हापूर, सांगली

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सदाशिव पोळ ...

यासारख्या ठिकाणी तसेच सहयाद्रीच्या कुशीमध्ये पाऊस चांगल्या प्रकारे पडतो. परंतु काही भागात पाऊस फारच कमी पडतो. खटाव, माण,आटपाडी,कवठेमहांकाळ,खानापूर ,जत यासारख्या भागाला पाणी देण्याकरता कृष्णा खो-यातील प्रकल्पाची निर्मिती निर्मिती झाली परंतु सरकारचे आज त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. त्या योजना सुरु झाल्या आहेत व त्यासाठी जो किरकोळ पैसा दिला जातो त्यातून त्या भागातील कर्मचा-यांचा पगारही भागत नाही.अशी आज परिस्थिती आहे..

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री. गायकवाड नंतर --- 17:20

श्री. पोळ ....

म्हणून आम्हाला वाटले की, या 87 तालुक्यांतील परिस्थिती... नुसत्या या 87 तालुक्यातच नव्हे तर सातारा जिल्ह्यातील कराड हा एक सधन तालुका समजला जातो परंतु त्या तालुक्यातील काही गावे अशी आहेत की तेथे कायम दुष्काळ आहे, तेथे कधीही वेळेवर पाऊस पडत नाही, शेतीचे उत्पन्न येत नाही. तर अशी जी गावे आहेत त्यांच्याबाबतीत म्हणजे 1950 सालानंतर ज्या ज्या गावातील आणेवारी 50 पैशापेक्षा खाली आहे अशा गावांचासुद्धा वेगळा विचार करण्याची गरज आहे. आज या 87 तालुक्यातील काही गावांची परिस्थिती चांगलीही असू शकेल पण महाराष्ट्रातील अशी अनेक दुष्काळी गावे आहेत की त्यांच्यासाठी सरकारने वेगळा निधी देण्याची गरज आहे. किंबहुना त्यांच्यासाठी स्वतंत्र महामंडळ निर्माण करावे लागले तरी ते निर्माण केले पाहिजे आणि ही जी दुष्काळी गावे आहेत त्यांना इतर पुढारलेल्या, सधन गावांबरोबर आणले पाहिजे. त्यासाठी आवश्यक तो निधीही उपलब्ध करून दिला पाहिजे. अशा प्रकारे या गावांची व्यवस्था करण्याची गरज आहे. सभापती महोदया, आज काही ठिकाणी वीज कनेक्शन्स देऊनही पाण्याची पातळी खाली गेलेली आहे म्हणून तेथे वीजेची कनेक्शन्स देऊ नयेत असे आदेश आलेले आहेत. त्यामुळे 87 तालुक्यात मोठी अडचणीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. अशा ठिकाणी पाण्याची पातळी वाढविण्याची जबाबदारी सरकारची आहे आणि त्यातून तेथील लोकांना दिलासा देण्याची गरज आहे. तेथील लोकांना आहे त्या परिस्थितीत वीज कनेक्शन देण्याचे आपण टाळू नये. त्या लोकांना इतरही वेगवेगळ्या सुविधा दिल्या गेल्या पाहिजेत. जेथे पाऊस कमी आहे, जिराईत शेती आहे तेथे आधुनिक तंत्रज्ञान आणण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. त्या दृष्टीने व्यवस्था निर्माण केली पाहिजे. थोड्या पावसामध्ये वेगवेगळी नवीन पिके कशी घेता येतील या दृष्टीने तंत्रज्ञान आणण्याची गरज आहे. सभापती महोदया, या सगळ्या दुष्काळी भागामध्ये कारखानदारीच्या बाबतीत देखील वेगळा विचार करण्याची गरज आहे. तेथील लोक स्थलांतरित होऊ नयेत म्हणून तेथे वेगवेगळे उद्योग-धंदे सुरू करण्याच्या दृष्टीने आपण विचार केला पाहिजे. त्या दृष्टीने या 87 तालुक्यांच्याबाबतीत व्यवस्था करावी लागेल. या ठिकाणी दुष्काळी तालुक्यांच्या अडचणी सन्माननीय सदस्य श्री. कदम यांनी मांडलेल्या आहेत त्याचबरोबर इतर काही कायम स्वरूपी मार्ग काढणे आवश्यक आहे, जेणे करून तेथील लोक स्थलांतरित होणार नाही या दृष्टीने सरकारने उपाय योजना केल्या पाहिजेत, एवढे बोलून मी भाषण संपवितो.

*****

.... 3एम 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनाजी साठे (नामनियुक्त) : माननीय सभापती महोदया, या ठिकाणी नियम 97 अन्वये या सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी जी चर्चा उपस्थित केली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील 87 दुष्काळी तालुक्यांचा, गावांचा किंवा अवर्षणप्रवण गावांचा विचार करीत असताना सन्माननीय सदय श्री.कदम यांनी राज्यातील किती जिल्हे दुष्काळाला सातत्याने तोंड देत आहे याचे विवेचन केलेले आहे. दुष्काळी जिल्ह्यांच्या यादीमध्ये सोलापूर जिल्हा देखील आहे. या राज्यामध्ये 1970-72 सालामध्ये पडलेला दुष्काळ हा अलिकडच्या काळातील सर्वात भीषण असा दुष्काळ होता हे या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितलेच आहे. त्या वेळी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी आणि राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांच्यामुळेच राज्यातील लोकांना दुष्काळाच्या तडाख्यात सहाय्य करण्याचे काम मोठ्या प्रमाणात झाले होते. अलिकडच्या काळामध्ये ओळीने गेली चार वर्षे या राज्यात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडलेला आहे. ....

( यानंतर श्री. जागडे .... 3एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ASJ/ MHM/ SBT/ 17:25

श्री. धनाजी साठे....

महाराष्ट्रातील आर्थिक परिस्थिती बिकट आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत जनावरांना चारा देण्याचे काम तसेच लोकांना रोजगार देण्याचे काम, तसेच पिण्याचे पाणी देण्याचा प्रयत्न शासनाने केला असला तरी कायमचा दुष्काळ दूर होण्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, अनुशेषाचा विचार करीत असताना आता या पुढे तालुक्याचा अनुशेष न धरता गावांचा अनुशेष धरला पाहिजे. कारण एखाद्या तालुक्यात 50 गावांना पाणी मिळते, परंतु बाकीच्या गावांना पाणी मिळत नाही. सभापती महोदय माढा तालुक्यात आशियातील सर्वात मोठा बोगदा झाला आहे. उजनीचे पाणी त्या बोगद्यातून सिना नदीमध्ये सोडण्यात आले आहे. आता त्यामुळे सिना नदीवरील काठावरील लोकांना पिण्याचे पाणी मिळाले आहे. परंतु त्याच तालुक्यातील काही भागात अशी परिस्थिती आहे की, त्या ठिकाणी पिण्याचे पाणी नाही. ब-याचशा गावात चा-याचा तसेच अनेक प्रश्न आजही आहेत. किती पैसा खर्च केला, यावर मुल्यमापन करण्याचा प्रयत्न केला तर ज्यांना कधीच काही मिळत नाही, तसेच कधीही मिळण्याची शक्यता नाही, अशा लोकांना नेहमी दुष्काळी परिस्थितीतच राहावे लागणार आहे. आपल्या राज्यातील ब-याचशा तालुक्यात अशी परिस्थिती आहे. माननीय सदस्य श्री. सदाशिवराव पोळ यांनी सांगितल्याप्रमाणे कराड तालुका हा सधन समजला जात असला तरी काही गावात अत्यंत वाईट परिस्थिती आहे. महाराष्ट्रातील शेतकरी हा निसर्गावर अवलंबून असतो. त्यामुळे पाऊस कसा पडतो, किती पडतो, याचा विचार करावा लागतो. 87 तालुक्यात 10 ते 12 इंचच पाऊस पडत असल्यामुळे या तालुक्यातील शेतक-यांचे सर्वच जीवन पावसावर अवलंबून असते. आता गेल्या चार वर्षात दुष्काळाला तोंड देत असताना गेल्या वर्षी ब-यापैकी पाऊस झाला होता. परंतु शेतक-यांना दुष्काळातून बाहेर काढण्याइतपत पाऊस झालेला नाही. माढा तालुक्याचा विचार केला तर या तालुक्यात 20 टँकर सुरु आहेत. सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण चार वर्षापूर्वी कोरडे पडले होते. त्याचा परिणाम सर्व जिल्ह्याला भोगावा लागला. तेव्हा धरणे भरली तरच लोकांना पाणी मिळू शकते. भरपूर पाऊस पडला नाही तर दुष्काळी परिस्थितीतून बाहेर पडणे शक्य होणार नाही. माढा तालुक्यातील मानेगाव, वरवडे आणि इतर भागात दुष्काळी परिस्थिती आहे. यासाठी मानेगाव या ठिकाणी एक लिफ्ट इरिगेशन योजना तयार करण्यात यावी. माढा-सिना योजनेमध्ये 150 ते 200 कोटी रुपये खर्च झाले आहेत. 25 कोटी रुपयांसाठी ती योजना अपुरी राहिलेली आहे. तेव्हा या योजनेला 25 कोटी रुपये त्वरीत ही योजना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनाजी साठे.....

पूर्ण करण्यात आली तर हा भाग दुष्काळाच्या परिस्थितीतून बाहेर पडणार आहे. तेव्हा दुष्काळचा विचार करीत असताना तालुकावाईज विचार न करता गाववाईज विचार करावा. या प्रमाणे विचार करुन दुष्काळी गावांना दुष्काळाच्या परिस्थितीतून बाहेर काढण्याचा शासनाने प्रयत्न करावा, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--

( यानंतर श्री. सरफरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान ( नामनियुक्त ): सभापति महोदय, दुष्काल यह कोई डिबेट का विषय नहीं है. रुलिंग और अपोजिशन दोनों को मिलकर हल निकालने का यह विषय है. यह सवाल मानवता से जुड़ा हुआ है. लेकिन इस बारे में शासन की नीति शुरु से ही इंसानों को बचाने के बजाए पैसों को बचाने की रही है. आर्थिक जिम्मेदारी कम करने के लिए शासन दुष्काल के बजाए दुर्भिक्ष यानी फॅमिन के बजाए स्केअर्सिटी घोषित करती है. 1952-53 में जब राज्य में दुष्काल पड़ा तब "महाराष्ट्र दुष्काल निवारण समिति " गठित की गई थी. इस समिति ने भी अपनी रिपोर्ट में इसी बात का उल्लेख किया था. समिति ने जो सिफारिशें की थीं, उनमें से बहुत सी सिफारिशें शासन ने मंजूर की थीं, लेकिन सरकार ने आर्थिक जिम्मेदारी बढ़ाने वाली सिफारिशें मंजूर नहीं की थीं.

सभापति महोदय, दुष्काल का सामना एवं उस पर उपाययोजना करने के लिए हमें गंभीरता से सोचने की जरुरत है. दुष्काल की परिस्थिति पैदा होने पर शासन जो स्केअर्सिटी वर्क करता है, वे काम कुछ समय बीतने के बाद निरुपयोगी और अनुत्पादक हो जाते हैं. स्केअर्सिटी निर्माण होने के बाद कुछ काम हाथ में लिए जाते हैं और जैसे ही स्केअर्सिटी खत्म हो जाती है, वे काम अपूर्ण छोड़ दिए जाते हैं. इस तरह से काम अपूर्ण छोड़ना ठीक नहीं है. इसी तरह से लाँग टर्म सोलूशन के हिसाब से इरीगेशन के काम नहीं होते है और पैसा खर्च हो जाता है. दुष्काल और पानी का सीधा संबंध है, ऐसा कहा जाता है. इस वजह से दुष्काल के काम "पानी " के ही इर्दगिर्द घूमने वाले होने चाहिए. अगर हम एक बार पानी की समस्या पर मात करते हैं तो बार बार हमें pain relievers पर पैसे गंवाने की जरुरत नहीं पड़ेगी. तकरीबन 87 तालुके अवर्षणप्रवण है. इसका मतलब यह है कि या तो अवर्षणग्रस्त है या किसी भी समय अवर्षणग्रस्त हो सकते हैं. इसका सीधा अर्थ यह है कि राज्य का लगभग एक तिहाई हिस्सा हमेशा दुष्काल की छाया में रहता है.

सभापति महोदय, यह जमाना Trade with technique का है. टेक्निक अप्लाय करके आज बाजार में उद्योगपतियों द्वारा पानी दूध के भाव में बेचा जा रहा है. लेकिन जो किसान टेक्निक से कोसों दूर है, उन्हें अवर्षण के चलते स्थलांतर करना पड़ रहा है. पिछले 40 सालों में टेक्निक अप्लाय करके दुष्काल पर हल ढूंढा गया होता तो शायद आज यह नौबत नहीं आती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

श्रीमती फौजीया खान.....

भूतपूर्व मुख्यमंत्री स्व. श्री वसंतराव जी नाईक साहब ने राज्य में जो हरित क्रांति की थी, वह नि:सन्देह प्रशंसनीय है. लेकिन उसके बाद जो कारगर कदम उठाने चाहिए थें, वे नहीं उठाए गए, यह मैं अफसोस के साथ कहना चाहती हूं. आज राज्य के कई हिस्सों में एक घड़ा पानी के लिए 10 रुपये गिनने पड़ रहे हैं. जब कोई एरिया अवर्षणग्रस्त जाहिर होता है, तब ग्रामीण भाग में हर व्यक्ति को सिर्फ 20 लीटर पानी दिये जाने का रिवाज है. इसी पानी में से जानवरों की भी प्यास बुझाने की कोशिश की जाती है. दुनिया के तथा अपने देश के विशेषज्ञों का भी कहना है कि कम से कम 30 लीटर पानी हर व्यक्ति को मिलना चाहिए. इस समस्या पर मात करने के लिए " पानी अड़वा पानी जिरवा " ऐसा हम कहते रहते हैं. लेकिन राज्य में जलसंधारण के लिए जो निधी का प्रावधान किया गया है, क्या वह पर्याप्त है ? इस बात को अन्य सदस्यों ने भी उठाया है.जब माननीय सुधाकरराव मुख्यमंत्री थे, तब यह प्रावधान 500 करोड़ का था, इस बात की ओर मैं मंत्री महोदय का ध्यान आकर्षित करना चाहती हूं.

सभापति महोदय, यह सही है कि हमारा राज्य आज दुष्काल के कगार पर खड़ा है. और मराठवाडा की हालत तो पहले से ज्यादा बदतर होती जा रही है. धरण(बांध) और बावड़ियों में पानी नहीं के बराबर है. लोग पानी के लिए तरस रहे हैं. आने वाले संकट को भाँपते हुए लोग अपने बच्चों की तरह पाले हुए जानवर कौढ़ी के भाव में बाजार में बेच रहे हैं. गारपीट और बेमौसम वर्षा की वजह से मराठवाड़ा का टूटा किसान सूखे के कारण अब मानसिक तौर पर भी बिखर चुका है. दुष्काल की चर्चा करते समय मैं विकास की बात नहीं करना चाहती थी. लेकिन मराठवाड़ा विकास पॅकेज में असमान वितरण हुआ है और परभणी जिले पर अन्याय हुआ है इसलिए मैं इस बात को अपने मुख्य विषय से जोड़ना चाहती हूं. दुक्काल का सामना करने के लिए शासन जो निधि का प्रावधान करेगा, उसमें मराठवाड़ा पर अन्याय न हो, यह मेरी आपसे विनती है. साथ ही साथ जैसे सम्माननीय सदस्य श्री कमल किशोर कदम जी ने कहा कि नांदेड़ और परभणी में कुल 400 गांवों में दुष्काल की परिस्थिति पैदा हो जाने के बावजूद यह माना ही नहीं जाता कि वहां पर दुष्काल है. इसलिए कम से कम इस बात की ओर माननीय मंत्री महोदय को ध्यान देने की जरुरत है कि दुष्काल ग्रस्त गांवों के लिए जिलावार बेलेंस एप्रोच हो. कयोंकि

....3



श्रीमती फौजीया खान.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्व. वसंतराव नाईक जब मुख्यमंत्री थे, तब उन्होंने महाराष्ट्र के सभी जिलों और गांवों को समान न्याय दिया था, यह हमें नहीं भूलना चाहिए. 1990 में जब दुष्काल पड़ा था, तब मुख्यमंत्री रहे मा. शरद पवार साहब ने भी कोई भेदभाव नहीं किया था. हमेशा बारामती पर बरसने वाले सम्माननीय सदस्यों को यह बात नोट कर लेनी चाहिए. इसी सत्र के दौरान मराठवाड़ा, विदर्भ और कोकण पर जो अन्याय होता आया है, यह बात मा. राज्यपाल महोदय के

इसके बाद का भाषण 3पी-1 पर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT 17:35

श्रीमती फौजीया खान ....

सामने रखने के लिए सर्व पक्षीय विधायक उन्हें मिले थें. चर्चा के बाद पत्रकारों ने सम्माननीय श्री नितीन गडकरी साहब से एक सवाल किया - "आखिर ऐसी क्या बात है कि जिसकी वजह से आप पर (विदर्भ पर ) अन्याय होता है, क्या यहां का नेतृत्व कमजोर है ? पत्रकारों के इस टू दी पांइट सवाल का जवाब माननीय गडकरी साहब टू दी पाइंट नहीं दे सके, यह सच है. लेकिन उसमें कमजोरी अकेले माननीय श्री गडकरी साहब की है, ऐसा मैं नहीं समझती. हम सब की यह कमजोरी है कि हम हर जगह पक्ष लाते हैं और तब तक पश्चिम महाराष्ट्र अपना लक्ष्य हासिल कर लेता है. चूंकि हम पक्ष के विवाद में उलझ जाते हैं और तब तक पश्चिम महाराष्ट्र निधि ले जाता है. पश्चिम महाराष्ट्र के आमदार निधि की चोरी नहीं करते हैं बल्कि वे अपनी एकजूटता के आधार पर निधि हासिल कर लेते हैं. इसमें गलत कुछ भी नहीं है. हमारे लिए उम्मीद की किरण यह है कि, मुख्यमंत्री माननीय विलासराव जी देशमुख मराठवाड़ा के है. दूसरे शब्दों में वे पश्चिम महाराष्ट्र के नहीं है. ऐसे में मराठवाड़ा को ज्यादा नहीं तो कम से कम बराबरी का हिस्सा दिलाने में वे पीछे नहीं हटेंगे, ऐसी मैं अपेक्षा करती हूं.

सभापति महोदय, यह सही है कि हर इंसान । (आई) के इर्दगिर्द घूमता है. मेरा देश, मेरा राज्य, मेरा विभाग, मेरा जिला, मेरा निर्वाचन क्षेत्र, मेरा गांव और आखिर में मेरे कुटुंब तक आकर रुकता है. लेकिन कुटुंब का तभी भला हो सकता है, जब देश का भला होगा. इसलिए पूरा राज्य दुष्काल का सामना करने में और हल ढूंढने में कामयाब होगा, इसी आशा के साथ मैं अपना भाषण खत्म करती हूं. धन्यवाद.

..................

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या राज्यात 87 तालुके दुष्काळग्रस्त आहेत आणि या दुष्काळग्रस्त भागातील शेतक-यांचे जे प्रश्न आहेत, त्यासंदर्भात आज या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी जो प्रस्ताव चर्चेसाठी मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे... 17:40

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे चालू...

सभापती महोदया, या प्रश्नावर सभागृहामध्ये मागच्या आठवड्यात प्रदीर्घ अशी चार-पाच तास चर्चा झाली. आज या विषयावर प्रामुख्याने जी चर्चा करण्याचे निमित्त आपल्याला मिळाले, त्याचे प्रमुख कारण असे की, खालच्या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख हे उपोषणाला बसले होते. राज्यामध्ये अवर्षणग्रस्त 87 तालुके आहेत, त्या तालुक्यातील लोकांचे, जनतेचे जे आज प्रश्न आहेत, त्या प्रश्नाला वाचा फोडणे, हा उपोषणाचा हेतू होता. 2001, 2002, 2003 या गेल्या तीन-चार वर्षामध्ये महाराष्ट्रातील जनतेला आणि राज्य शासनाला भयानक दुष्काळाच्या परिस्थितीशी सामना करावा लागलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील 11 जिल्ह्ये आणि 73 तालुक्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती आहे, तसेच काही मराठवाडयातील विशेषत: बीड जिल्ह्यामध्ये भयानक दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. त्याची तुलना 1972 च्या दुष्काळाशी होऊ शकते. यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम साहेबांनी केला. मला माहिती आहे की, वसंतराव नाईक राज्याचे मुख्यमंत्री असतांना दोन-तीन वर्षे सातत्याने या राज्यामध्ये भयानक अशी दुष्काळाची छाया पसरलेली होती. मला आठवते की, मी तेव्हा युवक काँग्रेसचा एक सामान्य कार्यकर्ता होतो. त्यावेळेस बॅ. रजनी पटेल हे मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. त्यावेळेला दुष्काळाशी सामना करीत असतांना, अन्नधान्य मिळविण्याची, औषध कंपन्यांकडून औषधे मिळविण्याची आणि ते पाठवून देण्याची व्यापक अशाप्रकारची बांधिलकी रजनी पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आम्ही मुंबईमध्ये पार पाडली. वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते,त्यांनी संपूर्ण राज्यामध्ये दुष्काळग्रस्त जनतेला दिलासा दिला, आधार दिला. दुष्काळी जनतेला मदत करण्याची भूमिका राज्य शासनाने घेतलेली होती. आज आपण रोजगार हमी योजनेचा ऊहापोह करतो. रोजगार हमी योजना ही 1972 सालापासून अस्तित्वात आलेली आहे. जे कष्टकरी शेतकरी आहेत, त्यांना दुष्काळग्रस्त भागामध्ये कोठेही काम नव्हते. त्यांच्या हाताला काम देणे, हे त्यामागचे स्वप्न होते. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी 50 लक्ष मजूर त्यावेळेस दुष्काळग्रस्त भागामध्ये रोजगार हमी योजनेवर काम करीत होते, असे सांगितले. त्यावेळेस धनिक शेतकरीसुध्दा कामावर होते, त्यांच्या हाताला फोड येत असत. अशाप्रकारे त्यावेळेला रोजगार हमी योजनेची कामे केली जात होती. त्यावेळेला या सभागृहामध्ये अनुभवी, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य राजकारणामध्ये होते, त्या सर्व लोकांना परिचित आहे. तसेच गेल्या दोन-तीन वर्षामध्ये 11 जिल्ह्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे चालू....

आणि 73 तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. आजही मागच्या आठवड्यात खास करून विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये जवळजवळ साडेबारा हजार गावे दुष्काळग्रस्त असल्याचे सांगण्यात आले. विदर्भामधील प्रामुख्याने 10 हजारापेक्षा जास्त गावांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झलेली आहे.  त्या ठिकाणच्या जनतेला मदत करणे, सहकार्य करणे ही राज्य शासनाची जबाबदारी आहे.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी..

आज जी आणेवारीची पध्दत आहे, ही कुठली आणेवारीची पध्दत आहे? आज जर रेव्हेन्यू कोड काढला आणि ज्या ठिकाणी पन्नास पैशापेक्षा कमी आणेवारी आली असेल त्या ठिकाणी दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर करावयाची. ही कुठली आणेवारीची पध्दत आहे?. सन 1942 मध्ये ज्या वेळेला संपूर्ण देशामध्ये मोठा दुष्काळ पडला होता, त्या दुष्काळाचे निवारण करण्यासाठी ब्रिटिशांनी जी काही कार्य पध्दती अवलंबिली होती तीच कार्य पध्दती आजही 2005 मध्ये अवलंबिण्यात येते. तोच रेव्हेन्यू कोड आणि त्या संदर्भात तीच आणेवारी आम्ही जाहीर करतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन म्हणून सन्माननीय सदस्यांना विचारतो की, आपण 1942 चा ब्रिटिशांचा संदर्भ देऊन आणीवारीवर टिका करतो पण गेले कित्येक वर्षे आपल्या हातात सत्ता आहे. ही आणेवारीची पध्दती बालून नवीन पध्दती आणावी असे कोणाला वाटले नाही नां? मग तुम्हाला टिका करण्याचा काय अधिकार आहे?

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, मी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचा आभारी आहे. परंतु ही वस्तुस्थिती आहे. आपला जो रेव्हेन्यू कोड आहे, त्या रेव्हेन्यू कोडमध्ये काहीही बदल केलेला नाही? ब्रिटिशांची जी आणेवारीची पध्दत होती तीच आजही 2005 मध्ये सुरु आहे. आपले तलाठी असतील. आपल्या राज्यातील तहसीलदार असतील त्यांना सांगावयाचे की, त्या ठिकाणी गावामध्ये जा आणि त्या ठिकाणी धान्य उगवलेले आहे काय ते बघा. त्याठिकाणी जे पेरले होते ते उगवले आहे काय ते बघा. तसेच त्याठिकाणी काय नुकसान झालेले आहे ते बघा. त्या प्रमाणे कोणी तरी तलाठी, तहसीलदार त्या गावांमध्ये जाणार आणि तेथील दोन-चार लोकांना बोलावणर, पंचनामा करणार आणि त्या गावामध्ये अत्यंत वाईट परिस्थिती असतांना सुध्दा अशी कित्येक गावे या पन्नास पैसे आणेवारीतून सुटलेली आहेत. तसेच काही गावांची चांगली परिस्थिती असतांना सुध्दा ती गावे पन्नास पैसे आणेवारीच्या खाली आलेली आहेत. अशा प्रकारे दुष्काळग्रस्त तालुके किंवा गावे जाहीर करण्यात येतात. ही सदोष अशा प्रकारची आणेवारीची पध्दत या राज्यामध्ये आहे. शासन या संदर्भात काही तरी विचार करणार आहे की नाही? ब्रिटिशांनी आणवारीची जी पध्दती घालून दिलेली आहे, ती सर्वच बरोबर आहे असे माणण्याचे काही कारण नाही.सायन्स पुष्कळ डेव्हलप झालेले आहे. निरनिराळया प्रकारे याचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी....

अभ्यास करता येईल. या आणेवारीच्या आधारावर दुष्काळग्रस्त भागात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर करावयाची त्यातून जे प्रश्न निर्माण होतील त्या प्रश्नाला शासनाने सामोरे जायचे. हा आणेवारीच्या पध्दतीचा जो प्रकार आहे त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.कोकणामध्ये आज अशीच परिसिथती आहे. श्री. वसंतराव नाईक यांच्या काळात कोकणात सिंचनाची व्यवस्था निर्माण होऊ शकते काय याचा अभ्यास करण्यासाठी बर्वे समिती नेमली होती. त्या समितीने आपला अहवाल दिला की,. संपूर्ण कोकणपट्टीमध्ये सिंचनाची व्यवस्था निर्माण होऊ शकत नाही म्हणून कित्येक वर्षे कोकणामध्ये सिंचनाच्या बाबतीत कुठलाही विचार करावयाचा नाही असे राज्य शासनाने त्या निमित्ताने ठरवले होते. आज कोकणात काय परिस्थिती आहे?श्री. कमलकिशोर कदम आपण या ठिकाणी उल्लेख केला, कोकणात सुध्दा अशीची परिस्थिती आहे.कोकणात 120 ते 130 इंच पाऊस पडतो. सातारा, माण किंवा अन्य भागात 50 से.मी.पाऊस पडतो. आमच्याकडे 120, 130 इंच पाऊस पडतो. हे पाणी कुठे जाते? पाऊस पडतो आणि ते पाणी समुद्रात वाहून जाते. कोकणातील शेती पावसावर अवलंबून असल्यामुळे पाऊस चांगला झाला तर शेती होते. ती शेती तरी कसली? भात शेती आणि गरिबी यांचे अत्यंत जवळचे नाते आहे. पॅडी ॲन्ड पॉवर्टी गोज टुगेदर हे संपूर्ण ब्रिद वाक्य आहे. आज कोकणात तीच अवस्था आहे. दारिद्रय कोकणात कां वाढले? याचे एकमेव कारण असे की,तेथे जो पाऊस पडतो त्या पावसाच्या आधारावर त्याठिकाणी शेती केली जाते. आणि येथे भात शेती शिवाय दुसरी कुठलिही शेती होऊ शकत नाही.पाऊस पडला तर शेती, पाऊस पडला नाही तर शेती करपून जाते. आज कोकणात सिंचन व्यवस्था निर्माण होऊ शकते. या ठिकाणी सिंचनाचा अनुशेष आहे.दांडेकर समितीने अहवाल दिल्या नंतर आज राज्य शासन गेली दोन-तीन वर्षे कोकणात ज्या ज्या ठिकाणी सिंचन व्यवस्था करण्यासारखी परिस्थिती आहे त्या त्या ठिकाणी लघुपाटबंधारे असतील, मोठी धरणे असतील असे प्रकल्प त्या ठिकाणी घेत आहे.

यानंतर श्री. बरवड ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

आज ही परिस्थिती संपूर्ण राज्यामध्ये आहे. काही ठिकाणी अधिक पाऊस पडतो पण त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत नाही. त्या ठिकाणी सुध्दा गरिबी आहे. ज्या ठिकाणी 120 इंच, 130 इंच पाऊस पडतो त्या ठिकाणी सुध्दा गरिबी आहे. त्या ठिकाणी सिंचन करु शकत नाही, पाणी अडवू शकत नाही. त्या ठिकाणी पावसाचे पडणारे पाणी समुद्रात जाऊन मिळते. त्यामुळे कोकण कोरडाचा कोरडाच राहिलेला आहे. ज्या ठिकाणी पाऊस पडत नाही त्या ठिकाणची तक्रार समजू शकतो. ज्या ठिकाणी पाऊस पडत नाही त्या ठिकाणची तक्रार आहेच पण आमच्याकडे अती पाऊस पडत असताना सुध्दा कोकणामध्ये दैन्यावस्था आहे. ही गंभीर परिस्थिती आहे. आज राज्याचे महसुली उत्पन्न 50 हजार कोटी रुपये आहे परंतु त्या 50 हजार कोटी रुपयांच्या महसुली उत्पन्नामध्ये या अवर्षणग्रस्त भागासाठी, कोरडवाहू शेतीला मदत करण्यासाठी आमच्याकडे काय व्यवस्था आहे ? सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम यांनी 17 टक्के सिंचनाचे क्षेत्र असल्याचे सांगितले. त्यातील 70 टक्के पाणी ऊस उत्पादनासाठी खर्च केले जाते. 70 टक्के पाण्याचा वापर फक्त ऊस उत्पादनासाठी केला जातो आणि 30 टक्के पाण्याचा वापर संपूर्ण राज्यामध्ये निरनिराळया पिकांसाठी केला जातो. असे विदारक चित्र राज्यामध्ये उभे राहिलेले आहे. सभापती महोदया, 50 हजार कोटी रुपये राज्याचे महसुली उत्पन्न आहे त्यातील 67 टक्के उत्पन्न हे राज्यामध्ये सॅलरी आणि पेन्शनवर खर्च होते. आज या राज्यामध्ये 20 लाख 67 हजार कर्मचारी शासकीय सेवेमध्ये आहेत आणि त्यांच्यावर 50 हजार कोटी महसुली उत्पन्नापैकी 67 टक्के खर्च केला जातो. 25 ते 26 हजार कोटी रुपये फक्त शासकीय कर्मचाऱ्यांचे पेन्शन आणि सॅलरी यावर खर्च करतो. बाकीची रक्कम इतर योजनांवर राज्यामध्ये खर्च करतो. आज गांभीर्याने जर हे राज्य सुधारावयाचे असेल, गरीब शेतकऱ्यांना मदत करावयाची असेल, कोरडवाहू शेतकऱ्यांना मदत करावयाची असेल तर या ठिकाणी काही स्पष्ट धोरण राज्य शासनाने घेतले पाहिजे. आंध्र प्रदेशमध्ये श्री. चंद्राबाबू नायडू यांनी 200 कोटी रुपये फक्त जलसंधारणाच्या कामासाठी ठेवले होते. त्याच्या उलट या राज्यामध्ये फक्त 30 ते 35 कोटी रुपयेच जलसंधारणाच्या कामासाठी खर्च करणार असाल तर राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. सभापती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ......

महोदया, माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, या राज्यातील कोकण असेल, विदर्भ असेल, मराठवाडा असेल, उत्तर महाराष्ट्र असेल किंवा पश्चिम महाराष्ट्र असेल, पश्चिम महाराष्ट्रामध्ये सुध्दा कित्येक तालुके अवर्षणग्रस्त आहेत, त्यांना मदत करण्याची शासनाची भूमिका असेल तर शासनाने या दुष्काळग्रस्त भागाचा, अवर्षणप्रवण भागाचा अभ्यास करावयास पाहिजे आणि त्या ठिकाणी निधीची तरतूद करुन हा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी गांभीर्याने काय विचार करु शकतो आणि कशा पध्दतीने हा संपूर्ण प्रश्न सोडवू शकतो याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

श्रीमती कांता नलावडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदया, आज या ठिकाणी नियम 97 अन्वये, जे दुष्काळग्रस्त 87 तालके आहेत त्यावर जी चर्चा सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम यांनी घडवून आणलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. सभापती महोदया, माझ्या हातामध्ये "दुष्काळाच्या मागावर" या नावाचे एक पुस्तक आहे. संपर्क संस्था या संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केलेले असून श्रीमती मेधा कुलकर्णी यांनी हे पुस्तक संपादित केलेले आहे. यामध्ये दुष्काळाचे वर्णन केलेले आहे. 1972 च्या दुष्काळाची परिस्थिती भयानक होती, भीषण होती. ज्या ज्या वेळी दुष्काळ पडतो त्या त्या वेळी या 1972 च्या दुष्काळाची आठवण तीव्रतेने होते. या पुस्तकामध्ये त्यांनी असे वर्णन केले आहे की, मोठी माणसे दुष्काळाच्या जुन्या गोष्टी सांगतात तेव्हा म्हणतात, " तेव्हाचा दुष्काळ इतका भीषण होता म्हणे की माणसानं माणूस खाल्ला".

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

कुणी त्या दुष्काळाला दुर्गादेवीचा दुष्काळ म्हणतं, कुणी म्हणतं "मरीआईचा दुष्काळ". जुन्या साहित्यात अन् लोकांच्या बोलण्यात, सांगण्यात त्या दुष्काळाची वर्णनं येतात. म्हणतात, त्या दुष्काळानं माणसं देशोधडीला लागली. आपला गाव, जमीनजुमला सोडून अन्नाच्या, पाण्याच्या दिशेनं धावली. एका एका घासासाठी, अन् पाण्याच्या थेंबासाठी माणसांनी भांडणं काढली, एकमेकांचे गळे चिरले म्हणे. ज्याच्याकडे खूप होतं त्यांनी त्या जोरावर नव्हतं त्याच्याकडूनही ओरबडलं अन् घरावर माडया चढवल्या, लुबाडलं. व्याजाचा दर कुठल्या कुठं नेला. कर्ज वसुलीत घरंच्या घरं धुवून काढली. आयाबहिणींची अब्रु पणाला लागली. इज्जतीचा लिलाव मांडला गेला. ज्यांना सहन झालं नाही त्यांनी जीव दिला. काही माणसं परागंदा झाली. होत्याचं नव्हतं केलं दुष्काळानं. असे म्हणे त्या दुष्काळानं केलं. काही माणसांचं जगणंच उखडून काढलं त्या दुष्काळानं. हे 1972 च्या दुष्काळाचा वर्णन संपर्क संस्थेने केलेले आहे. आजचा 2004 चा दुष्काळही कमी भीषण नाही. महाराष्ट्रात 87 तालुके दुष्काळग्रस्त आहेत. या 87 तालुक्यौकी काही तालुके नेहमी दुष्काळी असतात. यापैकी काही तालुक्यात गेल्या 2 वर्षापासून दुष्काळी आहेत. याच पुस्तकामध्ये या दुष्काळाचे वर्णन केले आहे. अन्नधान्याची परिस्थिती या दुष्काळी तालुक्यामध्ये कशी आहे ते त्यात दिलेले आहे. बीड, उस्मानाबाद आणि लातूर या जिल्हयात 30 टक्के लोकांच्या घरात जेमतेम दोन दिवस पुरेल इतकंच धान्य होते, 40 टक्के लोकांकडे फक्त 15 दिवस पुरेल इतका साठा होता, 20 ते 30 टक्के लोकांकडे सहा महिने पुरेल इतका साठा होता, उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यातील 70 गावातील 500 पैकी 210 कुटुंबांमध्ये 15 दिवस पुरेल इतकंच धान्य होते, बीड जिल्हयातील बीड तालुक्यातील 26 गावातील 5268 घरांपैकी 2035 घरांमध्ये जेमतेम 15 दिवस पुरेल इतका धान्य साठा होता, 1356 घरात महिनाभर पुरेल इतका आणि फक्त 120 घरांमध्ये सहा महिने पुरेल इतका साठा होता. नांदेड जिल्हयातील मुखेड तालुक्यातील 25 गावातील 788 कुटुंबांपैकी 50 टक्के कुटुंब धान्यटंचाईने ग्रस्त होते. पाण्याच्या संदर्भात या पुस्तकात माहिती देण्यात आली आहे त्यानुसार बीड, उस्मानाबाद व लातूर

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/ MHM/ SBT/

श्रीमती कांता नलावडे....

या तिन्ही जिल्हयातील बहुतेक गावांमध्ये 80 टक्के तलावं, धरणं आणि विहिरी कोरडया आढळल्या, सुमारे 60 टक्के गावांना टँकरने पाणीपुरवठा केला जात होता, परंतु तो सुध्दा अपुरा व अनियमित होता. उस्मानाबाद जिल्हयामध्ये 70 पैकी 31 गावांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होती. पण त्यासाठी किमान अर्धा कि.मी.अंतर चालून जावे लागत होते. सुमारे 95 टक्के विहिरी कोरडया होत्या. ज्यावेळी 87 तालुक्यांचा आपण विचार करतो त्यापैकी काही ठिकाणी गेल्या 4 वर्षापासून, तर काही तालुक्यांमध्ये 2 वर्षापासून दुष्काळ आहे. दुष्काळी भाग ठरवित असताना वार्षिक पर्जन्यमानाचा विचार केला जातो. ज्याठिकाणी 75 टक्के पाऊस कमी पडला आहे तो दुष्काळी भाग समजला जातो आणि जेथे 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला असेल तर तीव्र दुष्काळी भाग अशी दुष्काळासंबंधीची व्याख्या केलेली आहे. 50 पैसे किंवा 50 पैशापेक्षा कमी आणेवारी असेल त्याठिकाणी दुष्काळ आहे असे मानले जाते. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील माण, खटाव, खंडाळा आणि फलटण तालुक्याचा काही भाग हा कायम दुष्काळी आहे. याठिकाणी गेल्या दोन वर्षापासून दुष्काळ आहे असे नाही. जत, सांगली आणि आटपाडी हया तालुक्यांच्या सीमेवर 22 गावे दुष्काळी आहेत. परंतु त्या गावांमध्ये दुष्काळ असतो याची सरकार दरबारी गणतीच नाही त्यामुळे या दुष्काळी गावांना मदत मिळत नाही ती मिळाली पाहिजे. या दुष्काळामुळे गावामध्ये पिण्यासाठी पाणी नाही म्हणजे हाताला काम नाही. अशावेळेला दुष्काळी गावातील गावकरी स्थलांतर करीत असतात. खटाव व माण तालुक्यामधील गावक-यांचे कायम स्थलांतरण चालू असते. लोक ऊस तोडणीच्या कामावर, विटभट्टीच्या कामावर, बांधकामाच्या कामावर बाहेर जात असतात. तेथील ठेकेदार त्यांना काम देतात पण पुन्हा ते त्यांच्या विळख्यात अडकतात.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती कांता नलावडे पुढे सुरु...)

महिलांना तर पुरुषा पेक्षा कमी वेतन दिले जाते. महिला पुरुषांपेक्षा जास्त काम करतात. परंतु त्यांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात त्यांना वेतन मिळत नाही. दोन वर्षापूर्वी राज्यातील शेतक-यांनी दुबार, तिबार पेरण्या केल्या. प्रथम थोडासा पाऊस पडल्यानंतर शेतकरी खूष होतो आणि पेरण्या करतो. परंतु पेरण्या केल्यानंतर पाऊस न पडल्यामुळे पेरलेले बी करपून जाते. अशा प्रकारे दुबार, तिबार पेरण्या झाल्यानंतरही शेतक-यांच्या हातात काही पडत नाही. ग्रामीण भागातून पिण्याच्या पाण्याची तर भीषण अवस्था आहे. गावामध्ये पाण्याचा टँकर आल्याचे समजताच घराघरातील महिला, मुले हातात मिळेल ते भांडे घेऊन पाण्यासाठी धावत असतात. अनेक गावांतून आपण नळ पाणीपुरवठ्याच्या योजना केल्या. पाण्याच्या टाक्या बांधल्या. परंतु नळांना तोट्या लागल्याचे कुठेही दिसून आलेले नाही. पिकाची आणेवारी काढण्याची पध्दत देखील चुकीची आहे. आणेवारी ही 50 पैशापेक्षा जास्त आहे की, कमी आहे हे तलाठी ठरवत असतो. ही आणेवारी योग्य पध्दतीने काढली जात नाही. तेव्हा ही पिकाची आणेवारी काढण्याची जी पध्दत आहे त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. दुष्काळग्रस्त भागातील ग्रामस्थ रोजगार हमी योजनेच्या कामावर जातात. परंतु त्या ठिकाणी वृध्दांना मात्र काम मिळत नाही. वृध्द काम मिळेल या आशेने रोजगार हमी योजनेच्या कामावर जातात. परंतु त्यांना तेथून रिकाम्या हाताने परत यावे लागते. या रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना योग्य प्रकारे मजुरी दिली जाते काय हा देखील प्रश्न आहे. रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना मजुरी बरोबरच धान्यही दिले पाहिजे.त्यांची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. हे मजुर सकाळी कामावर जाताना सोबत एक पाण्याचा तांब्या भरुन घेऊन जातात आणि ते पाणी ते दिवसभर पुरवितात अशी मजुरांची पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत परिस्थिती आहे. या रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरांना खडी फोडण्याची कामे दिली जातात. ही कामे देत असताना त्यांना संरक्षण चष्मे दिले जात नाहीत. त्यामुळे खडी फोडणा-या कित्येत मजुरांना अंधत्व आलेले आहे. म्हणून खडी फोडण्याचे काम करीत असताना मजुरांना डोळयांचे संरक्षण करणारे चष्मे दिले गेले पाहिजेत.

सभापती महोदय, दारिद्रय रेषेखालील लोकांचा सर्व्हे योग्य प्रकारे झालेला नाही हे मला येथे नमूद करावयाचे आहे. यासंदर्भात मी माण तालुक्यातील एक उदाहरण देते. मी जेव्हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती कांता नलावडे पुढे सुरु...)

गुरांच्या छावण्याला भेट दिली होती त्यावेळी तेथील एका दलित महिलेने मला सांगितले की, त्या दारिद्र्य रेषेखाली आहेत. परंतु त्यांचे नाव दारिद्र्य रेषेखालच्या यादीमध्ये नसल्यामुळे स्वस्त धान्य मिळत नाही. आम्ही रोजगार हमी योजनेच्या कामावर जाऊन कशी तरी पोटाची खळगी भरतो. त्या महिलेने पुढे मला असे सांगितले की, "मी जेव्हा गुरांच्या छावण्याकडे पाहते त्यावेळी गुरांना निदान खायला चारा आणि प्यायला पाणी तरी मिळते, पण आम्हाला 20-20 दिवस रोजगार हमी योजनेच्या कामावर राबून नीट मजुरी मिळत नाही आणि पोटाला अन्नही मिळत नाही. त्यामुळे मी मानवाच्या जन्मी येण्या ऐवजी जनावर झाले असते तर बरे झाले असते". अशा करुण व्यथा त्या दलित महिलेने माझ्या समोर मांडल्या. तेव्हा रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना अन्नधान्य मिळाले पाहिजे आणि कामाच्या ठिकाणी त्यांची पिण्याच्या पाण्याची सोय झाली पाहिजे, मजुरांना ओळखपत्रे दिली पाहिजेत असे मला शासनाला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मी जेव्हा गुरांच्या छावण्या पाहिल्या त्यावेळी एकेका छावणीमध्ये मला साडेतीन हजारापर्यन्त गुरे दिसून आली. त्या छावण्यातून गुरांना चारा म्हणून उसाचे वाड दिलेले होते. उसाचे वाड खाऊन त्या जनावरांच्या तोंडाला इतके चरे पडले होते की, त्यामुळे ती जनावरे पाणी देखील पिऊ शकत नव्हती. अनेक गर्भार म्हशी मृत देखील झाल्या होत्या. अशा प्रकारे गुरांच्या छावण्यांची स्थिती मला आढळून आली. मोठ्या जनावरांसाठी 30 रु. आणि लहान जनावरांसाठी 15 रुपये द्यावयाचे होते. हे पैसे खरोखर दिले गेले आहेत काय असा माझा शासनाला सवाल आहे. गुरांच्या छावण्यामध्ये गुरे सोडल्यानंतर त्यांची राखण करण्यासाठी रोज एक माणूस तेथे असायचा आणि त्याच्या पत्नीने घराकडून त्याच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था करायची. म्हणजे एकेका घरातील दोन दोन माणसे त्या ठिकाणी राबायची. जी माणसे तेथे गुरांची राखण करण्यासाठी म्हणून थांबायची त्यांच्याकडूनच तेथील कामे करुन घेतली जात होती. अशी एकूण या गुरांच्या छावण्यांची अवस्था मला पहायला मिळाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...नंतर श्री. गिते...

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 18:05

श्रीमती कांता नलावडे...

सभापती महोदया, राज्यात दारिद्रयरेषेखालील लोक आहेत. त्यांच्या बाबतीत शासनास काही उपाययोजना करावयाच्या असतील तर दारिद्रयरेषेखालील कुटुंबाची यादी प्रत्येक ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लावली पाहिजे. या गावात किती कुटुंब दारिद्रयरेषेखालील आहेत याची लागलीच माहिती मिळू शकेल. तसेच स्वस्त धान्यांची दुकाने आहेत त्या ठिकाणी सुध्दा दारिद्रयरेषेखालील यादी लावता आली पाहिजे. सभापती महोदया, जत आणि आटपाडी या गावातील गुरांच्या छावण्यानां आणि रोजगार हमी योजनेच्या कामांना मी भेटी दिल्या. रोजगार हमी योजनेच्या कामावर किती तास काम केले तर किती मजुरी मिळते, तसेच पुरुषांना किती रोज दिला जातो, महिलांना किती रोज दिला जातो, इत्यादि माहितीचे बोर्ड रोजगार हमी योजनेची ज्या ठिकाणी कामे सुरु आहेत तेथे लावली गेली पाहिजेत. परंतु तसे बोर्ड मला कुठेही आढळून आले नाहीत. माण तालुक्यात एका ठिकाणी बंधारा बांधण्याचे काम चालू होते. तेथील काही महिला मजूर मला येऊन भेटल्या. त्यांनी मला येऊन सांगितले की, आम्हाला सही करता येते. परंतु आम्हाला सहया घेतल्या जात नाहीत. परंतु पगारपत्रकावर आमचे अंगठे घेतले जातात. मजुरी देण्यासाठी ठेकेदार रात्री 11.00 वाजेपर्यन्त मुद्दाम थांबवितो. अशा पध्दतीने रोजगार हमी योजनेवरील महिला मजुरांची पिळवणूक होत आहे. या बाबतीत अतिशय संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. आपल्याला पाण्यांच्या बाबतीत विचार करावयाचा झाला तर इंटर स्टेट ॲवार्ड नद्यांच्या बाबतीत मग ती गोदावरी नदी असेल, तापी नदी असेल, कृष्णा नदी असेल या नद्यांचे पाणी आपल्या राज्यालाच उपलब्ध झाले पाहिजे. महाराष्ट्र राज्याच्या वाटयाचे जे पाणी आहे ते विविध लवादाच्या माध्यमातून दुस-या राज्यांना मिळते. आपल्या राज्यास मोठया प्रमाणात पाणी उपलब्ध झाले पाहिजे आणि आपले नुकसान होता कामा नये या गोष्टीकडे लक्ष देण्याची गरज आहे. यातील बहुतांशी पाणी दुष्काळी भागास कसे उपलब्ध करुन देऊ शकतो यादृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. पाण्यावरील आपला हक्क गेला तर दुष्काळी भाग हा कायमचा दुष्काळी राहील. या कामासाठी निधी उपलब्ध करुन दिला नाही तर आपल्या राज्यातील दुष्काळी भागास पाणी सुध्दा उपलब्ध होऊ शकणार नाही. इंटर स्टेट ॲवार्डच्या ज्या नद्या आहेत तेथील पाणी मोठया प्रमाणात अडविले पाहिजे. या नद्यातून अडविलेल्या पाण्याचा आपण शेतीसाठी उपयोग करुन घेतला तर निश्चितपणे दुष्काळावर मात करु शकतो. महाराष्ट्र सरकारने दुष्काळ निवारण करण्यासाठी अलिकडे काही निर्णय घेतलेले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 18:05

श्रीमती कांता नलावडे..

आहेत. राज्यातील कृषी पंपांना मोफत विद्युत पुरवठा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ही घोषणा 17 ऑगस्ट, 2004 रोजी विधानसभेच्या निवडणुकींच्या तोंडावर झाली होती. राज्यात 23 लाख कृषी पंपधारक आहेत. त्यांना लागणा-या विजेची किंमत 200 कोटी रुपये एवढी आहे. मोठे आणि मध्यम शेतक-यांच्याच फायद्याचा हा निर्णय आहे. गरीब आणि लहान शेतक-यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यांच्यासाठी काही शासन वेगळा विचार करणार आहे काय याचा खुलासा या ठिकाणी करण्यात आला पाहिजे. आंध्र प्रदेश सरकारने मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला होता. परंतु तो निर्णय त्यांना नंतर मागे घ्यावा लागला. आत्महत्या केलेल्या शेतक-यांना 1 लाख रुपयांची मदत शासनाने जाहीर केलेली आहे. एखाद्या शेतक-याने आत्महत्या केली तर त्याचे आत्महत्येचे कारण वेगळेच सांगितले जाते. तो शेतकरी दारु पीत होता, तो व्यसनी होता अशी कारणे पुढे करुन त्या शेतक-यांना मदत देण्याचे शासनाने टाळलेले आहे.आतापर्यन्त 30 लाख रुपये आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत करण्यात आलेली आहे असे शासनाकडून सांगितले जाते. परंतु अजुनही आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना अद्याप मदत दिली गेलेली नाही त्यांना तात्काळ मदत दिली गेली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. शेतक-यांकडील 211 कोटी 14 लाख रुपये व्याज माफ करण्याची घोषणा शासनाने केली. परतु दुष्काळग्रस्त भागातील गावांसाठी ज्या योजना आहेत त्या योजना सरकारने तातडीने सुरु केल्या पाहिजेत असे मला वाटते. विदर्भ, मराठवाडा, कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र या सगळया भागात हे दुष्काळी 87 तालुके आहेत. या 87 दुष्काळग्रस्त तालुक्याना समन्यायी मदत मिळावी अशी आपली सर्वांची इच्छा आहे. परतु या वर्षाच्या दुष्काळाकडे सरकारने जेवढया गांभीर्याने पहावयास पाहिजे तेवढया गांभीर्याने पाहिजे जात नाही...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 18:10

श्रीमती कांता नलावडे ..

आज या चर्चेच्या माध्यमातून मी शासनाला एकच विनंती करणार आहे की, एका विभागाला कमी आणि एका विभागाला जास्त पैसा असे न करता सर्व विभागांचा समानतेने विचार व्हावा. दुष्काळाच्या भीषणतेमुळे लोक गावातून स्थलांतरीत होत आहेत. त्यांच्या आयुष्याचे वाभाडे निघत आहेत. मुला-मुलींचे शिक्षण अपुरे रहात आहे. महिलांची अब्रू वेशीवर टांगली जात आहे. या सर्व गोष्टी गांभीर्याने घेऊन शासनाने याकडे संवेदनशील दृष्टीने पहावे आणि तातडीने जास्तीत जास्त उपाययोजना करावी अशी विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 18:10

श्री. वसंतराव काळे(औरंगाबाद विभाग शिक्षक ): सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कायम दुष्काळी विभाग असलेल्या आणि पाण्याच्या संबंधी अतिशय तीव्र परिस्थिती असलेल्या प्रश्नासंबंधी या चर्चेच्या माध्यमातून मा.सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की,दरवर्षी दुष्काळ,पाणी टंचाई या संदर्भामध्ये सभागृहात तसेच सभागृहाच्या बाहेर आणि सरकारी पातळीवर सुध्दा जसजसे प्रश्न येतील तसतशी चर्चा होत राहते आणि जेवढा प्रश्न समोर आला तेवढयापुरतेच तात्कालिक उपाय योजले जातात. परंतु दीर्घकालीन आणि कायम स्वरुपाचे उपाय न केल्यामुळे या महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्यासाठी पाण्यासारखा पैसा खर्च झाला परंतु पाणी मिळू शकले नाही. आजही अनेक गावामध्ये पाण्याचे सोअर्स उपलब्ध नाहीत. आटलेले आहेत. मराठवाडयामध्ये अतिशय भीषण परिस्थिती आहे. मोठया नद्या नाहीत,मोठी धरणे नाहीत. जायकवाडी,गोदावरी यासारखी धरणे आहेत. गोदावरी धरण यावर्षी अपघाताने भरले आहे. वरती नाशिक विभागामध्ये पडलेले पाणी जास्त झाल्यामुळे गोदावरीला मिळू शकले. गेली 10-15 वर्षांची परिस्थिती पाहिली तर गोदावरीमध्ये पाणी येऊन आता गोदावरीत असलेले पाणी शेतीला मिळू शकत नाही. लातूर,उस्मानाबाद सीमारेषेवर धनेगांव प्रकल्प आहे. गोदावरी,धनेगांव,सिध्देश्वर,उर्ध्व पैनगंगा हे सगळे प्रकल्प शेतीच्या पाण्यासाठी बांधले गेले. परंतु दुर्देवाने आज या प्रकल्पामध्ये असलेले पाणी सिंचनासाठी उपलब्ध होऊ शकत नाही. याचे कारण असलेले पाण्याचे साठे हे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी वापरावे लागत आहेत. माझी सरकारकडे अशी मागणी आहे की, या सगळया धरणांचे नामकरण वॉटर सप्लाय टँक असे करावे. कारण शेतीला पाणी मिळू शकत नाही. मराठवाडयात पाणीच नाही. पाऊस पडत नाही. जमिनीमध्ये 600-700 फूट खोल बोअर घेतली तरी पाणी उपलब्ध होत नाही. सर्व नद्या आणि धरणे तसेच पाझ ार तलाव कोरडे पडले आहेत. फक्त गोदावरीमध्ये अपघाताने पाणी आहे. अजून 2-3 महिने जायचे आहेत. या परिस्थितीमध्ये मराठवाडयामध्ये पाण्यासाठी दंगली होतील. गेल्यावर्षी पाण्याच्या प्रश्नावर अनेक ठिकाणी एकमेकांची डोकी फोडण्यात आली होती. दलित समाज यामध्ये भरडला जातो. दलित माणसाला पाणी आणण्यासाठी पाणी असलेल्या ठिकाणी गेल्यानंतर सवर्ण मंडळींकडून त्यांच्यावर हल्ले होतात. एक-दोन ठिकाणी अशा प्रकारच्या घटना घडल्या आणि दलितांच्या हत्या झ ाल्या.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव काळे .....

पाण्याच्या प्रश्नावरुन हत्या झालेल्या आहेत. एका अर्थाने यातून गावा गावामध्ये सामाजिक तणाव निर्माण होत असतात. ज्या गावात पाण्याचे सोर्स नाहीत त्या गावासाठी टॅन्कर्स मार्फत पाणी आणत असतांना व दुस-या गावातील पाण्याच्या स्त्रोतातून टॅन्कर्स भरत असतांना त्या गावातील लोक टॅन्कर्स भरु न देण्यासाठी टॅन्कर्स अडवत असतात. तेव्हा अशा प्रकारची स्थिती निर्माण झालेली असतांना यावर कायम स्वरुपी, दीर्घ कालीन उपाययोजना सरकारने केलेली आहे असे अजून काही घडलेले नाही. 1972 सालापासून आता पर्यन्त जेव्हा जेव्हा दुष्काळ पडला किंवा पाणी टंचाई निर्माण झाली तेव्हा तेव्हा सरकारने तात्कालीक उपाययोजना केल्या व मलमपट्टी लावण्याचे काम केले परंतु ऑपरेशन करुन हा रोग कसा दुरुस्त करावा यासाठी कोणतीही उपाययोजना केलेली नाही. अवर्षण ग्रस्त तालुक्यांचा अभ्यास करण्याकरिता निरनिराळे कमिशन स्थापन करण्यात आले होते. त्यांनी यासंबंधीचा अभ्यास केला परंतु यातून आपल्या पदरात काही पडले आहे असे दिसून येत नाही.तेव्हा या चर्चेच्या निमित्ताने माझी शासनाकडे अशी मागणी आहे की, या संदर्भात एकदा शांत चित्ताने विचार करुन कायम स्वरुपी व दीर्घकालीन उपाययोजना आखून भुकेलेल्या आणि तहानलेल्या भागाला पाणी कसे देता येईल यासाठी गंभीरपणे विचार केला पाहिजे .यंदाचा दुष्काळ हा पाणी टंचाईची तीव्रता असलेला दुष्काळ आहे.पाणी टंचाईमुळे लोक मरतील, जनावरे मरतील तेव्हा जनावरे आणि माणसे मरु नयेत यासाठी काय करता येईल ? कोणती ठोस उपाययोजना आखता येईल ?यांसंबंधी सरकारने गंभीरपणे विचार केला पाहिजे. परंतु दुर्देवाने त्या दृष्टीने काहीही घडत नाही ही खंत मी या ठिकाणी या निमित्ताने व्यक्त करीत आहे.सभापती महोदया, शेती हा विषय सरकारच्या अंजेंडयावरुन दुर्लक्षित पध्दतीने मागे पडत चालला आहे. सरकार कोणासाठी चालले आहे? याचा शोध घेण्याची आता वेळ आली आहे.हे सरकार पुरोगामी आहे . प्रागतिक योजनांसाठी हजारो रुपये खर्च करण्याकरता शासनाकडे पैसे आहेत. त्यामुळे शासनाकडे पैसे नाहीत असे म्हणता येणार नाही.माननीय अर्थमंत्री मोठया गौरवाने आणि अभिमानाने असे सांगत असतात की तिजोरीतील खडखडाट आता संपला असून तिजोरीत आता खणखणाट आहे. मला त्याचा आनंद आहे.परंतु त्याचा लाभ या शेतक-यासाठी आणि शेतीसाठी होत नाही. बजेटच्या दोन टक्के तरी रक्कम आज शेतीसाठी खर्च केली जाते काय ?हा संशोधनाचा विषय आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी असे सांगितले की,

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत काळे ...

त्या त्या विभागासाठी जेवढी रक्कम खर्च होत असते त्यातील 70 टक्के रक्कम कर्मचा-यावर खर्च केलीजाते .त्यामुळे शेतीवर प्रत्यक्षात किती पैसे खर्च होत असतो हा सुध्दा संशोधनाचा विषय आहे.आपण शेतक-याचे पूत्र आहोत असा अभिमान बाळगणारे, दुस-याला निरुत्तर करण्यासाठी आम्हीच शेतक-याचे पूत्र आहोत असा अविर्भाव आणणारे  जे आमचे भाऊबंद या ठिकाणी बसलेले आहेत त्यांनी शेतकरी कसा मातीत चालला आहे हे एकदा डोळे उघडे ठेऊन पाहिले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.एखादी दुर्घटना घडली तर हजारो किंवा लाखो रुपयांची मदत केली जाते परंतु शेतक-यांसाठी मात्र अशी मदत दिली जात नाही. आमच्या मराठवाडयात गारपीट झाली होती तरी सुध्दा शेतक-यांना पाच पैशाची मदत दिली गेली नाही. एखाद्या शेतक-याचे पीक उद्ध्वस्त झाले तर त्या शेतक-याला पाच पैशाची मदत दिली गेली नाही. उलट आज आपले कायदे असे आहेत की जर दुष्काळ पडला असेल तर दुष्काळ पडला आहे हे सिध्द करावे लागते.ते सिध्द करण्यासाठी 50 टक्क्यापेक्षा  कमी आणेवारी आहे किंवा नाही हे शासन पाहत असते.सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी एका गोष्टीचा उल्लेख केला होता त्यामुळे मला थोडे बरे वाटले.कधी तरी एकदा सरकारने याचा विचार करावा. 50 टक्यापेक्षा कमी आणेवारी येणार नाही यासाठी उपाययोजना केली जात आहे.50 टक्यापेक्षा कमी आणेवारी येणार नाही यासाठी रेडीमेड कार्यक्रम असतो.पीक विमा योजनेसाठी शेतक-यांकडून पैसे गोळा केले जातात आणि त्या योजनेमध्ये असे सांगितलेले आहे की ,50 टक्के पेक्षा कमी आणेवारी असेल तरच त्या योजनेचा लाभ त्या शेतक-याला होईल. 50 टक्यापेक्षा कमी आणेवारी आणण्याचा कार्यक्रम हा सुध्दा सरकारचा असतो. महसूल खात्याचे हे काम आहे आणि ते स्टिरिओ टाईप पध्दतीने काम करीत असते.त्यामुळे 50 टक्कयापेक्षा कमी आणेवारी येत नाही. साहजिकच त्या शेतक-याला काहीही फायदा मिळत नाही. 50 टक्यापेक्षा कमी आणवारी आली असल्यामुळे टंचाई नाही असे सांगितले जाते व त्याला काहीही मदत मिळत नाही. ही एक प्रकारची अडथळयाची शर्यत असल्यामुळे ग्रामीण  भागामध्ये टंचाईच्या परिस्थितीत  शेतक-याला शेतीसाठी मदत मिळते मिळत नाही तसेच पिण्याच्या पाण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध  करुन दिली जात नाही.

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव काळे ....

हे जे सगळे प्रश्न आहेत यासाठी दुरूस्ती केली पाहिजे आणि मुलभूत प्रश्नांकडे लक्ष दिले पाहिजे. यासाठी मी काही उपाय योजना मराठवाड्याच्या संदर्भात सरकारकडे मागू इच्छितो आणि या उपाय योजना कराव्यात अशी विनंती करतो. माझी पहिली सूचना अशी आहे की, कोकणातील पडणारे अतिरिक्त पाणी हे समुद्रात वाहून जाते. आता जग एवढे पुढे गेले आहे की, हे वाहून जाणारे पाणी आपण प्रयत्न केला तर निश्चितपणे अडवू शकतो, त्याचा वापरू करू शकतो. चीन हा आपल्यानंतर एक वर्षांनी स्वतंत्र झाला पण त्याने तेथे एक महाकाय धरण .. फ्री गॉजेज धरण बांधले. आणि त्यातील पाणी मोठी पाईपलाईन टाकून दूर अंतरावर नेले आणि त्याद्वारे शेतीला आणि पिण्याच्या पाण्यासाठी दिले. आमच्याकडेसुद्धा धनेगाव धरणातील पाणी 60 कि.मी. अंतरावर नेलेले आहे. तेव्हा त्याचा एक पायलट प्रोजेक्ट म्हणून आपण विचार करावा. कोठल्याही धरणाचे पाणी हे कालव्यातून सोडण्यापेक्षा बोगदा करून त्यातून पाईपलाईन टाकून त्याद्वारे दूर अंतरावर नेण्याची पध्दत आपण सुरू केली पाहिजे. कारण त्यातून मोठ्या प्रमाणात लॉसेस होतात ते सारे यामुळे बंद होतील. आज पाणी हे सोन्यासारखे आहे असे समजून यापुढे धारणातील पाण्याचा शेतीसाठी आणि पिण्यासाठी म्हणून द्यायचे असेल तर चाऱ्या आणि कालवा पध्दतीने पाणी द्यायचेच नाही असा ठाम विचार आपण केला पाहिजे. आपणा सर्वांनाच हे माहीत आहे की, चाऱ्या आणि कालवा पध्दतीने पाणी देण्याने किती पाणी आणि पैसा हा वाया जातो. चाऱ्या दुरूस्तीसाठी तर दरवर्षी लाखो रुपये खर्च होतात आणि तरीही त्या चाऱ्या दुरूस्त होतात की नाही याची मला कल्पना नाही पण कोणाची तरी घरे भरण्याची मात्र त्यातून जरूर व्यवस्था होते आणि मग कधी तरी अमुक अमुक अधिकाऱ्यांच्या घरी इतकी करोड रुपयांची संपत्ती सापडली म्हणून बातमी येते. म्हणून मुलभूत पध्दतीने धरणाचे पाणी शेतीसाठी आणि पिण्यासाठी म्हणून देण्याकरिता पाईपलाईन उपलब्ध करूनच पाणी दिले जावे. म्हणजे त्यामुळे एका थेंबाचा देखील लॉस होणार नाही आणि हे पाणी देतानाही ते स्प्रिंकल किंवा ठिबक सिंचन पध्दतीनेच वापरले गेले पाहिजे असे बंधन टाकले गेले पाहिजे. अध्यक्ष महोदया, आमच्या उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये ठिबक सिंचनाचे संच दिले गेले होते आणि त्यावेळी सांगितले गेले की, तुम्हाला यावर सबसिडी मिळेल. परंतु सरकारला ती सबसिडी देण्यासाठी आज पर्यंत सवड मिळाली नाही की सरकारकडे पैसा उपलब्ध झाला. परिणामत: त्या शेतकऱ्याला आजपर्यंत सबसिडीचे पैसे मिळालेले नाहीत आणि त्यामुळे जेवढी रक्कम त्याने

...... 3वाय 2 ...

श्री. काळे .....

त्यासाठी कर्जाने घेतली होती त्यापेक्षा तीनपट रक्कम त्याला व्याजाने भरावी लागली. शेतकरी उध्वस्त करण्यामध्ये शेतकऱ्यांच्या नावाने मळवट भरलेले हे आमचे येथील प्रतिनिधी शेतकऱ्यालाच पायदळी तुडविण्याची भूमिका घेणार असतील तर या चर्चेच्या माध्यमकातून हे आमचे सरकार असले तरी देखील अतिशय कडवटपणे मला येथे सांगावे लागते आहे की, तुम्ही ज्यांच्या मतावर येथे निवडून आला आहात त्या शेतकऱ्याला, गरीब माणसाला विसरू नका., ही माझी आपल्यापुढे प्रार्थना आहे. अध्यक्ष महोदया, उस्मानाबाद जिल्ह्यातील हे उदाहरण मी येथे मुद्दाम दिले आहे. तेथील शेतकऱ्याला ठिबक सिंचनाच्या संचाचे पैसे का दिले नाहीत याचाही विचार आपण केला पाहिजे. आपल्याकडील असलेले पाणी हे प्रथम पिण्यासाठी आणि शेतीसाठी दिले गेले पाहिजे. हा लातूर पॅटर्न आहे आणि आमचे मुख्यमंत्री लातूरचेच असल्यामुळे त्यांनी ही योजना राबविली आणि ती यशस्वी झाली आहे. तेव्हा महाराष्ट्रासाठी ती योजना एक पायलट प्रोजेक्ट म्हणून बघितली जावी. पिण्यासाठी आणि शेतीसाठी पाणी पाईपलाईन द्वाराच नेणे आणि तेथे ठिबक सिंचनानेच दिले गेले तर त्या पाण्याचा पुरेपूर उपयोग होईल आणि योग्य प्रकारे ते वापरता येईल. तेव्हा या दृष्टीने आपण उपाय योजना केली पाहिजे. दुसरे म्हणजे कोकणातील जे अतिरिक्त पाणी आज समुद्रात वाहून जात आहे त्यामुळे कोकण तर कोरडा राहिलाच आहे. पण त्या पाण्याचा उपयोग करून घेण्याचा आपण विचार केला पाहिजे, प्रयत्न केला पाहिजे. ते पाणी बोगदा करून टर्बाईन पध्दतीने उचलून आणले, घाटमाथ्यावर आणले, घाटापलिकडे आणले तर ते साऱ्या महाराष्ट्राला मिळू शकेल. उजनी धरणाचे पाणी आम्हाला देण्याचे सरकारने यापूर्वीच मान्य केलेले आहे पण अजून पर्यंत ते आम्हाला मिळालेले नाही. आता राज्याचे मुख्यमंत्री मराठवाड्याचे आहेत त्यामुळे मराठवाड्याला उजनी धरणाचे पाणी मिळावे या साठी त्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. आज आम्ही हे पाणी मागितले की, लगेच आम्ही प्रादेशिक ठरतो. ....

( यानंतर श्री. जागडे ..... 3झेड 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत काळे....

महाराष्ट्राचे विघटन करावे, अशी आमची भूमिका नाही. महाराष्ट्र आम्ही एक समजतो. म्हणूनच आमच्या भागातील गरीब शेतक-यांना पाणी मिळाले पाहिजे. म्हणून महाराष्ट्र एक आहे, असे आपण सगळ्यांनी समजले पाहिजे. सभापती महोदय, आमच्याकडे कोणतीही भेदभावाची भूमिका नाही. परंतु ज्यांच्या हातात हे सारे आहे, त्यांनी जर भेदभावाची भूमिका ठेवली तर ते योग्य नाही. ही बाब या सभागृहाच्या माध्यमातून आपल्या नजरेसमोर आणणे हे माझे कर्तव्य आहे. आम्हाला आमचा हक्क म्हणून 60 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे. कृष्णा खो-यामध्ये फक्त 200 टीएमसी पाणी होते. परंतु मराठवाडा सामील झाल्यानंतर म्हणजेच नवा महाराष्ट्र निर्माण झाल्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन 600 टीएमसी पाणी राज्याला मिळाले. म्हणजे चारशे टीएमसी पाणी वाढले. हे पाणी मराठवाडा सामील झाल्यानंतर महाराष्ट्राला 600 टीएमसी पाणी मिळाले असेल तर मराठवाड्याला 10 टक्के हिस्सा म्हणजेच 60 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे. सभापती महोदय, मी या ठिकाणी बोलत असताना मुळशी धरणाचे मी उदाहरण देईन. टाटा इलेक्ट्रिक कंपनीला मुळशी धरणातील पाणी वापरण्यासाठी परवानगी दिली होती. परंतु कराराच्या पलिकडे जाऊन टाटा इलेक्ट्रिक कंपनी पाणी वापरते. यावर सरकारचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. सरकार त्यांना सरंडर झाले आहे. आता तेथील पाणी पुण्यामध्ये आणा, उजनीमध्ये आणा. आणि हे पाणी मराठवाड्याला द्या. अशा प्रकारच्या अनेक उपाययोजना आपणाला करता येऊ शकतात. सरकारने गंभीर व्हावयाचे, चिंतन करावयाचे, मुलभूत धोरणांचा विचार करावयाचा. शेतकरी आपला आहे, असे सरकारने कधीतरी ठरविले पाहिजे. आता ही वेळ या सरकारने वाया घालविली तर पुढची पिढी दुष्काळाच्या परिस्थितीत पाण्याचा टाहो पडून मरेल. आज उन्हाळ्यांत माणसे आणि जनावरे पाण्यासाठी स्थलांतर करीत आहे. म्हणून सरकारने अत्यंत गंभीरपणाने आणि अग्रक्रमाने हा विषय अजेंड्यावर घ्यावा तसेच दूरगामी विचार आखण्याचा प्रयत्न करावा, अशी नम्रतापूर्वक प्रार्थना करतो. आणि माझे दोन शब्द संपवितो.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ( सहकार, पुनर्वसन व मदत मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर सदनात चर्चा घडवून आणली आहे. मा. सदस्य श्री. वसत काळे यांनी सांगितल्याप्रमाणे या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली आहे. प्रायोरिटीचा विषय घेऊन याबाबत ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता होती, ते मात्र ज्या प्रमाणात आणि ज्या पध्दतीने व्हावयला पाहिजे होते, ते झालेले नाही. या चर्चेमध्ये माननीय सदस्य श्री धनाजी साठे, श्रीमती कांता नलावडे, श्री. गुरुनाथ कुळकर्णी, श्रीमती फौजिया खान यांनी भाग घेतला आहे.

सभापती महोदय, 87 दुष्काळी तालुक्याचा विषय या ठिकाणी मांडला आहे. यावर अनेक कमिशन्स झाली आहेत. बर्वे, सुखटणकर, सुब्रहमण्यम् कमिशन झाली आहेत.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम....

या सर्व माननीय सदस्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यांचा 87 आकडा आता राहिला नसून तो वाढत 147 पर्यंत गेला आहे. उपग्रहावरुन केलेल्या पहाणीनुसार पाण्याची पातळी सातत्याने खाली जाऊ लागली आहे व दुष्काळी तालुक्यांच्या संख्येमध्ये सतत वाढ होत राहिली आहे. या बाबतीत ठोस कायम स्वरुपी विचार करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने सरकारने निरनिराळया घोषणा केल्या. टँकरमुक्त महाराष्ट्र करण्याची घोषणा केली परंतु महाराष्ट्र टँकरमुक्त झाला नाही. पिण्याच्या पाण्यासाठी प्रचंड खर्च करण्यात आला, जनावरांच्या चाऱ्यासाठी प्रचंड खर्च झाला. परंतु दुष्काळी तालुक्यातील दुष्काळ काही हटू शकला नाही. माननीय सदस्य श्री. वसंतराव काळे म्हणाल्याप्रमाणे वैधानिक विकास मंडळे आली त्यामध्ये विकासाची चर्चा झाली. महाराष्ट्रामध्ये कायम स्वरुपी दुष्काळी भाग आहे त्या ठिकाणी निश्चित स्वरुपामध्ये टाईम बाऊंड कार्यक्रम करण्याची वेळ आली आहे. त्या संदर्भात हे शासन ताबडतोब जलद गतीने दोन्ही सदनातील माननीय विरोधी पक्ष नेते व काही तज्ज्ञ मंडळींची बैठक उद्याच घेणार आहोत. आणि त्या ठिकाणी एकमताने सर्वांना विश्वासात घेऊन कायम दुष्काळी भाग असलेल्या तालुक्यांमध्ये टाईम बाऊंड कार्यक्रम आखण्याची शासनाची तयारी झाली आहे. वर्षानुवर्षे येतो पावसाळा, त्या प्रमाणे वर्षानुवर्षे येतो दुष्काळ व त्यावर सदनामध्ये चर्चा होते. त्यावर तात्पुरता इलाज केला जातो. काही ठिकाणी टँकर लावले जातात, जनावरांसाठी छावण्या उघडल्या जातात, रोजगार हमी योजनेची कामे सुरु होतात. परंतु हा प्रश्न कायम स्वरुपी सोडविण्यासाठी निश्चितपणे विचार करण्याचा शासनाचा मानस आहे. त्या दृष्टीकोनातून विरोधी पक्षाच्या काही प्रमुख नेत्यांना या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींना विश्वासात घेऊन हा कार्यक्रम आखण्याची भूमिका शासनाने निश्चित स्वरुपात मनामध्ये आणली आहे. आणि म्हणून केव्हा तरी, कधी तरी असे न करता येत्या एक-दोन दिवसात त्या संबंधी बैठक घेतली जाईल. त्या बैठकीतून सर्वांना मान्य असणारा व दुष्काळी भागासाठी ठोस उपाय सुचविणारा कार्यक्रम निश्चितपणे घेतला जाईल. माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांनी सांगितल्याप्रमाणे 87 दुष्काळी तालुक्यांच्या प्रश्नावर यापूर्वी अनेक कमिशने झाली, परंतु ठोस स्वरुपाची उपाययोजना आखली गेली नाही. निश्चितपणे ठोस उपाय योजले जातील व या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम....

दुष्काळाच्या प्रश्नाच्या बाबतीत कायम स्वरुपी एक रेमिडी घेतली जाईल असे या सदनाला मी अभिवचन देतो. व याबाबत एक - दोन दिवसात सर्वांना एकत्र बोलावून चर्चा करुन तो निर्णय या सदनामध्ये जाहीर केला जाईल असे सांगून माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मंत्रिमहोदयांनी ठोस निर्णय घेण्याचे आश्वासन सभागृहाला दिले आहे. मला वाटते की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 55 वर्षे या महाराष्ट्राने पाच दुष्काळ पाहिल्यानंतर शासनाला या संबंधी गांभीर्याने विचार करावासा वाटला. या चर्चेची फलनिष्पत्ती झाली असे मी समजतो. या बाबतीत या सभागृहाला एक आवर्जून सांगितले पाहिजे की, या 87 तालुक्यामध्ये 66 तालुके पश्चिम महाराष्ट्रातील आहेत, 18 तालुके मराठवाडयातील आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम . . . .

विदर्भाचे फक्त 12 तालुके, बुलढाणा जिल्हयातील 1-2 तालुके याबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे. 1970 ते 1973 ही तीन वर्षे सलग दुष्काळ पडला, त्या काळात महाराष्ट्रात ज्या जिल्हयात, ज्या तालुक्यात दुष्काळ होता, त्या सर्वच तालुक्यांच्या बाबतीत आपल्याला विचार करावा लागेल. कारण 26 जिल्हयापैकी 23 जिल्हे सातत्याने तीन वर्षे दुष्काळात होरपळून निघालेले आहेत. त्यामुळे सुखटणकर समितीने 83 तालुके दुष्काळग्रस्त म्हटले होते. नंतर त्यात महाराष्ट्र शासनाने 4 तालुक्यांची भर घातली आणि ही संख्या 83 वरुन 87 पर्यंत गेली. आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, ही संख्या जवळजवळ 146 पर्यंत गेलेली आहे. त्यामुळे मला असे वाटते की, याबाबतीत योग्य ते निकष लावून, कोणत्याही भागातील शेतक-यांमध्ये भेदभाव करावयाचा नाही. हा शेतकरी पश्चिम महाराष्ट्राचा, हा शेतकरी विदर्भाचा, हा शेतकरी मराठवाडयाचा असा भेदभाव करता कामा नये. तर संपूर्ण महाराष्ट्राचा हा शेतकरी आहे असे समजले पाहिजे. विशेषत: कोरडवाहू जमिनीवर शेती करणा-या शेतक-याची दु:खे अगणित आहेत. त्यामुळे मी शासरनाला अशी नम्र विनंती करीन की, संपूर्ण महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतीचा प्रश्न हा आपल्या सर्वांचा प्रश्न आहे असे समजून या बाबींकडे लक्ष देण्यात येईल आणि त्या शेतक-याला न्याय देण्याचा आपण पूर्णपणे प्रयत्न कराल अशी आशा करतो आणि माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो.

**तालिका सभापती(श्रीमती सुधा जोशी)** : आता अल्पकालीन चर्चा संपलेली आहे.

------

. . . .4 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्ध्या तासाच्या चर्चेसंबंधी

**तालिका सभापती** : आज आपल्यासमोर अर्ध्या तासाच्या चार चर्चा आहेत. त्यासंदर्भात सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे काय म्हणणे आहे ?

प्रा.बी.टी.देशमुख(खाली बसून) : या चर्चा नंतर घ्याव्यात.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदया, नंतर नको. अर्ध्या तासाच्या चार चर्चेपैकी दोन अर्ध्या तासाच्या चर्चा या माझ्या विभागाशी संबंधित आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे आणि सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांच्या अर्ध्या तासाच्या चर्चा आज घेण्यात याव्यात.

श्री.विनोद तावडे(खाली बसून) : आज नको. एका बैठकीसाठी जावयाचे आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना बैठकीसाठी जावयाचे आहे. तेव्हा याबाबतीत आपले काय म्हणणे आहे ?

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, आज 7.00 वाजता या सभागृहातील आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी एका कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. जलविहार कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.

एक सन्माननीय सदस्य : सभापती महोदया, या चर्चा पुढच्या अधिवेशनात ठेवाव्यात.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, पुढच्या अधिवेशनात नको. अजून 7 वाजण्यास वेळ आहे. तेव्हा माझी अर्ध्या तासाची चर्चा घेण्यात यावी.

**तालिका सभापती** : अजून 7 वाजण्यासाठी वेळ आहे हे कबूल असले तरी देखील आपण 7 वाजण्यापूर्वी चार अर्ध्या तासाच्या चर्चा संपविणार आहोत का ? जर 7.00 वाजेपर्यंत या चर्चा पूर्ण करणार असाल तर आपण त्या निश्चितपणे घेऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, कामकाज उरकून घेण्यासाठी करावयाचे असेल तर आमची हरकत नाही. पण या चर्चा येथे देण्यामागे सन्माननीय सदस्यांच्या काही भूमिका असतात. अशा वेळी त्या विषयांना न्याय दिला पाहिजे. त्यामुळे या चर्चा 10-15 मिनिटामध्ये पूर्ण होऊ शकत नाहीत. तेव्हा या अर्ध्या तासाच्या चर्चा उद्या घेण्यात याव्यात.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, माझी अर्ध्या तासाची चर्चा तरी घेण्यात यावी.

. . . .4 बी-3



APR/MAP/KGS 18:35

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : एक चर्चा ध्यावयाची आहे का ? पण त्यापूर्वी मी याठिकाणी सांगू इच्छिते की, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी अर्ध्या तासाची चर्चा आहे. त्या चर्चेसंबंधात त्यांनी असे सांगितले आहे की, त्यांनी माननीय राज्यमंत्र्यांबरोबर चर्चा केली असून, ती समाधानकारक झाली असल्यामुळे ही चर्चा आता कार्यक्रम पत्रिकेवरुन वगळण्यात येणार आहे.

तसेच सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनीही अर्ध्या तासाची चर्चा दिली होती. त्यासंदर्भात त्यांचे असे म्हणणे आहे की, हा विषय येथे उपस्थित करण्यात येऊ नये. त्यामुळे ती चर्चा सुध्दा आपण रद्द करु या.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (पुढे चालू...

आता या दोन्ही अर्धातासाच्या चर्चा रद्द झालेल्या आहेत. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांची अर्धातासाची चर्चा आहे. त्या चर्चेच्या संदर्भात त्यांनी चिठ्ठी पाठविलेली आहे,की, ही चर्चा आपण उद्या घेणार आहात काय ? यामुळे आता आपण सन्माननीय सदस्य श्री.तरे यांची अर्धातासाची चर्चा घेऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांची अर्धातासाची चर्चा उद्या घ्यायला हरकत नाही.

श्री.गणेश नाईक : माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे साहेबांच्या अर्धातासाचा विषय मोठा नाही त्यामुळे ती आता घ्यायला हरकत नाही.

श्री.विनोद तावडे (बसून) : विषय मोठा आहे. विस्ताराने मला तो मांडायचा आहे.

**तालिका सभापती** : आता आपण सन्माननीय सदस्य श्री.तरे साहेबांची अर्धातासाची चर्चा घेऊ.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे येथील औद्योगिक पट्ट्यातील कारखाने बंद असणे.

**मु. शी.** : " ठाणे येथील औद्योगिक पट्ट्यातील कारखाने बंद असणे", विषयावरील सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे, वि.प.स.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.अनंत तरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, "ठाणे येथील औद्योगिक पट्ट्यातील कारखाने बंद असणे", विषयावरील मी आपल्या अनुमतीने नियम 94 अन्वये पुढील विषयावर अर्धातास चर्चा उपस्थित करतो :-

"ठाणे येथील औद्योगिक पट्ट्यातील कारखाने छोट्या-मोठ्या कारणावरून परंतु येथील कामगारांच्या कोणत्याही मागण्या नसताना तसेच संप, काम बंद अशी आंदोलने नसताना या मालक वर्ग आपले कारखाने धडाधड बंद करीत असल्याने कामगारांवर आलेली उपासमारीची पाळी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

सभापती महोदया, ठाणे हे महाराष्ट्रातील औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. परंतु आज त्या ठिकाणची भयावह परिस्थिती आहे. योगायोगाने कामगार मंत्री हे कामगारांचे नेते आहेत,ते फार मोठ्या युनियनचे प्रमुख होते, त्यामुळे त्यांना या गोष्टीची पूर्णपणे कल्पना आहे. सभापती महोदया, कंपनी बंद पडण्याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे ठाणे महानगरपालिकेच्या ॲक्ट्रॉयच्या संबंधात जाचक अटी आहेत, त्याचबरोबर दुसरे कारण असे की, औद्योगिक क्षेत्राला मिळणाऱ्या सुविधेमध्ये खंड पडलेला आहे. या औद्योगिक पट्ट्यातील जाचक अटीमुळे कंपन्या, कारखाने बंद पडलेले आहेत. कारखानदारांनी त्या संबंधात ठाणे महापालिकेवर मोर्चा काढून आयुक्तांना यासंबंधात निवेदनही दिलेले आहे. परंतु त्या संबंधाने काहीही झालेले नाही. आज त्या ठिकाणचे कारखाने बंद पडलेले आहेत. त्याचप्रमाणे सभापती महोदया, वाढते शहरीकरण होत आहे. जमिनीच्या किंमतीमध्ये फार मोठी प्रचंड भाववाढ झाल्यामुळे त्या ठिकाणी घरांची भाववाढ झालेली आहे, त्यामुळे देखील फरक पडलेला आहे. अशाप्रकारे एखादी कंपनी चालू ठेवून दोन वर्षात नफा होणार नाही, तो नफा दुसरीकडे कंपनी नेऊन करता येईल म्हणून कंपन्या बंद पडलेल्या आहेत. शहराचा विकास आराखडा मंजूर होत असतांना औद्योगिक क्षेत्र, रहिवाशी क्षेत्र, खुले क्षेत्र म्हणून विकास आराखडयामध्ये दाखविले जाते. परंतु त्या ठिकाणी 20 वर्षामध्ये झपाट्याने औद्योगिकरण होत असतांना औद्योगिक क्षेत्राचे रुपांतर रहिवाशी क्षेत्रामध्ये करण्याचा सपाटा लावलेला आहे. मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे (पुढे चालू....

औद्योगिक क्षेत्राचे रुपांतर निवासी क्षेत्रामध्ये करावयाचे असेल तर तसा प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेच्या महासभेमध्ये यायला पाहिजे. महासभेमध्ये चर्चा करुन तो ठराव ताबडतोब शासनाकडे पाठविला जात होता. पंरतु 1995 नंतर डी.सी. रुलमध्ये बदल झाला, त्याप्रमाणे विकास नियमावलीमध्ये बदल होऊन यासंबंधीचा अधिकार मा.आयुक्तांना देण्यात आलेला आहे. कंपनी बंद पडते. पंरतु त्या ठिकाणचे लोकप्रतितनधी आमदार, नगरपालिकेला त्याची माहिती नसते. नंतर कर्मचारी त्या ठिकाणच्या लोकप्रतिनिधींना येऊन भेटतात आणि सांगतात की, आम्हाला पैसे मिळालेले नाहीत. मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की. इंडियन लीड या कंपनीमधील कर्मचाऱ्यांचे पैसे तीन वर्षांनी मी मिळवून दिले, त्यानंतर कोरस प्रा. लि.या कंपनीच्या कर्मचाऱ्यांना चार वर्षांनी पैसे मिळवून दिले. त्यानंतर शहा अनिमल कास्टींग ही कंपनी बंद पडली होती, त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांना 19 वर्षांनी पैसे मिळवून दिले. व्होल्टास, स्वीच गियर कंपनीमधील कर्मचाऱ्यांनाही तीन वर्षांनी पैसे मिळवून दिले. ज्या कंपन्या बंद पडलेल्या आहेत, त्यांची लिस्ट माझ्याकडे आहे, ती मी वाचून दाखवितो.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ प्रथम श्री. किल्लेदार... 18:45

श्री. अनंत तरे...

या ठिकाणी जवळ जवळ 209 कंपन्यापैकी 80 कंपन्या बंद पडल्या. सभापती महोदया त्यातील काही कंपन्याची नांवे मी आपल्या माहितीसाठी वाचून दाखवितो. मे.कन्सॉलिडेटेड मिल्स सप्लायर्स प्रा. लि., राजेंद्रकुमार एल. राधाकृष्णन मेहता, रिगल किमेटेक्स लि., मे. डॉन मिल कंपनी लि., केम्पल इंजिनियरींग प्रा. लि.,मे.राजदीप पॉलीफरेशन प्रा.लि., एच.आर.जॉन्सन, कॅडबरी इंडिया लि., मे. रॉकालेट को. ऑप. हौ. सो.लि., मे. युनायटेड वायर रोप्स प्रा. लि.,मे. युनायटेड वायर रोप्स प्रा. लि., मे. गोल्डन डाईज, मे. मेटल कास्टींग, नितीन कास्टींग कं.लि., मे. ग्लोब इंडस्ट्रीज प्रा.लि., मे. रायको प्रा. लि., कॅमलिनी आशर, मे. ॲनालाईज डायस्फूस ॲन्ड फार्मासिटयुकल्स कं.प्रा.लि., मे. कोरस इंडिया लि., निरजंन के. खन्ना, मे. नवजीवन इंडिया कॉर्पोरेशन, मे. प्लाटा स्टील इंडस्ट्रीज, मे.आर.पी.जी. केबल, (अडथळा) यातील काही नावे वाचून मी ही नावे सभागृहाच्या पटलावर ठेवतो. मे.इनार्को प्रा. लि., मे. बी.आर.टी. लि., मे. डब्ल्यु. जी फोर्ज, प्रफुल्लचंद्र मंगलदास शहा, एक्स्लो मशिन टूल्स,बॉम्बे वायर रोप्स प्र..लि., एफ. जी. पी., श्री. रसीकलाल जयंतीलाल वाडीया,महालक्ष्मी इस्पात, हरीलाल वृजराज मोदी व इतर, इंडियन हयूम पाईप कंपनी लि., एशियाटीक गॅसेस कं.अशा सबंध 209 कंपन्या बंद पडल्या आहेत. अशा प्रकारे कंपन्या बंद पडल्यामुळे शासनाचा सेल्सटॅक्सच्या माध्यमातून मिळत असणारा महसूल कमी झाला. स्थानिक स्वराज्य संस्थाना ठाणे महानगरपालिकेकडून ऑक्ट्रायच्या माध्यमातून मिळणारा पैसा बंद झाला आणि सगळयात दु:खद गोष्ट म्हणजे, त्या ठिकाणचा कामगार वर्ग उध्वस्त झाला.त्या ठिकाणी शासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज होती. सभापती महोदया, मी सभागृहाच्या माहितीसाठी काही आकडे वाचून दखवितो. ठाणे मॅन्युफॅक्चरर्स संघटनेच्या मोठया कंपन्या होत्या. 669 कपन्या होत्या त्यापैकी 175 कंपन्या बंद पडल्या आणि 50 कंपन्या आजारी आहेत. हे जून, 2001 चे आकडे मी सांगत आहे. ठाणे लघुउद्योग संघटनाचे छोटे-मोठे एकूण 4000 कारखाने होते त्यामधील 1600 कारखाने बंद पडले. मी फक्त ठाण्यापुरतेच बोलत आहे. संपूर्ण ठाणे जिल्हयातील सांगत नाही. हे 2001 चे आकडे सादर केलेले आहेत. आज 2005 साल सुरु आहे. कामगार मंत्रिमहोदयांकडे यासंबंधीचे डिटेल्स असतील. सभापती महोदय, या कंपन्यांमध्ये कर्मचारी काम करीत असतांना ऑल ऑफ ए सडन कंपनी बंद पडते, टाळेबंदी येते आणि कर्मचा-यांना

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे...

पगार मिळत नाही. त्यांची राहिलेली कायदेशीर देणी सुध्दा मिळत नाहीत. वारंवार औद्योगिक कोर्टात आणि उच्च न्ययालयात जाणे कर्मचा-यांना परवडत नाही. युनियनचे काम कंपनी बंद पडल्यानंतर थांबते आणि अशा प्रकारे कामगारांना त्यांची हक्काची देणी न मिळाल्यामुळे त्यांची उपासमार सुरु झाली.मी या ठिकाणी माननीय कामगार मंत्र्यांना धन्यवाद देईन. मी हिंदकन्टेरची केस आणली होती. श्री. सुशीलकुमार शिंदे साहेब मुख्यमंत्री असतांना एक चांगला निर्णय त्यांनी घेतला. जो पर्यंत कर्मचा-यांची देणी दिली जात नाहीत तोपर्यंत कुठच्याही विकासाला परवानगी देऊ नये. पण या पूर्वी ज्यांनी परवानगी घेतली आहे त्यांचे काय? हिंदकन्टेनर ही कंपनी 13 वर्षापूर्वी बंद पडली.1991 साली औद्योगिक न्यायालयाने निर्णय दिला की, 1 कोटी 64 लाख रुपये कर्मचा-यांना अदा करावे परंतु त्या ठिकाणी त्या कंपनीच्या मालकाने आणि बिल्डरने संगनमत करुन हायकोर्टातून ऑर्डर मिळवली आणि कर्मचा-यांचे पैसे दिले नाहीत. त्या ठिकाणी बांधकाम सुरु झाले. ते बांधकाम पूर्णत्वास आले आणि केवळ ॲक्युपेशन सर्टिफिकेट घेणे बाकी होते, ते मिळविण्यासाठी बिल्डरने घाई केली. मी त्याठिकाणी म्युनिसिपल कमिशनरला सांगितले की,त्यांना असे ॲक्युपेशन सर्टिफिकेट देऊ नका. त्यावेळी त्यांनी सांगितले की, कामगार आयुक्तंनी आम्हाला असे पत्र दिलेले आहे की, कामगारांचे सूपर्ण पैसे आम्ही दिलेले आहेत. पैस न देता सुध्दा अशा प्रकारचे सर्टिफिकेट त्यांना देण्यात आलेले होते. ही बाब मी कामगार मंत्र्यांच्या निदर्शनास आणली. त्यांनी अतिशय घाईगर्दीने हा प्रश्न हाती घेतला आणि माननीय आयुक्तांना फोन करुन लगेचच दुस-या दिवशी कामगार आयुक्तांना बोलावून त्यांनी दिलेले पत्र विथड्रॉ करायला लावले.

यानंतर श्री. बरवड ....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे ....

उद्या जर त्या कंपन्यांच्या माध्यमातून उभ्या राहिलेल्या इमारतीला ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाले असते तर त्या कर्मचाऱ्यांची देणी कोणी दिली असती ? आता त्या ठिकाणी ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळणार नाही परंतु हे काम इथेच थांबत नाही. त्या बिल्डरला कोठेही ऑक्युपेशन सर्टिफिकेटची गरज भासत नाही. ते त्यांच्या पाण्याची व्यवस्था कोठून तरी करुन घेतात. अगोदर असलेल्या पाण्याच्या कनेक्शनच्या माध्यमातून त्यांना पाणी मिळत असते. त्यामुळे त्यांना ऑक्युपेशन सर्टिफिकेटची गरज भासत नाही. त्यामुळे हिंद कंटेनर्सला त्या माध्यमातून पाणी मिळते, त्यांना विजेचे कनेक्शन मिळालेले आहे. त्यांना महापालिकेच्या ऑक्युपेशन सर्टिफिकेटची गरज नाही. आज 13 वर्षापासून त्यांचे 1 कोटी 64 लाख रुपये प्रलंबित आहेत. आज हे पैसे त्यांना मिळावयास पाहिजेत. 13 वर्षे त्यांनी जे काम केले त्या कामाची कायदेशीर देणी न देता त्या ठिकाणी इमारती उभ्या राहिल्या, व्यापारी संकुले उभी राहिली पण त्या ठिकाणी न्याय देण्याची कोणतीही व्यवस्था शासनाकडे नाही. मी विनंती करीन की, ज्या 209 कंपन्या बंद पडलेल्या आहेत, काहींना एमआयडीसीने पाणी पुरविलेले आहे. ज्या कंपन्या बंद पडलेल्या आहेत, ज्या ठिकाणी औद्योगिक वापर बंद झालेला आहे त्या ठिकाणचे पाण्याचे कनेक्शन आपण तोडावयास पाहिजे. ते पाण्याचे कनेक्शन घेऊन त्या ठिकाणी जे काम सुरु आहे त्या कामाला पाणी वापरतात. त्यांना महापालिकेच्या ऑक्युपेशन सर्टिफिकेटची गरज भासत नाही. आपल्या या धोरणामुळे ते कर्मचाऱ्यांची देणी देऊ शकणार नाहीत. शासनाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. एका शहरामध्ये औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्यासाठी शासनाने विकास आराखडा मंजूर केला असेल तर त्यामध्ये कमीतकमी 20 वर्षे कोणताही बदल होऊ नये. डी.सी. रुल्समध्ये बदल करण्याचे अधिकार ठाणे महापालिकेच्या महासभेला होते ते अधिकार काढून घेतलेले आहेत. ठाणे महापालिकेने पुन्हा एकदा असे अधिकार मिळावेत आणि डी.सी. रुल्समध्ये बदल करण्याचा प्रस्ताव मान्य केला होता परंतु तत्कालीन आयुक्त श्री. के. पी. बक्षी यांनी शासनाला विनंती केली आणि तो ठराव खंडित केला. सन 2002 मध्ये ठाणे महापालिकेने औद्योगिक क्षेत्र निवासी क्षेत्रामध्ये बदलण्याचा अधिकार ठाणे महापालिकेला मिळावा म्हणून शासनाकडे अर्ज केला. आज दोन वर्षे झाली तरी त्यावर कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला नाही. माझी अशी मागणी आहे की, अशा प्रकारच्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. अनंत तरे ....

औद्योगिक क्षेत्रामध्ये कमीतकमी 20 वर्षे बदल करण्यात येऊ नये आणि जर बदल करावयाचा असेल तर पूर्वी विकास नियमावलीमध्ये जे अधिकार ठाणे महापालिकेला होते तसे अधिकार ठाणे महापालिकेला पुन्हा देण्यात यावेत. त्याचबरोबर त्या ठिकाणी जे जे औद्योगिक क्षेत्र बंद पडलेले आहेत त्या औद्योगिक क्षेत्रामध्ये निवासी किंवा व्यापारी संकुल उभे करावयाचे असेल तर त्यासाठी त्या ठिकाणी जोपर्यन्त कर्मचाऱ्यांचे पैसे पूर्णपणे दिले जात नाहीत, त्यांची कायदेशीर देणी देत नाहीत तोपर्यन्त शासनाने कोठेही विकासाला परवानगी देऊ नये. त्या ठिकाणी जे पैसे बाकी आहेत ते पैसे व्याजासह मिळावे अशा प्रकारचा कायदा करण्याची गरज आहे. आज शासनाने निर्देश दिलेले आहेत. उद्या त्या निर्देशाच्या विरोधात एखादा बिल्डर जर कोर्टात गेला तर कदाचित न्याय मिळू शकणार नाही. म्हणून अशा प्रकारचा कायदा करण्याची गरज आहे. त्याचबरोबर त्या ठिकाणी औद्योगिक क्षेत्रात ज्या छोटयामोठया कंपन्या आहेत त्या बंद पडतात. त्या ठिकाणी त्यांच्यावर कंपल्शन करावयास पाहिजे की, जर एखादा धंदा चालत नसेल, उद्योग चालत नसेल तर त्या ठिकाणी त्यांना व्यापार उद्योग सुरु करण्याचे बंधन आणले पाहिजे. मी या चर्चेच्या माध्यमातून विनंती करीन की, ठाणे शहर आणि ठाणे जिल्हयामध्ये जे काही औद्योगिक क्षेत्र निर्माण झाले होते आणि औद्योगिक जिल्हा म्हणून ठाणे जिल्हयाकडे पाहिले जात होते, त्या जिल्हयातील औद्योगिक क्षेत्र फार कमी झालेले आहे. त्या ठिकाणी काम करण्यासाठी कामगार आहेत परंतु त्यांना काम देणाऱ्या कंपन्या नाहीत. या कंपन्या चालू राहण्यासाठी शासनाने निश्चित धोरण ठरविले पाहिजे. ज्या छोटयामोठया सवलती इतर राज्यांमध्ये मिळतात त्या आपल्या राज्यामध्ये निर्माण करण्याची गरज आहे. मी माननीय कामगार मंत्रिमहोदयांकडे दोन-तीन मागण्या करतो. सभापती महोदया, मी या ठिकाणी फक्त दोन तीन गोष्टींची मागणी आपल्या माध्यमातून करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत तरे....

ठाणे महानगरपालिकेच्या डेव्हलपमेंटच्या नियमामध्ये जे औद्योगिक क्षेत्र दाखविले आहे, जे निवासी क्षेत्र दाखविले आहे ते त्या महापालिकेने त्या शहराचे निवासी क्षेत्र लक्षात घेऊन नागरी सुविधांची आखणी केलेली आहे. ती तेवढयापुरतीच केलेली आहे. आज नागरी क्षेत्र वाढले आहे त्यामुळे नागरी क्षेत्रावर ताण पडणार आहे, ड्रेनेज सिस्टिम अपुरी पडणार आहे, पिण्याचे पाणी कमी पडणार आहे. त्याठिकाणी रस्ते तयार केले आहेत ते त्याठिकाणचे निवासी क्षेत्र लक्षात घेऊन केलेले आहेत. त्यामुळे संपूर्ण औद्योगिक क्षेत्रावर, त्या शहरावर ताण पडणार आहे. जे औद्योगिक क्षेत्र आहे ते नवीन नवीन करु नये. एखाद्याला कंपनीच्या जागेवर विकास करावयाचा असेल तर त्या विकासकाला कर्मचा-यांचे वेतन व कायदेशीर देणी आहेत ती व्याजासह मिळाली पाहिजेत यासाठी कायदा करावा आणि जे औद्योगिक क्षेत्र बंद पडत आहे त्याठिकाणी औद्योगिक क्षेत्र उभे करावे, त्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ MHM/ SBT/

श्री.गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.अनंतराव तरे यांनी पोटतिडीकीने हा विषय उपस्थित केलेला आहे. त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये औद्योगिकदृष्टया अग्रेसर असलेला जिल्हा आहे. या जिल्हयाला औद्योगिकदृष्टया अनन्यसाधारण महत्व आले होते. परंतु एकूणच जागतिकीकरण, केंद्र सरकारची धोरणं आणि खुली स्पर्धा यामुळे बरेच कारखाने बंद पडले. तसेच ठाणे महापालिकेचा जकात कर हे सुध्दा त्याला कारणीभूत ठरलेले आहे. सभापती महोदया, ठाणे शहरामध्ये 9128 लघुउद्योग होते त्यापैकी 3272 उद्योग बंद पडले. त्यामुळे 7128 कामगार बेकार झाले. कारखाना अधिनियमाखाली ठाणे जिल्हयामध्ये नोंद केलेले कारखाने 9500 आहेत आणि त्यात कामगारांची संख्या 4 लाख आहे. बंद पडलेल्या मोठया कारखान्यांची संख्या 78 असून त्यामुळे 8636 कामगार बेकार झाले आहेत. त्यापैकी 32 कारखान्यांनी त्यांच्या कामगारांची पूर्ण देणी दिलेली आहेत आणि 3731 कामगारांनी ती मिळालेली आहेत. ही रक्कम साधारणपणे 40 ते 45 कोटी आहे. देणी न दिलेल्या कारखान्यांची संख्या 46 आहे. एक गोष्ट खरी आहे की, हे कारखाने बंद पडले असले तरी कॉल सेंटर्स, आयटीसारख्या नव्या उद्योगांची तेथे उभारणी होत आहे. ठाणे जिल्हयामध्ये अशा 48 आस्थापना आहेत. त्यामुळे 19500 लोकांना रोजगार मिळाला आहे. यामध्ये तरुण मंडळी काम करीत आहेत. ज्यांना नवीन काम मिळणार नाही परंतु घरी बसण्यासारखी परिस्थिती नाही असे लोक चिंतेमध्ये आहेत अशी खंत मा.सदस्य श्री.अनंत तरे यांच्या मनामध्ये आहे. त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, याच्यातील उद्योजक युजरमध्ये बदल करुन टॉवर्स, कमर्शिअल कॉम्प्लेक्स, मॉल्स बांधून आयुष्यभराची कमाई दुस-याच्या भावनांची कदर न करता कमवावी असा दृष्टीकोन स्वीकारत आहेत त्याला प्रतिबंध करावा असे मा.सदस्य श्री.अनंत तरे यांचे म्हणणे आहे. मी कामगार खात्याचा चार्ज घेतला त्यावेळी खात्याच्या वरिष्ठ अधिका-यांना बोलावून सांगितले होते की, राज्यसरकारची भूमिका कामगारांकडे झुकण्याची आहे. 51 टक्के कामगारांचे हित आणि 49 टक्के व्यवस्थापनाचे हित पाहिले जाईल. अशा परिस्थितीमध्ये एका घटकाने युजरमध्ये बदल करुन टॉवर्स, कमर्शिअल कॉम्प्लेक्स, मॉल्स बांधावयाचे ठरविले असेल त्यावेळी ते जोपर्यंत कामगारांची देणी देत नाहीत तोपर्यंत त्यांना ओ.सी.च नाही तर सी.सी. सुध्दा देण्यात येऊ नये.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KGS/ MHM/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 19:00

(श्री. गणेश नाईक पुढे सुरु......)

मा.सदस्य श्री. अनंत तरे यांनी सांगितलेली बाब खरी आहे. त्या उद्योगामध्ये पाण्याचे, लाईटचे रितसर कनेक्शन असेल, ड्रेनेज असेल, सिव्हरेज असेल आणि त्या सिस्टीमचा वापर करुन ओ.सी.ची वाट न पाहता टावर्स बांधून आपला कार्यभाग जे उरकत असतील अशा लोकांवर शासनाची निश्चितपणे नजर असून अशा लोकांचे इप्सित त्यांना साध्य करु दिले जाणार नाही. एक गोष्ट खरी आहे की, यामध्ये सगळयांचेच हात गुंतलेले आहेत. मला अतिशय दु:खद अंत:करणाने सांगावे लागते की, जे व्यासपीठावर कामगारांच्या, गरिबांच्या हिताच्या गोष्टी करतात त्यांचे पडमागे जे अंतस्त इरादे असतात ते कधी कधी माणुसकीला काळीमा फासणारे असतात. त्यामध्ये कधी कधी शासनाचाही काही भाग असतो आणि लोकप्रतिनिधींचा देखील भाग असतो. म्हणून अशा बुरखा पांघरणा-या लोकांना माझे स्पष्ट सांगणे आहे की, तुमची भूमिका एकदा स्पष्ट करा. जेव्हा सोयीचे असेल तेव्हा एक भूमिका घ्यायची आणि सोयीचे नसेल त्यावेळी दुसरी भूमिका घ्यायची, ही प्रवृत्ती बदलली पाहिजे. जे जीवन जगतात त्यांना पैशाचे मोल आहे. मनी पॉवर हे नशीबही आहे. परंतु कोणत्याही गोष्टी नैतिकतेने न करता केवळ पैशाच्याच मागे धावून पैसा उभा करायचा, अशा पध्दतीने जो कारभार चालला आहे तो कुठे तरी थांबला पाहिजे. मा.सदस्य श्री.अनंत तरे हे हाडाचे समाजसेवक आहेत. अशा सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीमध्ये त्यांनी हिरिरिने भाग घेतलेला आहे. मी मागे पर्यावरण मंत्री असताना इंडियन लिड कंपनीचा प्रश्न त्यांनी धसास लावला आणि त्या कंपनीतील कामगारांना त्यांनी न्याय मिळवून दिला. हिंद कंटेनरच्या कामगारांना त्यांनी न्याय मिळवून दिला. शासनाचे अधिकारी, प्रतिनिधी आणि सो-कॉल्ड समाजसेवक यांचे जे अशा प्रकारचे मिलीज्युलीभगत धंदे चालले आहेत ते रोखण्यासाठी मा.सदस्य श्री. अनंत तरे यांच्यासारख्या जागृत लोकप्रतिनिधींची गरज आहे. हा विषय याठिकाणी उपस्थित केल्या बद्दल मी मा.सदस्य श्री. अनंत तरे यांचे मनापासून कौतुक करतो. अशा लोकांचे इरादे शासन कधीही पूर्ण होऊ देणार नाही, त्या लोकांना शासन प्रतिबंध करील. भविष्य काळामध्ये उद्योगाच्या अनुषंगाने कामगार प्रतिनिधी आणि लोकप्रनिधी यांना घेऊन परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा निश्चितपणे प्रयत्न करु. मा.सदस्यांनी युझर्स् चेंज करण्याला बंदी करावी असे सांगितले. हा धोरणाचा भाग आहे. याबाबतीत मी कोणतेही आश्वासन देऊ शकत नाही. पाण्याच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गणेश नाईक ...)

वापरासंबंधी मी सांगू इच्छितो की, त्यांनी जर रीतसर परवानगी न घेता पाण्याचा रेसिडेन्ससाठी वापर केला असेल तर ते पाण्याचे कनेक्शन तोडले जाईल. तशा प्रकारचे निदेश दिले जातील.

श्री. अनंत तरे : माननीय कामगार मंत्र्यांनी या संपूर्ण चर्चेचे समर्थन केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. युझर चेंज करणे हा धोरणात्मक निर्णय आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले., डीसी रुलमध्ये अशा प्रकारे चेंज करण्याची परवानगी द्यावी अशा प्रकारचा ठराव महानगरपालिकेने केलेला असून त्याबाबतचा निर्णय शासन स्तरावर दोन वर्षापासून प्रलंबित आहे. त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. अजूनही काही कर्मचा-यांचे पैसे 12-12, 19-19 वर्षे मिळालेले नाहीत. 19 वर्षापूर्वी तुमच्याकडे 20 हजार रु. असतील तर आज त्याची किंमत अडीच लाख रु. होते. पण आज त्या कामगारांना फक्त 20 हजार रु. मिळणार आहेत. म्हणून त्या कामगारांना व्याजासहीत पैसे मिळाले पाहिजेत असा प्रश्न मी उपस्थित केलेला होता.

श्री. गणेश नाईक : मा.सदस्य श्री. अनंत तरे यांच्या भूमिकेशी मी सहमत आहे. परंतु ती जमीन विकली गेल्या नंतर आर्थिक व्यवहारापोटी जर सफिशियन्ट रक्कम मिळाली तर या गोष्टीचा सुध्दा विचार करण्यास सांगितले जाईल.

श्री. अनंत तरे : कंपन्यांच्या जागेवर व्यापारी आणि निवासी संकुले उभी रहात आहेत. कंपन्यांच्या मालकांनी कामगारांना पैसे दिलेले नाहीत. या संकुलांची ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाल्यानंतर त्या कामगारांना कोणीच पैसे देऊ शकणार नाहीत. म्हणून ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळण्यापूर्वी पाण्याच्या कनेक्शनचे परमिशन, वीज कनेक्शनचे परमिशन, लिफ्टचे परमिशन अशा परमिशन्स घ्याव्या लागतात. ह्या परमिशन आपण थांबवाव्यात. नाही तर त्या कामगारांना कोणीही पैसे देणार नाही. म्हणून या संदर्भात आपण कारवाई करणार काय ?

श्री. गणेश नाईक : यापुढे कामगारांची देणी दिल्या शिवाय अशा त-हेच्या लिफ्टच्या संदर्भातील परमिशन, पाण्याचे कनेक्शन, इलेक्ट्रिक कनेक्शन दिले जाणार नाही. धनिक जर सफिशियन्टली स्ट्राँग असतील तर ती रक्कम व्याजासहीत देण्यासाठीही त्यांना भाग पाडले जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी ) :** अर्धा-तास चर्चा संपली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 13.4.2005 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 4 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 13.4.2005 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही